# माणूस



मार्च - १९६३

मूल्य : एक रुपया

वर्ष दुसरें : अंक दहावा

※

मार्च १९६३

※

: संपादक :
**श्री. ग. माजगांवकर**




## स्वरूपदर्शन


**राजकीय–सामाजिक**

योगभ्रष्ट : अन्नदाशंकर व इतर
सक्तीची लष्करभरती हा कॅन्सर आहे का ? : हरिश्चंद्र
मीं पाहिलेला लाल हुकूमशहा : रा. म. शास्त्री

**साहित्यविभाग**

**कथा** : अनंत मोरेश्वर ओक, अवनींद्रनाथ, प. त्रि. सहस्रबुद्धे
**ललित लेख** : मधुकर केचे, राजेंद्रसिंह बदी
**कविता** : शाम सोनारे, राम गोसावी, कुसुमानंद, पेट्रिक ढोके, लक्ष्मीकांत तांबोळी, सौ. इंदिरा कुलकर्णी
**समीक्षा** : चढण : तें माझें घर

**विविध विषय**

दीर्घायुष्य व कायाकल्प : पु. ना. ओक
पंडित भिडे (मुलाखत) : प्रतिनिधि
ला प्रेनुसा : दत्तात्रय गोविंद
१९६२ साल गाजविणारे चित्रपट : वसंत भालेकर
हिमालयाची हांक : अनंत भिडे
मोहित्यांची मंजुळा (परीक्षण) : रंगा मराठे

**मुखपृष्ठ** : शिशिरांतील पानझड–सुभाष संचेती

**सजावट** : दत्ता महाबळेश्वरकर


**सूचना**

१. कथासाहित्य किंवा लेख पाठवितांना सोबत टपालखात्याच्या नवीन नियमानुसार पुरेसें टपाल हंशील पाठवावें.
२. कविता पाठवितांना, कविता नापसंत ठरून ती परत हवी असल्यास पुरेसें टपाल हंशील पाठवावें.
३. नापसंत साहित्य जर परत नको असेल तर केवळ निर्णय कळविण्यास पुरेसें टपाल हंशील पाठविल्यास निर्णय कळविण्यांत येईल व असें साहित्य निकालांत काढलें जाईल.
४. प्रकाशित लेख, चित्रें इत्यादि बाबतचे सर्व हक्क स्वाधीन.
५. या मासिकांत व्यक्त झालेलीं मतें 'माणूस' मासिकाच्या चालकांचीं अधिकृत मतें असतातच असें नाहीं.

※

पत्रव्यवहाराचा पत्ता
**'माणूस'**
४१९ नारायण पेठ, पुणें २.

वार्षिक वर्गणी : आठ रुपये
किरकोळ अंक : एक रुपया



[ देश : १९ जानेवारी १९६३ मधून ]

# भारत नि कॉमनवेल्थ

' योगभ्रष्ट ' या पत्ररूपानं लिहिलेल्या दीर्घ लेखांत अन्नदाशंकर-बाबूंनीं एके ठिकाणीं असं म्हटलं आहे, कीं ' प्रश्न आहे तो चीनच्या सॉव्हरीनटीशीं मिळती-जुळती अशी तिबेटची एक स्टेटस. '
दुसऱ्या एके ठिकाणीं असं म्हटलं आहे, कीं ' इंग्रजांनीं आपल्या साम्राज्याला कॉमनवेल्थ असं नांव देऊन राणीला कॉमनवेल्थचं सर्वोच्च अधिकारी केलं आहे. परिणामीं, भारत, पाकिस्तान, सिलोन वगैरे प्रजासत्ताकांना पण डोमिनियन स्टेटसच्या माशाला सॉव्हरीनटीच्या पाल्याखालीं झांकून ठेवून एकाच वेळीं दोन्ही डगरी संभाळतां आल्या आहेत. चिनी लोक जर असेच हुशार असते तर त्यांना सुद्धां तिबेटला अशाच प्रकारें संतुष्ट ठेवतां आलं असतं. ' याचा अर्थ असा, कीं भारताच्या उत्तर-सीमेंत भारत अन् चीन खेरीज आणखी तिबेटलाहि भागीदार म्हणून घेण्याची त्यांची इच्छा आहे. अन् म्हणूनच तिबेट हें स्वतंत्र राष्ट्र आहे, असा त्यांचा विश्वास आहे. पण चीनच्या सॉव्हरीनटीच्या अधीनच हें असं स्थान ते तिबेटला कसं देऊं शकतात, हें अगदींच अस्पष्ट आहे. एकीकडे तिबेटचं स्वातंत्र्य अन् दुसरीकडे चीनची सॉव्हरीनटी या दोन परस्परविरोधी अवस्थांची कॉमनवेल्थ सारखी एखादी संस्था केली तर मिटमाट कशी काय होऊं शकेल, हें अन्नदाशंकरबाबूंनीं सविस्तर सांगितलं, तर भारत-चीन अन् तिबेटचाहि फायदा होईल.

शिवाय, माझा सर्वांत विरोध आहे तो दुसऱ्या उताऱ्याला. कॉमनवेल्थ म्हणजेच ब्रिटिश साम्राज्य, अशी त्यांची भूमिका आहे. पण ही भूमिका निव्वळ वैयक्तिक आहे, तें खरं नाहीं, ही गोष्ट घटनेचा थोडाबहुत अभ्यास केलेला कुणीहि अगदीं सहज सिद्ध करून देईल. भारताच्या बाबतींत हा विचार लागू पडत नाहीं, या चर्चेवर बारा वर्षांपूर्वीच पडदा पडला आहे. अन् तरीहि भारतीय घटनेच्या जन्माला बारा वर्षं उलटल्यावरहि हा भ्रम अन्नदाशंकरबाबूंच्या मनांत आला आहे. ' भारताला फक्त डोमिनियन स्टेटस मिळालं आहे, खरं स्वातंत्र्य मिळालेलं नाहीं ' — ही गोष्ट ऐकायला— विशेषतः या क्षणीं ऐकायला — कशी तरीच वाटते; ' ये आझादी झूटी है ' ही तथाकथित स्लोगनहि हास्यास्पद ठरून आतां हवेंत विरून गेली आहे. अन्नदाशंकरबाबूंच्या मतें कॉमनवेल्थ हें ब्रिटिश साम्राज्य आहे, म्हणून भारत हा ब्रिटिश साम्राज्याचा भाग आहे. असं असेल तर मग भारताचं स्वतःचं असं परराष्ट्रीय धोरण असूं शकणार नाहीं. सुएझच्या प्रकरणानंतर भारताचं स्वतःचं परराष्टीय धोरण समजायला कुणालाच कांहीं गैरसोय असणं बरं नाहीं. ऐक्याचं प्रतीक म्हणून भारतानं इंग्लंडच्या राजमुकुटाला कॉमनवेल्थचं सर्वाधिकारी मानलं आहे, यापेक्षां जास्त कांहीं नाहीं. इथं डोमिनियन स्टेटसच्या माशाला सॉव्हरीनटीच्या पाल्यानं झांकून ठेवलं आहे, असं ' योगभ्रष्ट ' लेखकाला कशाच्या आधारावर वाटतं ?

रणजित् चौधुरी

# युद्ध संयोजन आघाडी

□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□

'देश' या बंगाली साप्ताहिकाच्या ५ जानेवारीच्या अंकांत प्रसिद्ध झालेल्या श्री. अन्नदाशंकर राय यांच्या 'योगभ्रष्ट' या लेखाचें भाषांतर 'माणूस'च्या गेल्या अंकांत दिलें होतें. 'देश'च्या पुढील कांहीं अंकांतून या लेखावर उलटसुलट बरीच चर्चा झाली. या चर्चेची पातळी व स्वरूप मराठी वाचकांच्या ध्यानांत यावें म्हणून येथें या चर्चेतील पत्रें–उत्तरें सादर केलीं आहेत.

□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□

**लेखकाचें उत्तर**

कॉमनवेल्थच्या आंत असावं कीं बाहेर असावं यांतून कोणतीहि निवड करायचं संपूर्ण स्वातंत्र्य दिलं गेलं होतं. भारताप्रमाणेंच ब्रह्मदेशालाहि दिलं गेलं होतं. भारतानं कॉमनवेल्थच्या आंत असणं पसंत केलं. ब्रह्मदेशानं बाहेर राहणं पसंत केलं. भारत अन् ब्रह्मदेश– कुणीच कुणापेक्षां कमी स्वतंत्र नाहीं. कुणाचीच आझादी झूटी नाहीं. पण कॉमनवेल्थच्या आंत राहणं म्हणजेच कॅनडा नि ऑस्ट्रेलियाची स्टेटस स्वीकारणं. त्यांच्यासारखंच राणीला डोक्यावर बसवणं. राणी म्हणजे ब्रिटिश सरकार. त्यांच्या दृष्टीनं कॅनडा न् ऑस्ट्रेलिया हीं जर डेमिनियन्स असतील, तर भारत अन् पाकिस्तान हींहि डोमिनियन्सच आहेत. पण हा शब्द आपल्याला बरा वाटत नाहीं, म्हणून त्याच्या बदलीं कॉमनवेल्थ मेंबर असा शब्द वापरला जातो. ब्रिटिश सरकारच्या फॉरीन सेक्रेटरीला प्रधानमंत्र्याच्या खालोखाल मान असतो. डोमिनियन्स सेक्रेटरीला फॉरीन सेक्रेटरीइतका मान नाहीं. अलिकडे डोमिनियन्स सेक्रेटरीचें नांव कॉमनवेल्थ रिलेशन्स सेक्रेटरी असं ठेवण्यांत आलं आहे. परंतु म्हणून त्याचा मान कांहीं कमीजास्ती झालेला नाहीं.

मानापानाचा प्रश्न सोडून दिला, तर कॉमनवेल्थच्या प्रत्येक मेंबरला आपापली घटना आपल्याआपण तयार करायचा अधिकार आहेच. आंतरराष्ट्रीय व्यवहारांत पण कुणावर अवलंबून न राहिलं तरी चालतं. अंतर्गत काय किंवा आंतरराष्ट्रीय काय, कोणत्याच व्यवहारांत ब्रिटिश सरकार हस्तक्षेप करूं शकत नाहीं. पण आंतरराष्ट्रीय व्यवहारांत परस्परांशीं सल्लामसलत करावी लागते. ब्रह्मदेशावर असला कोणताच विधिनिषेध नाहीं. ब्रम्हदेश वाटल्यास इंग्लंडच्या शत्रूशीं मैत्री करूं शकतो–भारताला तसं वाटलं तरी करतां येत नाहीं. ब्रह्मदेश वाटल्यास इंग्लंडच्या मित्रांशीं शत्रुत्व करूं शकतो–भारताला तसं वाटलं तरी करतां येत नाहीं. ब्रह्मदेश वाटल्यास इंग्लंडविरुद्ध युद्ध पुकारूं शकतो–भारताला तसं वाटलं तरी करतां येत नाहीं. उलटपक्षीं भारतावर कांहीं संकट कोसळलं, तर इंग्लंड धांवून येऊन पाठीशीं उभं राहण्याची शक्यता आहे,–जसं परवां इंग्लंडनं शस्त्रास्त्रं पाठवून दिलीं, अन् पैसे घेतले नाहींत. ब्रह्मदेशाच्या बाबतींत कांहींएक करारमदार नसतांना इंग्लंडनं असं केलं असतं का? एक गोष्ट बरी आठवली, सिलोनला प्रजासत्ताक म्हणण्यांत माझी चूक झाली आहे.

अन्नदाशंकर राय

**[ देश : २६ जानेवारी १९६३ मधून ]**

गेल्या आठवड्याच्या 'देश'च्या अंकांत कामनवेल्थ नि भारत यांच्यांतील संबंध सविस्तर सांगतांना श्री. अन्नदाशंकर राय यांनीं कांहीं मुद्दे मांडले आहेत. त्यामुळं खऱ्या सत्याचा अपलापच झाला आहे. अन्नदाबाबूंचा मुद्दा असा : कॉमनवेल्थच्या आंत राहणं म्हणजेच कॅनडा नि ऑस्ट्रेलियाची स्टेटस स्वीकारणं. त्यांच्यासारखंच राणीला डोक्यावर बसवणं.

नाहीं; रिपब्लिक भारतानं कॉमनवेल्थचं सभासद होतांना कॅनडा-ऑस्ट्रेलियासारखी स्टेटस स्वीकारलेली नाहीं.

पाहा–१९४९ सालच्या २७ एप्रिल रोजीं केलेली कॉमनवेल्थ प्रधानमंत्र्यांच्या बैठकींतली घोषणा. या घोषणेंत भारताची वेगळी स्टेटस मान्य करवून घेतली आहे. राजाला (किंवा राणीला) भारतानं स्वतंत्र नि स्वेच्छापूर्वक सहकार्याचं 'प्रतीक' म्हणूनच केवळ मान्यता दिली आहे.

घोषणेंत असं म्हटलं आहे :–

, India accepts the King as the symbol of the free association of the independent member nations and, as such, the head of the Commonwealth.'

भारताच्या मते इंग्लंडचे राजा अन् राणी फ्री अॅसोसिएशनचे प्रतीक म्हणूनच कॉमनवेल्थचे हेड. क्राऊनशी भारताचा कोणत्याच प्रकारचा सेवकभाव नाही. इतर बिन-रिपब्लिक सभासद-राष्ट्रं क्राउनचे सेवक आहेत.

ही घोषणा भारतीय लोकसभेच्या १६ मे १९४९ च्या बैठकीत मान्य केली गेली होती.

अन्नदाबाबूनी असं लिहिलं आहे, की 'ब्रह्मदेश वाटल्यास इंग्लड-विरुद्ध युद्ध पुकारूं शकतो – भारताला तसं वाटलं तरी करतां येत नाही.'

हे बरोबर आहे. जोंपर्यंत भारत कॉमनवेल्थचा सभासद म्हणून राहील, तोपर्यंत भारताला इग्लडविरुद्ध युद्ध पुकारता येणारच नाही. पण ह्यामुळं भारत कोणत्याहि प्रकारे इग्लंडच्या अधीन आहे, असं होत नाही. इंग्लड तरी भारताविरुद्ध युद्ध पुकारू शकते का ? नाही. ह्यामुळंहि असं सिद्ध होत नाही, की आपण कोणत्याहि प्रकारे भारताच्या अधीन आहोंत, असं इग्लडनं मानलं आहे.

संजीव चौधुरी

एकोणीस जानेवारीच्या 'देश'च्या अकांत प्रसिद्ध झालेल्या पत्रांत अन्नदाबाबूनी आपलें मत वुद्धिग्राह्य म्हणून लादायला पाहिलं आहे. ब्रिटिश सरकारच्या कोणत्या खात्याचं नाव बदलून तें काय झालं– यानं काहीच विघडत नाही. खरा प्रश्न हा आहे, की कॉमनवेल्थच्या सभासद-राष्ट्रांशी इंग्लडचा सबंध काय आहे ? सभासद-देशांनी सामान्य समस्यांची चर्चा करण्याकरतां म्हणूनच कॉमनवेल्थ टिकवून ठेवण्यांत आलं आहे. अन् तें टिकून आहे म्हणूनच इंग्लंडच्या बाजारपेठांत आपापला व्यापारी माल विकण्याकरतां कॉमनवेल्थमधल्या देशाना कांही सवलती मिळत आहेत.

'आंतरराष्ट्रीय व्यवहारात परस्पांशी सल्लामसलत करावी लागते' या अन्नदाबाबूंच्या म्हणण्याला कांही आधार नाही. आतरराष्ट्रीय व्यवहारांत असली सल्लामसलत क्वचितच होते. सुएझवर आक्रमण करायच्या वेळेला काय ब्रिटननं भारताशीं सल्लामसलत केली होती ? की गोवा घ्यायच्या आधीं भारतानं ब्रिटनशीं सल्लामसलत केली होती ? अन् परवांच राष्ट्रसंघांत अंगोला नि दक्षिण ऱ्होडेशियाचा प्रश्न निघाला तेव्हां ? कटांगाच्या प्रश्नावर भारत अन् राष्ट्रसंघाच्या धोरणाशीं इंग्लंडचं धोरण सरळ विरोधी नाहीं का ? राष्ट्रसघात इंग्लडन भारताच्या विरुद्ध नि भारतानं इंग्लडच्या विरुद्ध कितीतरी वेळां मतदान केलं आहे, हें तर सगळ्यानाच माहीत आहे.

'ब्रह्मदेश वाटल्यास इंग्लडच्या शत्रूशी मैत्री करू शकतो–भारताला तसं वाटलं तरी करतां येत नाही' हा निःसशय भारताच्या परराष्ट्रीय धोरणावर प्रहार आहे. आक्रमण झालेल्या इजिप्तची बाजू घेऊन भारतानं आक्रमण करणाऱ्या इंग्लंडच्या विरुद्धच आचरण केलं नाही काय ? पत्रलेखकानं ह्या घटनेचा उल्लेखहि केला होता. पण तरी-सुद्धां आपलं म्हणणं वेगळ्या रीतीनं माडलं पाहिजे, असं अन्नदाशंकरबाबूंना वाटलेलं नाही. परत 'ब्रह्मदेश वाटल्यास इग्लडच्या मित्रांशीं शत्रुत्व करूं शकतो– भारताला तसें वाटलें तरी करतां येत नाहीं'– हे विधान पण टिकत नाही. पोर्तुगाल इंग्लंडचं सर्वांत जुनं मित्रराष्ट्र अन् अवघ्या एकाच वर्षामागें गोवा मिळवून भारतानं इग्लंडचं शत्रुत्व संपादन केलं होतं. भारतानं केलेली गोवामुक्ति ही काय इतकी तुच्छ घटना आहे का, कीं ती एकाच वर्षांत विसरून जातां यावी ? इंग्लंड अन् कॉमनवेल्थची सभासद-राष्ट्रं याच्यात काही बाधील सबंध असता, तर आता पाक-चीन मैत्रीचा करार होऊं शकला नसता.

या वेळी जसं धांवून येऊन इंग्लंडनं भारताला शस्त्रास्त्रं दिली आहेत, अगदी तशीच शस्त्रास्त्रांची आणि इतर मदत अमेरिकेनं दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी रशियाला केली होती. अन् त्याच्या किती-तरी नंतर मग करार झाला. ह्याहि वेळी अमेरिकेन भारताला अशीच मदत केली आहे अन् या मदतीचं प्रमाण इंग्लडनं दिलेल्या शस्त्रास्त्रांच्यापेक्षां कितीतरी पटीनं जास्त आहे. सकटाच्या काळात एक मित्रराष्ट्र दुसऱ्या मित्रराष्ट्राला मदत करीतच असतं. ब्रह्मदेशांतली कम्युनिस्टांची बडाळी मोडण्याकरिता भारतानं देखील थाकिन नू यांच्या सरकारला शस्त्रास्त्रांची मदत केली होती.

भारताचं कॉमनवेल्थमधें राहणं अन् ब्रह्मदेशाचं न राहणं– याचं कारण संपूर्णपणें आर्थिक आहे. इंग्लंड हें अजुनी भारताच्या व्यापारी मालाचं सर्वांत मोठं गिऱ्हाईक आहे अन् भारत कॉमनवेल्थचा सभासद असल्यामुळं भारताचा जवळजवळ सगळा माल जकात भरायला न लागता इग्लडमध प्रवेश करतो. इंग्लंडच्या बाजारात विकण्याजोगा काहीच माल ब्रह्मदेशाजवळ नाही. त्यामुळ ह्या संधीचा त्यानं फायदा घेण्याचा काही प्रश्नच नव्हता. ही गोष्ट अन्नदाशंकरबाबूंना माहीत नसावी. म्हणूनच त्याच्या हातून अशी चूक झाली आहे.

तिबेटच्या बाबतीत अन्नदाशंकरबाबूंच्या म्हणण्यावर पत्रलेखकानं जे प्रश्न उपस्थित केले होते, त्यांबद्दल ते अगदी गप्प आहेत. कॉमन-वेल्थमधल्या देशाशी ब्रिटनचा जो सबध आहे, तोच सबंध तिबेटशी चीनचा असेल, तर मग भारताशी इग्लंडचा जो संबध आहे, तोच संबंध तिबेट अन् चीन याच्यामधें प्रस्थापित व्हावा, एवढ्याकरिता अन्नदाशंकरबाबू लेखणी हातात घरतील काय ?

निरंजन हालदार

[ देश : ९ फेब्रुवारी १९६३ मधून ]

'देश' मधें श्रद्धेय अन्नदाशकर राय यानी भारत अन् कॉमन-वेल्थ याच्यासबंधी जे विचार मांडले आहेत, तो 'तो खऱ्या सत्याचा अपलाप' आहे असं कांही पत्रलेखकांनी लिहिलं आहे. श्री. राय यानी आपल्या लेखात थोडक्या शब्दांत भारताशी असलेलं इंग्लंडच्या संबंधावर प्रकाश टाकला आहे. हा संबंध भारताला खरोखरीच मानहानिकर आहे, ही गोष्ट अन्नदाशकराच्या टीकाकारानी कबूल केली नाही, तरी त्यामुळें कायद्याच्या अर्थात कानामात्रेचाहि बदल होईल असं वाटत नाही. ज्या कायद्यांच्या बंधनान भारत कॉमन-वेल्थशी जडलेला आहे, त्या बधनाची एकदोन अंगं वाचकाच्या समोर माडली म्हणजे अन्नदाशकरानी 'आपलं मत वुद्धिग्राह्य म्हणून लादायला' पाहिलेलं नाहीं, हें स्पष्ट होईल.

[ पान ६१ वर चालू ]

# सक्तीची सैन्यभरती

# हा कॅन्सर आहे काय?

हरिश्चंद्र

भारतावर चीनचे आक्रमण झाल्यावर देशात सैनिकीकरणाच्या कार्यक्रमाविषयीं एक विलक्षण औत्सुक्य निर्माण झालें. आजवर अहिंसेची जपमाळ ओढणाऱ्या नेत्याच्या मुखातून क्षात्रवृत्तीची रणगीते जेव्हां एकाएकी बाहेर पडूं लागली तेव्हा काळाचा महिमा अगाध आहे असेच उद्गार काढण्याची सर्वसामान्य माणसावर पाळी आली. एका दृष्टीनें संरक्षणाविषयी ही जागृति योग्यच असली तरी सैनिकीकरणाचा अतिरेकी व एकांगी विचार हा मूळ उद्दिष्टालाच धोका पोहोचवितो हें ऐतिहासिक सत्यहि दृष्टिआड करतां येत नाही. चीनप्रमाणे 'नागरी सेना' उभारा, कुटुंबागणिक एक तरुण तरी सैन्यात पाठवा, भारतीय सैन्याची पुनर्घटना करण्यासाठी ऐच्छिक सैन्यभरतीच्या आजवरच्या परंपरागत धोरणाला चिकटून न राहतां सैन्यभरती सार्वत्रिक नि सक्तीची करा अशा सूचना आजच देशातील विचारवंत मंडळीकडून मांडल्या जात आहेत. सूचना करण्यामागील देशभक्तीची प्रामाणिक भावना जरी मान्य केली तरी त्या कार्यवाहीत आणताना अनेक धोके संभवतात, त्याचाहि वेळीच विचार होणें अवश्य आहे. यासाठीच गेल्या दोन महायुद्धाचा अनुभव असलेल्या कॅ. लिडेल हार्ट* ह्या पाश्चात्य रणधुरंधराचे सक्तीच्या सैन्यभरतीवरील (conscription) साधकबाधक विचार पाहणें उद्बोधक ठरेल. लिडेल हार्ट म्हणतो —

* कॅ. बी. एच्. लिडेल हार्ट : डिफेन्स ऑफ दि वेस्ट.

### सैन्यभरतीचे संकल्पित लाभ

सकृद्दर्शनी पाहतां सक्तीची सैन्यभरती हाच राष्ट्ररक्षणाचा सर्वोत्तम उपाय असें वाटतें, कारण त्यापासून राष्ट्राला अनेक लाभ होतात असें दिसतें. उदाहरणार्थ, ज्या ज्या देशांत लोकशाही पद्धतीने राज्यकारभार चालतो तिथें 'सर्वांना समान संधी' ह्या तत्त्वाला प्राधान्य असतें; आणि वयांत आलेल्या सर्वांना राष्ट्ररक्षणाची समान संधी केवळ सक्तीच्या सैन्यभरतीमुळेच लाभते. म्हणून लोकशाहीवर निष्ठा असलेली राष्ट्रे स्वेच्छेनें होणाऱ्या सैन्यभरतीपेक्षां सक्तीने सैन्य उभारण्याचा पुरस्कार करतात.

तसेंच, जिथें केवळ लढाऊ जातीतूनच सैन्यभरती केली जाते, तिथें शस्त्रास्त्रविद्या नि युद्धकला त्या विशिष्ट जातीच्या लोकाची मक्तेदारी होते, नि त्यामुळें त्याच्याकडून ती रणविद्या केवळ आपल्या जातीच्या स्वार्थसंपादनार्थ वापरली जाण्याचा धोकाहि संभवतो. परंतु सैन्यभरती सक्तीनें केली गेल्यास ही युद्धविद्या त्या विशिष्ट जातीच्या हातीच न राहतां, देशांतील योग्य वयाच्या सर्व नागरिकाना ती आत्मसात् करता येते, नि ओघानेच त्या विशिष्ट जातीकडून होऊं शकणाऱ्या तिच्या दुरुपयोगाला मोठा आळा बसतो म्हणून राष्ट्रहितदृष्ट्या लोकशाहीच्या तत्त्वास धरून असलेली सक्तीची सैन्यभरतीच अधिक चांगली वाटते.

दुसरें कारण असें की, वयांत आलेल्या सर्वांची सैन्यात सक्तीनें भरती केली गेली म्हणजे त्याच्या अंगीं आपोआप शिस्त बाणते नि त्यासवेच त्यांना आपल्या राष्ट्राची नि पूज्य मातृभूची सेवा करण्याची प्रेरणाहि मिळू शकते.

तिसरें, सैन्य-उभारणीच्या स्वेच्छामूलक नि सक्तिमूलक ह्या दोन पद्धतींपैकी सक्तिमूलक पद्धतीने नोंदल्या जाणाऱ्या सैन्याच्या वेतना-

साठीं लागणारा पैसा त्यांच्या संख्येच्या मानानें कमी लागतो, कारण वेतनश्रेणीच्या कुठल्याहि अटीवांचून गुणी नि अंगीं तात्त्रिक पात्रता असलेली अशी चागली माणसें सैन्याला सहज मिळू शकतात. म्हणून, तौलनिक दृष्ट्या स्वस्त भासणारी सक्तिमूलक सैन्यभरतीच अधिक चांगली, असें मानलें जातें.

आणि सक्तिमूलक सैन्य-उभारणीच्या समर्थनपर सर्वांत मोठें कारण म्हणजे केवळ याच मार्गानें मोठ्यांत मोठें सैन्य उभारतां येतें. जगभर कुठेंहि पाहा, राष्ट्राची शांततकालीन सुरक्षितता नि युद्धातील विजय ह्या गोष्टी जोंवर शस्त्रसज्ज सैनिकांच्या संख्याधिक्यावरच अवलंबून असतात तोंवर सैन्याच्या सख्याधिक्याचा उत्तम उपाय म्हणून सैन्य-भरतीच्या सक्तिमूलक पद्धतीचे महत्त्व नि आकर्षण वाटणे स्वाभाविक असतें. कारण सैन्याची सख्या अगणित झाली की आपलें राष्ट्ररक्षणाचे गणित सुटलें असें मानण्याकडे मानवी स्वभावाचा सामान्यतःच कल असतो.

परंतु गेल्या दोन्ही महायुद्धांचा अनुभव पाहता नि आजच्या पुष्कळच पालटलेल्या युद्धपद्धतीचें स्वरूप लक्षांत घेतां सक्तिमूलक सैन्यभरती ही नुसती सदोष आहे इतकेंच नव्हे, तर तिच्यामुळें कोण-त्याहि राष्ट्राची लाभापेक्षां हानीच अधिक कशी होते हें समजतें.

### शास्त्रीय दृष्टचा सदोष पद्धति

'सर्वांना समान संधी' ह्या लोकशाहीच्या तत्त्वानुसार राष्ट्ररक्षणाची संधि सर्वांनाच देऊं पाहणारे जर सामाजिक नि मानसशास्त्र दृष्ट्या ह्या पद्धतीचें परीक्षण करतील तर तिच्या उपयुक्ततेविषयीची आपली कल्पना सदोष असल्याचें त्यांना उमजेल. हटातटाने युद्ध चालवायला अंगी युयुत्स वृत्ति अथवा सोप्या शब्दात म्हणजे भांडकुदळपणा (pugnacity) अत्यावश्यक असतो. परंतु जसजसा माणूस अधिका-धिक सुसंस्कृत होत जातो तसतसा मनुष्यस्वभावातील हा भांडकुदळ-पणाचा युद्धावश्यक गुण त्याच्यांतून उणावत जातो, असा अनुभव सर्वत्र येतो. म्हणूनच, ज्याचा उपजत स्वभाव अथवा 'प्रकृति' सैनिकी व्यवसायास अनुकूल आहे ते, नि ज्याची तशी नाही ते, अशा उभय-ताची शत्रूशी गांठ पडली असता होणारी वागणूक अगदी भिन्न स्वरू-पाची होते. क्षात्रवृत्तीच्या तेजस्वी परंपरेंत वाढलेला बच्चादेखील शत्रूच्या नरडीचा घोट घ्यायला 'जिंकेन किंवा मरेन' अशा निकराने झुज देतो; तर 'गजस्तत्र न हन्यते' अशा परंपरेत जन्मलेले मानीव नरसिंह खरी सिंहगर्जना कानी पडताच गर्भगळित होऊन य:पलाय तरी करतात किंवा ते शक्य नसल्यास शान्तिपाठांची कोल्हेकुई करून प्रत्युत्तर देऊं पाहतात! स्वेच्छेनें सैन्यांत आलेले नि मारून मुटकून भरती केले गेलेले याच्या स्वभावात नि आचरणांत इतके भयकर अतर असतें. तरीसुद्धा लोकशाहीचे वेड लागलेले सत्ताधीश राष्ट्ररक्ष-णाची, नि म्हणून लढण्याची सर्वांना समान सधी देण्यासाठी सक्तीची सैन्यभरती करूं लागतात नि त्यापायी अन्ती सर्वनाश ओढवून घेतात. तसेच, लढाऊ जातीतून स्वेच्छेने भरती झालेले लोक आपल्या युद्ध-विद्येचा नि सैनिकी शक्तीचा स्वार्थसंपादनार्थ वापर करण्याचा धोका असतो असे मानणे हा एक भ्रम आहे, एक अपसमज आहे; कारण इतिहास तशी साक्ष देत नाही. तथापि सक्तीनें सैन्य उभारण्याच्या आपल्या कल्पनेच्या समर्थनार्थ असा भ्रात युक्तिवाद करणाऱ्याला आपली वाजू विनतोड असल्याचे भ्रामक समाधान जरी लाभले, तरी पुराव्यावांचून प्रमेय सिद्ध झाल्याचें मानणाऱ्या ह्या कल्पनावीराला रणागणावर मात्र आपल्या बाजूची खाडोळीं झाल्याचे पाहणें भाग पडते.

आतां शिस्तीच्या लाभासाठी सक्तीच्या सैन्यभरतीचा पुरस्कार कर-णाऱ्याचे शिस्त-प्रेम कौतुकास्पद मानले तरी, सक्तीची सैन्यभरती हा काही नागरिकाना शिस्त लावण्याचा प्रमुख उपाय नव्हे. सैन्यांत आढळणारी शिस्त हा सैनिकी जीवनाचा आनुषंगिक अथवा गौण लाभ आहे. लोकशाही यशस्वी व्हायला नागरिकांत शिस्त बाणायला हवी, याविषयी दुमत असणे शक्य नाही. परंतु केवळ शिस्तीसाठीं सैन्य-भरती सक्तीने करा असे म्हणणे हा नागरिक वयात येईपर्यंत त्याना मिळालेल्या गृहशिक्षणाच्या नि शालेय शिक्षणाच्या अयशस्वितेचाच लाजिरवाणा पुरावा आहे!

आणि तसें पाहिले तर सैन्यांतले लोकहि अधिकाराच्या अस्तित्वाचे दडपण असतें तोवरच शिस्त पाळतांना दिसतात. ते दडपण दूर होतांच ते कसे वागतात ते सांगायला नकोच! म्हणून लोकशाही यशस्वी होण्यासाठी जीवनाच्या सर्व अवस्थांत नि सर्व क्षेत्रात शिस्त-पालन हा नागरिकाचा स्वभावच बनेल असे सस्कार करणारें शिक्षण त्याना बालपणापासूनच मिळायला हवें नुसती दडपी शिस्त ही त्या-कामी कशी यशस्वी होणार?

आतां, सैन्याची प्रचड संख्या व्हावयाला हवी असल्यास सक्तीच्या सैन्यभरतीवांचून गत्यन्तरच नाही असें सागणाऱ्यांत काही सेना-धिकारीहि असतात. पण सैन्यात झाली, तरी ती माणसेंच. तेव्हां जितकी सैन्यसख्या अधिक तितके त्यांतले विभाग अधिक, त्या प्रमाणात अधिकाऱ्याच्या चढत्या श्रेणीच्या जागा अधिक, नि तदनुसार सैनिकास मिळणाऱ्या बढत्याहि अधिक असें पाहून, काही सैनिकी सल्लागारानी, मूलभूत मनुष्यस्वभावानुसार स्वार्थानें प्रेरित होऊन, सरकारला सक्तीच्या सैन्यभरतीचा उपाय सुचविणें अशक्य नाही. पण लिडेल हार्ट स्वच्छ सागतो कीं (Conscription means a weakening of the solderly spirit) हा उपाय क्षात्रवृत्ति क्षीण करणारा आहे. कारण वरवर विचार करणाऱ्याला त्यापासून काही किरकोळ लाभ होतांना दिसले तरी युद्धशास्त्रदृष्टचा सक्तिमूलक सैन्यभरती ही राष्ट्रघातक आहे. कशी-ते पाहा.

प्रथम सैन्याच्या कार्यक्षमतेवर तिचा काय परिणाम होतो तें पाहूं. स्वयंस्फूर्तीने वा स्वेच्छेने सैन्यात आलेल्याना दीर्घकालीन अभ्यासा-मुळें जें युद्धकौशल्य संपादितां येते तें मारून मुटकून सैन्यात ओढले-ल्याना, युद्धपूर्वकाळी सैन्यात कितीहि दीर्घकाळपर्यंत हडेलहप्पी करायला लावली तरी सपादितां येत नाही, येणे शक्य नाही. आणि अशाच्या हातून अत्याधुनिक विविध शस्त्रास्त्रांच्या वापराचे तंत्र नीट समजून ती यशस्वीपणे हाताळण्याचे कौशल्य आत्मसात् होणें तर त्याहून अशक्य. तथापि या अशक्यतेचे मानसशास्त्रीय कारण याहूनहि बलवत्तर आहे. उत्साह हा कोणत्याहि क्षेत्रातील कार्यक्षमतेचा मूलाधार आहे. पण सक्तीच्या पायी अनिच्छेने सैन्यांत ढकललेल्याच्या अंगी जो प्रामुख्यानें असतो तो तर उत्साहाचा अभाव! अशा स्थितींत कार्यक्षमता यावी कुठून?

अर्थात् स्वच्छेनें सैन्यात आलेल्याची सर्वच कामे मोठ्या उत्साहानें होतात असें नव्हे. तसेंच, सैन्यात बळेंच ओढलेल्याच्यांत उत्साह

दिसणारच नाही असेहि नव्हे. मुळांत उत्साह नसला तरी, कामाच्या दीर्घकालीन नि निरंतर संवयीमुळें, अभ्यासामुळें, कांही प्रमाणांत कार्यक्षमता येतेहि. परंतु उच्च प्रतीची कार्यक्षमता मात्र ज्या त्या कामाचा आदरपूर्वक नि उत्साहानें अभ्यास केला तरच निर्माण होऊ शकते. आणि आजच्या युगांत तर सैन्याची कार्यक्षमता सामान्य प्रतीची असून मुळीच चालणार नाही. ही गोष्ट सक्तीच्या सैन्यभरतीच्या पुरस्कर्त्यांनी अवश्य ध्यानात घ्यायला हवी.

## आधुनिक युद्धतंत्र

दुसरें, मारून मुटकून बनविलेले सैनिक हें भरंवशाचे कूळ नसतें. एकदा युद्धाला तोंड लागले, की त्या बिकट परिस्थितीत हे सैनिकीकृत (conscripts) गागरतात, नि अशा वेळी त्यांच्या नुसत्या संख्याधिक्यावर विसंबणें हें धोक्याचें ठरते. कारण, युद्ध खेळलेल्याचा अनुभव असा आहे कीं, भीतीमुळें उडालेली गाळण ही अत्यंत सांसर्गिक असल्यामुळें एकदां एक सैनिकीकृत गांगरला की त्याचा इतरानाहि झपाट्याने संसर्ग लागतो. आणि नव्या युद्धतंत्रातील वाढते व्यक्तिगत दायित्व लक्षात घेतां अवघा एक जण जरी गांगरला तरी तें अतिशय धोक्याचे असते.

तसेंच, युद्धशास्त्रदृष्ट्या आणखी एक दोष असा की सैनिकीकृताच्या दळात गतिशीलता फार थोडी असते (A conscript army is slow to mobilize.). सक्तीची सैन्यभरती ही मूलत: ज्या लोकशाहीच्या तत्त्वानुसार केली जाते त्या लोकशाहीत सथपणा नि दिरंगाई हे गुण विशेष प्रामुख्याने असतात. त्यामुळें सैनिकीकृताच्या तुकडीची कुठलीहि हालचाल अतिशय रेंगाळत होते. म्हणून आजच्या विद्युत्तुल्य आक्रमणाला (Blitzkrieg invasion) तितक्याच चपळाईने तोंड देऊन प्रतिहल्ला चढविण्यास अशी तुकडी बहुतकरून असमर्थ असते. मग अणुध्वंसकाच्या माऱ्यापुढें तर हे सैनिकीकृत कसे काय टिकणार? यावरून हे स्पष्ट होईल की युद्धशास्त्रदृष्ट्या सक्तीच्या सैन्यभरतीपासून होणाऱ्या लाभाच्या मानाने हानीचे प्रमाण बरेंच मोठें असतें.

आतां, सैन्यभरतीची सक्ती ही अन्य क्षेत्राना सुद्धां पर्यायाने कशी अपायकारक ठरते ते थोडक्यात पाहूं. उद्योगधद्यांना मनुष्यबळ पुरेसे नसले तर त्याचा परिणाम उत्पादनावर होतो हे सुविदित आहे. आतां सैन्यभरती सक्तीनें सुरू झाली की वयात आलेले सर्व सुदृढ तरुण सैन्यात ओढले जातात, त्यामुळें उद्योगधद्यात जाणाऱ्या कामगाराची संख्या उणावते, मग उत्पादन घटते नि ओघानेच त्याचा युद्धकार्यावर घातक परिणाम होतो. वास्तविक युद्धकाळात शस्त्रास्त्रें नि युद्धावश्यक इतर साहित्य याचे उत्पादन हें इतर वेळेपेक्षा प्रचंड प्रमाणावर नि अधिक वेगाने होणें अत्यावश्यक असते. परतु मनुष्यबळ कमी पडल्यानें तें व्हावें तसे होत नाही.

दुसरें असे की, ज्याना सैन्यात अनिच्छेने नोकरी करावी लागलेली असते त्याच्यातील वैयक्तिक दायित्वाची जाणीव क्षय पावते, त्याच्यांत कर्तव्याची टाळाटाळ करण्याची प्रवृत्ति वाढीस लागते, नि अन्ती अशाच्या हातून देशभक्तास साजेशी राष्ट्रसेवा होऊ शकत नाही, इतकेच नव्हे तर देशद्रोह होण्याचा संभव मात्र बळावतो. ज्या देशात सैन्यभरतीची सक्तिमूलक पद्धति दीर्घकाळापासून अस्तित्वांत आहे तिथे फितुराचें प्रमाण फार मोठें असून त्याच्या कारवाईमुळें राष्ट्ररक्षणाची उभी यत्रणाच अकस्मात् कोसळण्याचा धोका असल्याचें प्रत्ययास आलें आहे. कारण धूर्त, कपटी नि कावेबाज शत्रु हा आपल्या हस्तकाकरवी विरुद्ध पक्षाचे सैन्य आतून पोखरतो, आणि नेमकी आपल्या नियोजित हल्ल्याच्या वेळीच त्याची शक्ति फितुरांच्या द्वारें खच्ची करीत असतो. आणि शत्रु हे करणारच ही गोष्ट जरी खरी असली तरी हा त्याचा डाव सैनिकीकृताच्या बिनभरंवशाच्या दळात सहज सिद्धीस जातो. सक्तीच्या सैन्यभरतीपासून असलेला हा धोका सूक्ष्म असल्याने त्याची जाणीव अननुभवी नेत्यांना होत नाही, नि त्यांच्या हातून आधी झालेल्या इतर चुकात ह्या भयंकर चुकीची अविवेकाने भर पडण्याची भीति असते.

आणि अशा रीतीनें वरील सर्व बाबीचा साकल्याने विचार करतां बहुदोषी असलेली ही सैन्यभरतीची सक्तिमूलक पद्धति सकृद्दर्शनी जरी स्वस्त वाटली तरी तिच्या परिणामांवरून तिचें खरे मूल्यमापन करू जातां शेवटी ती फार महागच पडते. कारण स्वस्तपणाच्या अल्पलाभासाठी प्राणांहूनहि प्रिय असलेलें देशाचें बहुमोल स्वातंत्र्यच हातचें गमावण्याची पाळी येते.

## दुसऱ्या महायुद्धाचा बोलका इतिहास

दुसऱ्या महायुद्धाचा इतिहास वरील सर्व विवेचनाचे समर्थनच करतो तें कसें पाहा : १९३९ ते ४१ मध्यें जर्मनीच्या 'तुफानी सेने'च्या तडाख्यामुळे जीं राष्ट्रें कोलमडली त्या सर्वांनी आपापल्या संरक्षणार्थ सैन्यभरतीची सक्तिमूलक पद्धति उपयोजून, फार आधीपासून अफाट सेना उभारलेली होती. उलट जर्मनीच्या मूळ विरोधकांपैकी जें एकमेव राष्ट्र अजिक्य राहिलें त्याच्यापाशी युद्ध जुंपेपर्यंत जें राखीव सैन्य होतें तें केवळ स्वेच्छेनें भरती झालेल्याचे. आणि त्या राष्ट्रानें युद्धकाळात जरी सक्तीची सैन्यभरती सुरू केली तरी ती केवळ राखीव सैन्यास पूरक म्हणून दुय्यम उपयोगासाठी. तरीहि कांहीना वाटते की इग्लडला समुद्राचा नैसर्गिक खंदक लाभला होता म्हणून ते बचावले. पण त्याला उलट बाजूनें नॉर्वेचें उदाहरण पुरेसे आहे. नॉर्वेचा सागरी खंदक तर इग्लडच्याहून अधिक विशाल होता. पण तो काही नॉर्वेला वाचवू शकला नाही. जर्मनीच्या तुफानी हल्ल्यामुळें कोलमडणाऱ्या राष्ट्राची किंचित् वानगी पाहा.

१० मे १९४० या दिवशी जर्मनीने हॉलडच्या रॉटरडॅम नि हेग ह्या दोन प्रमुख नगरावर तीव्र तडाखा हाणला. त्यात छत्रीदळ, भूदळ नि विमानदळ मिळून सुमारें ३० हजार कसलेले राखीव सैन्य होते. त्याच्या माऱ्यापुढें टिकाव न लागल्याने अवघ्या पाच् दिवसात हॉलंडनें शरणागति पतकरली. सक्तीची सैन्यभरती हें जर बचावाचे उत्तम साधन असतें, तर तेच साधन वारपलेल्या डचाचा बचाव व्हायला हवा होता. पण झाले तें उलटच !

तीच गत बेल्जियमचीहि झाली. आर्डेन्समधून मुसडी मारून जर्मनीच्या तुकडयांनी पश्चिम खाडीचा किनारा अवघ्या एक आठवडयांत गांठला आणि गट्टीराष्ट्राची बेल्जियनांना मिळणारी कुमक तोडून त्यानाहि जर्मनीनें डचांसारखीच शरणागति पतकरायला भाग पाडलें.

फ्रेंचांनी तर सैन्यभरतीची सक्ती करून सेनेचा एक महासागरच निर्मिला होता. आणि इतर कुठल्याहि राष्ट्रापेक्षां त्यांनी अधिक प्रमाणांत नि अधिक काळपर्यंत आपल्या सैनिकीकृताना शिक्षण दिले होतें. तथापि अद्यावत् शस्त्रास्त्रानी सुसज्ज अशा मूठभरच पण कडव्या

जर्मन सैन्यापुढें फ्रेंच सैनिकीकृताचा तो महासागर पार गारठला! अशा रीतीने दुसऱ्या महायुद्धाचा अनुभव ध्यानी घेता सैन्यभरती सक्तीची केली की राष्ट्र सुरक्षित राहते ह्या जुनाट कल्पनेचें समर्थन आतां होऊं शकत नाही. जे देश केवळ याच पद्धतीवर अवलबून नव्हते ते आवश्यकतेनुसार आपले युद्धतंत्र झटकन् पालटूं शकले. तसेच, जे देश १९३९ ते ४१ मध्यें जर्मनीकडून पादाक्रांत झाले तेहि सैनिकाच्या संख्याधिक्यापेक्षा गुणवत्तेला, शिक्षणाला नि साधनसामग्रीच्या अद्यावत्करणाला अधिक महत्त्व देते तर त्यांची सरशी होऊं शकली असती; निदान झाली तितकी दुर्दशा व्हायची तरी टळली असती.

आणि आतां आपण भविष्यकाळाकडे दृष्टि वळविली तर सक्तीनें उभारलेल्या सैन्याची उपयुक्तता फारच शंकास्पद वाटते. कारण अणुध्वंसक नि लांब पल्ल्याची रॉकेटस् याच्या संभाव्य हल्ल्याना तोंड देण्याचें सामर्थ्य सैनिकीकृताचा (conscripts) दळभारात असणें अशक्यप्राय आहे. उलट राष्ट्राच्या संरक्षक फळीला त्यांच्यापासून धोका मात्र अधिक संभवतो.

*आणि उभयपक्षी समान विध्वंसाच्या भीतीने* शत्रूनें जरी अण्वस्त्राचा उपयोग होतां होईतों करायचे टाळलें तरी इतर प्रकारच्या माऱ्यापुढेंसुद्धां सैनिकीकृताचें दळ कितपत टिकू शकतें तें पटविण्यास गेल्या महायुद्धाचा अनुभव पुरेसा आहे.

## व्यवसायाची सक्ती नको

इथें उतावळीनें आक्षेप घेणारे लगेंच हटकतील की सक्तीने केलेली सैन्यभरती जर इतकी अनिष्ट असेल तर मग विद्यार्थ्यांना तरी सैनिकी शिक्षणाची सक्ती कशाला? त्याला उत्तर इतकेंच ' सैनिकी व्यवसाय ' नि ' सैनिकी शिक्षण ' ह्यांचा असा घोटाळा होतां कामा नये. सक्तीचे सैनिकी शिक्षण हे परिणामी तें शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या नि राष्ट्राच्याहि हिताचें असल्यानें सर्वथा इष्ट आहे, उलट लोकांवर त्याच्या इच्छेविरुद्ध सैनिकी व्यवसाय करण्याची सक्ती करणे हें मात्र अनिष्ट आहे. कारण जो व्यवसाय एखाद्याला आवडणार नाही तो त्याला अळेवळेंच करायला लावण्यापासून एक वेळ त्याच्या 'पोटा 'चा प्रश्न सुटेल, पण त्याच्या मनाला त्यात गोडी वाटणार नाही; त्यामुळें त्याच्या हातून तो व्यवसाय चांगला होणार नाही नि शेवटी जो सामाजिक लाभ त्यापासून व्हायला हवा तोहि होणार नाही. अशा रीतीने व्यक्ति नि समाज या दोघानाहि अनिष्ट असलेली सक्तीची सैन्यभरती करणे हे श्रेयस्कर ठरणार नाहीं.

सैनिकी शिक्षणाचे मात्र तसें नाही. सैनिकी शिक्षण जर सक्तीनें दिले तर ज्या विद्यार्थ्यांच्या अंगी क्षात्रवृत्ति स्फुलिंगावस्थेंत असलेल्या त्याच्यातील ती वृत्ति चेतविली जाणार नाही इतकेच नव्हे, तर ती बीजरूपाने कुठें कुठें आहे हेहि प्रत्ययास येणार नाही. तेव्हा या राष्ट्रातील क्षात्रतेज उद्दीपित व्हायला हवें असेल, आमच्या युवकाच्या अंगी वीरश्री सचरायला हवी असेल नि रामायणकालीन त्या लवकुशाप्रमाणें आजच्याहि युवकाची ऐटवाज नि धीरोद्धत चाल पाहून ' हा मूर्त वीररस वा रणदर्प धृष्ट ' असे धन्योद्गार एखाद्या आधुनिक भवभूतीनें काढायला हवे असतील, तर सर्व विद्यार्थ्यांना अगदी लहानपणापासून त्यांच्या वयोमानानुसार वेळ नि अभ्यासक्रम ठरवून, सैनिकी शिक्षण सक्तीने देणे हे सरकारचे अत्यावश्यक असे राष्ट्रीय कर्तव्य आहे.

शिक्षणोत्तरकाळी त्याच्यांतील जे कोणी आपल्या स्वभावज ओढीनें सैनिकी व्यवसाय स्वेच्छेनें स्वीकारतील तेवढ्याचीच सैन्यात भरती करावी. इतर सर्वजण प्रत्यक्ष युद्धाच्या आघाडीवर शत्रूशी झुंज देण्याच्या दृष्टीने उपयोगाचे नसले तरी, आपापल्या आवडीनुसार ते जो *कोणता व्यवसाय करू लागतील त्यात*, तसेच युद्धाचा प्रसग असेल तेव्हा देशातर्गत नागरी संरक्षणाची सुव्यवस्था लावण्याच्या कामीहि त्यांना आपल्या पूर्वार्जित सैनिकी शिक्षणाचा निश्चित उपयोग होईल म्हणूनच विद्यार्थ्यांना सैनिकी शिक्षण हें सक्तीने द्यायला हवे.

परंतु सैनिकी शिक्षण सक्तीनें दिलें म्हणून सैनिकी व्यवसायहि सक्तीनें करायला लावणे ही भयंकर चूक आहे असे कॅ. लिडेल हार्ट ह्या जगद्विख्यात युद्धशास्त्रविशारदाचें सर्व स्वातंत्र्यप्रिय राष्ट्रांना आवर्जून सागणें आहे. तो स्पष्ट बजावतो–Liberty-loving peoples are foolish if they help to preserve such a system as a natural and proper custom; for conscription has been the cancer of civlization– म्हणजेच सक्तीनें केलेली सैन्यभरती ही कॅन्सरसारखी भयंकर असल्यामुळें देशाच्या स्वातंत्र्यरक्षणार्थ सैन्य उभारताना ह्या पद्धतीचा अवलंब करणे हा शुद्ध मूर्खपणा आहे.

वास्तव आमची राजनीति ही जरी परकीयांवर आक्रमण करणारी नसली तरी आजच्यासारखी परचक्राची भीति संभवतेच. म्हणून शत्रूने आमच्यावर आक्रमण करायचा विचारहि आणायला धजू नये यासाठी स्वयंस्फूर्तीने सैन्यात येऊं इच्छिणाऱ्याचें प्रचंड नि बलाढ्य असें सर्वांगपूर्ण सैन्य, अत्याधुनिक शस्त्रास्त्रानी सुसज्ज होऊन, आमच्या परमपूज्य मातृभूच्या संरक्षणार्थ सदैव खडें असले पाहिजे, कारण ' जिसकी लाठी उसकी भैंस, जिसकी फौज उसका राज ! '

□ □ □



# साहित्य विभाग

मी स्वतः जरी मध्यमवयीन आहें तरी गडकरी यांचें चरित्र सर्व माझ्या डोळ्यांपुढें होऊन गेलेंहि. कॉलेजांतील विद्यार्थी, नाटचकलेचा नादी, मासिकांतून विनोदी लेखक, कवि व नाटककार हीं त्यांच्या चरित्रांतील पांच स्थित्यंतरें इतक्या त्वरेनें एकामागून एक निघून गेलीं कशीं व आपल्या वयाच्या अवघ्या बत्तिसाव्या वर्षी मराठी भाषेंतील एक चांगले कवि व नाटककार अशी कीर्ति प्रस्थापून ते गेले कसे याचा अचंबाच वाटतो. पण विचार करूं गेलों असतां ही गोष्ट एका प्रसिद्ध नियमाला अपवादभूत नसून उलट पोषक अशीच ठरते. हा नियम असा कीं, खरी काव्यस्फूर्ति किंवा नाटचस्फूर्ति मनुष्याला अल्पवयांतच होते. गडकरी आणखी जगते तर ते आणखी लिहिते हें खरें; तथापि कवि व नाटककार या नात्यानें त्यांची स्फूर्ति त्यांच्या पूर्ववयांत जितकी चमकली तितकी ती उत्तरवयांत चमकली असती किंवा नाहीं हें सांगणें कठिण आहे. गुंजारव करणारा भोंवरा हा स्वतःला आपल्या जोरदार प्रथम परिभ्रमणांगी भूमीमध्यें व तेंहि मर्यादित कक्षेंत गाडून घेतो. तीच गोष्ट मनुष्याची बुद्धिमत्ता किंवा प्रतिभा यांचीहि होते. कवि व नाटककार यांची प्रतिभाहि कालांतरानें एकमार्गी बनते व त्यांच्या हातून उत्तरोत्तर निर्माण होणारीं काव्यें किंवा नाटकें यांतील नावीन्य नष्ट होऊन स्फूर्तीहि घडयाळांतील कमानीप्रमाणें शिथिल होते. जगांतील मोठमोठे कवि व नाटककार त्यांच्या सर्वोत्कृष्ट कृति अशाच अल्पवयांत अवतरल्या, हें त्यांचीं चरित्रें या दृष्टीनें वाचून पाहणाराला बिनतक्रार कबूल करावें लागेल. किंबहुना वृद्ध कवि किंवा म्हातारा नाटककार हे शब्द 'वदतोव्याघाता' चीं उदाहरणें म्हणून कोणींहि खुशाल द्यावींत. मानसशास्त्रदृष्टचा या चमत्काराचें कारण प्रायः हेंच असावें कीं, प्रतिभा हें शरीरपरिणतीबरोबर उत्पन्न होणारें तेज असल्यामुळें तें उत्पत्तीबरोबरच आपला प्रभाव दाखवूं लागतें व त्यावर आधिभौतिक, आध्यात्मिक संकटमय स्थितीचीं एकात्रर एक अशी कितीहि जाड आवरणें पडलीं तरी त्यांतून तें बाहेर झळकल्याशिवाय व आपलें गुणकार्य केल्याशिवाय राहूं शकत नाहीं. यामुळेंच दारिद्रच, दुःख, दास्य, सेवावृत्ति, कारागृहवास अशा संकटावस्थेंतच प्रथम लोकनिदर्शनास आलेलें आणि पुढें प्रतिभासामर्थ्यावर स्वातंत्र्य व ऐश्वर्य मिळविलेले किती तरी कवि, नाटककार व लेखक सरस्वतीच्या मंदिरांत अढळ स्थानापन्न होऊन राहिले आहेत.

न. चिं. केळकर

# असें हें मन

अनंत मोरेश्वर ओक

दादर, १-१२-५९

काकू,

इकडे आलें खरी पण तिकडची आठवण सारखी होते. बाळान तर सारखा तुमचाच ध्यास घेतलाय्. तुम्ही असतात तर त्याच्या हाका ऐकून तुम्ही तरातरा आंत आला असतात आणि त्याला पाठुंगळी घेऊन गेला असतात; पण तुम्ही तिथं आहात आणि आम्ही इथं आहोत. चार वर्षांपूर्वी मी तुमच्या शेजाराला आलें त्यावेळी मला कांहीच माहीत नव्हता तुमचा स्वभाव आणि परवां शेजार सोडला, तर आतापर्यंत तुमच्याखेरीज मला दुसरं कांही आठवत नाही. हातांत असत तर तुमचा शेजार मरेपर्यंत सोडला नसता हातात असतं तर—जाऊं दे झालं.

गाडींत गर्दी पुष्कळ होती. इतकी माणसं इकडून तिकडं दररोज जात-येत असतात? कीं माझ्याच वेळेला सगळयांना गर्दी करायची इच्छा होते समजत नाही. मधल्या जागेत एक मनुष्य असा वांकडा तिकडा उभा होता की मोकळया जागेवर त्याला तस उभ राहातांच आल नसत. बाळ हिंडत होता. पण मला बाई एवढया गर्दींत जागेवरून उठायचीहि इच्छा झाली नाही.

जी रड गाडीत तीच या मुबईंत. परवा आले त्या दिवशीं झोपच येईना. मी मावशीला म्हटलसुद्धा की काय मेली ही गर्दी म्हणन. तर ती नुसती हंसली आणि गप्प झाली. आपल्याकडे श्रावणी सोमवारीं सोमेश्वराला सुद्धां एवढी जत्रा भरत नसेल, एवढे लोक दररोज इकडून तिकडून धावत असतात. कसं माझं निभणार आहे देव जाणे.

नोकरी बरी आहे. मालकीणबाई अथरुणाला खिळून आहेत. दोन मोठी मुलं आहेत-साहेबांना मोठा पगार आहे. माझं जमेल असं वाटतं बघाव कस होतं तें. बरंय.

गंगू

दादर, ४-१-६०

काकू,

आज म्हैन्यानी पत्र लिहतेय्. तेंसुद्धा तुमची दोन पत्रें आल्यावरतीं. आवाचा गुढगा आतां बरा झाला का? तुमच्या डोक्याला शातता कशी ती नाहीच. कधी आवा तर कधी पमा, आणि वर पुन्हां सगळया चाळीचा लोळ. नाही दोन दिवस चाळीतून हिंडलं तर चालेल. पण तुम्ही कुठल्या. जाऊं दे. मी बोलायचं आणि तुम्ही हसायच. ठरलेलच आहे.

बाळ शाळेंत जातो. आमच्या मालकाच्या वशिल्यानें शाळेत गेला तो. आता शाळेंत जायला सुद्धां वशिला लागतो अन् मी जात नव्हतें तर मास्तर येऊन आईला भेटायचे आणि मग आई मला केरसुणीच्या खुटान बडवायची. काळच फिरलाय्.

मालकीणबाईची पिरपिर चालूच असते दिवसभर. काय करील बिचारी. दिवसभर अंथरुणात पडून पडून जीव आवतो मग सगळ निघतं नोकरावर. परवां तर मोठी गंमतच झाली. भोपळयाची भाजी करायला आपणच सागितली आणि उलट माझ्यावरच खेकसल्या सारखा भोपळा कशाला पाहिजे म्हणून. मी आपल हसण्यावारी नेलं. बरंय.

गंगू

दादर, १४-१-६०

काकू,

हें काहीं खर नाहीस वाटायला लागलय्. आपण मरेमरेस्तो जीव लावावा आणि थोडसं काही खुट्ट झाल की त्या सगळयावरून पाणी फिराव. आमच्या मालकीणबाई सदानूकदा अथरुणांतच असतात. गेले पांचसात दिवस ताप आला होता त्यांना कालचा बिनतापाचा दिवस. डॉक्टरनीं अग पुसून घ्यायला सागितलं. साहेबाना वेळ नव्हता. मुलांचा प्रश्न नव्हता. तेव्हां त्यांनी मला सागितलं. अंग पुसायचं पाणी थोडं गरम होतं. बाई बाई, काय बेचाळीस कुळया उद्धरल्या आहेत माझ्या. सैंपाकीणबाई म्हणून मी काय वाटेल ती बोलणी सहन करावीत होय. मीहि तापले अन् मग अशी काहीं झिम्मड उडालीय्. मी मग आज कामावर गेलेच नाही आहें. बोलावणं आलं तर जाईन, नाहीतर बघीन दुसरीकडं कुणीकडं. बोलून चालून नोकरीच करायची मग ती इथ काय न् तिथं काय. खरय् ना?

गंगू

दादर, १७-१-६०

काकू,

किती हो धांवपळ तुमची माझ्याकरतां! तुमचं पत्र आणि दामूअण्णाच्या बरोबरचा निरोप दोन्ही मिळाले. दिवस जसा जात चालला तसं मलाहि वाईट वाटायला लागलं होतं. मनाला चुटपुट लागून राहिली होती. पण तेवढयात मालकाच्याकडून निरोप आला. मग मी गेलें. बाईंचा ताप उलटला होता. मी काही न बोलता कामाला लागले कुणीच काही सध्या बोलत नाही.

दामूअण्णाच्याबरोबर तुमच्याकरता इथून खवा पाठवला आहे दत्ताच्या नैवेद्याकरतां. पमाची परीक्षा असेल ना आता? तिला म्हणावं पास हो बाई. होतेच म्हणा नेहमी ती. पण आपण आपलं म्हणत असायचं.

गंगू

साहेब सध्या गडबडीत आहेत म्हणे. त्याच्या बदलीच घाटतय्.

गंगू

दादर, ३०-३-६०

काकू,

आज जवळजवळ दोन महिन्यांनी पत्र लिहिते आहे मी तुम्हांला. गेल्या वेळेला म्हणाले होते ना ती साहेबाची बदली झाली. पण बाईंची तब्येत ठीक नव्हती. साहेब तसेच गेले. तिकडे जागाहि लवकर मिळेना. पण मग एकदाची मिळाली. जागा बरी आहे म्हणतात. मग सामानाची बाधाबाध. साहेब गावीं मुलं शाळाकॉलेजमध्यें. बाई अंथरुणावर. मीच कसं बस त्याचं सामान बाधून दिल. मुलांनी मदत केली. पण ती यथातथाच. आतां साहेबाना रजा मिळाली की येऊन घेऊन जाणार सगळयांना.

माझं काम मात्र संपरलं हो. एक महिन्याचा पगार जास्त आणि नवीन नोकरीकरतां ओळख दिली आहे. मी तिकडे जाऊन सुद्धां आलें बाईंच्या बरोबर. मोठा बंगला आहे. जवळ नोकरा-चाकराना राहायला चागली जागा पण आहे मला तिथ येऊन राहायला सागितलं आहे. पगारहि तसा घसघशीत आहे. बडं काम आहे म्हणे. आपल्याला काय,

कुठल्यातरी चुलीसमोरच बसायचं.

बाई आठवड्यांत जातील बहुतेक. बाई गेल्या म्हणजे नव्या नोकरीवर जायच्या आधीं तिकडे एकदां येऊन जाईन म्हणतें. येऊं ना ?

गंगू

दादर, १५-४-६०

**काकू,**

कायसंसं म्हणतात ना तशांतली गत हो. मी मारे ठरवत होतें तुमच्याकडे येऊन जायचं. तेवढ्यांत आपल्यासमोरच्या मागिर्थीकाकू येऊन टपकल्या. त्यांच्या कुठल्याश्या भावाच्या मुलाचं लग्न होतं म्हणे. त्याला आल्या होत्या. याना तुम्ही. माझं काय वेंचतंय. पण बरोबर एवढं सगळं लेंढार घेऊन माझ्या राशीला कां ? आणि तुम्हांला ती कन्या माहीतच आहे. छळवाद आहे नुसता. सहा महिन्यांत ओळखी झाल्या नाहींत इतक्या त्या गेल्या ८।१० दिवसांत झाल्या. सगळ्यांच्या तक्रारी आणि मागिर्थीकाकूंना त्यांचाच अभिमान. लग्नघरीं राहायच्याऐवजी मी म्हणतें माझ्यावरतीं कां हो साडेसाती ? तिथं कांहींतरी झालं असेल म्हणून माझी आठवण झाली. बाळ तर बन्या आल्यापासून दोन दिवसांच्या आंत मालकांच्याकडे आला, तो परत घरीं यायला तयारच होईना.


सांगायचं कारण काय कीं मी तुमच्याकडे यायला जी धडपडत होतें तें जमेलसं दिसत नाहीं. आतां आवराआवर करण्यांत १।२ दिवस जातील कीं नव्या कामाला जायचं. बघायचं तुम्हांला कधीं भेटतां येईल तें आतां.

गंगू

वार्डन रोड, १५-५-६०

**काकू,**

नवीन कामावर येऊन पंधरा दिवस झाले. वस्तान बरं बसेलसं दिसतंय. हांका मारायला काम तें केवढस्सं पण लोळच जास्त. तीन भाऊ एकत्र राहाताहेत. नवलच आहे अलिकडच्या काळांत म्हणाल तुम्ही. पण मला कळलंय ते राहतायत एकमेकांवर नजर ठेवायला. मोठे मालक जिवंत आहेत आणि धडधाकट आहेत अजून. तेव्हां त्यांनीं आपल्याला वगळूं नये अशी प्रत्येकाची धडपड आहे. पण ह्या सगळ्यांत मालकांच्यांकडे लक्षच नसतं कुणाचं. ते आपले दिवसभर घराबाहेरच असतात. केव्हांतरी येतात, जेवतात अन् झोंपतात. पैशाकरतां काय काय होतं ? अहो, एवढ्यांत धाकटया जाऊबाई माझ्याजवळ बोलायला लागल्या आहेत, म्हणून तर मला इतकं समजलं. त्यांचा जीव जास्तच खालींवर होतोय. त्यांचा नवरा फारसा शिकलेला नाहीं. वडिलांच्या हाताखालींच काम करतोय मनाविरुद्ध. त्याला स्वतंत्र धंदा करायचा आहे. मोठे मालक परवानगी देत नाहींत. तेव्हां तो भांडतो आणि बायकोच्या पोटांत गोळा उठतो. मामंजी जास्त रागावले तर काय होईल म्हणून. गंमत आहे झालं.



बाळचंहि बरं चाललंय्. खेळायला, हुंदाडायला भरपूर जागा आहे. आम्हांला एक स्वतंत्र खोली आहे. तुम्ही याना एकदां.

गंगू

वार्डन रोड, १६-७-६०

**काकू,**

माणसांची म्हणजे अगदीं कमाल आहे हो. परवां आबासाहेब (मोठ्या मालकांना आबासाहेब म्हणतात) आले ते असे थडथडून. घरांत कुणीच नव्हतं. कसेबसे गाडीतनं उतरले आणि खोलीकडे जायला लागले आपल्या. इतक्या झोकांड्या जात होत्या त्यांच्या ! मला पाहवेना. घरांत दुसरं कुणीच नव्हतं. ते नको नको म्हणतांना मीं त्यांना धरलं आणि अंथरुणावर नेऊन निजवलं. पांघरुणं वगैरे घातलीं. खोलीच्या बाहेर बाळला बसवून ठेवलं. आणि मी कामाला लागलें. तेवढ्यांत थोरल्या जाऊबाई आल्या. बाळला तिथं पाह्यलं आणि त्या भडकल्या. मग मी तिथं गेलें आणि मीं बाळला तिथं कां बसवलं तेंहि सांगितलं. मग काय, तशाच त्या आंत गेल्या. मग कोलन वॉटरची पट्टी काय न् काय काय. हळूहळू सगळे आले. आणि सगळ्यांच्या लक्षापायीं आबासाहेबांना नकोसं झालं. तेवढ्यांत डॉक्टर आले. आणि त्यांनीं ताप साधा थंडीवाऱ्याचा आहे म्हणून सांगितलं. झालं. जी सेवेकऱ्यांना गळती लागली ! हो, दुखणं अंगावरचं नाही मग लक्ष द्यायची धडपड कशाला ? शेवटीं मला राहवेना म्हणून मींच पातीचा चहा करून नेऊन दिला. दोन दिवस त्यानंतर आबा-

साहेब घरात होते. पण त्यांच्याकड बघितलं सुद्धां नाही कुणी. तस घरातल प्रत्येक माणूस कामाच ना. कुणाला समाजात जावं लागतं. कुणाला क्लबात जाव लागत जाऊं दे झालं. आपल्याला काय करायचय् एवढं मात्र खरं हो की मोठ्या मालकाचे हाल आहेत.
तुम्ही केव्हां येताय् ?

गंगू
वार्डनरोड, १६-८-६०

काकू,
मी आतां तुमच्यावर खूप रागावले आहें. एवढं आम्ही सारख सारख आर्दमून बोलवाव आणि तुम्ही नुसत्या सबबी सागाव्यात म्हणजे काय हो ? आता पुढच्या महिन्यांत पमाला एक मोठी सुट्टी आहे अस म्हणतांय् तेव्हा त्या वेळेला तरी या. अहो इकड फार मोठी जागा आहे मला राहायला. आणि राहणार आम्ही इन् मिन् दोघं. काही काही वेळेला जागा कशी खायला उठते ! तेव्हा तुम्ही याच. आपण गंमत करूं.
थोरले साहेब पुन्हां कामाला जायला लागले पण चिन्ह काही बरं दिसत नाही. जेवण तुटलंय् फार. दोन वेळा ते घरी उशिरा आले. म्हणून एकटेच जेवायला बसले. तर पूर्वीच्या निम्म्यानंहि जेवण गेल नाही. मला राहवलं नाही. मी थोरल्या जाऊबाईंशी बोलले. बाई, माझें काय तारे तोडलेत बाईन त्या. मी गप् बसलें. नाहीतरी त्या बाईचा मला थोडासा रागच येतो ढालगज भवानी. स्वत.ला काही करायला नको. आणि दुसऱ्या कोणाला बोलूहि द्यायचं नाही. मला काय जरूर पडली आहे म्हणा लक्ष घालायची ! समोर घडल म्हणून सागितल. गमत आहे नाही काकू ?

गंगू
वार्डन रोड, २०-९-६०

काकू,
मला काय झालय् तेच कळत नाही. तीन तीनदा थपडा खाल्ल्या तरी सुद्धां आमच्या थोरल्या मालकांचं जेवण काही डोक्यातन जात नाही आणि परवा आणखीच प्रकरण पेटलंय. काय झाल, मी धाकट्या जाऊबाईंना (घरांतल जाऊबाई जाऊबाई ऐकून माझ्याहि तोंडात तोच शब्द बसलाय्) आबासाहेबांच्या बद्दल सागायला गेले तोच थोरल्या जाऊबाई तेथें आल्या आणि जो काही तोंडाचा पट्टा सुरू केला म्हणता. मी बराच वेळ ऐकून घेतलं आणि बोलायला तोड उघडणार तोच पाठीमागून आबासाहेबांचा आवाज आला. काय झाल त्या बाईंनी लक्ष दिलं म्हणून ? स्वत: द्यायच नाही आणि लोकानाहि देऊ. द्यायचं नाही ही कुठली रीत ? थोरल्या जाऊबाई अशा तावड्या-हिरव्या-पिवळ्या झाल्या होत्या की ज्याचं नाव तें ! मला बाई चोरट्यासारख झाल. ह्या बायका म्हणजे कमालीच्या ह्या. काय काय होणार आहे कोणास ठाऊक.

गंगू
वार्डन रोड ४-१०-६०

काकू,
मागचं पत्र लिहिलना मीं आणि अशी टागल्यागत झाले होते किनई त्यात तुमचहि पत्र आलं. अहो, असली सुखाची नोकरी कोण सुखासुखी सोडायला बसलय् ? तुमच आपलं काहीतरीच. तेव्हा तुम्ही भरवसा ठेवा मी ही नोकरी सोडत नाही म्हणून.
सगळी मालक मडळी काश्मीरला की उटीला कुठस जाणार आहेत म्हणे. थोरल्या मालकाना कुणीतरी एक महिनाभर बंगला दिला आहे वापरायला. म्हणून सगळी जाताहेत. कुठय् हो हे काश्मीर की उटी ते ? बाळला सध्या क्रिकेटपुढें फुरसत नाही काहीहि बोलायला. शाळेंतनं येतो तो क्रिकेट खेळायला जातो आणि मला त्याच्या भुगोलात काही सापडत नाही. मला जाऊबाई खिजवीत होत्या. अहो माझी जर एवढी ताकद असती तर तुमच्या घरी पोळ्या लाटायला कशाला बसले असते चुलीपुढें ? पण खिजवण्याच्या भरात भान राहात नाही हेच खरं. तेव्हा मी, आणि सोबतीला संभा माळी राखणीला मागें आहोत. आता मात्र नाही म्हणू नका हं काकू. याच.

गंगू
वार्डन रोड ३-११-६०

काकू,
किनई, त्या दिवशी झाली गमत. थोरले मालक आले म्हणून तुम्ही पळ काढलात. तुम्हाला स्टेशनवर पोचवून येते तो संभा चुलीशी लुडबूड करायला लागला होता. त्याला बाजूला करून साहेबांना चहा करून पाठवला. जरा वेळानं संभा तुम्हाला मालकानी बोलावलय म्हणून सांगत आला. देवाच नाव घेत मालकाच्याकडे गेले. त्यानी तुमची चौकशी केली. कोण, कधीं, कशा, कुठें वगैरे. मग काय झालं कुणास ठाऊक. ते म्हणाले, "मी आलो म्हणून त्यानीं जायची गरज नव्हती. मी खाल्लं नसतं त्यांना. घरात इतकी माणसं नाही का राहात ?" नि इतकं म्हणून गप बसले. मला तर काय बोलावं ते सुचेना. थोडा वेळ घुटमळून मी परतले. म्हणजे बघा. तुम्ही उगाचच गेलात अस फक्त मलाच नाही—थोरल्या मालकानासुद्धा वाटल. वरच पत्रं लिहून दोन दिवस झाले. आळसामुळें तसंच पडून होतं पत्र. आज पोस्टात टाकण्याकरता पाकिटात घालणार तोंच बाळ धांवत आला आणि 'आई, बाबासाहेब बघ कस करताहेत' म्हणत मला त्यांच्या खोलीकडे घेऊन गेला. ते कामावरून अगांत ताप घेऊनच आले होते अगावरचे कपडे सुद्धां काढले नव्हते. चांगलीच थंडी भरली होती त्याना. गेल्या वेळचाच प्रकार. पण प्रमाण जास्त. संभाला पाठवून डॉक्टरना आणलं. त्यांनी इजेक्शन देऊन औषध चालू केलं. जातां जातां बाकीची मडळी कुठायत् म्हणून विचारल मी त्यांना सगळ सागितलं. ते हसले आणि म्हणाले, ठीक आहे. आणि घाबरण्याच काही कारण नाही म्हणून सांगून गेले. हातीपायी नीट सुखरूप सुटोत म्हणजे झालं.

गंगू
वार्डन रोड, १२ ११-६०

काकू,
काय माणसाच्या दैवात आहे देव जाणे. अहो साहेबांचा ताप उतरतच नाही. डॉक्टर येऊन जाताहेत. औषधपाणी चाललय्. पण गुण म्हणून नाही. बरं त्याच हल्ली मीच पहाते सगळ बाळ लहान. भिवा गागरून जातो. नर्सा पैसे घेऊनही वेळेवर येत नाहीत. डॉक्टरनी पहिल्या नर्सीला तर पहिल्याच दिवशी हाकून दिल. तेव्हां सागणं काय की साहेबाच सगळ मीच एकटी पहाते. बरं ह्या सगळ्या आणि त्याचे नवरे काय करतात मला कळत नाही. घरातला मोठा मनुष्य, ज्याला काडीचहि व्यसन नाही; व्यसनात गुतला म्हणायला आठनआठ दिवस बेपत्ता होतो, आणि ह्या लोकानी साधी चौकशी करू नये ! मी म्हणतें साहेब सदा फिरतीवर असतील. पण ते फिरतीवरच आहेत, त्याना काही झाल नाही ना नको पाहायला कुणीतरी ? अशा वेळेला बायकोला नवरा आणि नवऱ्याला बायको लागते. नाही म्हटल तरी

चित्त एकमेकाकडं असतं. वेळेवर माणूस दृष्टीला नाही पडल तर जिवाची घालमेल होते. पण म्हणतात ना तशातली गत आहे. चडफडायच आणि गप्प् बसायच. काही होऊं दे, माझ्या हाताला अपयश नको म्हणजे झालं. आबानी आणलेला काशीविश्वेश्वराचा अंगारा आणि गंडा दामूअण्णाच्या हातून मिळाला. अंगारा आम्ही सगळयानी लावला. गंडा मात्र मी साहेबाच्या गळयात बांधला. रागावणार नाहीना, बाळच्याहि गळयात बांधला नाही म्हणून ? नाहीतरी त्यानाच जरूर आहे आज.

गंगू

वॉर्डन रोड, १५-११-६०

काकू,

ह्या पुरुषाच्या जिभेला हाड नसतं आणि थट्टेला ताळ नसतो. आता तुम्हीच बघा काकू. परवापासनं साहेबाच्या तापाला थोडा उतार पडला आहे. आज डॉक्टर आले. मी इंजेक्शन-करता गरम पाणी तयार करत होतें. आणि इकडचतिकडच आवरत होतें. त्या दोघाच्या गप्पा चालू होत्या. बोलतां बोलता साहेब फटकन् म्हणाले, " डॉक्टर, एक मोठा पेंच पडला आहे. एका व्यक्तीन माझ्यावर फार मोठे उपकार केले आहेत " " मग एक मोठ भरघोस बक्षीस देऊन टाका " " आणि त्या व्यक्तीन ते घेतलं नाही तर ?" "घेणारच" "पण नाही घेतल तर ?" "व्यक्ति म्हणजे कोण ? बाई की पुरुष ?" " पुरुष. " " मग पंचाईत आहे." " आणि बाई असती तर ?". "लग्न करण्यालायक असली तर लग्नच करून टाका म्हणेन. " " डॉक्टर ! " दोघंहि मोठमोठयान हसू लागले मला बाई चोरटया-सारखच व्हायला लागल. डॉक्टर गेल्यावर मला साहेब म्हणाले, " ऐकलत ना डॉक्टर काय म्हणाले ते ? नाहीतरी आपण दोघही एकएकटीच आहोत." मी आपली निघून आले. आजारी माणस हळुवार झालेल असतं त्याचं बोलणं मनावर घ्यायच नसत. पण तरीसुद्धां......

गंगू

वॉर्डन रोड, २०-११-६०

काकू,

इथ काय अनर्थ होऊन राह्यलाय् काकू माहीत आहे तुम्हाला ? गेले दोन तीन दिवस नुसता गदारोळ उडून राहिलाय् आणि मी त्यांत भाजून निघत्येय. तुम्हाला गेलं पत्र लिहिल ना, त्याच दिवशी धाकटया जाऊबाई आल्या. अगदी देवावरच फूल उचलून सागतें हे काकू, मला हायस वाटल. अहो, किती केलं तरी परक माणूस तें. नशिबानं उतार पडला म्हणून ठीक. काहीबाही झालं असत तर माझ्यावरच टेंपर आल असतं. सुटकेचा श्वास सोडला अन् मी माझ्या कामाला लागले. धाकटया जाऊबाई साहेबाच्याकडे पाहूं लागल्या. पण त्याना काही गोष्टी माहीत नव्हत्या म्हणून मी सागूं लागले तों त्या नाराज झाल्या. मी गप बसले. म्हटलं मला काय करायचय मेलीला! पण मी सागत होतें तेंच अखेरीस खरं झालं. आणि कपाळावर आणखी एक आठी चढली. रात्री मला वाटतं झोपायच्या वेळेला साहेबानी मी कुठें आहे म्हणून विचारलं असेल. झालं. आत येता येतां इतका पारा चढला आता इतके दिवस कायम आजूबाजूला राहणारी मी एकदम नाहीशी झाले. कोणीहि विचारल पण नाही. आत आल्यावरोवर मला फर्मान. "तिकडे तुम्ही पाऊल टाकतां कामा नये." मी बरं म्हणालें. आणि खालच्या मानेने काम करू लागलें. दुसऱ्या दिवशी तोंड लागलं लढाईला साहेबानी मला बोलावल असेल, ह्यानी " ती इथं नाही." म्हणून सागितल असेल काय झालं, नक्की माहिती नाही.- पण तोंड जवर लागल ह्यात शका नाही. त्या आत आल्या. आणि त्यानी जो तोडाचा पट्टा सोडला म्हणताय्! एक ना दोन. तोडाला येईल ते बोलल्या अति झाल तेव्हां मी फक्त एवढच बोलले की ह्या सगळयाला तुम्हीच जबाबदार आहात. झाल. आगीत आणखीनच तेल ओतलं गेल. पण माझ काय चुकल तुम्ही सागा ना मला. अहो, घरातला कर्ता पुरुष, पण त्याला वागणूक मात्र परक्याची. इतके दिवस ते आजारी होते तरी कोणी ढुकूनहि पाहिल नाही. आणि आत्ता सुद्धा काय मुद्दाम आल्या होत्या. काय साहेबाचा शोध काढायला ? रामा शिवा गोविंदा. काहीतरी दुसरच काम निघालं असेल म्हणून आल्या. वर्मावर बोट ठेवल ते जिव्हारी लागल दुसर काय ! निघाल्या होत्या दुप्पट का चौपट पगार देऊन हाकलून द्यायला. पण मग काय वाटल कुणास ठाऊक त्याना. मला राहूं दिल. पण सक्त ताकिदीवर की साहेबांच्या हारी-मोरीलासुद्धा राह्यच नाही म्हणून. मला काय करायचय् मेलीला तिकड जाऊन ! पण बाबू आणि भिवा सांगतात माझ्या नावाचा घोशा घेतलाय् म्हणे. शेवटी भिवावरच साहेबाना टाकून ह्या कुटंतरी तासन्तास जाऊं लागल्या आहेत. कसलीतरी धावपळ चाललीय् माझ्या-विरुद्ध. मी आपली बाजूला बसून गम्मत पहाणार आहे. पण काकू, मला भीति वाटायला लागलीय्. तुम्ही इकडे येता का माझ्या सोबतीला ?

गंगू

वॉर्डन रोड, ९-११-६०

काकू,

तुम्ही निघतांना म्हणालात ना तेच खरं. मी इथ आलें त्याच्या दुसऱ्या दिवशी आबासाहेबाच मृत्युपत्र कुणी शेडे वकिलांनी वाचल मला वाटलं मी आपली साधी स्वंपाकीण, मला कशाला बोलावल ? पण कागद वाचायच्या आधी शेडे वकिलानी विचारल, त्या गगूबाई कुठ आहेत ? आणि थोरल्या जाऊबाईंनीं माझ्याकडे बोट दाखवल. मग त्या साहेबानी मला विचारलं? तुम्हीच गगूबाई का ? मी हो म्हणून सागितल. तेव्हा उलगडा झाला माझ्या मनात, की ह्या शेडीबुवानी सागितल म्हणून मला बोलावलं. काय सागायच काकू तुम्हाला ! थोरल्या मालकानी पन्नास हजार रुपये मला दिले आहेत बक्षीस. अहो महिन्याला एकावन्नावा रुपया दृष्टीला पडायची मारामार तो एकदम पन्नास हजार ! मला काही अर्थच कळेना मी वकिलाना विचारल की हे कशाकरता ? तो म्हणे शेवटच्या दुखण्यात मी शुश्रुषा केली म्हणून. काकू, अशा आशेन मी केलं होत हो ! त्याच्या अन्नावर जगले मी आणि माझा बाळ वेळेवर घरात कुणी नाही म्हणून मी केल. काही विशेष नाही केल मी. काकू, तुम्हांला राग येईल. पण मी त्या शेडेबुवाना सागितल, मला हे पैसे नकोत मी घेणार नाही. काकू, मला पाहिजे होते थोरले मालक पैसा नको होता. सगळयाना आश्चर्य वाटल. एवढे मोठे डोळे करून सगळे माझ्याकडे पाह्यला लागले. पण मला काय पाह्यजे होत त्याना कस समजणार ?

गगू

* * *




## फुलवेडा मी

फुलवेडा मी गेंद गुलाबी फुलाफुलांचा मला लळा
फुलारलेल्या फुलवेलींच्या पुलकित करितों कळाकळा
फुलाफुलांतच कळी गवसली फुलवंती श्यामला मला
प्रणय रंगांत भ्रमर रंगला अलबेला भाळला तिला
शशांकवदना षोडशवर्षा मृगांकनयना गौर गळा
अंगलटीनें शेलाटी अन् नजर शिकारी यारकळा
तनुसोनसळा खण सोनकळा तंग किरमिजी चंद्रकळा
कळापुष्कळा गानकोकिळा मंजुमंजुळा प्रेम कळा
सुडाळ मोतीं निळा सांवळा चोरावरतीं मोरखुळा
गुलाबगालीं तीळ बावळा उगाच करितो झळाझळा
दर्वळलेला धुन्द केवडा रोमांचित हो पुष्पकळा
ज्वानीचा भर उभार बांधा रसरसला जणु इष्कमळा
ओठांवरतीं घमघमलेला गंधकस्तुरी उतावळा
मदनशरानें मनरमणाला क्षणांत करिसी दूधखुळा

—श्याम सोनारे

## ‘ कल्पतरूच्या मिठींत गहिऱ्या ’

एकदांच तव नयनशरानें मानस भेदुनि जाऊं दे ।
अर्धोन्मीलित अंतरकलिका त्या वेधानें उमलूं दे ।।
मृदु स्पर्शाचें पुनव-चांदणें भाग्यवतीला उजळूं दे ।
निश्वासाचा मलय सुगंधित वातावरणीं पसरूं दे ।।
ज्या उछ्वासें गंधित केलें फूल मनींचें फुलवूं दे ।
सद्भाग्याच्या कररेषांचें मीलन सुखमय होऊं दे ।।
पदस्पर्शाच्या हेमकरांनीं सोन-उंबरा होऊं दे ।
कल्पतरूच्या मिठींत गहिऱ्या बहर बहरुनी येऊं दे ! ।।
शुभचिन्हांकित पुलकित कंपित साज तनूला सुखवूं दे ।
कणांकणांवर तव स्पर्शाचें भाग्य अलौकिक उजळूं दे ।।

— सौ. इंदिरा कुलकर्णी

## हुंदक्यांत ऊर फाटे—

उसवतें शिळें दु:ख
उणें काळाचें ठिगळ
वठलेल्या वृक्षालाहि
पिसाटते वावटळ
हृदयांत खोल भेगा
तीक्ष्ण डंखतात कांटे
असें कांहीं घडे आणि
हुंदक्यांत ऊर फाटे

—कुसुमानंद

# स्मृति

अशीच केव्हां केव्हां येते ।
मूर्ति तियेची स्मृतिपटलावर ।।
भान हरऊनी तेव्हां पाही ।
उगीच जोंवर जाई नजर ।। १ ।।
अशाच वेळीं नकळत येई ।
काळ कसा हा बनुनी चोर ।।
सकाळ असो वा संध्या आणिक ।
उघडी दालन तो बिनघोर ।। २ ।।
लगेच तेव्हां फुंकर घाली ।
विद्ध जाहल्या हृत्पटलावर ।।
गोड नाजूक स्पर्श वेदना ।
उसळें रक्तिम जल जखमेवर ।। ३ ।।
अशाच वेळीं काळा वाटे ।
दु:ख अपुल्या कृतकृत्यावर ।।
धिक् मला रे खडा टाकुनी ।
दिला खवळुनी हा रत्नाकर ।। ४ ।।

—पॅट्रिक ढोके

# एक अभंग

धुंडाळिलें नभ
तुडविली माती
सुख आलें हातीं
उफराटें ।।
आजवरी केली
व्यर्थ पायपीट
आतां आला वीट
चालण्याचा ।।
मनाचीं पांखरें
रानोमाळ गेलीं
आतां विसावलीं
घरट्यांत ।।
इथेंच लाधला
जन्माचा निवारा
पायरीचा चिरा
देव झाला ।।

—लक्ष्मीकान्त तांबोळी

# आषाढी स्पर्श

आषाढी तवस्पर्श लागतां
फुटले पाषाणाला अंकुर
आणि ठिबकले थेंब दंवाचे
प्रज्वळलेल्या अग्निफुलावर
गाभाऱ्यांतिल घनतिमिरीं तूं
उधळित येसी प्रकाशकेशर
अन् गढूळत्या नभडोळ्यांतुन
लक्ष विष्यांचें झालिस झुंबर
फुटतां माझ्या मनीं पालवी
रंग पोपटी आलिस घेउन
कधि राधा तूं, कधीं बांसरी
झालिस गोकुळ देहकणांतून
अदृश्याची ओढ अनावर
आर्त, व्यथित ही जीवनधारा
तुझ्या बिलोरी भिंगामधुनी
दिसे दूरचा स्वप्न किनारा

—राम श्री. गोसावी



# शिलादित्य

अवतींद्रनाथ

शिलादित्याचा जन्महि झाला नव्हता, वल्लभी-पूरला जेव्हां राजा कनकसेनाच्या वंशांतला शेवटचा राजा राज्य करीत होता, तेव्हां वल्लभीपुरांत सूर्यकुंड नांवाचं एक अत्यंत पवित्र कुंड होतं. त्या कुंडाच्या एका बजूला असलेल्या विराट् सूर्यमंदिरांत एक अतिशय वृद्ध पुरोहित रहात होता. त्याला कांहीं मूल-बाळ नव्हतं कीं कुणी मित्र नव्हते. अनंत आकाशांत सूर्यदेव जसे एकटे, तसंच आकाशा-सारख्या निळ्या प्रचंड सूर्यकुंडाच्या कांठच्या आदित्य-मंदिरांत सूर्य-पुरोहित असा तेजस्वी वृद्ध ब्राह्मण अगदीं एकाकी, अगदीं एकटा होता. मंदिरांत समया लावणं, घंटा वाजवणं, उगवती-मावळतीला दोन्ही संध्याकाळीं आरती करणं– सगळाच भार त्याच्यावर. कुणी गडीमाणूस नाहीं, एकहि शिष्य पण नाहीं. वृद्ध ब्राह्मण एकटाच दररोज तीस शेर वजनाच्या पंचारतीनं दोन्ही संध्याकाळीं सूर्यदेवाची आरती करायचा; दररोज आपल्या थकल्या-मागल्या हातानं राक्षसांच्या राजाच्या राजमुकुटासारखी देवळांतली प्रचंड घंटा वाजवायचा; अन् मनांतल्या-मनांत त्याला वाटायचं, जर एखादा सोबती मिळाला, तर ह्या उतारवयांत सगळा भार त्याच्या हातीं सोंपवून देऊन निश्चित होतां येईल.


सूर्यदेवानं भक्ताची मनोकामना पुरी केली. एक दिवस पौष महिन्याच्या सुरवातीला घनदाट धुक्यानं चोहींकडे अंधारलं होतं, सूर्यदेव मावळला होता, वृद्ध पुरोहित संध्या-काळची आरती उरकून भीमाच्या छातीसारखं देवळाचं प्रचंड लोखंडी दार मोठ्या कष्टानं बंद करत होता, एवढ्यांत म्लान चेहऱ्यानं एक ब्राह्मण-कन्या त्याच्यासमोर येऊन हजर झाली–अंगावरचे कपडे फाटके, पण अपूर्व सुंदर होती. वाटलं, थंडीमुळं एक रात्र सूर्य-मंदिरांत आसरा हवा असेल. ब्राह्मणानं पाहिलं, मुलगी सुलक्षणा आहे, अन् वेश विधवेचा आहे. त्यानं चौकशी केली– 'तू कोण ? तुला काय हवं ?' तेव्हां ती ब्राह्मण-बालिका कमळाच्या कळीसारखे इवले दोन हात जोडून म्हणाली,– 'प्रभु, मला आसरा हवा आहे. मी ब्राह्मण-कन्या आहे. गुर्जर देशांतल्या वेद जाणणाऱ्या ब्राह्मण देवादित्याची एकुलती एक मुलगी मी. माझं नांव सुभागा. लग्नाच्या रात्रींच विधवा झालें, ह्या अपराधानं दुर्भागी म्हणून सगळ्यांनीं मिळून मला आमच्या देशांतून हांकलून दिलं आहे. प्रभु, मला आई होती, आतां तीहि नाहीं, मला आसरा द्या.' ब्राह्मण म्हणाला– 'अग अनाथ पोरी, इथं कोणत्या सुखाच्या आशेनं तुला आसरा हवा आहे ? माझ्या-जवळ अन्न नाहीं, वस्त्र नाहीं, मी अठराविश्वें दरिद्री, मला मित्रहि नाहींत.'

ब्राह्मण हें मनापासूनच बोलला, पण त्याच्या मनांत कुणी तरी म्हणायला लागलं 'हे दरिद्र्या, हे मित्रहीना, ह्या बालिकेला आपली मैत्रीण कर, आसरा दे.' ब्राह्मणाला एकदां वाटलं, आसरा द्यावा; परत वाटलं, ज्या मंदिरांत आज ऐंशी वर्ष आपण एक-टचानं ह्या सूर्यदेवाची पूजा केली, त्याच्या पूजेचा भार आतां ह्या शेवटच्या दिवसांत आणखी कुणाच्या हातीं सोंपवून निश्चित होणार ? ब्राह्मण घुटमळायला लागला. तेव्हां अचानक संध्याकाळचा सगळा अंधार भेदून पृथ्वीच्या पश्चिम तीराकडून सूर्याच्या उजे-डाचा एक थेंब येऊन त्या दुःखी बालिकेच्या चेहऱ्यावर येऊन पडला. भगवान् आदित्य-देवानं जणू स्वतःच्या हातानं दाखवून दिलं, –हीच माझी सेवादासी ! हे माझ्या प्रिय भक्ता, ह्या बालिकेला आसरा दे, ही दुःखी विधवाच नेहमीं माझ्या सेवेकरतां असू दे. ब्राह्मणानं हात जोडून सूर्यदेवाला प्रणाम करून, देवादित्य ब्राह्मणाच्या कन्येला–सुभागेला–सूर्यमंदिरांत आसरा दिला.

मग कितीतरी दिवस गेले, सुभागा आतां मंदिरांतलीं सगळींच कामं शिकली होती, फक्त तिच्यासारख्या कोंवळ्या हातांना तीस शेर वजनाची ती पंचारती कांहींकेल्या उचलतां यायची नाहीं, म्हणून आरतीचं काम वृद्ध ब्राह्मणालाच करावं लागत होतं. एक दिवस सुभागानं पाह्यलं, वृद्ध ब्राह्मणाचं जीर्ण शरीर ढांसळून गेलं आहे–पंचारती दुबळ्या हातांतून ढळली आहे. त्याच दिवशीं वल्लभीपूरच्या बाजारांत जाऊन एक शेर वजनाची एक लहानशी पंचारती घेऊन येऊन सुभागा म्हणाली–' बाबा, आज संध्या-

काळच्या वेळीं ह्याच पंचारतीनं सूर्यदेवाची आरती करा.' किंचित् हंसून ब्राह्मण म्हणाला-'सकाळीं ज्या पंचारतीनं देवाच्या आरतीची सुरवात केली आहे, त्याच पंचारतीनं संध्याकाळीहि देवाची आरती करायला हवी. नवी पंचारती ठेवून दे, उद्यां नव्या दिवशीं नव्या पंचारतीनं सूर्यदेवाची आरती होईल.' त्याच दिवशीं नेमक्या दोन प्रहरीं सूर्याच्या उजेडानं जेव्हां सबंध पृथ्वी उजळून निघाली होती, तेव्हां ब्राह्मणानं सुभागेला सूर्यमंत्र शिकवला—ज्या मंत्राच्या बळानं सूर्यदेव स्वतः येऊन भक्ताला दर्शन देत होते, अन् जो मंत्र आयुष्यांत एकदां सोडून दुसऱ्यांदां उच्चारला, तर नक्की मृत्यु येणार होता—तो सूर्यमंत्र. मग संधिक्षणीं संध्याकाळच्या अंधारांत आरती संपल्यावर विझलेल्या पंचारतीप्रमाणं ब्राह्मणाची जीवनज्योत धीरे-धीरे विझून गेली—सबंध पृथ्वी अंधारी करून सूर्यदेव अस्त पावले. सुभागा एकटी पडली.

पहिले कांहीं दिवस सुभागानं वृद्धाकरतां रडून-रडून घालवले. मग स्वतःच्या हातानं जंगल साफसूफ करून मंदिराच्या चारी बाजूला फुला-फळांचीं झाडं लावण्यांत कांहीं दिवस गेले. मग मंदिराच्या दगडी भिंती घांसून-घांसून स्वच्छ करून त्यांवर वेली, फुलं, पक्षी, हत्ती, घोडे, पुराणं, इतिहास ह्यांचीं चित्रं काढण्यांत आणखी दिवस गेले. शेवटीं सुभागाला आणखी कांहींच काम राह्यलं नाहीं. मग ती त्या फळांच्या बागेंत, फुलांच्या ताटव्यांत एकटीच हिंडत फिरायची. हळू हळू जेव्हां त्या नव्या बागेंत एक दोन फळं पिकायला सुरवात झाली, एक-दोन फुलं उमलायला लागलीं, तेव्हां मग हळू हळू एक-दोन इवलेसे पक्षी, कांहीं रंगीबेरंगी फुलपांखरं, अन् त्याचबरोबर लहान-मोठ्या मुला-मुलींचं एक टोळकंहि तिथं दिसायला लागलं. फुलपांखरं फुलांतला अगदी थोडा मध पिण्यावरच संतुष्ट होतीं, पक्षी फक्त एक-दोन फळांच्यावर टोंचे मारायचे एवढंच; पण तें मुलांचं टोळकं मात्र फुलं कुस्करून, फळं पाडून, डहाळ्या मोडून टाकून धिंगाणा घालायचं. तरी सुभागा कुणालाच कांहीं बोलायची नाहीं. हंसतमुखानं त्यांचा सगळा त्रास सहन करायची. झाडाखालीं हिरव्या गवतावर नाना रंगांचे कपडे घालून लहान-लहान मुलं-मुली खेळत असायच्या, तें बघतां-बघतां सुभागाचे दिवस विरंगुळ्यांत निघून जायचे. मग पावसाळा येऊन ठेपला—चोहींकडे काळ्या ढगांची दाटी अन् विजांचा लखलखाट, अन् गडगडाट. अशावेळीं एक दिवस तलवारीच्या पात्यासारखा पूर्वेचा वारा आला, अन् सुभागाच्या नव्या बागेंतले फुलांचे गुच्छ तोडून, झाडाचीं पानं झडवून, तिनं एवढ्या हौसेनं केलेली बाग जवळजवळ रिकामी करून सूं-सूं करत निघून गेला. पक्ष्यांचे थवे वाऱ्याच्या फटकाऱ्यानं वाहून नेले, फुलपांखरांचे तुटके पंख फुलांच्या पाकळ्यांमारखे चोहींकडे विखरून पडले, मुलांचं टोळकं कुठल्याकुठं दिसेनासं झालं. मग सुभागा त्या मुसळधार श्रावणांत एकटीच बसून आईवडलांची माया, सासु-सासऱ्यांची निष्ठुरता अन् लग्नाच्या रात्रींच्या सुंदर नवऱ्याच्या हंसतमुखाच्या आठवणी काढून रडायला लागली; अन् मनांतल्या-मनांत विचार करायला लागली—'हाय! ह्या निर्जन जागीं कुणाच्यातरी सोबतीवांचून परदेशांत सबंध आयुष्य एकटीनं कसं घालवूं?' हरणाच्या डोळ्यांसारखे सुभागाचे काळे-काळे विशाल डोळे आसवांनीं भरून आले. तिनं पूर्वेला पाह्यलं, अंधार, पश्चिमेला अंधार, उत्तरेला—दक्षिणेला चोहींकडे अंधार; तिला आठवण झाली. अशाच अंधारांत एक दिवस आपण ह्या देवळाचा आसरा घेतला होता. आजसुद्धां तसाच अंधार—तोच वादळी वारा, तेंच निःशब्द प्रचंड अर्यमंदिर—पण हाय, तो वृद्ध ब्राह्मण कुठं आहे, ज्यानं त्या दुर्दिनीं अनाथ अभागी सुभागेला आसरा दिला होता! सुभागेच्या काळ्या डोळ्यांतून दोन आसवं पावसाच्या दोन थेंबां-



सारखीं अंधारात झरून पडली. मंदिराची सगळी दारं बंद करून पंचारती पेटवून सुभागेनं देवाची आरती केली मग काय वाटलं कुणास ठाऊक, सुभागा सूर्याच्या त्या मूर्तीसमोर ध्यानस्थ बसली. हळू हळू सुभागेचे दोन्ही डोळे स्थिर होत आले, चोहीकडून वादळाचा थयथयाट, ढगाचा गडगडाट हळू हळू जास्ती-जास्ती लाब-लाब जात गेला. सुभागेच्या मनात आतां काही शोक नव्हता, काही दु.ख नव्हतं. तिच्या मनांतला अंधार जणू सूर्याच्या तेजान छिन्नविच्छिन्न होऊन गेला होता. धीरे-धीरे, भीत-भीत ब्राह्मणाकडून शिकलेला तो सूर्यमत्र सुभागेन उच्चारला; तेव्हां सबध पृथ्वी जणू जागी झाली, सुभागेला जणूं ऐकू आल, चोहीकडे पक्ष्यांचा किलबिलाट, बांसरीची तान, आनंदाचा कोलाहल. मग गभीर गडगडाटानं आकाश थरकवून, आसमत उजेडानं उजळून काढून, त्या देवळाच्या दगडी भिंती, लोखडी दरवाजा आगीनं जणूं वितळवून टाकून, सात हिरव्या घोड्याच्या पाठीवर, उजेडाच्या रथांत, कोटयवधि अग्नीच्याप्रमाण ज्योतिर्मय, प्रकाशमय सूर्यदेवानी दर्शन दिलं. तो उजेड, ते तेज माणसाच्या दृष्टीला सहन होण्याजोग नव्हत. दोन्ही हातांनी तोंड झांकून घेऊन सुभागा म्हणाली—'हे देवा, रक्षण कर, क्षमा कर, सबध पृथ्वी जळते आहे!' सूर्यदेव म्हणाले—'भिऊ नकोस, भिऊं नकोस. वत्से, वर माग.' बोलतां-बोलता सूर्यदेवाचा उजेड क्रमशः क्षीण होत आला, फक्त किंचित्शी तावूस छटा सौभाग्यवतीच्या सिंदुरासारखी सुभागेच्या भागांत उजळ राहृली. मग सुभागा म्हणाली —'देवा, मला पति नाही, पुत्र नाही. मी अनाथ विधवा आहें. अतिशय एकाकी आहें. मला असा वर दे, की मला आता आणखी ह्या जगांत रहाव लागणार नाही. सगळ्या वेदनातून सुटका होऊन आजच तुझ्या चरणतळी मला मरण येऊं दे.' सूर्यदेव म्हणाले—'वत्से, देवतेच्या वरान मृत्यु येत नाही, शापान येतो. तू वर माग.' तेव्हा सूर्यदेवाला प्रणाम करून सुभागा म्हणाली—'देवा वर दिलाच आहेस, तर मला एक मुलगा नि एक मुलगी दे. त्याना मी मोठं करीन. मुलगा तुझ्यासारखा तेजस्वी होऊं दे, नि मुलगी चद्रकोरीसारखी सुदर होऊं दे.'

'तथास्तु' म्हणून सूर्यदेव अतर्धान पावले. हलके-हलके सुभागेच्या डोळ्यावर झोंप आली दगडावर पदर अंथरून सुभागा झोपी गेली चोहीकडे झिमझिम पाऊस पडायला लागला. पहाट होत आली होती, तेव्हां झोंपेच्या तद्रीतच सुभागा ऐकायला लागली, तिच्या त्या उध्वस्त बागेंत दोन इवल्या पक्ष्यांनी किती सुंदर गाण गायला सुरवात केली होती! हळू हळू सकाळच्या वेळचा थोडासा सोनेरी उजेड सुभागेच्या डोळ्यावर पडला, ती घाईघाईनं उठून बसली, पदर ताणला गेला, वळून पाहृल— एक कोवळा मुलगा नु एक कोवळी मुलगी आपल्याशेजारीच झोंपलेली! सूर्यदेवाचा वर फळला. देवासारखी सुदर दोन मुल सुभागेन मांडीवर घेतली. सगळ्या लोकाच्या नजरेआड निर्जन मदिरात त्याचा जन्म झाला, म्हणून सुभागेनं दोघाचीं नाव ठेवली— गायब अन् गायबी.

गायब अन् गायबीला कडेवर घेऊन सुभागा मदिराच्या बाहेर आली, तेव्हा पूर्वेला सूर्यदेवाचा उदय होत होता, पश्चिमेला चद्र अस्ताला चालला होता. सुभागेनं पाहृल, गायबच्या तोंडावर सूर्याचा उजेड हळूहळू वाढत गेला, अन् गायबीच्या काळ्याभोर केसांत चद्राच चादण हळूहळू विझत गेल. मनातल्या-मनात तिला उमगल, गायबीला ह्या जगात जास्ती दिवस राखता यायच नाही.

गायब हळूहळू मोठा होऊन जेव्हा पाठशाळेंत जायला लागला, त्याच वेळी गायबी आईजवळ बसून मदिरातल कामकाज शिकायला लागली. गायब जितका उनाड, खोडकर होता, तितकीच गायबी शात होती. गायबीशीं खेळायला कितीतरी लहान-लहान मुली मुद्दामहून यायच्या, पण गायबच्या खोड्यानी पाठशाळेंतली सगळीं मुलं त्रासली होती. शेवटीं त्या सगळ्यानी मिळून एकदिवस चर्चा केली — अभ्यासात, अगच्या बळात, सगळ्या बाबतीत गायब आपल्याला भारी आहे; चला, आपण सगळे मिळून गायबला राजा करूं या, अन् आपण त्याची प्रजा होऊं या; तसं केल की मग गायबला आपल्याला छळतां यायचं नाही. असं म्हणून सगळ्यांनी मिळून गायबला राजा म्हणून खाद्यावर घेऊन नाचायला सुरवात केली. हंसत-खिदळत मोठ्या खुषीत गायब त्या सगळ्या छोट्या-छोट्या मुलाच्या खाद्यावर बसला होता, इतक्यांत एक अगदीं लहान मुलगा म्हणाला—'मी राजाचा पुजारी! मंत्र वाचून मी गायबच्या कपाळावर राजटिळा लावणार!' तेव्हा त्या मुलाच्या टोळक्यानं गायबला एका मातीच्या टेकाडावर बसविल गायब खऱ्या राजासारखा त्या मातीच्या सिंहासनावर बसला होता, एवढ्यात त्याच्या कपाळावर टिळा लावून तो लहान मुलगा म्हणाला—'गायब, तुझ नाव आम्हाला माहीत आहे. बोल, तुझ्या आईच नाव काय? वडलाच नांव काय?' गायब म्हणाला—'माझं नाव गायब, माझ्या बहिणीचं नाव गायबी— आईचं नाव सुभागा. माझ्या वडलाचं नाव— काय?' आपण सूर्यदेवाचे वरपुत्र आहोंत, हें गायबला माहीत नव्हत. त्याला नाव सागता आलं नाही, शरमेनं त्याची मान खाली झाली, चारीबाजूचं मुलांच टोळक खो-खो हंसत टाळ्या पिटायला लागल, शरमेनं गायबचा चेहरा लालीलाल झाला.

मग रागाच्या एका ठोकरीनं तें मातीचं सिंहासन मोडून टाकून, थपडानी लहान मुलाचे फुगीर गाल जास्ती फुगवून, रागान थरथर कापत गायब थेट सूर्यमदिरात येऊन थाबला. गायबीच्या हातात पितळेची एक लहानशी पचारती देऊन, सूर्यदेवाची आरती कशी करायची असते, हें सुभागा तिला शिकवत होती; एवढ्यांत झंझावातासारखं आत येऊन गायबनं पितळेची ती पचारती हिसकून घेऊन फेंकून दिली. निर्मळ पितळेची ती पचारती दगडी भिंतीवर आपटून झणझण् आवाज होऊन, फुटून गेली, त्याचबरोबर सूर्यदेवांची मूर्ति खोदलेला एक काळा दगड त्या भिंतीतून ढासळून पडला. सुभागा म्हणाली—'अरे वेड्या, हें काय केलंस? सूर्यदेवाची मगलारती फोडून देवाचा अपमान केलास?' गायब म्हणाला—'मला देव माहीत नाही, सूर्य पण माहीत नाही; साग, मी कुणाचा मुलगा आहें? नाहीतर आज तुझी ही सूर्यमूर्ति कुंडाच्या पाण्यात बुडवून टाकीन.' जरी ती सूर्यमूर्ति भीम आला असता, तरी त्याला उचलता आली नसती, तरीदेखील गायबचा आवेश बघून सुभागेला वाटल— हा काय करेल कुणास ठाऊक. घाईघाईनं गायबचे दोन्ही हात धरून ती म्हणाली—'बाळ, शांत हो, स्थिर हो, परत सूर्यदेवाचा अपमान

करूं नकोस; वडलांचं नाव काय करायचंय्? मी तुझी आई आहे, गायबी तुझी बहीण आहे, मग तुला कशाची उणीव आहे?' मग गायब रडत-रडत म्हणाला– 'मग, आई, मी नीच, किळसवाणा, अपवित्र, रस्त्यावरली धूळ आहे? भिकाऱ्यापेक्षाहि खालच्या दर्जाचा आहे?' हे शब्द बाणासारखे सुभागेच्या हृदयात जाऊन खुपले, दोन्ही हातानी तोंड झाकून घेऊन ती मट्दिशी खाली बसली; मनातल्या-मनात तिला वाटलं– हाय देवा, हें काय केलंस? आतां ह्या खोडकर मुलाची कशी समजूत घालू, काय सागूं त्याला? गायब-गायबी नीच नाहीत, अपवित्र नाहीत, तीं सूर्याची मुलं आहेत, सगळ्यांच्यापेक्षा पवित्र आहेत, ह्या गोष्टीवर कोण विश्वास ठेवील? एकदा सुभागेला सूर्यमंत्राची आठवण झाली, पण जेव्हा आठवलं की दोनदा मत्र उच्चारला तर नक्कीच मरण येणार,– ह्या कोवळ्या वयाच्या गायब-गायबींना एकटं टाकून पृथ्वी सोडून आपल्याला कायमचं निघून जावं लागेल, – तेव्हां तिचं आईचं अंतःकरण आक्रोश करायला लागल. सुभागा म्हणाली– बाळा, बोलण राहू दे, शात हो, चल, आपण दुसऱ्या देशात निघून जाऊं. सूर्यदेवच तुझे वडील आहेत, हे लक्षात ठेव.' गायबन मान हलवली, त्याचा विश्वास बसला नाहीं. तेव्हा सुभागा म्हणाली– 'तर मग मदिराची सगळी दार बद कर, आता तुमचे वडील तुला दिसतील, पण हाय, मी मात्र तुम्हाला परत मिळणार नाहीं!' सुभागेच्या दोन्ही डोळ्यातून आसवाच्या धारा लागल्या. गायबी म्हणाली– 'भाऊ, का आईला त्रास देतोस?' गायबनं उत्तर न देता मंदिराची सगळी दार बद करून टाकली. सुभागेन दोघाचे हात धरले, अन् ती सूर्यमूर्तीसमोर ध्यानस्थ होऊन बसली. ह्याच मंदिरात एकाकी सुभागेन एक दिवस मरणाची इच्छा करून जो मत्र निर्भयपणे उच्चारला होता, तोच काळसर्पासारखा सूर्यमंत्र आज उच्चारताना तिच्या आईच्या हृदयात किती भीति, किती व्यथा होती! सूर्यदेवानं दर्शन दिल– सबध मदिर जणू रक्ताच्या प्रवाहात वाहवून टाकून प्रचंड मूर्तीत सूर्यदेवान दर्शन दिल. सुभागा म्हणाली– 'देवा, गायब-गायबी कुणाची मुलं आहेत?' सूर्यदेव एकहि शब्द बोलला नाही. पाहता-पाहता सूर्याच्या प्रचड तेजानं भीक मागणाऱ्या सुभागेचं सुंदर शरीर जळून खाक होऊन गेल. गायबी रडायला लागली– 'आई, आई.' गायबन विचारल– 'आई कुठाय्?' सूर्यदेवानं काहीच उत्तर दिलं नाही, दगडावरला तो राखेचा ढीग तेवढा दाखवला. गायब उमगला –आई आतां नाही. संतापान, दुःखानं त्याच्या डोळ्यात आग पेटली. मदिराच्या कोपऱ्यातनं सूर्याची मूर्ति खोदलेला तो दगड उचलून, त्यान सूर्यदेवाला फेंकून मारला. यमराजाच्या रेड्याच्या डोक्यासारखा तो काळा दगड सूर्यदेवाच्या मुकुटाला लागून जळत्या कोळशासारखा एका बाजूला पडला–अन् त्याचबरोबर गायब बेशुद्ध झाला.

खूप वेळान गायब जेव्हां शुद्धीवर आला, तेव्हा सूर्यदेव अतर्धान पावला होता, डोक्याशीं गायबी तेवढी बसून होती. गायबनं विचारलं– 'सूर्यदेव कुठं आहेत?' तेव्हा तो काळा दगड दाखवून म्हणाली– 'भाऊ, ती घे आदित्यशिळा. हा दगड तूं ज्याच्यावर टाकशील, तो नक्की मरेल. सूर्यदेव हा तुला देऊन गेले आहेत, अन् त्यानीं सांगितल आहे, की तू त्याचाच मुलगा आहेस, आजपासून तुझं नांव शिलादित्य झालं. तुझा वंश सूर्यवंश म्हणून जगात राज्य करेल अन् तूं मनातल्या-मनात हाक मारल्याबरोबर त्या सूर्यकुंडांतून सात घोड्याचा सूर्याचा रथ तुझ्याकरता वर येईल! रथाचं नांव सप्ताश्वरथ. जा भाऊ, सप्ताश्वरथात बसून, आदित्यशिळा हातांत घेऊन जग जिंकून ये.' गायब म्हणाला– 'तुला कुठ ठेवून जाऊं?' गायबी म्हणाली– 'भाऊ, मला ह्या मदिरात बद करून ठेव, मी बागेतली फळ खाऊन कुडांतलं पाणी पिऊन आयुष्य घालवीन. मग जेव्हा तू राजा होशील, तेव्हा मला ह्या मदिरातून राजवाड्यात घेऊन जा'

गायबीला त्या देवळात बद करून ठेवून, सात घोड्याच्या रथातून गायब मोठ्या आनदानं जग जिंकायला निघून गेला. अन् गायबी तो राखेचा ढीग सूर्यकुडाच्या पाण्यात विसर्जन करून 'आईग! भाऊ!' असं म्हणत दगडाला ठेंचकाळून पडली.

त्या दिवशी मध्यरात्र उलटून गेल्यावर, जेव्हा आकाशात चांदण्या नव्हत्या, पृथ्वीवर उजेड नव्हता, तेव्हा अचानक झणत्कारान सूर्यमदिर थरारलं. मग ऐशी मण वजनाच्या प्रचड सूर्यमूर्तीला अन् लोण्याच्या मावलीसारख्या सुदर गायबीला घेऊन, अर्धं मंदिर हळूहळू जमिनीच्या खाली जायला लागल. जिवाच्या भीतीन गायबीनं पळायचा प्रयत्न केला. पण व्यर्थ! गायबीन भिंतीला धरून वर चढायचा प्रयत्न केला, दगडी भिंतीवर पाय ठेवता येत नव्हता– दगडी भिंत काचेसारखी झाली होती. तेव्हा 'भाऊ!' अशी किंकाळी फोडून गायबी बेशुद्ध होऊन पडली. मग सगळं खलास, सगळा अधार.

कितीतरी दिवस गेले, गायबनं त्या सप्ताश्वरथातून जगभर भटकून, देशोदेशीं सैन्य जमा करून, राज्यामागून राज्यं जिंकून, शेवटी वल्लभीपूरच्या राजाला समोरासमोरच्या लढाईत त्या आदित्यशिळेन मारून, शिलादित्य नाव घेऊन, राजसिंहासनावर बसून, पाठशाळेतल्या सोबत्यांपैकी कुणाला मत्री तर कुणाला सेनापति करून, कुचकामी म्हाताऱ्या नोकराना हांकलून लावलं. मग नाना मगलवाद्यांच्या आवाजात चद्रावती नगराच्या पुष्पवती राजकन्येशी लग्न करून, संगमरवरी शयनमंदिरात शिलादित्य विश्राति घ्यायला गेला. हळूहळू रात्र जेव्हां वाढली, कुठच काहीं जाग नव्हती, पायथ्याशी चवऱ्या ढाळणाऱ्या दासी चवऱ्या हातातच ठेवून पेंगत होत्या, उशाशी सोन्याची समई विझायला आली होती, त्या वेळी शिलादित्याला स्वप्नांत आपल्या धाकट्या बहिणीचा– गायबीचा– चेहरा दिसला. त्याला वाटलं, खूप, खूप लांबून तो चेहरा आपल्याकडे बघतो आहे; अन् त्या सूर्यमदिराच्या दिशेन कुणीतरी हाक मारत आहे– 'भाऊ, भाऊ, भाऊ!' किंचाळी फोडून शिलादित्य जागा झाला. तेव्हां पहाट झाली होती. ताबडतोब रथात बसून सैन्य घेऊन तो सूर्यमदिरापाशी येऊन हजर झाला; त्यान पाहिलं, भीमाच्या छातीसारखी मदिराची दोन्ही दार अगदी जाम बद– किती काळापासूनच्या वेलींनी ते मदिराच दार जणू लोखडी साखळ्यानी बाधून ठेवलं होत. स्वतःच्या हातानं त्या वेली बाजूला सारून शिलादित्यानं दार उघडल– दिवसाचा उजेड आत आल्यान वटवाघळाचा एक कळप घाईगर्दी करत उघड्या दारातून बाहेर पडला. शिलादित्यान मदिरात प्रवेश केला; त्यान पाहिल, जिथ पूर्वी सूर्यमूर्ति होती, तिथ एक प्रचड अधार, काळ्या पड-

द्यासारख त्यानं सगळ झाकून टाकल होतं. शिलादित्यानं हाक मारली– 'गायवी ! गायवी ! गायवी, तू कुठ आहेस ?' अधाऱ्यातून उत्तर आलं– 'हाय गायवी ! कुठाय् गायवी !' शिलादित्यान मशाल आणायचा हुकूम दिला, त्या मशालीच्या उजेडात शिलादित्यान पाह्यल– उत्तरेची बाजू रिकामी करून सूर्यमूर्तीबरोबरच अर्धं देऊळदेखील जणू पाताळात निघून गेल होत; फक्त काळ्या दगडाच्या सात घोड्याची मुडकी वासुकीच्या फण्यासारखी जमिनीच्या वर उरली होती. ज्या खोलीत शिलादित्य गायवीबरोबर खेळ खेळायचा, दिवसभर खेळल्यावर गुर्जर देशच्या गोष्टी ऐकता-ऐकता ज्या खोलीत आईच्या माडीवर दोघ भावड झोंपून जायची, जिथ देवदाराच्या झाडासारखी ती पितळेची पचारती होती– त्या खोल्याची निशाणीदेखील नव्हती त्या प्रचड गुहेच्या तोंडाशी उभ राहून शिलादित्यान हाका मारल्या– 'गायवी ! गायवी !' त्याचा तो करुण आवाज त्या अधाऱ्या गुहेत फिरून–फिरून, हळूहळू जास्ती दूर-दूर होत, पाताळाच्या तोडात निघून गेला. सुस्कारा टाकून गायब परत राजमदिरात आला.

त्यादिवशी राजाच्या आज्ञेन राजाचे कारागीर सोन्याच्या जाड पत्र्यान ते प्रचड मदिर सबध मढवायला लागले शिलादित्यान त्या मदिरात दुसऱ्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली नाही त्या अधाऱ्या गुहेतून सूर्याचे घोडे जसे अर्धवट वर आले होते, ते तसेच राह्यले. मग डोंगर खोदून सगमरवर आणवून, शिलादित्यान सूर्यकुडाच्या समोवार सुदर बाधून घेतल कधी लढाईचा प्रसग आला, की शिलादित्य त्या सूर्यकुडाच्या काठावर सूर्याची उपासना करायचा; त्याबरोबर सप्ताश्वरथ त्याच्याकरता पाण्यांतून वर यायचा. त्या रथात बसून शिलादित्य ज्या ज्या लढाईवर गेला, त्या त्या लढाईत त्याचा जय झाला. शेवटी एका विश्वासघातकी मत्र्यान– *ज्याच्यावर शिलादित्याचा सर्वांत जास्ती* विश्वास होता, सर्वांत जास्ती प्रेम होत– त्यानच शिलादित्याचा सत्यानाश केला. शिलादित्याकरता सूर्यकुडातून सप्ताश्वरथ वर येतो, ही गोष्ट त्या मत्र्याखेरीज जगातल्या दुसऱ्या कुणालाच माहीत नव्हती.

सिधुतीरावरल्या श्यामनगरहून पारद नांवाच्या रानटी यवनाच्या टोळीनं जेव्हा वल्लभीपुरावर आक्रमण केल, तेव्हां ह्याच विश्वासघातक्यान थोडक्यापैशाच्या लालुचीन त्या रानटी लोकाशी कट करून, गाईच्या रक्तान ते पवित्र कुड अपवित्र केल. युद्धाच्या दिवशी शिलादित्य जेव्हा सूर्यकुडाच्या काठावर सूर्याची उपासना करायला लागला, तेव्हा निळं पाणी कापून पूर्वीसारखा देवरथ वर आला नाही; शिलादित्यान सात घोड्याची सात नांव घेऊन कितीदातरी हाका मारल्या, पण कुडाचं पाणी होत तसंच स्थिर राह्यल. निराश होऊन राजपथावर शिलादित्य शत्रूला सामोरा गेला, पण त्याच युद्धात त्याचा प्राण गेला दिवसभरच्या युद्धानतर सूर्यदेवाबरोबरच सूर्याचा वरपुत्र शिलादित्य अस्त पावला. सोन्याच मदिर फोडून वल्लभीपुर उध्वस्त करून परधर्मी शत्रु निघून गेला. * *


# रो मां च

लेखक .
व्यं. न. कुलकर्णी

## (मला घडलेलें जर्मनीचें दर्शन)

"जर्मन स्त्रियांबरोबर नाचायला यायला पाहिजेच का ?"

**जर्मनींत शाकाहारी राहतां येणं शक्य आहे का ? जर्मनांना संस्कृत भाषेविषयीं फार प्रेम आहे म्हणे, खरं का ? हिटलर लोकप्रिय होता ?"**

इत्यादि अनेक प्रश्न मला शेंकडों वाचक बंधुभगिनी जर्मनविषयी विचारतात मी जर्मनीत दहा वर्षे होतो. दुसऱ्या महायुद्धाच्या राखरागोळीतून नवा वैभवशाली जर्मनी कसा निर्माण झाला हें मी प्रत्यक्ष पाहिले आहे, अनुभविले आहे साहजिकच माझे वाचक मला अनेक प्रश्न विचारतात, पण सर्वांना मी मात्र पत्रानें उत्तरे देऊ शकलोंच असेल असें नाहीं. मार्च अखेर प्रसिद्ध होणाऱ्या माझ्या "रोमाच"-मध्यें अशा अनेक प्रश्नाची उत्तरें सापडतील.

**रोमांच : मूल्य सहा रुपये व टपाल खर्चासाठीं ७५ न. पै. पाठवून आपली प्रत आजच राखून ठेवा !**

व्यं. न. कुलकर्णी
पोस्ट गोकाक (जि. बेळगांव)



# जेवण

मधुकर केचे

खाण्यापिण्यांत मी इतर दहाजणाहून सरसा आहें. निदान मागें तर मुळीच नाही. खरें अथवा खोटे माना, पण खाण्याबाबत आमच्या घराण्याला इतिहास आहे. रघूजी भोसल्याच्या कारकीर्दीत आमच्या घराण्याने वर्धा नदी ओलाडून त्या गावावर कब्जा केला. मूळच्या लोणारी मडळीना येथून हुसकावून लावले. लोणारी हे भोसल्याचे मालगुजार. तसा झगडा आतरराज्यीय व्हायला हवा होता. आम्ही कितीहि झाले तरी मोगलाईतून इकडे विनापरवाना आलेलो तेव्हां भोसले विरुद्ध निजाम असे रगायला काही कमी कारणें नव्हती. पण आक्रमणाचें इतके मनाला लावून घेण्याचा तो काळ नव्हता. लोणारी देत असत तेवढाच किंबहुना एखादा ' राणी छाप ' जास्तच वायदा आमची मडळी भोसल्याच्या, दरबारी पोचता करूं लागली. त्यामुळें फार निक्षून पाहण्याचे भोसले सरकारानाहि कारण उरले नसावें. आज तर या गोष्टीचें भोसल्यानाच काय, आम्हालाहि स्मरण उरले नाही. हगामात एखादा 'पुस्तकी' इकडे येतो डालीभर कणसांच्या मोबदल्यात आमच्या घराण्याच्या वृक्षाची नवी पाने तो आपल्या दफ्तरात नोदून घेतो. विचारलेंच तर मग रगात येऊन सांगतोहि, " लोणाऱ्याविरुद्ध तुमच्या पूर्वजानी कशी पिवडी मारली म्हणतां! एकटचा सुरेंमानसिंग केच्यानी (सु'रें'चा रफार *त्याचा*) —" असो.

हें लोणाऱ्याचें हारणें व आमची नवी मालगुजारी येथें प्रस्थापित होणें याच्याशीच आमच्या खाण्यापिण्याचा फार नजीकचा सबध आहे. झाले काय की आमचें बस्तान येथें बसले. ते तसेच सूर्यचंद्र अगासात असेस्तों ठीक बसले असते; पण नंतरच्यापैकी आमच्या कोण्या गगारामसिंगाने भोसल्याना एकवर्षी वायदाच दिला नाही. मालगुजारी म्हणजे साठचाळीसीचा हक्क. शभरातून साठ रुपये भोसल्याना आणि चाळीस माल गुजाराला असे वायदा वसुलीचे वाटप होतें. पण गगारामसिंगानें पठ्ठ्यानें सारा वायदा गिळून टाकला. त्या काळाच्या रिवाजानुसार दोरानें बाधून त्याला नागपूरला दरबारांत उभें केलें गेलें.

भोसले सरकार क्रुद्ध नजरेनें त्या हातपाय बाधलेल्या गंगारामसिंगावर आग पाखडू लागले.

"बोल हरामखोरा! कुठें आहे वायदा?"

"खर्च झाला सरकार." काहीशी भीति व काहीशी बेपर्वाई गगारामच्या डोळघात होती.

"खर्च? कशांत खर्च झाला?"

यावर गगारामसिगानें आपल्या पोटावरून निदर्शक हात फिरवला हा वेळपर्यंत दुर्लक्षित झालेलें ते पोट मग एकदमच सर्वांच्या दृष्टीत उमटलें. खरेच, मोठें भव्य होतें. ते पोट. मोटेचीच आठवण व्हावी.

"इतका सारा पैसा खाण्यांत घातला काय?" सरकार अचव्याने व रागानें त्यावर ओरडले, "असा खातोस तरी किती?"

"भूक हातची नाही सरकार."

मग दरबारी मंडळीच्या आग्रही सूचनेवरून त्याचे खाणे पडताळण्याचें ठरले सागणारे सांगतात की दीड पायली तादळाचा भात *गंगारामसिंगाच्या पोटात कोण्या कोपऱ्यात दडला हा माणूस झूट* बोलत नव्हता या खात्रीनें सरकार खूष झाले

ही बातमी किती खोटी यावर फारसा अदाज करता येत नाही पण अजूनपर्यंत तरी कमी भुकेचा माणूसच आमच्या कुळात जन्माला आला नाही. आतांतर मी पाढरपेशा झालो. त्या मानाने भूक कमी व्हायला पाहिजे तरीहि मी-मी म्हणणाऱ्या खाबूना मी खाली पाहायला लावलें आहे

यातले एक मला लक्षात घेतले पाहिजे की आम्ही लोक बकासुरासारखे नुसतेच बका बका खात नाही. आम्हाला त्यातली चवदेखील आहे शहरी जीवनाची कीड हळूहळू माझ्या अगाला लागत असली तरी ती चव मात्र गेली नाही. दहा पोळचाच्या ठिकाणी आता पाचच खात असेन, पण त्या पोळचा कोण्या गव्हाच्या, कशा भाजल्या, कशा कापल्या की नुसत्याच लाटल्या ते सारे ठरवणारी चव मात्र शाबूत आहे

खूप खाण्याच्या गोष्टी आताशा लोकाना रुचत नाहीत. स्वत: खायचे सोडा; दुसऱ्यानें खाणेहि त्याना आवडत नाही. स्वत ला पचत नाही. दुसऱ्याचे पहावत–परवडत नाही नुसतेच ऐकणेहि त्याना जमत नाही. तसें काही बोलू गेलों तर आपलाच गावढळपणा ठरतो. या तकलादी लोकाना थोडें कमीअधिक खाल्ले तर पोट फुटण्याची भीति वाटते. म्हणूनच अलीकडे उत्तम प्रमाणात खाणाऱ्या माणसाच्या गोष्टी मी कधी सागत नाही. अतोऱ्याचा डोमा पाटील नागपूरच्या

दीपकमध्यें गेला होता म्हणतात. तर त्याच्या अर्ध्या जेवणांतच मॅनेजर घामाघूम झाला. पुन्हां म्हणून एका रुपयांत त्याला 'पात्र' द्यायचें नाही ही त्यानें मनाशी प्रतिज्ञा केली म्हणे. म्हणून अशा पराक्रमाच्या गोष्टी जरा जपून बोलाव्या लागतात. पेशव्याचे इतर दुर्गुण विसरून जाऊन नेमके त्यांच्या कढीभातावर बोट ठेवणारे व मराठ्यांचें राज्य त्यामुळें बुडाले म्हणणारे तर्कशास्त्री अनेक आहेत. त्याची कीव करण्यापेक्षा हा विषयच टाळणे बरे ! शिवाय ही अन्न टंचाई ! त्यामुळें खाण्याच्या प्रमाणाबद्दल तरफदारी नकोच.

हें झाले तरी लोकांनी आपल्या खाण्याची चवहि सोडून दिली तें कांही बरें नाहीं केलें. पोरगा केवळ दोन पोळ्या खातो—हा कर्तबगारी काय करणार ? म्हणून त्याला पोरगी नाकारणारे सोयरे कालपरवाचे. आजचे नसतील. हो, पण सुग्रण अशी उत्तम स्वयपाक करणारी पोरगी मागणारा सोयरा मात्र आजहि आहे. तो आहे हाच आनद.

पण अन्नाची अशी रुचि असणारा माणूसहि आजकाल विझत चालला आहे. हायस्कुलात असताना अनेक ताप होते. पण खाणावळीत जेवण्याचा ताप इतरापेक्षा जबर होता. नांव ठेवायला तसें म्हटलें तर कुठेंहि जागा नव्हती. हळद ल्यालेले पिवळें धम्म वरण अगदी वितळल्या सोन्यासारखें सजायचें. जुईची फुलं हंसणारा भात त्याच्याशी लगट करीत असायचा. त्याचे आकारहि मोठे मनवेधू असतात. *भात वाटीनें दावलेला. त्याची लेणी चापून चोपून बसलेली.* त्याच्या पायथ्याशी वाहणारें वरण ! वाहण्यांतला सैलपणा आणि आटोप तेथें नक्कीच असायचा. कधी म्हणून या वरणानें बोर्डिगातल्या वरणासारखें मिठाला नामशेष केलें नाही की टोकाच्या चटणीला गिळून टाकलें नाही. माज्या मसाल्याचा गंध वातावरणाला सागत वाटीत वाफेच्या दुलईआड दडलेल्या. फारच, मोहक फारच चवलावू. पण कांहीहि म्हणा, त्या जेवणांत, तशाहि रूपवान जेवणात, चव कशी ती येईच ना. आमच्या गावचे कापूसगाडीवाले त्याहि वेळी येत. ही मंडळी ताकाचें चून व वरणाचा पेंड डझनभर भाकरीच्या चळतीत दाबून आणीत. कापूस विकल्यावर दलालाच्या दुकानावर किंवा मार्केटांतल्या नळाजवळ सांवली पाहून बसत. अशा वेळी खानावळीस खाडा करून मीहि त्याच्या शिदोरीवर ताव मारी. पुढें पोट दुखे. त्यानी तें अन्न निघत्यावेळी सोबत घेतलेले असे. म्हणजे मी खाण्याच्या वेळी ते उणेपुरें तीन दिवसाचे शिळें असे. आतां शिळेपणाने पोट हें दुखणारच. बाकी त्या पोट दुखल्यामुळें त्याची चव मात्र गुजमरहि कमी होत नव्हती. त्या चवीची सर खानावळीतल्या देखण्या अन्नाला तर जिरेभरहि येत नव्हती. पुष्कळदा ही शिदोरी संपलेली मंडळी 'उतान्या'वर आपल्या बडधा–बैल नेऊन तेथें उडदाचें वरण आणि रोटल्या करीत त्या उडदाच्या वरणावर लसणाच्या तीक्ष्णमधुर चवीचे अधिराज्य असे. आणि रोटल्यात तर साध्या भाजणीमुळेंच एक अवीट गुळचटपणा येई. हें खाणाऱ्या मंडळीना मात्र उगीचच आमच्या खानावळीच्या झगमग अन्नाचें आकर्षण असे. दोन पैसे गांठी बाधून असणारा एखादा धुरकरी गडी मग एखाद्या लॉजमध्यें जेवून येई. पण चारपाच वेळाच्या *अनुभवानें तो शहाणा होऊन* पुन्हा उडीदगोटल्याकडे वळे.

*खानावळीच्या अन्नात* सपन्नता असे. विविधता राही. भाज्या, चटण्या, कोशिंबिरी, काय काय ते राही. पण त्या संपन्नतेंत व विविधतेंतहि तोचतो बाणा असे. तो खटके. भाजी बटाट्याची असो की वांग्याची असो–तोंडावळा तोच. खूप सुंदर रूप असणारे चार लोक जन्मभर एखाद्याच्या वांट्याला यावे, इतराशीं त्याचे सबध तुटून जावे आणि मग रोज रोज दिसणाऱ्या त्या चेहऱ्यांना कटाळून त्याने इतर कुरूप लोकाचाहि सोस धरावा तशी स्थिति खाणावळीच्या मेंबराची होते. जेवणातल्या सपन्नतेनें केवळ चव येत नाही. खरें म्हणजे अन्नाची चव अन्नाबाहेरच असते. स्थळ, काळ, प्रसग याच्यांतून ती चव येते.

आतां कोणाला म्हटले तुमचा तो साजूक तूप घातलेला भात सोडा, तें केशरी श्रीखड आणि बेलदोड्याची जाणीव देणारी बासुंदी बाजूस सारा, किंवा मधई पानासारख्या लुसलुशीत पोळ्या खाऊं नका; *आणि खा काय तर ज्वारीच्या घुगऱ्या ! त्याहि* नुसत्या मीठ घालून व कोरडी मिरची त्यांत फोडून. वरून थेंब दोन थेंब जवसाचे तेल टाका—सारे जण तसे म्हणणाऱ्याला वेडयांत काढतील. चवीचें गणित करणारे लोक घुगऱ्यापेक्षां त्या मुलायम मिष्टान्नाकडे त्वरित वळतील. नेहमीच्या रूढ चाकोरीच्या अळणी जीवनात ते आपली जीभ हारवून बसलेले असतात. लिंबूत ते चव शोधणार नाहीत. त्याना ती लेमनमध्यें मिळेल. अननसाच्या ताज्या फोडीपेक्षा पायनापलचा कृत्रिम अर्क त्याना बरा वाटेल अशा चव गेलेल्या लोकांना घुगऱ्या मिळत नाहीत याचा फारसा खेद नाही. पण पदार्थ व अन्न ही *तर त्या त्या जीवनाचीं बोलकी प्रतीके आहेत. एक विशिष्ट पदार्थ* खायला न मिळणे म्हणजे जीवनाचा एक थर पारखा होणे. तसा तो पारखा झाला त्याची जाणीव बोचत राहणे हेहि आरोग्याचे लक्षण आहे. निदान त्यात जीभ व जीवन चाखणारी सर्व इंद्रियें जिवत आहेत, त्या जिवत तळमळीने, भुकेने ती तापलेली आहेत व तापून तापून त्याची जाणीव वाढली आहे असें तरी म्हणता येईल. पण जेथे ही रुचीच नाही, आवडच मेली, तेथें मृतकळाच म्हटली पाहिजे. महारोग्याला आलेला बोथटपणा व ही जीवन चाखण्याबद्दलची उदासीनता हे दोन्ही सारख्याच मरणाचे पुरावे होत.

घुगऱ्या रोजच *खाल्ल्या पाहिजेत हा आग्रह येथें अर्थातच नाही.* पण रोजच्या गोडीला व पक्वान्नाना कटाळणें आणि नवी चव मागणे हे जें जिवतपणाचें लक्षण. त्याच्याच पोटी ही घुगऱ्यांची आवड जन्म घेते. वर्षांतून एकदां वावरांत मळणी होते. धान्य एकदा शेतातून बाहेर आले की त्याची अनेक रूपें घरापासून हॉटेलपर्यंत दिसतात. सारे जग धान्याच्या त्या बदललेल्या रूपांना चाखते. एकेका आस्वादासोबत एकेक संस्कृति दिसते. पुरणपोळी, पावबिस्किट, केक्स जिलेबी—हजार रूपांनी. गहू आपल्याला नतर भेटतो. म्हणच आहे की 'एकटा गहू। प्रकार बहू।' त्या बहुरूपात मूळ गव्हाची आठवण देखील बुझून जाते. पण आजच्या सुधारलेल्या जगातहि आपली मूळ संस्कृति, जुन्या, इतिहासाचे पुरावे जपण्याचा जो हव्यास आहे, तो खाद्यपदार्थाबद्दल कां नसावा ? बापाला बाप न म्हणणारे लोक ऐतिहासिक चिजा जपायला नाखूष असतात. सध्याचे शिल्पपूर्ण राजवाडे सुखाने बघायचें सोडून पडक्या इमारतीच्या मौर्यकालीन विटा जपणें व त्यांत आनद मानणें त्याना जमणार नाही. हेच म्हणणें पुढें न्यायचे तर आपल्या नव्या बहारदार चेहऱ्याच्या बायका सोडून जख्ख चेहऱ्याची आई जपणेहि त्यांच्या अतर्मनाला खटकतच असतें. ही अर्थातच समाज मरत चालल्याची सूचना आहे तद्वतच मळणीच्या घुगऱ्या, तो

धान्याचा आदि पदार्थ, न रुचणें हेहि अनारोग्यच होय. वर्षांतून एकदा तरी तो आवडायलाच पाहिजे.

अग्नि ही पदार्थ शिजवणारी एक शक्ति एवढाच अर्थ आज उरला आहे. त्यामुळें वरण, भात, भाजी—सर्व एकच कुकरमध्यें ठेवून घराची खाणावळ करण्याचा प्रकार बळावत आहे आग कमी-जास्त दिल्याने पदार्थाच्या चवीवर परिणाम होतो हें जणू काही आज माहीतच नाहीसे दिसतें. खूप चिजा एकत्र आणल्या की पदार्थ चागला होतो आणि मसाल्याची जर भरपूर फोडणी दिली तर सार्घे गवतहि चवदार होते असा वेडा समज आज आहे ही मसालाप्रधान प्रवृत्ति सर्व स्वयपाकाचा विचका करते. 'स्वयंपाक हाटाने (हाट—बाजार) होत नाही, हातानें होतो.'

पूर्वी खाल्लेला एकेक पदार्थ आठवला की त्यासोबतच एकेका जीवनहि आठवते संपूर्ण जीवन एका कूकरमध्यें घालून ते बेचव होत असल्याचे दु ख तेव्हां उफाळते. घुगऱ्याचीच गोष्ट. घरी सतत जेवण्याचा उबग आलेले मन त्या मळणीच्या दिवशी शेतात चादण्या नभाखाली उघड्यावर बसायला आतुर असते. रोज पाटावर बसून बसून बधीर झालेल्या माड्या त्या शेतांतल्या मातीच्या ढिवलांवर रोवल्या जातात व नव्या-हव्या अशा जाणिवाची पालवी त्या जख्ख बधीरपणाला फुटते. समोर तृप्तीची साक्ष देणारी धान्याची मली मोठी रास आकाशातल्या चादण्याशी नातें लावीत असते. सग्यासोयऱ्यांची थट्टा केल्यासारखे चादणेहि गोड हसत असतें. ते तसें चादणे, ती पिकाबू माती आणि राशीची तृप्ति मिनलेल्या त्या घुगऱ्या एका वेगळ्या चवीनें जीभेवर लाळ आणतात त्या लाळेला सपूर्ण वर्षाच्या श्रमाची, उन्हाची, पावसाची, थंडीची—सारी शेतकी जीवनाची माधुरी असते. मानवाच्या इतिहासाला लाब लाब हात पोंचवणारे प्रसग अजून आहेत. आमचे पुडलीक काकाजी वर्षांतून एकदा अगात काही संचारल्यासारखे आम्हाला सागत, "पोट्टेहो, आज घरी नोका जेवू. नदीवर जायच" ते असे अमक्याच दिवशी सांगत असा नेम नसे. कधी तरी ती दैवी ताकद त्यांच्या तोडातून बोलून जाई. आणि एकदम आमच्या अंगातून चैतन्याची लहर सरसरून जाई. घर, ताट, पाट, भाडी चूल, खाटा, गाद्या, काय काय तरी—याच्या बधनांत जखडलेल्या जीवाला स्वत: देवानें हाक मारावी, "या, सारें सोडून या!" आणि मुक्तीच्या तीव्र भावनेनें भारावून गेलेले मुमुक्षु एकदम धावत सुटावे तसा तो प्रत्यय असे. मुरलीचा नाद ऐकायला मिळेल या आशेत गवळणी दह्यादुधाचा हिशेब करीत नसत. आमचेहि तसेच होई काकाजी नदीवर जाण्याची हांक मारीत तो दिवस एखादेवेळी मोठाच आणिबाणीचा असे. आईने रसाबरोबर सरगुडे केलेले असत. मोठ्या काकूकडे बोटोळें तयार असत, किंवा जिजीला बाहेर काही काम निघाल्याने मला तिने तापणाऱ्या दुधाच्या हाडीचा ताबा दिलेला असे. मलईचा पोपडा अगदीं पाचा मिनिटांच्या हांकेवर आलेला असे. हे सारें सोडायचे म्हणजे कठीणच. तरीहि मी काकाजीमागे धावत सुटें तो अनुभव असेच तसा वेगळा.

त्या दिवशी काकाजी पुढें व आम्ही मागें असा थाट राही. काकाजीच्या उपरण्यांत धडाभर वागी व पायलीभर कणीक, तिखटामिठांचीं गठुडी इतके राही. बाकी कांही म्हणून घ्यायचे नाही ते तितके घेतले ही देखील नेहमीचा जीवनाला शरणागति कधीकधी तर वांगीमिरच्याहि नदीकाठच्या उन्हाळी वाड्यातल्या घ्यायचे. नदीवर त्या दिवशी नहमीच्या गावपेंडावर जायचे नसे दूर उजाड सहितपूरच्या खडकावर जायचे. मग उपरण्याचें गाठोडें तेथें ठेवले की सारेजण अगावरच्या सर्व वस्त्रानिशी नदीत उड्या मारीत गंगेंत डुबायचे. मग वस्त्राचा हिशेब कशाला? कोंबडाकोंबडीचा पाणीफेक्या खेळ रगायचा काकाजी तेव्हा लहानाहून लहान होत. काकाजी म्हणून तेथें कोणी माणूसच उरत नसे. चुळीतून इद्रधनुष्यें काढायची. बुड्यांची हरतऱ्हा करायची मग भरपूर थकले की बाहेर यावयाचे. या थकण्यातला भरपूर हा शब्द फार महत्त्वाचा असे. तेथें थकण्यांत अपुरेपणा राहयाला नको, यासाठी आम्ही फार जपायचें. हो, उगीचच अतृप्ति नको. मग अगावरचे कपडे काही अंगावर व काही वाळूवर वाळत घालायचे. 'ओल्या कपड्यानी हुदडू नका' हा घरगुती ताप तेथें नसे.

घराच्या बधनातलें काही काहीच न मानतां खऱ्याखुऱ्या मोकळेपणानें, त्या प्रथम मानवाच्या स्वतत्रतेने मग आम्ही एकेक गोष्ट करायचे. नदीच्या वाळूवरील काटक्या, शेण्या, सनकाड्या गोळा केल्या की गारगोट्यांची चकमक झाडून झगरे पेटवायचे. माचीस त्या वेळी इसवी सनाच्या तारखासह दूर राही. त्या पेटलेल्या झगऱ्यात वांगी भाजायची. काठचा खडक मग पाण्याने धुऊन तेथें कणीक भिजवायची दुसऱ्या न्हाल्या गोट्यावर त्या कणकेच्या गोळ्यांची उतरड मांडायची. नतर झगऱ्याच्या गरम राखेत 'पानगे' भाजायचे. त्या विट्टचा व वांग्याचें बिनतेलाचे भरीत मग पळसाच्या पानावर खायचें. खूप खायचे. ती चव व तिच्या सोबत अनुभवलेले तें मुक्त जीवन याच्या ताज्या आठवणी तोडांत घोळवीत डुलत डुलत घरी यायचें. आज खाणावळीतलाच नव्हे, हक्काच्या व जिव्हाळ्याच्या घरचाहि घास त्या विट्टघाभरिताच्या आठवणीने तोंडांत फिरतो. ती चव न्यारी!

खाद्यपदार्थांना जीवन असें लदलदून येते. नुसत्या जिभेच्या चवीने पदार्थाला चव येत नाही. द्वारकेच्या पंचपक्वान्नाना व सपन्नतेच्या सततपणाला कंटाळलेला श्रीकृष्ण सुदाम्याच्या पोह्यात चव हुडकू शकला. त्याचे कारण त्या पोह्यांच्या स्पर्शासोबत त्याला तिथली यमुना, तिचा रमणीय काठ, तिथले मित्र, क्रीडा, सारेच आठवले असेल. तें सारें जीवन त्यानें त्या पोह्याच्या एकेका घांसाबरोबर खाल्ले असेल. जुन्या आठवणी, जुनी संस्कृति, जुनें प्रेम—सारें सारें त्या पदार्थांच्या चवीमुळे जागृत होते.

अन्नाला अनेकदा प्रसाद म्हणून धार्मिक मोल असतें. देऊळवाड्याचा काला बारा कोस फिरतो श्रीखेडची कोहळ्याची भाजी मोठे लखोपती अमृताच्या चवीनें खातत तीर्थांतली मिठाई त्या तीर्थांच्या पवित्ररम्य आठवणीमुळेच शिळी होत नाही. ज्याला हा धार्मिकपणा आवडत नाही असाहि माणूस—तो माणूस असेल तर—तो प्रसाद खातो. धर्माबिर्मावर फारशी श्रद्धा न ठेवणारे एक क्लास वन गॅझेटेड ऑफिसर वरखेडला आमच्या पंगतीत जेवायला बसले. बेत होता डाळभाजी आणि भाकरीचा. डाळभाजीमध्यें जणू मिरच्याची मुख्यत व फोडणीला तेवढी थोडीशी डाळ अशी स्थिति होती. ऑफिसर गृहस्थ घासाघासाला पाणी पीत होते तेलाचे तगर पात्रावरून वाहत होते. तरीहि मोठ्या चवीने ते जेवीत होते. जवसाचें तेल न

आवडणाऱ्या मडळीतले ते गृहस्थ. त्याबद्दल ते प्रामाणिकपणे म्हणाले, " त्याचे असे आहे, इतका हा हजारों लोकाचा समुदाय एकत्र जेवताना मी कधीच पाहिला नाही. माझ्या स्वत.मध्यें ती ऐपत नाही. तुकडोजी महाराजाची ही ऐपत और आहे या गावच्या घराघरातून बायानी भाकरी करून प्रेमाने पाठविल्या आहेत हजारोना खाऊ घालण्याची वृत्ति हजारोत निर्माण करणें मला जमणार नाही. हे दृश्य दुर्मिळच या सोहळयाचा प्रसाद कितीहि तिखट असो, तो समाजवादाचा भरीव व प्रत्यक्ष मंत्र आहे. मला तो खाल्ला पाहिजे. " त्या डाळ-माजीची चव घरच्या सुग्रास अन्नाला अजून आली नाही.

लोक आपल्यापुरतें पाहायला लागले म्हणजे अशा डाळभाज्या तर वस्तुसंग्रहालयातच ठेवणे आवश्यक होईल. पण तेथेंहि त्या वस्तु जीवनावेगळया झाल्यामुळें त्याची चव जाईल श्रीकृष्णाला जे पोहे सुदाम्यानें दिले ते कसे होते हें सांगताना घरच्या डब्यातले मूठभर पोहे दाखविणें हा सत्याचा अपलाप होई.

वर्धेच्या थडीला एका उंच जागी कोनाडा आहे. काशीराव बापूनी तो आणखी रुद करून घेतला. दहाबारा माणसें घेऊन त्या कोना-ड्यात जेवायला बसायचे व नदीच्या अफाट पात्राकडे पाहायचें हा त्याना छदच जडला होता पुढें बापूची अवस्था बदलली; पण मडळी तेव्हा आपापल्या घरून डबे आणून बापूना तेथें आग्रहाने घेऊन जायची. आपल्या घरचे अन्न आपण यथें पूर्वीसारखे खाऊं शकत नाही, याचा बापूना विषाद वाटे. हे कार्यक्रम इत.पर नकोतच असे बापू म्हणत पण लोक म्हणत, " बापू, तुम्ही काही म्हणा; पण अधून-मधून येथे जेवण केल्याशिवाय अन्नाला चवच येत नाही. " लोकाचेच खरे होते आज बापू नाहीत. तो बापूनी सुरू केलेला सोहळा माहीत असलेले लोकहि गावात नाहीत. पण नव्या पिढीतल्या कोणाला जरी तेथें जाऊन जेवण्याची इच्छा झाली तरी बापूचेच जीवन तेथें रूप घेते.

आजकाल लग्नप्रसगात भलतीच एकपदार्थता झाली आहे. बुदीचे लाडू एके बुदीचे लाडू ! आता त्यात चवच कशी हुडकायची ? तरीहि लोक जेवतात. घर बरें वाटते तरीहि मी तेथें जेवतो. कां ? तेथें असते एक वेगळी चव. एक वेगळें जीवनहि.

● ● ●


Statement about ownership and other particulars about MANUS Monthly as required under Rule 8 of the Registration & Newspapers (central) Rules, 1956.

**FORM IV**

(See Rule 8)

1. Place of Publication..... ............POONA
2. Periodicity of its publication.......Monthly
3. Printer's Name.........................S. G Mazgaokar
   Nationality........................Indian
   Address..........................419 Narayan peth, Poona 2
4. Publisher's Name... ...... . ........ / Nationality........... ... .. ... / Address . .......... . .. .. . . } as above
5. Editor's Name...... ................. / Nationality...,...... ... ......... / Address ......... . .... ....... } as above
6. Name and addresses of individuals who own the newspaper and partners or shareholders holding more than one per cent of the total capital. } Rajhans Prakashan, 419 Narayan Peth, Poona 2 / 1) S G. Mazgaokar / 2) B M. Purandare

I, S. G. Mazgaokar, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Date 1-3-1963

Signature of Publisher
S. G. Mazgaokar

# अमर लेणं

प. त्रिं. सहस्रबुद्धे



किती जणांना आतां आठवण राहिली असेल सांगतां येत नाहीं, पण माझ्या डोळ्यांपुढें त्याची आकृति सहज उभी राहते. त्याच्या आठवणी ताजेपणानं फुलूं लागतात.

त्या वेळीं सारा आठ वर्षांचा मी असेन. वयाच्या मानानं मला पुष्कळ गोष्टी कळत नव्हत्या. त्यामुळें त्याचं जीवन डोळ्यांपुढें धांवतं असूनहि मला त्याचं नीटसं आकलन करतां येत नव्हतं. आपल्यावर ममता करणारा, सहानुभूतीनं बोलणारा आणि न विसरतां चिवडा देणारा ... इतकीच फारतर त्याच्याबद्दल मला जाणीव होती. आतां जेव्हां मी मागच्या काळाकडे पाहूं लागतों; बऱ्याच वर्षांपूर्वीच्या आठवणी ताज्या करतों, तेव्हां त्याचं व्यक्तिमत्त्व किती मोलाचं होतं याची कल्पना येते. तो साधासुधा माणूस होता. प्रसिद्धीचा लखलखाट त्याच्याजवळ नव्हता. सभ्य, शुद्ध अन् स्वच्छ म्हणवणाऱ्यांनीं हिणवावं असंच तो वागत होता. धनाची विपुलता त्याला ओळखीत नव्हती. मोठेपणाचा आव आणून इतरांच्या डोळ्यांत धूळ फेंकण्याचा ढोंगीपणा त्याच्याजवळ कधीं फिरकला नाहीं. तरीहि त्याचं व्यक्तिमत्त्व मानवतेवरील अमर लेणें होतं यांत आतां मला शंका वाटत नाहीं. याची जाणीव त्याच वेळीं झाली असती तर ? त्याच्या पुढें आदरानं माझं मस्तक नम्र केलं असतं. पण मला तेव्हां कळत नव्हतं. त्याचं जीवन मला तेव्हां साधंच भासत होतं. त्यांतला मोठेपणा विशालता नि सखोलता मला समजत नव्हती. तरीदेखील त्याच्याबद्दल कितीतरी आठवणी आजहि जाग्या होतात. बारीक सारीक प्रसंगांची जाणीव त्याचं व्यक्तिमत्त्व डोळ्यांपुढें उभं करते. अन् मानवतेचं अमर लेणं शोभणाऱ्या साध्या चिवडेवाल्याबद्दल मन आदरानं भरून जातं...

तेव्हां मात्र त्याला कधी कुणीं आदर दाखवलेला नव्हता. सगळ्यांकडून उपहासाचा विषय बनलेला रामभाऊ चिवडेवाला कुणाला हवासा वाटत नव्हता. सहज आकर्षण वाटेल असं त्याच्याजवळ नव्हतंहि कांहीं. बिचारा नेहमीं तेलकट कपड्यांत असायचा. कळकटलेला सदरा. त्यावर तेलकट बनलेला कोट. कोटाच्या बाह्यांतून सदऱ्याच्या बाह्या बाहेर डोकावत असायच्या. गळ्याजवळची गुंडी सुटलेली. तर कधीं बटणं लावतांना चुकीनं

लावलेली. डोक्यावर घामाची पुटं बसलेली वाटोळी टोपी. त्यांतून कानाच्या वरील पाढु-रके केस दोन्ही बाजूनीं बाहेर पडलेले. काळ्या कपाळावर आडव्या आंठ्यांचं जाळ. डोळ्या-तून दूरवर पाहणारी दृष्टि लगबगीनं चौफेर फिरायची. तोडान खड्या आवाजांत बडबड चाललेली असायची. "चुरचुरीत तडड्या चिवडा ! ... चिवडा ऽ चिवडा ! " हेच शब्द किती वेळां उच्चारले जातील याचा नियम नाही. पण प्रत्येक वेळी शब्द उच्चार-तांना त्याच्या गालावर हास्याच्या रेषा उमटायच्या. पहाता पहातां भुवया वक्र व्हायच्या हातांतला ताव्याचा डबा सावरीत त्याची स्वारी "चिवडा ऽ चिवडा !" करीत कल्याणच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत जायची. रोजचाच हा कार्यक्रम ... रोजचीच फेरी ... तेच तेच शब्द.

या साध्या चिवडेवाल्याकडे कोण आदरानं पाहणार ? त्याच्या जीवनांतील असामान्य मोठेपणा कोणाला दिसणार ? त्या व्यक्ति-मत्त्वाच अमर लेणं कोणाची दृष्टि दिपवून टाकणार ?

त्यानं तयार केलेला चिवडा शेकडो लोकांनीं खाल्ला असेल. त्याची रुचि किती-तरी वेळ त्यांच्या तोंडांत रेगाळत राहिली असेल. पण पैसा देऊन घेतलेल्या चिवड्या-मागं अधिक जाण्याचं कुणाला भान राह-णार ? फार तर चिवडा चांगला झाला म्हणून त्यानीं स्तुतीचे शब्द फेंकले असतील. इतक्यानं रामभाऊच खरं मूल्यमापन करण व्यवहारी जगालाच शोभणार. चिवडा बनव-णारे काय थोडे का आहेत ? कदाचित् काही जण रामभाऊपेक्षां चागला चिवडा करी-तहि असतील. चिवडा चांगला करणं हाच काही त्याचा खरा मोठेपणा नव्हता. पण तो शोधणार कोण ? गुणाच्या बाजारांत राम-भाऊच्या मोठेपणाचा शोध कोण घेणार ? याच्या चिवड्याची किंमत दिली की आपण आपलं कर्तव्य केल असंच प्रत्येकजण समज-णार अन् त्याचे शब्द, त्याचे व्यक्तिमत्त्व याना विस्मृतीत ढकलून व्यवसायाच्या दिशेनं पावल टाकू लागणार !

पण रामभाऊ कुणाकडेच फाजील अपे-क्षेन बघत नव्हता. आपण किती मोठे आहों याची त्याला खरोखर जाणीवच नव्हती. अन् यांतच त्याचा खरा मोठेपणा होता. राम-भाऊचं जीवन दवकत दवकत ... ठेंचाळत पडत ... चाललं होतं आणि हें जीवन जगता जगतांच त्याच्या व्यक्तिमत्त्वांतील अमर लेण्यांचा आविष्कार माझ्यासारख्याना होत होता. त्याची चमक. त्याचं मूल्य. त्याची कलात्मकता अनुभवास येत होती.

त्याची आठवण झाली की आजहि राम-भाऊची काळवंडलेली कळकट कपड्यातली तेलकट टोपी घातलेली मूर्ति हसत हसत डोळ्यापुढ उभी राहते. तिच्या कपाळावरील आंठ्यांच जाळं विणल जातं. गालावर हास्याच्या रेषा उमटतात. भुवया वक्र होतात. अन् खड्या आवाजांत ती म्हणू लागते, "चुरचुरीत तडड्या चिवडा! चिवडा ऽ चिवडा ! ! "

रामभाऊची राहण्याची खोली माझ्या बिऱ्हाडाजवळ होती. त्याच्या अन् आमच्या घरांची विहीर एकच. दोन्ही अगणाना विभा-गणारी एक भिंत होती. विहीरीजवळचा भाग हळहळू कोसळून गेलेला असल्यान विहीरीजवळच्या पडक्या भिंतीवरून पलीकडे जाणं मला सहज साधत असे. सकाळचा अभ्यास वगैरे आटोपून मी रामभाऊकडे सहज जाई. त्याचा मला इतका ळळा कसा लागला, आतां आठवत नाही. पण रामभाऊशी बोलल्या-शिवाय मला चैनच पडत नसे. सकाळी मी जाईं, तेव्हा रामभाऊ चिवड्याच्या तयारीस लागलेला असायचा. कधी सुपात भाजलेले पोहे पाखडताना, दाण्यांची साल चोळून काढताना किंवा कांदा चिरतांना तो आढळे. बाहेरच्या दारातून डोकावून पाहतांना राम-भाऊ कसल्या तरी कामात दग असल्याचं आढळून येई. माझ्याकडे लक्ष जाताच 'काय मधू ? . ये, आत ये ... ' अस काही तरी बोलत तो माझं स्वागत करी. माझ्या हाता-वर जवळचे दाणे किंवा काहीतरी दिल्या शिवाय त्याची बडबड चालूच होत नसे. मग मात्र त्याच्या तोडाची पटावळ चालू होई. आदल्या दिवशी चिवडा विकताना घडून आलेल्या – पाहिलेल्या – बारीक सारीक गोष्टी तो सागत राही. त्याच्या अंतःकरणात कसे लहान मोठे हेलकावे उत्पन्न झाले, भावनांना पीळ कसा पडला किंवा आनंदानं त्याला उल्हासित कसं केल-याच वर्णन काम करतां-करताच, करीत राही. त्याच्या बोलण्या-मागील मोठा आशय मला तेव्हां समजत नव्हता. पण त्याची ती बडबड ऐकत राहावं असं सारखं वाटे.

विहिरीजवळच्या खोलीतच तो राहात असे. चुना निघालेला. बारीक खिडक्या खिळ खिळ्या झालेल्या. नळीच्या कौलांनी झाकलेल्या निरुंद खोलीत तो जगत होता. रोज चिवडा करून करून सगळी खोली धुरकटून काळी पडली होती. कोपऱ्यातल्या मोठ्या चुलीचा वरचा भाग तर काजळीनं काळा ठिक्कर पडला होता. त्या चुलीवर चिवडा भात...किंवा चहा ... आघोळ करायची लहर आली तर पाणी तापायच. पण त्याच चुलीवर खोली धुरकटून गेली होती. खुली हवा मोकळेपणान खेळेल अशी खिडकी भिंतीला नव्हती. रात्री दार उघडं ठेवून निजण्याखेरीज रामभाऊला उपायच नव्हता. एका कोपऱ्याशी जुनाट गादी पोत्यात गुंडाळून ठेवलेली. फाटलेली असल्यान दोन्ही बाजूनी कापूस डोकं बाहेर काढून आपली काळवडलेली काया दाखवीत होता. गादीखाली पसरलेल्या फाटक्या तरटा-वर बसूनच रामभाऊचं काम चालू होई.

मी आत डोकावतांच त्याच्या हाताना गति उत्पन्न होई. चिवडा चुलीवरून उतरल्या-वर तो दोन्ही हातानी खालचा वर, वरचा खाली करीत राहणं हे एक महत्त्वाच काम असे. ही क्रिया कमीत कमी पाचशे वेळा केली जाई. तीच हालचाल सारखी करीत राहताना रामभाऊ गप्पा मारण्यात रमून जाई. या वेळी कुणीहि बोलायला असलं पाहिजे, असं त्याला वाटत असावं. कारण कित्येक वेळा त्यान नेमकी याच वेळी मला हाक मारली होती. धुरानं काळ्या बनलेल्या खोलीत अस्ता-व्यस्त पडलेल्या सामानाच्या मधोमध मोठ्या थोरल्या थाळ्यात चिवड्याची रास ठेवून रामभाऊ जेव्हा तो हातानं ढवळू लागे, तेव्हा कळकटलेल्या मुखावर समाधानाची छटा उजळू लागे. श्रमाच फळ आता हाताशी येत होत. चिवडा तयार झाला. विकला की, पैसेच पैसे ! रामभाऊ स्वप्नाच्या दुनियेंत भटकायला जाई तो याच वेळी. मनाला मोकाट सोडावं. तोडाला मोकळ सोडावं. दिवसभर श्रम करताना पाळाव्या लागलेल्या मर्यादा शिथिल कराव्या अन् चंदेरी स्वप्नाची चमचमकणारी फुलपाखरं डोळ्यापुढें नाचू द्यावी ! ... रामभाऊ एकटा असला की अशा गोड स्वप्न स्वप्नात रमून जाई. मी असलों

तरीहि डोळ्यापुढची शब्दात व्यक्त होण्याची धडपड करीत, त्याच्या डोयात नाचूं लागत. चार वाजेपर्यंत सगळं काम आटपून थोडी विश्रांति घेऊन तो ताजातवाना होई. तयार चिवडा पितळेच्या डब्यांत भरून, खाकेत अडकविलेल्या झोळीत कागद घेऊन, तो बाहेर पडे. टिळक चौकांतून त्याची 'चिवडा ऽ चिवडा' ही ठरीव ललकारी बाहेर पडली की आसपासच्या घरातून खेळात दग झालेली मुलं जागच्या जागी थबकत अन् खेळ तसाच टाकून रामभाऊच्या ललकारीच्या दिशेनं धावत जाऊं लागत

रस्त्यांतून तो स्तब्धतेनं कधीच चालत नसे. हसऱ्या तोंडाची बडबड. तेलकटलेल्या हाताची वत्सलतेचीं थरथर. त्याच्या भोवती, मधाच्या पोळ्याभोवती पिंगा घालणाऱ्या मधमाशां-प्रमाणे, मुलं घेर धरीत. त्याच पाऊल पुढे पडलं की ती चालूं लागत. तो थांबला की ती थांबत ! कारण रिकाम्या हातानं राम-भाऊ कुणालाच परत धाडीत नसे. चिवडा विकत देण्यासाठी डबा उघडला की त्यावेळी असतील तितक्या मुलाच्या हातावर चिव-ड्याचे चार दाणे मिळत. मुलाचं समाधान तेवढ्या चिवड्यानं होई. अन् त्यांच्या तृप्त चेहऱ्याकडे पाहतांना रामभाऊचे डोळे सुखावले जात.

चिवड्याची ललकारी मारीत मारीत रामभाऊ पुढे पुढें जाई. मुलाच्या घोळक्यांतून चाललेला रामभाऊ इतराच्या टीकेचा विषय अर्थात् झाला. पण तो घोळक्याला मुळीच कटाळत नसे. कुणाला हाकलून लावीत नसे. एखाद्या मुलान फारच त्रास दिला तर गोड शब्दात त्याची कानउघाडणी करी. याबद्दल कुणी थट्टा केली तर हसत हसत तो म्हणे, " ... अहो चालायचच अस ... माझीच पोरं आहेत ना सारी... " अन् त्याच्या डोळ्याच्या कोपऱ्याजवळची कातडी दुमडली जाई. डोळ्यातल हसू तोंडभर पसरे. वत्सलतेचा उमाळा त्यातूनच चमकू लागे.

वाटण्यावारी त्याचा किती चिवडा जात असेल, कोण जाणें, त्याची त्याला खंत नसे. डबाभर चिवडा विकून जितके पैसे मिळत, त्यांत लाभलेल्या फायद्यावर त्याचा खर्च चाले. त्याचा खर्च असा खरच फारच थोडा होता. विडी मधूनमधून शिलगावण्याखेरीज त्याला व्यसन असं नव्हतंच. तेच तेच कपडे. वर्षानुवर्षं त्याच त्याच वस्तू वापरीत अस-ल्यानं जेवणाखेरीज त्याला विशेष खर्च नसेच जेवण तरी काय ? पायल्यावारी चिवडा करण्याची मेहनत केल्यावर चमचमीत जेवण करण्याची शक्ति राहीना. कदाचित् विविध पदार्थांची आवड नसावी किंवा स्वत: हातान करण त्याला जमत नसावं. भात-वरण, भात-पिठलं असच काही साध जेवण करून तो आपल पोट भरी. याला किती खर्च लागणार ? रस्त्यावर घोघावत जवळ येणाऱ्या पोराना चिमूटभर चिवडा वांटूनहि त्याचा खर्च कसाबसा निघत असावा. कारण स्वत.-साठी त्यानं कधी पैशाची मागणी केली नाही. सामानहि उधार आणल नाही. आपला धंदा साधा. व्यापाऱ्याना विश्वास वाटेल असं आपल्याजवळ काय आहे ? उधार सामान मागावं व दुकानदारानं नाही म्हणावं यात स्वाभिमान काय राहिला ? स्वाभिमान दुखावला जाण्यापेक्षां उपासमार पत्करली असं तो मानीत असे. साहजिकच रोखीचा व्यवहार ठेवणं तो जरूर मानी व तसा वागे. त्याची साधी राहणी लक्षांत येण्याजोगी होती. कधी त्याला त्याबद्दल विचारलं तर तो म्हणे, " एकटा जीव सदाशिव ! करायचे आहेत काय पैसे ?..." आणि त्याचं मन मागच्या काळात सूर मारी. डोळे संकुचित होत. स्वप्नवत् झालेल्या घटना डोळ्यापुढें येत. अन् तो म्हणे "एका काळी याच हातानं हजारो रुपये हाताळले आहेत चैनीन श्रीमतीत वावरलों आहें. आतां थोडक्यात निभवावं लागतं सारं. ईश्वराची इच्छा...हेहि दिवस जातील "...अन् तो ओलावलेल्या डोळ्यानी शून्यात पाहू लागे. जणू पुन्हां श्रीमंतीत वाव-रत असल्याची चिन्हें त्याच्या दृष्टीपुढें नाचू लागत !

आजची त्याची स्वप्नं एका काळीं उप-भोगलेल्या श्रीमतीची प्रतिबिंबं होती. राम-भाऊ एके काळी श्रीमंत होता हें आता कुणाला खरसुद्धा वाटल नसत. पण तें एक सत्य होतं. श्रीमत कुळात त्याचा जन्म झाला होता. नाशिकजवळच्या एका खेडेगांवात त्याची इनामी मिळकत होती. पेशवाई काळातील विस्तीर्ण चार चौकी वाडा होता. रामभाऊला लहान भाऊ होता. वडिलाच्या पश्चात् ते दोघे त्या वाड्यांत राहात होते. श्रीमंती त्याच्या घरी पाणी भरीत होती. पण राम-भाऊचं सारं लक्ष गतवैभवावर खिळलं होतं. हिंदुस्थान स्वतंत्र व्हावा या भावनेनं त्याच्या शरिरांतील कण न् कण पेटला होता. पर-सत्तेखालीं चिरडल्या जाणाऱ्या व भिकेस लागलेल्या देशाकडे पाहतांना त्याचं रक्त सळ-सळू लागे. स्वातत्र्याच्या भावनेनं त्याला घेरलं होतं. देश स्वतंत्र झाल्याच्या स्वप्नांत तो तरंगू लागला. पण ही स्वप्नं सत्य सृष्टीत येण्यासाठीं केवढ्या त्यागाची तयारी पाहिजे याची जाणीव होऊं लागताच रामभाऊनं त्याची तयारी केली. चळवळीच बाळकडू कदाचित् वडिलांकडून मिळालं असेल. किंवा भारतातील इतिहासकालीन लढ्यांनी त्याला स्फूर्ति दिली असेल. त्याच मन कठोर त्यागाला तयार झालं. त्याच्या प्रयत्नाना प्रारंभ झाला. त्या काळांत या गोष्टी उघडपणानं करण शक्य नव्हतं. गुप्तता, अंधार याच्या आधारा-वर क्रातिकारकाचीं पाऊलं स्वत च शीर हातांत घेऊन स्वातत्र्याच्या बेहोषीनं टाकली जात होती. रामभाऊनं या पाऊलवाटा शोधून काढल्या आणि सुखदु:खांची तमा न बाळ-गतां त्यानं चालायला सुरुवात केली.

असं करताना त्यान भावाचा विसर पडूं दिला नाही. योग्य वेळी त्याचं लग्न करून संसार थाटून दिला. स्वत: मात्र ब्रह्मचारी राहून क्रांतीच्या वणव्याला आवाहन केलं. भावाच्या ताब्यांत सर्व इनामी देऊन तो कफ-ल्लक–नि:संग–बनला. चळवळीचे धागे निघू लागले...जाळं विणल जाऊ लागल...

आणि अचानक एका अपरात्री त्याला पकड-ण्यात आल. नंतर खटला ... शिक्षा ... या घडामोडीत त्याची इनामी जमीन जप्त झाली. श्रीमतीत लोळूं शकणारा रामभाऊ एकाएकीं दारिद्र्यांत ढकलला गेला. भावाला रामभाऊबद्दल कृतज्ञता नव्हती, आदर नव्हता. वेडपट प्राणी म्हणूनच तो त्याची सभावना करूं लागला. श्रीमतीचा वाटा वांचवण्यासाठी त्याला रामभाऊला जवळ करण शक्यहि नव्हतं. श्रीमती व रामभाऊ यामध्यें त्यानं श्रीमतीला जवळ राहू दिलं आणि रामभाऊला दूर जाऊं दिलं...

तुरुगातून सुटल्यावर रामभाऊनं नाशिक-जवळच गाव सोडलं. चळवळीचे धागे उखडले गेले होते. उभारलेल्या आशा उधळल्या गेल्या होत्या. पण रामभाऊचा उत्साह खचला नव्हता. त्याला इतरत्र पाहिल्यावर समाधानच

वाटू लागलं. कारण स्वातंत्र्याच्या चळवळीला आता सामुदायिक स्वरूप येऊं पाहात होतं. गुप्त संघटना अंधारात फोफावण्याऐवजी सामुदायिक संघटना उघडयावर प्रतिकारांना न भीतां उभारल्या जात होत्या. रामभाऊला हेच मोठ समाधान होतं. तुरुंगातल्या कामामुळं त्याची शक्ति खचली. म्हातारपणाची अवकळा तोंडावर पसरली. सामुदायिक चळवळीत पडून यातना सहन करण्याची शक्ति राहिली नाही. म्हणूनच रामभाऊनं कल्याणांतल्या भिकार खोलीत चिवडा करून तो गावभर विकून कसंतरी जगण्याचं ठरवलं. खंगणारं शरीर भवितव्याकडे आशेनं पाहात होतं. काळवंडलेलं तोंड स्वातंत्र्याच्या नुसत्या कल्पनेनं उजळत होतं. खचलेलं मन वाढत्या चळवळीच्या जाणीवेनं फुलत होत.

हा इतिहास सांगतांना रामभाऊ रंगून जाई. घडलेल्या बारीकसारीक गोष्टी फुलवून सांगतांना त्याचे डोळे ओले होत. निराशा तरळू लागे पण क्षणभरच. चिवडयानं तेलकटलेले हात थांबवीत शून्यात दृष्टि स्थिरावून तो म्हणे, "...मधू...हेहि दिवस जातील. आपला देश लवकरच स्वतंत्र होईल. परमेश्वरानं बळवंतरावांसारखा पुढारी आपल्याला दिला आहे. त्याच्याच हातून आपल्या देशाच स्वातंत्र्य मिळवलं जाईल..." रामभाऊची ती निष्ठा होती. तळमळणाऱ्या प्रामाणिक मनाचा तो उद्रेक होता. विचाराच्या निकषावर त्यांना घांसण्यात अर्थ नव्हता. याच निष्ठेच्या आधारावर त्याचं जीवन चाललं होतं. साधा चिवडेवाला. पण स्वातंत्र्याच्या उमाळयान त्याला घेरलेलं असेल, असं कुणालाच वाटलं नाही. म्हणूनच उपहासाखेरीज त्याच्या वाटयाला कधीच काही आल नाहीं.

कल्याणला लो टिळकाचा मुक्काम होणार आहे अस कळताच त्याची किती धांदल उडाली याची मला चागली आठवण आहे. व्याख्यानाच्या दिवशी आचवल वकिलांकडे ते उतरणार आहेत याची माहिती मिळताच त्यान मला बोलावून सांगितली. तो म्हणाला, "...अन् त्या दिवशीं बळवंतरावांसाठी खास चिवडा करून द्यायचहि मी ठरवलं आहे...." आणि लो. टिळकांसबंधी अभिमानानं रसरमलेलं अस कितीतरी तो बोलत राहिला. कुणाला वाटावं लोकमान्याची थोरवी याच गृहस्थाला खरी काय ती कळली आहे !

आणि रामभाऊनं खरंच चिवडा तयार करून लो. टिळकाना देण्याची व्यवस्था केली. त्या रात्री त्यानं मला मुद्दाम बोलवून सारं सांगितलं. आपल्या हातचा चिवडा टिळकांनी खाल्ला यांत केवढ समाधान त्याला लाभल होत खरच. मी म्हटल, "रामभाऊ ..टिळकानी चिवडयाला चागला म्हटल असेल नाही ?" माझ्या पाठीवर थाप मारीत तो म्हणाला, "मधु...त्यानी चांगलं म्हणावं म्हणून मी चिवडा दिला नव्हता. मला जें साधल नाही ते करून दाखवणाऱ्या महापुरुषान केलेला केवळ स्वीकारच मला लाख मोलाचा वाटतो. बरं.. पण तुला तें इतक्यांत कळणार नाही...." आणि मला तेव्हां खरच समजल नाही. !

आता रामभाऊच मौलिक व्यक्तिमत्त्व नव्या नव्या आठवणी घेऊन डोळयापुढें तरंगू लागतं. अन् वाटतं मोठया माणसाचा सहवास लाभला होता आपल्याला !

रामभाऊ सगळया मुलाना हवासा वाटावा यांत नवल नाही. रामभाऊची ललकारी कानावर पडली नाही की सायंकाळ सुनी वाटू लागत असे. चिमुटभर चिवडा गिळून कुणाच पोट भरत असे असं नाही. पण त्याच्या हातांत जो गोड जिव्हाळा होता त्याचा लाभ मिळावा असच प्रत्येकाला वाटे. रामभाऊला सगळी मुलं सारखीं वाटत. जात, गोत, धर्म, यांच्या मर्यादा त्याच्या वत्सलतेला कोडू शकत नव्हत्या. मला चागलं आठवतं, एकदा त्यानं वाटेंत टांग्याचा धक्का लागून पडलेल्या मुसलमान मुलाला खांद्यावरून घरीं आणलं होत. त्याची शुश्रूषा करून घरी पोचवल होतं. मुल पाहिली की त्याची वृत्ति उल्हसित व्हायची. त्याची जात, त्याचा धर्म यांचा विचार त्याच्या वत्सलतेला शिवत नसे. मुलाच्या पाठीवर प्रेमानं हात फिरवितांना जें समाधान आपल्याला लाभतं ते हजारो रुपये अचानक मिळाल्यानहि मिळणार नाही अस तो म्हणत असे. मुलानी रामभाऊबद्दल आपुलकी बाळगली तर काय नवल ?

रामभाऊच्या शेजारी काशीताई राहत होत्या. त्या व त्याचे पति आसपास प्रसिद्ध होते. केशव भटजी साफ बहिरे होते, काशीताई पूर्ण आंधळया होत्या. स्वतःचा बहिरेपणा झाकण्यासाठी कीं काय केशव भटजी पत्नीलाच 'बहिरी' म्हणून नावं ठेवीत! "बहिरे !" म्हणूनच हाक मारीत ! काशीताईंना काही दिसत नसे. डोळयाच्या ठिकाणी कवडया उलटया करून बसवल्या असाव्या अस पाहणाराला वाटे. पण त्याची स्मरणशक्ति तीक्ष्ण होती. हजारो गाणी त्याना तोंडपाठ होती. सावित्रीच-आख्यान तीन तीन दिवस त्या म्हणत. रोज नवं गाणं म्हणायच असा एका चातुर्मासात त्यानी नेमच केला व तो पार पाडला. आंधळेपणानं त्याना सगळा भार स्पर्शेंद्रियावर टाकावा लागे. सवयीनं त्या घरातल सगळ करीत. स्वयपाक, धुणं, विहिरीच पाणी काढणं, झाडलोट--सारी काम चाचपडत चाचपडत त्या करीत. विहिरीचं खोल गेलेल पाणी काढताना त्याना किती सावधगिरी बाळगावी लागे. तरीहि एखादवेळी रहाटावरचा हात चुके. वरपर्यंत आलेली बालडी आदळत आदळत खाली जाई.

—अस काही झालेलं पाहिलं की रामभाऊची धावपळ सुरू होई. तो हातांतल काम तसंच टाकून धावत जाई. तिचा हात धरून बाजूला करी आणि हवं तितकं पाणी काढून देई. काशीताईचा पायच एकदा घसरला, हात सुटला व तोल जाऊन ती विहिरीच्या काठावरून घसरली. रामभाऊनं ताबडतोब विहिरीत उडी मारून तिला वर आणलं. तिची असहाय्यता त्याच्या मनाला डाचत असे. सभोंवार पसरलेल्या सुंदर निसर्गाकडे पाहण्याच तिच्या नशिबी नसावं याची त्याला खंत वाटे. निदान तिचा दुःखभार हलका करण्याचा प्रयत्न करावा अस वाटून तो शक्य तितका प्रयत्न करी.

—मुलाना, शेजाऱ्यांना आणि देशात पसरलेल्या अनंत जीवाना सुखानं जगतां यावं याचाच रामभाऊला ध्यास लागला होता. परक्याचं राज्य गेलं की सार चागलं होईल. अशी निष्ठा मनात तेवत होती. तिच्याच जोरावर त्याची क्षीण काया येईल त्या प्रसंगाला तोंड देत भविष्यकाळाकडे विश्वासान पाहात जगत होती।

एकदा मी सकाळीच नेहमीप्रमाणे त्याच्याकडे गेलो. नेहमीप्रमाण चिवडयाची भली मोठी रास पुढें ठेवून ढवळण्याच काम या वेळी चालू असायच. पण पाह्यलं तों मळकट गादीवर आढयाकडे टक लावून रामभाऊ बसला होता. डोळयातून अश्रूंची

फुलं ठिबकत होतीं. मला चमकल्यासारखं झालं. इतक्या निराशेनं घेरलेला रामभाऊ आज प्रथमच मी पाहात होतों.

" रामभाऊ ... ! " थबकत मी विचारल, " हें काय, आज चिवडा नाही तयार करायचा ? "

रामभाऊनं चटकन् स्वतःला सावरलं. बाजूला पडलेल्या कळकट फडक्याला डोळयाच्या कडा पुसल्या. तो म्हणाला " ये मधू ... आत ये ... "

" पण चिवडा का नाही करीत ? "

" आज चिवडा बद ... बळवंतराव वारले ... आज सारं बंद. "

लो. टिळक त्याच दिवशी वारले. त्या बातमीन खचलेला रामभाऊ सुन्न झाला होता. त्याचे डोळे लाल झाले होते. खिन्नपणानं तो जणूं ग्रासला गेला होता. टिळकांच्या प्रेतयात्रेची मोठी मिरवणूक मुंबईला निघाली. त्याच वेळी त्याच्या प्रतिमेची मोठी मिरवणूक कल्याणला निघाली होती. मिरवणुकीचा फायदा घेऊन चिवडा खपवायचा व्यवहार त्याला समजत नव्हता. टिळकांच्या मृत्यूनं आपल्या निष्ठाचा पायाच हादरला गेला असल्यासारखं त्याला वाटत होतं. महान् पुढारी चिवडेवाल्यापासून कितीतरी दूर होते. पण ते आपल्यासाठीच झगडत आहेत याची जाणीव चिवडेवाल्याला होती. म्हणून दुःखाच्या उर्मी चिवडेवाल्याला पोळीत होत्या. नतर कितीतरी दिवस रामभाऊ निरुत्साहानं वावरला. हळूंहळू पुन्हां चिवडयाचं सामान येऊं लागल. पोहे भाजले जाऊं लागले. दाणे सोलले जाऊं लागले. सकाळच्या वेळी तेलाचा खमग वास काळवडलेल्या खोलीतून बाहेर पडू लागला. अन् सायंकाळच्या वेळी 'चुरचुरीत तडडया चिवडा ! चिवडाऽ चिवडा !' अशी खमग ललकारी कल्याणच्या रस्त्यारस्त्यातून घुमू लागली.

राजकारणाला मिळालेली कलाटणी याला कारण होतो टिळकाच्या मृत्यूनं खचलेला देश म. गाधीच्या पुढारीपणाच्या स्वीकारांत रंगला होता. नवे पुढारी चळवळीची नवीं पाऊल ... सारं काही नवं होत. पण एकाच ध्येयाच्या दिशेन आपण जात आहों अशी श्रद्धा लोकांना वाटत होती रामभाऊनहि हें ओळखल. निराशा माग टाकली. आशेचीं स्वप्नं पुन्हां जीव धरूं लागली. रामभाऊनं डोक्यावरची काळी टोपी फेकून दिली. गाधी टोपी वापरूं लागला. पुन्हा भविष्यकाळाबद्दल आशा, स्वातत्र्याबद्दलचा जिव्हाळा...पूर्वीच्याच वेगान तळमळीच्या लाटा फेंसाळू लागल्या अन् स्वप्नाच्या चमचमाटानं चमकू लागल्या. देशभर नवा उत्साह संचारला. नव्या चळवळीन सगळी जनता भारली गेली. जी सत्ता अमर आहे असा भास उत्पन्न करण्यांत आला होता, ती कोलमडणार व हिंदुस्थान स्वतंत्र होणार याचा विश्वास प्रत्येकाच्या ठिकाणी उत्पन्न होत होता. रामभाऊ चिवडा विकतां विकता या नव्या लाटेवर हेलावू लागला. ... मन स्वातत्र्याच्या कळकळीन उचबळत होत. पण शरीर थकलं होतं. फार मोठं काम करण्याची ताकद आता राहिलेली नव्हती. वाढत्या चळवळीकडे आशेन, सहानुभूतीन व सहकार्याच्या वृत्तीन पाहण्याशिवाय आपण काही करू शकत नाही याची रामभाऊला जाणीव व्हायला लागली. मनाला लगाम घालून तो चिवडा करूं लागला, विकू लागला. ' चिवडा ऽ चिवडा ' करीत हिंडूं लागला.

पण एकाएकी कल्याणात नवीच घटना घडून आली आणि रामभाऊ त्यात गुरफटला गेला. ...

गांवभर भटकावं लागत असल्यानं त्याला गावातल्या बारीकसारीक घडामोडी सहज कळत. कळलेल्या पसरवायच कामहि तो अर्थात् करी ! एकदा त्याला सहज कळल की बदर आळीत प्लेगची केस झाली. भीत भीतच त्यान मला सागितलं. प्लेगच्या वार्षिक फेऱ्याला सगळेच कंटाळलेले. साथ आली की गावाबाहेर राहाव लागत असे, अनेक त्रास सहन करावे लागत. प्लेगची केस झाली कीं यदाहि सार सहन कराव लागणार. रामभाऊची बातमी खोटी मात्र ठरली नाही. लवकरच आणखी लागण झाली, साथ पसरूं लागली माझ्या आसपासची बिऱ्हाड वालधुनीवर राह्यला गेली. आम्ही जाण्याचंहि नक्की झाल जातां जाता मी रामभाऊकडे गेलो ! " मधू..." दुःखान सद्गदित झालेल्या स्वरांत त्यान म्हटलं, " आज जाणार ना तुम्ही ?..." इतक्यात आवढा गिळीत त्यानं म्हटल, " पण जा ... जाणार आहात हेच बर ! ... "

रामभाऊन निरोप दिला तो डबडबलेल्या दृष्टीनं घर सोडतांना मला रामभाऊ आठवत होता. त्याची ललकारी कानावर पडत होती.

आम्ही सारीं गेलो. अर्धा गाव ओस पडला. पण रामभाऊ जागा सोडून गेला नाही. त्याच्या ओळखीच्या कोणाला तरी प्लेग झाला त्याची शुश्रूषा करीत राहिला. आणि नतर अनेकाच्या सेवेसाठी त्याने श्रम घेतले. ज्याना कुणी नाही त्यांच्या सेवेला रामभाऊ जाऊं लागला. साथीन होरपळून निघालेल्या नागरिकांना गोड शब्दांची, प्रेमळ वागणुकीची, जिव्हाळयाची देणगी देत देत तो फिरूं लागला. त्यांत त्याला अमाप समाधान वाटत होतं. इतरासाठी श्रम करण्यांत अनन्य आनंद लाभत होता. या धुंदीत त्यान स्वतःच्या शरीराकडे पाहिलं नाही, त्रासाकडे बघितलं नाही, धोका ध्यानात घेतला नाही.

आणि प्लेगला रामभाऊ हा मोठा शत्रु वाटायला लागला. साथ पसरण्यास अडकाठी करणाऱ्या या प्राण्यावरच त्यान अचानक झडप घातली !

अखेरीस रामभाऊचा बळी प्लेगन लीलेनं घेतला. पण किती विचित्र ! सगळया गांवाची काळजी वाहणाऱ्याला पोचवण्यासाठी चार माणसं वेळेवर मिळू शकली नाहीत ! रामभाऊ इतराप्रमाणे चितेतील अग्नीच्या भक्ष्यस्थानी पडला. धडाडलेल्या चितेन त्याची चिमूटभर रक्षा केली. कल्याणच्या स्मशानात राखेचे कण इतस्तत. फेंकले गेले. त्याच मागमूसहि राहिला नाही. प्लेग गेला. गाव पुन्हां गजबजलं. पण रामभाऊची " चिवडाऽ चिवडा " ही ललकारी पुन्हां ऐकू आली नाही. तरीहि गावाचा ससार चालूच राहिला. रामभाऊच्या जाण्यान कसली उणीव कुणाला भासली नाही. सरकत्या काळाबरोबर विस्मृतीचं विरळ आच्छादन त्याच्या चरित्रावर पसरलं गेलं. अति हळूहळू रामभाऊ, त्याची विशाल वृत्ति, जळजळीत देशप्रीति, याची स्मृति विरून जाऊं लागली. ∴

त्याचं स्मारक झाल नाही. मोठया पुढाऱ्याप्रमाण जाहिरातीचं वलय त्याच्या स्मृतीभोवती पसरलं नाही. विशेष केल्याची जाणीव त्यानहि कधी बाळगली नाही. त्याची आठवण आता कुणाला होत नाहो. पण माझ्या मनात मात्र त्याचं व्यक्तिमत्त्व अमर लेण्यांप्रमाणं चिरंजीव झालं आहे !

* * *

# आइने के सामने

## राजेंद्रसिंह बेदी

मी कोण आहे हें आजपर्यंत कळलं नाहीं. मी विनम्र असल्याविषयीचा यांतनं निघणारा निष्कर्ष चुकीचा ठरेल. इतर कुणापुढं न वांकणारा किंवा कुठलासा विवक्षित मत-सिद्धात, ठराविक धर्म आणि वाद, यांचा पाठपुरावा न करणारा माणूस विनयाचा पुतळा असणं जस सहजशक्य आहे, तसंच नमून वागणारा माणूस अहंकाराचं किळसवाणं प्रात्यक्षिक म्हणून देखील शोभायचा.

तसं तर विनयाचं प्रात्यक्षिक घडवणारा किंवहुना जास्तच भयकर असायचा.

'अपराधी दूनानिवे, ज्यों हन्ता मिरगान्ह'
(ग्रन्थसाहब)

(अपराधी दुपटीनं वांकतो. हरणांना मारणाऱ्या शिकाऱ्यासारखा)

एरवीं मी साधामोळा नि विनम्र असल्याच मला एकदम् मान्य. पण असे कांही प्रसग ओढवतात की वरकरणी मला अहगड असल्याचं सिद्ध व्हाव. उदाहरणार्थ, मीं कुठलस लिहायला घेतांना माझ्या मनात घोटाळत राहणाऱ्या नव्या नि विचित्र वाटणाऱ्या अनुभवातून एक वेगळाच टिपून घेणारी शैली माझ्यात सामर्थ्य आणि उत्साह निर्माण करते तेव्हाचे क्षण. तर ते असेच. अन् तेव्हाच स्वत:हून वेगळं होऊन सांगावस वाटतं—

---

श्री. बेदी हे उर्दूतील एक प्रसिद्ध साहित्यिक. 'लाजवन्ती', 'दीवाला' हे त्यांचे कथासंग्रह विशेष गाजले. 'एक चादर : मैली-सी' ही कादंबरी नुकतीच प्रकाशित झाली. कथालेखक म्हणून हिंदी चित्रपटसृष्टींतही ख्यातनाम—

---

मोगल बादशहा दिवाणखान्यांत येत असताना ओरडणाऱ्या त्या मालदारासारखं.

अन् अशा अनुभवावाचून लिहिण शक्य नि सोप नाही. तेव्हा ही क्षणिक अहता नि तशी विनम्रता या कांही वेगवेगळ्या गोष्टी नाहीत. मग कागद अन् मी यांच्यामध्यें तिसरा कुणी नसल्यामुळें इतराना याचा उपद्रव होण्याचा संभव नाही. आपल्याच घरीं एखादा माणूस स्वत:ला कालिदास किंवा शेक्सपियर समजत असला, तर त्याचं इतराना काय? लिहून झाल्यावर नि प्रकाशकाकडे पोचेपर्यंत जर हा माणूस स्वत:ला तितकाच महान् समजत राह्यला तर तो नि सशय शूरच म्हटला पाहिजे. तसं तर कागदावर लिहीत असतांनाच आपली इभ्रत काय तें कळत असतं. तरीहि जर कळलं नसेल तर मित्रकूट सांगतातच—किंवा गमजाच दाखवायच्या तर सागतहि नाहीत.

हो, तर मग मी कोण?

एरवी देखील तमुक कोण याची तसदी माणस घेत असतातच, तसंच तो काय करतो आहे, याचा थांगपत्ता त्याना लावायचा असतो. माझ्याबाबतीत मात्र या दोन्ही गोष्टी निष्फळ आहेत. कारण फार थोडी माणसं मला ओळखतात. तसच माझा व्याप कोठला हेहि त्यांना ठाऊक आहे. माझी अनायासे कीर्ति पसरवणाऱ्या चित्रपटाचं मी शुभ चिंतितों. अन् हे जग तर जाहिरातीचं. नाव कमावलेल्या माणसाकडे लोक डोळे विस्फारून पाहतात. तसच त्या माणसाला या साऱ्या यशाकरता जें कांही द्याव लागतं, त्याबद्दल लोकाचं अज्ञान असत अन् म्हणूनच की काय लोक यशासाठी घोळ घालीत असतात. मी तर तसा कुणीच नाही. आमच्या चित्रपटातील 'हीरों' ना विचारा. आयुष्याचा एखादा क्षण का असेना, पण त्याना स्वाभाविकपणं घालवतां येतो काय? ते घरी असले तरी बायकोकरतां 'हीरो' होण्याचे प्रयत्न करीत असतात. पण हे विसरलेले असतात की तिला तर आपला कण-न्-कण माहीत आहे. आणि गालातल्या गालांत हसून ती म्हणत असते—

ब-हर रंग के ख्वाही जामा मी पोश,
मन अंदाजे कदत रा मी शनासम।

(कुठल्याहि रगाच आवर्तन तू पाघरलंस
तरी तुझा आकार मला ठाऊक आहे.)

स्वत:ला पाह्यलं म्हणजे एका दिग्दर्शकान एका कुत्र्याला चित्रपटात घेतल त्याची मला आठवण होते. (अर्थातच मला विनयाचं प्रात्यक्षिक दाखवायचं नाही)

कुत्र्याचं चित्रपटातल काम पुरस्सर स्वरूपाचं. म्हणजे बारा नंबरच्या सीनमधें त्याचं काम झालं, तरी एकावन्न नंबरच्या सीनमधें त्याच काम होतच. अन् हें सारं सहा महिन्यांनतर होणार होतं. कुत्रा तसा चागलाच. कुठंसा भटकत असायचा. धाणीच्या ढिगाऱ्यांत कसलस खायचं शोधत राह्यचा. पण चित्रपटात तो एक व्यापार-वस्तु म्हणून ठरला होता. विकता येईलशी, किंमत होईलशी. अन् दिग्दर्शकान त्याला मुळी बांधूनच ठेवल होतं. दिवसातन चार वेळा खायला. झोपायला आराम-गाद्या. पडस झाल तर डॉक्टर. अन् कुत्रासुद्धा प्रत्येक आल्या माणसासरशी जोरात शेपूट हलवायचा. प्रत्येक माणसाला तो देवदूत मानायचा म्हणजे सैतान अन् देवदूत यात एका कुत्र्याला फरक करण्याइतपत शक्य होतं तितक तो करायचा. चित्रपट घडत असता कुत्रें महाशय अगदी मजेत. चित्रपट तयार झाल्यावर मात्र तो निवात स्वतत्र झाला. पण धाणीच्या ढिगाऱ्यात पोटा-पाण्याची व्यवस्था शोधण्याची सवय आता नाहीशी झाली होती. तो भटकत सांवरत फिरून पहिल्याच ठिकाणी यायचा. पहिल्यापेक्षा जोरात शेपूट हलवायचा नि त्याच्या बदल्यात त्याला मिळायच्या लाथा. मग ओरडत तो निघून जायचा. तरी सवयीप्रमाणं परत यायचा. ऐकायचा तीच शिवी—'हा दिग्दर्शकाचा कुत्रा नाही. कुठलासा माणूस दिसतोय'—स्तिमित होऊन.

मानामरातबाच्या जोरात घसरत जाणाऱ्या माणसाची ही स्थिति आहे. पैशाच्या बळावर सार काही हाती आणणाऱ्या माण-

साची ही अवस्था आहे. कायदा, नीति, धर्म, राजकारण–साऱ्याना खिशांत कोंबणारा. ' लोलिता ' च्या नायकासारखा कुठल्याशा मानसशास्त्रीय अवस्थेंत गुरफटलेला. अन् ज्याच्या उच्छृंखल वागणुकीलादेखील लोकांनी उदारपण म्हणावं– " मोठ्याच्या करमणुकी. चालायचच. " मानामरातबाच्या गोष्टी, उच्चाधिकाराची लालसा आणि पैशाचा पाठलाग करण्याच वळण या साऱ्या भानगडीमुळ प्रत्येक वऱ्यापैकीं माणूस नंतर वैतागून उठतो. सार सोडून द्यावसं वाटतं त्याला. परंतु ' ब्लँकेट मला तर सोडायचं आहे, पण ब्लँकेट मला सोडत नाही ' ही त्याची गत होते. अन् शेवटी त्या माणसाला वाचाळता प्रिय आहे की खरंच सारं मनस्वी वाटतं आहे, हा प्रश्न उरतोच.

एकदाची गोष्ट. माझ्या कांही गोष्टी वाचलेले एक प्रशसक मला भेटले. जीवनाचं रहस्य उमजलेल्या अशा श्रेष्ठीपैकी ते एक. थोडसं सटरफटर झाल्यावर मुद्याला त्यांनी हात घातलाच.

' बेदीसाहेब, आपण खरंच श्रेष्ठ आहांत ! '

' काय ? ' मी भीत भीत म्हणालों, ' कसलं कसल, मी तर य:कश्चित्. '

अन् माझ्या विधानाशी सहमत असल्याचं त्यांनी सांगितल्यावर मात्र मला त्यांचा खूप राग आला.

मी कोण आहे ? काय करतो ? इत्यादि प्रश्न इथं सपले आहेत. खरं तर माझा या प्रश्नांशी काही सबध नाही. मी तर अशापैकी की ज्याला विचाराव, बाबा रे, तू कां म्हणून आहेस ? खरंच, का म्हणून आहेस ?

अन् हें तरी मला कुठं माहीत आहे ?

खरच. जगात रोज कोट्यवधि माणस जन्मताहेत. अशापैकीच एक मी. एके दिवशीं सहज जन्मलो असेन. आईला आनंद झाला असेल. वडलाना आनद झाला असेल. पण उजवीकडल्या शेजाऱ्याला मात्र याचा पत्ता नव्हता. अन् शेजाऱ्याला माहीत असण काही चागलहि नाही. तो कदाचित् अभिनदनाकरतां आला असेल देखील–केवळ शिष्टाचार म्हणून. मी जन्मल्यामुळ त्याला आनद तो कसला होणार ? उलटपक्षी त्याच्या मुलाचा – पन्नालालचा – विरोधी नाही का जन्माला आला होता ? देण-घेण लागून असलेल्या या जगांत निराळं तें काय ? अन् तसच त्याला होणाऱ्या मुलीला उगाच आपला माझ्यापास्न धोका. तर सागायचं असं की राजेंद्रसिह बेदी जन्माला आला काय, तर त्याला अभिनंदन द्या ? चूहडसिंह आले, द्या अभिनंदन. दिल्लूराम किंवा चमन्नखाँ आले, तर आनंदीआनद साजरा करा, अन् वाजवा-रे-वाजवा.

टागोर म्हणतात – जगांत रोज जन्माला येणारी माणस देव माणूस-निर्मितीपासून थकलेला नाही अस सिद्ध करतात. देवदेखील विनोदाआड किती कठोर वागतो आहे. त्याला बापड्याला थकवा नाही. म्हणून आपला माणसं निर्माण करतो आहे.

बेकार मन्नाश कुछ किया कर;
पाजामा ही उधेड कर सिया कर।

(रिकामटेकडा बसू नकोस. काही तरी करत ऐस. आणि इतर काही नसलं की लेंग्याची शिवण उसवून परत शिवीत जा.) तर देवाच्या लेंग्याची शेवटची शिवण म्हणजे मी. एक सप्टेंबर १९१५ रोजी सकाळी तीन वाजून सत्तेचाळीस मिनिटांनी लाहोर मुक्कामी जन्मास आलों–महाकवि टागोराच सत्य सिद्ध करण्याच्या हेतूनं केवळ. माणसाप्रमाणेच (राम आणि रहीम) बहुतेक विसरलेले असावेत की जग हे दुःखाच माहेरघर आहे. नाहीं तर मला जन्माला घालून उगाच ईश्वरीकृपा त्यानी का म्हणून दाखवली असती ? अन् मला तर वाटतं, की शास्त्रमतानुसार म्हणायचं झाल, तर माझ्यावर एक सूड उगवला गेला होता. गेल्या जन्मीचं कर्म असेल कांहीं अन् देव तरी मग त्यात काय करणार ?

प्रत्येक आईवडलाप्रमाणच माझ्या आईवडलाची इच्छा अशी, कीं मी कलेक्टर व्हावं. त्यात अर्थातच त्याचा काही दोष नाही. त्यांच्या विचारशक्तीची धांव निव्वळ कलेक्टरापर्यंत. कलेक्टरालाहि चाकरपण पत्करावसं वाटावं अस काही असल पाहिजे, याची त्याना काय कल्पना ? उदाहरणार्थ, एका साध्या शेतकऱ्याचा कसलासा तटा मामलेदारापाशी आला होता. मामलेदारान निवाडा शेतकऱ्याच्या बाजूनं दिल्यावर शेतकरी अगदी खूष होऊन म्हणाला, " ईश्वर कृपा करो, मामलेदारसाहेब. अन् आपल्याला पाटील करो. "

स्पर्धेच्या या दुनियेत लोक मोठमोठे हवाले देऊन गोष्टी करतात.

तसं पाहृल तर हा सारा एका कटाचाच प्रकार. अन् प्रत्येक माणूस त्यात अडकतोच नाही म्हटल तरी. उदाहरणार्थ लोक सागतात, की लिकनचा जन्म ' लॉग कॅबिन ' मधें झाला अन् तो पुढें ' युनायटेड स्टेटस् 'चा अध्यक्ष झाला. अन् ' लॉग कॅबीन ते प्रेसीडेंट ' हा वाक्प्रचार रूढ होऊ घातला. पण हे सागणारे लोक एक गोष्ट बहुतेक विसरलेले असतात, की झोपडीतूनं निघून राजभवनापर्यंत पोंचणाऱ्या माणसाची सख्या जवळ जवळ लक्षात न घेण्याइतकी. मग या आकांक्षांचे बळी धडपडतात अन् तत्कालानतर मरणहि पावतात –

अजल है लाखो सितारोकी इक वलादते महर।

**या अंकापासून हें एक सदर सुरूं होत आहे. त्यांत मराठी सोडून दुसऱ्या कोणत्याहि भाषेतील लेखकाबद्दल, लिखाणाबद्दल येत राहील. —विकर्ण**

एका सूर्याचा जन्म अनेक ताऱ्याचा काळ असतो

या उपर जर तुम्हाला ईश्वरीकृपेवर अन्याय करायचा असेल तर मग सर्वस्वी तुमची इच्छा.

मी लहानपणी आजारी असायचो. माझ्या आईसारखा. टायफॉइडच्या आजाराचे टक्केटोणपे मी अनुभवले आहेत. त्यातला केन्द्रबिंदु स्वत: रोगीच असतो. अन् त्याला प्रत्येक वेळेला असं जाणवत असत की, गोफणीतल्या दगडासारखं कुठल्याशा मृत्यूच्या क्षितिजावर आपण एकसारखं फेंकले जात आहो उशीत डोळे खुपसून एकमेकात गोंधळलेले अनेक रंग मी पाहिले आहेत वास्तवाच्या चिमटीत ते सांपडत नाहीत त्याचं यात्रिक विश्लेषणदेखील अशक्य. अन् इद्रधनुष्यदेखील त्याच्या मर्यादा निश्चित करूं शकणार नाही. असे ते रग. मी खूपसा रडलो आहे त्यातले अश्रू खारट नव्हते की गोड नव्हते. नेमकी चव म्हणून त्याची सागता यायची नाही. अन् हे अश्रू तर असे की प्रेमळ आई-बाप-भाऊ-बहीण किंवा प्रेयसी याना ते टिपून घेता येऊ नयेत. अनेकदा

कुठल्याशा विक्राळ उध्वस्ततेत मी एकटा राहिलो आहें. अन् उत्स्फूर्त भीतीनिशी असं वाटलं आहे की....दूरपर्यंत अगदी दूरपर्यंत माझ्याजवळ कुणी नाही. मी पण नाही. अन् कित्येकदा मी पाहिला आहे इग्लंडचा बाजार किंवा बनारसचा तो घाट. तिथं गेल्या जन्मी मी जन्माला आलों होतों. पूर येऊन गेला आहे अन् गंगा दूर सरली आहे. अन् काठाच्या जवळपास लालजर्द मातीत अगणित लहान सहान प्रवाह सोडून निघून गेली आहे. जिथं म्हणून पाय ठेवावा तिथं-तिथं एक आणखी प्रवाह सुरू होतो. अन् तिथं आठ-नऊ वर्षांचा एक काळाकुट्ट नागडा मुलगा कमरेला काळं घोतरड गुडाळून नि डोक्यावर शेंडी उगारून उभा आहें. अन् तो मी आहें.

मोठ झाल्यावर उमेदीच्या तडाख्यानीं नस-न्-नस ढिली करून घेण्याचा प्रश्नच माझ्या बाबतीत उद्‌भवला नाही लहानपणीच रग अन् नसत्या गोष्टी सपून गेल्या होत्या. क्षुल्लकशा गोष्टीमुळें राग यायचा. साध्याशा कारणाकरता रडू यायच. आई सतापून दूर-वर फेकून द्यायची. कारण तिच आजारी वक्ष मी साफ पिळून टाकीत होतों. आई, तू असलीस काय नि नसलीस काय, चालेल. पण तुझं दुध मात्र मला मिळाल पाह्यजे. अन् मी आजतागायत बोलावतों आहें—आई, माझं दूध मला दे. अन् आई मात्र कुठच नाही आहे· याचा अर्थ कळतो काय ? —आई कुठं म्हणून नाही........हो, तर प्रथमत फेंकून दिल्यावर अथाग वात्सल्यानिशी ती पुन: उचलून घ्यायची. मला ठेवून घ्यावं की फेंकून द्यावं हें तिला कळल नसावं.

मी कित्येकदां मेलो तसा कित्येकदा जन्मलो. प्रत्येक गोष्ट पाहून स्तिमित झालों. अन् प्रत्येक वाईट गोष्ट घडून गेल्यावर कासावीस झालों. माझ्या आश्चर्याला मर्यादा नाही की कासावीस होण्याला अंत नाही. माझी जन्मकुडली दाखवली गेली होती अस नंतर कळल.

लग्नात केतु, स्वगृहीं गुरु अन् नजर बुधाकडे. इत्यादि ज्योतिष्यानं सागितलं होत. म्हणजे कलावंत होण्याविषयीच भाकित केलं होतं. पण शनीचीदेखील दृष्टि असल्यामुळं नाव मेल्यावर मिळेल, असं सुद्धां विवेचन त्यान केलं होतं. आणखीसुद्धा खूपस. सूर्य उग्र. धन आणि लाभ स्थानी. अन् त्याच घरात शुक्र. सूर्याच्या तेजानं मद झालेला, शनि शुक्राला कोन करून असल्यामुळं आयुष्यांत अनेक स्त्रिया येतील. शनि आणि शुक्र यांची युति डोक्यावर नाचली तरी गुरु-गृही असल्याकारणान बद्दूपणा यायचा नाही. इत्यादि इत्यादि.

पुन: मंगळ शनीच्या युतीत दोघाचा जरी एकमेकाशी काटकोन असला, तरी मंगळ हा शेवटी मंगळच. तो आपला प्रभाव दाखवणारच. चालूं असलेली कामं बंद पडतील—विशेषकरून गुरु वक्री असेल तेव्हा. दहाव्या घरी राहु आहे अन् त्याच्यावर मगळाची दृष्टि. एकूण काय, बायको नेहमीच आजारी असणार. जणूं काय, आमच्या तमाम वंशालाच हा शाप होता. माझ्या वडलाची बायको आजारी, नेहमीची रोगी ! अन् माझी बायको सुद्धा तशीच.

तर सांगायची गोष्ट अशी, की एका बायकोचं आयुष्य उघळून लावण्यापलीकडं आणि तसंच कांही पोराचं भविष्य वाईट करण्यापलीकडं असं दुसरं सुपीकसं मी कांही केलं असेल, तर तें हें असलच काळं करत राहणं, काही पुस्तकं लिहिणं अन् नंतर स्वतःच ती विकत घ्यायला निघणं अन् काही चित्रपट अयशस्वी करणं—

चन्द तस्वीरे बुताँ, चन्द हसीनोके खतूत,
बाद मरने के मेरे घरसे यह सामाँ निकला।

(लावण्यवतीची. कांहीशी चित्रं, सुंदरीनी लिहिलेली काही पत्रं, एवढंच सारं मी मेल्यावर माझ्या घरांत सापडलं.)

माझी आई ब्राह्मण. वडील क्षत्रिय. त्याकाळी हें असल लग्न ग्रेटनाग्रीन (एक असं स्थळ की ज्या ठिकाणी पळून आलेली जोडपीं लग्न लावायची) मधें देखील झालं नसत. पण आपलं होऊन गेलं. माझे आईवडील एकमेकाच्या मनाबद्दल नि विचाराबद्दल आदर व्यक्त करायचे. म्हणूनच की काय एकीकडं ग्रथसाहवाच वाचन चालू असता दुसरीकडे स्तोत्र आणि गीतापठण व्हायचं.

लहानपणी ऐकलेल्या पहिल्या गोष्टी राक्षसाच्या अन् पऱ्याच्या नव्हत्या. गीतेच्या प्रत्येक अध्यायाच्या शेवटीं असलेल्या 'माहात्म्या' विषयीच्या होत्या. आणि हें आम्ही मोठ्या श्रद्धेनं आईपाशी बसून ऐकायचों. राजा, ब्राह्मण, पिशाच्च इत्यादिकाच्या कांही गोष्टींचं स्वरूप लक्षात यायचं. ग एक गोष्ट——

' आई, ही गणिका ग कोण ? '

आहे आपली. गप्प बैस. '

'ऊं ऽ ऽ हूं, सागना—गणिका...? '

'चूप! '

आणि मग तसलीशी कीव. आपल्या मुलाचा एकाएकी चेहरा हिरमुसला झाल्यावर जी फक्त आईलाच येते—

' वाईट बाईला गणिका म्हणतात '

' आई, तू तर चागली बाई आहेस ना? '

' आई ही नेहमी चागलीच असते. कुणाचीहि असली तरी. '

' तर मग वाईट बाई कुठली ? '

' तू तर डोक उठवलस. राजा, वाईट बाई असते बऱ्याच पुरुषांच्या सोबतीत राहणारी. '

माझ्या लक्षात आलं. पण दुसऱ्या दिवशीं बुटाचा मार बसला तो खराच. त्याचं असं झालं, की शेजारच्या सावित्रीच्या आईला मी गणिका म्हणून गेलों. हो, नाहीतर काय. तिच्या घरी दीर (लहान, थोर) आणि आणखी कुठलीतरी बरीच पुरुषमाणसं होती. माझं नतरचं आयुष्यहि असच. कुठ काही म्हणन जाणून घ्यावंसं वाटलं तर जन्माचं 'चूप! ' अन् जर कधी उत्तर मिळालं तर तें समजूं नये असल.

अन् जर कां मी समजलों, तर आपला पायतळीचा मार.

शारीरिक दुबळेपणा, कुठल्याशा संवदेनानी गांजलेला, प्रश्नाची रीतसर उत्तरं न मिळणं किंवा मिळालेल्या उत्तराचं महत्त्व न उमजण—या साऱ्या अशा गोष्टी आहेत, कीं एखादा उगाच अंतर्मुख होतो. जास्ती सवेदनशीलदेखील. अन् स्वत.ची म्हणून एक विशेष अस्मिता निर्माण होण्याची शक्यतासुद्धा असते अशा वेळी. सरळसोट अधारावाचून देखील एक वेगळं महाशून्य या जगात तर आहेच. नानाविध भय, सकट, निराशा ही सारी हरघडी मनाचा थरकाप उडवून देत असतातच. शिवाय, वाकीच्या अनेक गोष्टीत नाना घटना असतात आणि प्रयोग सुद्धां. अन् प्रत्येक लेखकाच्या आयुष्यात त्यांचा वाटा असतोच. या साऱ्या गोष्टीना तो जाणून घेत असतो, त्यांचं विश्लेषण करत असतो—अन् नंतर ते लिहिण्याची धडपड.

तसं म्हटल तर पाच वर्षांचा असतांनाच रामायण अन् महाभारत अन् त्याच्यांतल्या पात्रांशी माझी ओळख झालेली. आतां

रामायण पहावं तर किती मोठं पुस्तक. त्यांत किती पात्रं – सुदर, सद्‌गुणी नि त्यागी. पण मला सर्वांत सहृदयता असेल, तर ती त्या सुग्रीवाविषयी. याला कारण काय ? त्या बिचाऱ्याचा थोरला भाऊ वाली त्याची बायको हिरावून घेऊन गेला. अन् तो स्र नुसता पहातच राह्यला. जर राम तिथं येऊन ठेपला नसता, तर सुग्रीव बिचारा तसाच एकाकी राह्यला असता. यासारखच माझ्या कुतूहलाचं एक पात्र महाभारतात आहे. ज्याचा आडोसा घेऊन भीष्माचा वध केला जातो तो शिखंडी. नाहीतर भीष्माना मरण आल असतं का ? आजपर्यंत ते जिवत राह्यले असते.

माझी आई आजारी असल्यामुळं माझे वडील रोज दिडकी या वर्गणीवर कुठल ना कुठलं पुस्तक आणायचे नि आईशेजारी बसून वाचून दाखवायचे. अन् मी दडून बसून ऐकत असायचो'चं शालेय आयुष्य सपत असतानाच टॉडसाहेबाचं राजस्थान आणि शरलॉक होम्सच्या रहस्य-विस्मय-कथांशी माझा संबध आला. होता. कुठल कांहीं जर समजलं नसलं, तर तें 'मिस्टरीज् ऑफ दि कोर्ट ऑफ पॅरीस.' आठवतं ते इतकच, की माझे वडील मात्र ते पुस्तक मोठ्या मिटक्या मारत वाचायचे. अन् मला मात्र कुतूहल असायचं, की एखादा माणूस दर वेळी कुठल्यातरी नव्या स्त्रीशी का म्हणून भानगड करत असतो ? तोपर्यंत अर्थात्‌च माझ्या लक्षात इतकं नक्की आलं होतं, की स्त्रियाच्या माग लागणं सभ्यपणाच नाही. अन् दुसर असं की स्त्री ही अत्यंत घाणेरडी बाब आहे. सागायचं तर अस, की मी तडफडत झोपी जायचों

कालातरानं माझ्या चुलत्यानी एक स्टीम प्रेस विकत घेतला. त्याबरोबरच पाच-सहा हजार पुस्तक पण आदण म्हणून मिळाली आठव्या यत्तेपर्यंत मी ती सगळी वाचून संपवली. प्रत्येक जुन्या पुस्तकातल्या त्या किडयानच माझा आत्मा पोसला होता. किंवा प्रत्येक सुज्ञ प्रकाशक नवीन पुस्तकांत खूण म्हणून बुकमार्क टाकून ठेवतो, तसं म्हणा हवं तर. सिद्धान्तान मी जवळजवळ प्रत्येक बाबतीत माहितगार झालों होतो. व्यवहारानं मात्र नाही. तर या दोहोंतल्या संभाव्य तफावतीमुळ शक्य तेवढा अनर्थ माझ्यावर देखील ओढवला. प्रत्येक प्रयोगानिशी मी फांसावर लटकलों. अन् माझ्या बाबतींत तर हें व्हायलाच हवं होत.

जीवनाचा सम्यक् पाया इतक्या विस्तारानं सांगितल्यावर इतर ज्या आपत्ती कोंसळल्या त्याचं विवरण व्यर्थच मानलं पाह्यजे. शेवटी हेच सागायचं ना, की मी मॅट्रिक झालों, पुढं कॉलेजात गेलों, अन् इंग्रजीत अन् पंजाबींत शेर सांगितले, उर्दूत शोकविरहपर काहीं लिहिलं, आई वारली, पोस्टात नोकरीला लागलों, लग्न झाल, मुलं झालीं, वडील वारले, मुलगा वारला, नऊ वर्षं पोस्टांत नोकरी केली, रेडिओत पाऊल टाकलं, फाळणी ...... कत्तल ...... उध्वस्ततां ...... रक्तानं लिबलिबीत शरीरं ...... आगगाडीच्या डब्यावर उघड्यानिशीं दिल्लीत येणं ...... स्टेशन ...... युद्ध ...... मुबई ...... चांगले चित्रपट, तसेच वाईट देखील ...... कधी तरी कथाच्या कुठल्याशा पुस्तकात हात लेखणी व्हायला लागले. हाताचं लेखणी होणं ऐकलं आहे ? पाह्यलं आहे ? मिर्जा गालिब म्हणतात —

> लिखते रहे जुनूंकी हिकायाते खूं चकाँ
> हरचन्द इसमें हाथ हमारे कलम हुए ।

तसंच पुढं काही सकटं. असले क्षण. बुद्धाच्या आयुष्यात आले नसतील असे. अशा घटका की ज्या अजामिळानसुद्धा अनुभवल्या नसतील. बायकोत आस्था राहिली नाही, तसच तिचं माझ्यावर प्रेम नाही. कारण ? भगड वयामुळं आलेली कटकट. धद्याच्या पातळीवर मोठ्या मुलानं मला मूर्खांत काढलेल अन् मी त्याला केवळ पैशाच्या नादीं लागलेला आणि टवाळचा म्हणून समजत होतों. तर हें सारं मांडत बसायचं काय ? माझ्या श्रद्धा कुठल्या ? विश्वास कसला ? तर कुठलाच नाही नि कसलाच नाही. अन् आशा ? तसंच निराशा ? तर त्याहि नाहीत. अक्कलशूर म्हणून मी कधी कुठल्या स्त्रीवर प्रेम केल नाही. मूर्खपणामुळं तिन माझ्यावर केलं नाही हें तितकच खरं. वासना नि प्रेम याच्यांतला फरक मला समजतो ना, म्हणून. वाटत (मात्र त्यातली घडपड वजा जाता) की फक्त लिहीत जावं—पैशाकरितां नाही, कुणा पब्लिशरकरता पण नाहीं. फक्त लिहिणं मला हवं आहे. कुठल्याहि धर्मग्रथाची मला आवश्यकता नाही. या शिळ्या पुस्तकाच्या मानान मी स्वत: बऱ्यापैकी लिहितो. मला गुरु नाही. एखाद्याची दीक्षा घेण्याचं माझ्या मनात नाही. मला आपलं वाटतं, की गुरु आणि शिष्य या बाबी त्या-त्या माणसात एकवटूनच असतात. त्याच्यापुरत्या. आता राहिली असतील ती दुकानं. हिरव्या हिरवट पानाशी अन् चमेलीच्या फुलाशी मी बोललो आहें माझ्याशी पण ती बोलली आहेत. मला कावळ्याची भाषा समजते' माझा कुत्रा अन् मी आम्ही दोघं एकमेकांना समजतों. मला कसल्याहि परमसत्याची तसच मोक्षाचीसुद्धा आवश्यकता नाहीं. देव माणूस घडवत सुटला आहे. मग मी माणूस असून देव घडवण्याचा मूर्खपणा का करावा ? अन् जर परमसत्याला माझी गरज असली, तर मला वाटतं भूत आणि भविष्य याच्यापासून सर्वस्वी वेगळ्या असलेल्या नि:सीम शातीच्या कुठल्याहि क्षणी ते स्वत:च मला शोधून काढेल. मला सहज माणूस म्हणून जगायचं आहे — अर्थात् त्यातली इच्छा वगळून टाकून. एका अशा स्थळी जावसं वाटतं — अर्थात् प्रयत्नाचा डोईजडपणा गाळून—सतांच्या भाषेत 'सहज अवस्था' म्हणतांत, तिथं अन ही अवस्था तर अनुभवल्यावर येते. तर अन् . ....

मला माहीत नाहीं !

* * *

# समीक्षा

## चढण

### आल्हाददायक कथासंग्रह

फार मोठा गाजावाजा न झालेले परंतु जाणतेपणानें जे कथालेखक बराच काळ कथा-लेखन करीत आहेत, त्यांतील प्रा. वडेर हे एक होत. म्हणूनच त्यांचा हा कथासंग्रह पहि-लाच असला तरी त्यांत नवेपणांतील कसलाहि बुजरेपणा किंवा सांकेतिक धडपड जाणवत नाहीं. वडेरांचें कथाविश्व आहे मध्यमवर्गी-यांचेंच. परंतु त्यांच्या कथांत जो वेगळेपणा जाणवतो, त्याचं कारण त्यांचं सौंदर्यशोधक चिंतनशील मन ! जेव्हा एखाद्या सांकेतिक कथानकप्रधान कथेच्या मोहांत ते पडतात, तेव्हां त्यांची " सांवली " सारखी कथा भरा-भर ओसरत जाते. हरवलेल्या प्रेयसीची ही गोष्ट नेहमींच वळणें-वाकणें घेत पुढें जाते. आजोबांच्या ज्या दोन गोष्टी या संग्रहांत त्या अत्यंत वाचनीय आहेत. कारण फार लाडांत गेलेलें बालपण श्री. वडेर मोठ्या हिकमतीनें होतें तसें जिवंत करूं शकतात. 'दोन पिढ्यांपूर्वीचा माणूस' यांतील आजोबा-आजीच्या संबंधांचें चित्रण अतिशय सरस आहे. 'शल्य' या कथेंतील अकृत्रिम निवे-दनहि असेंच मन हेलावून सोडतें. 'काबुली-वाला' या प्रख्यात कथेशीं पैज घ्यावी इतकी ही कथा सामर्थ्यशील आहे. या संग्रहांत कथा-नकाचें कुंकू असलेल्या ज्या कथा आहेत, त्यांत आणखी एकच कथा आहे, ती म्हणजे 'अफवा'. घरीं आलेल्या श्रीमंत काकांचा अपघातानें झालेला मृत्यु हा पैशाच्या लोभानं घडविण्यांत आल्याची जीवघेणी अफवा या कथेंतील कथा-विषय आहे. बस्स. या व्यतिरिक्त जें ललित-लेखन या संग्रहांत आहे तें सर्व प्रसंगांच्या कलात्मक उतरंडीसारखें मोहक आणि वेधक आहे. 'वादळी संध्याकाळ', 'कुस्ती', 'चढण', 'चांदण्यांतलें स्वप्न', आणि 'सूर्यास्त' या सर्व कथांमध्यें कथानकाचा धागा अत्यंत अस्पष्ट आहे. परंतु लेखकाच्या चिंतनशील, सौंदर्यशोधक वृत्तीची जीं स्पंदनें आणि आवर्तनें या लिखाणांत नजरेस पडतात नि चकित करतात. एका वादळी संध्याकाळीं मंगळसूत्राची अडचण मानणारी स्त्री आप-ल्याला ते बोलतां बोलतां दाखवतात, तर सूर्यास्ताच्या सुमारास 'डोंगराच्या नक्षीदार पेल्यांत विरघळणारा आइस्क्रीमचा केशरी गोळा' त्यांच्या नजरेला भुरळ पाडल्याखेरीज रहात नाहीं. श्रीरंगपट्टणच्या किल्ल्याच्या भेटीच्या वेळीं कलत्या उन्हांतील पराक्रमी पुरुषांच्या समाध्या पाहतांना लेखकाचें मन हेलावून जातें व ती सर्व खळबळ शब्दांत पकडण्यांत लेखक यशस्वी होतो. मात्र कितीहि दूरान्वयानें विचार केला तरी प्रवासवर्णनाला कथासंग्रहांत ढकलणें योग्य वाटत नाहीं. निदान अनुक्रमणिकेंत 'कथाक्रम' हा शब्द तरी नको होता.

आपल्या कथेचें विश्व रुंदावण्यांत श्री. वडेर यांचें यश बरेंच असलें तरी या प्रयत्नांत कांहीं अपयशहि त्यांना मानावें लागेल. 'मी: एक हॅम्लेट', 'हुरहूर' आणि 'वाटचाल' या तिन्ही कथा हें अपयश स्पष्ट करतात.

यशापयशाचें मोजमाप केल्यानंतर एक गोष्ट आवर्जून सांगावयास हवी की वडेर यांच्या कथांचा साज सर्वस्वीं वगळा आहे. उत्कट अनुभवांची श्रीमंती त्यांत आहे आणि निसर्गाशीं त्यांची सोयरीक आहे. जीवनां-तील भकास आणि हृदयद्रावक असें कांहीं ते आपल्या कथांतून दाखवीत नाहींत. त्यामुळें या संग्रहाला एक आल्हाद प्राप्त झाला आहे. संग्रहांत मुद्रणदोष मात्र सुमार आहेत. त्यामुळें पृ. ५ वर निवेदनांत अचानक लिंग-बदल होतो. पृ.३० वर " आम्ही आली " असला घेडगुजरी शब्दप्रयोग खड्यासारखा बोंचतो, तर पृ. ९२ वर " अनिमिषपणें " पहाण्याऐवजीं कोणीतरी " अनियमितपणें " पाहतें व गुलमोहराऐवजीं " गुलमोरा "चा शोध लागतो. वेष्टनावरील नवचित्रहि फारसें आकर्षक नाहीं.

□ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □

**चढण**

प्रल्हाद वडेर

साधना प्रकाशन, पुणें
तीन रुपये पन्नास न.पै.

# तें माझें घर

## वैशिष्टयपूर्ण गुजगोष्टी

गुजगोष्टी हा वाङमयप्रकार प्रा. फडके यांनीं नावारूपाला आणला. कांही काळ तो लोकप्रिय झाला. त्यानतर जो तो अत्यंत रटाळ गुजगोष्टी लिहूं लागला आणि या वाङमयप्रकाराला नियतकालिकामधून हद्दपार व्हावें लागलें श्री. म. म. केळकर याचा हा गुजगोष्टीचा सग्रह बऱ्याच कालावधीनतर वाचायला मिळाला. एकदम वैशिष्टयपूर्ण वाटला. तसें पाहता यातील लेखन शुद्ध गुजगोष्टीच्या स्वरूपाचें नाही किंवा निबधाच्या स्वरूपाचेहि नाही. त्यात भरपूर आत्मचरित्रात्मक लिखाण आहे. चरित्रकथनहि आहे. लेखकाच्या या घरात साहित्यसम्राट केळकर, श्रीमती गिरजाबाई केळकर, प्रा. द. के. केळकर, डॉ. कमलाबाई देशपाडे याच्यासारख्या नामवताचा सचार झालेला असल्यामुळें या लेखनात त्याच्या काही हृद्य आठवणी समाविष्ट आहेत. "आधारवड" या लेखात कै. न चि. केळकराच्या स्वभावावर प्रकाश टाकणाऱ्या आठवणीची रेलचेल आहे. "आधारवड उन्मळून पडला" या लेखाचे वर्णन तर उत्कृष्ट मृत्युलेख असेच करावें लागेल. ज्या लेखनात श्री म. म केळकर याच्या चिंतनशील व्यक्तित्वाचें दर्शन घडते असे लेख म्हणजे – "स्पर्शें मन पालवते", "चिमी – एक तत्त्वज्ञान" व "भिकारी". श्री. केळकर स्पर्शाच्या ओढीचें, घरात पाळलेल्या माजराचे किंवा सहज दृष्टीस पडलेल्या भिकाऱ्याचे दर्शन घडवीत असताना नवे नवे चिंतनीय विचार व्यक्त करतात. "आत्याबाई" हें शब्दचित्र जिव्हाळयाने लिहिलेले आहे परतु ते वैयक्तिक पातळी सोडून वर उचललें जात नाही – हा त्याचा दोष जाणवतो.

उरलेल्या लेखांतून सुस्पष्ट दर्शन होतें ते लेखकाच्या दिवगत वडिलांचें. कै. आप्पासाहेब केळकर! एक सज्जन, थोर परंतु प्रसिद्धिपराङमुख असें हे जीवन होतें. पुनरुक्तीचा लहानसा दोष या लेखातून शिरला आहे. मात्र हा दोष अधिक काळजीच्या सपादनाने टाळता आला असता.

या सर्व पुस्तकाला घराचें घरपण हें प्रमुख सूत्र आहे. आज फक्त चाळी कोसळत नसून घरेहि विस्कळीत होत आहेत. मोठी सुखी कुटुबे दुर्मिळ होत आहेत. म्हणून लेखकाच्या या घराच्या दर्शनाने वाचकाला समाधानाबरोबर आर्ततेचाहि अनुभव मिळतो. या पुस्तकाचे हे यश मोठें आहे.

पुस्तकाची छपाई मोहरेदार व पद्मा सहस्रबुद्धे याचे वेष्टन मनोवेधक आहे.

□ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □

**तें माझें घर**

मनोहर महादेव केळकर

मनोहर ग्रथमाला, पुणे

तीन रुपये



## साभार स्वीकार

**रसिला** (कथासग्रह) वसंत कुंभोजकर: महाराष्ट्र प्रकाशन गृह, कोल्हापूर. किंमत तीन रुपये.

**काळोखांतील काजवे** (कथासंग्रह) रामचं हिंगणे: नलिनी साहित्य प्रकाशन, पुणे. किं. एक रुपया पन्नास नये पैसे.

**स्वामी विवेकानंद** (चरित्र) भीमराव कुलकर्णी: इनामदार बंधु प्रकाशन, पुणे २. किंमत दोन रुपये पन्नास न. पै.

**मोतीलाल नेहरु** (चरित्र) अरविंद ताटके. इनामदार बंधु प्रकाशन, पुणे २. किं. २ रुपये

**असा असावा नवरा** (कथासग्रह) दि. बा. मोकाशी. मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुबई. किं. चार रुपये.

**चीन–भारत युद्धांतील संग्रामगीतें** रा. ना. पवार: प्रकाशक: ग. का रायकर १० ए, झावबाची वाडी, ठाकुरद्वार, मुबई २. किं. २५ न. पै.

**उबग** (काव्यसग्रह) भाऊ भालेराव. प्रकाशक: शि. म. पवार. "नवयुग" प्रकाशन, राजकमल चौक, अमरावती. किं. ३ रु.

**अग्निकळया** (काव्यसग्रह) दि. ना. पळशीकर. शारदा प्रकाशन. हैद्राबाद (द.) किं. २ रु.

**शहरचे दिवे** (कादंबरी) वि. ग. कानिटकर. प्रकाशक: मनोहर ग्रंथमाला, पुणें २. किं. ४ रु.

**गुंजारव** (काव्यसग्रह) भृग स्मारक ग्रथ. भृग गुणगौरव स्मारक समिति, पुणें ४. किं ५ रु.

□ □ □

# मी पाहिलेला लाल हुकूमशहा

मिलोव्हिन जिलासच्या
**Conversations with Stalin**
या पुस्तकाचा प्रदीर्घ परिचय

: लेखांक तिसरा :

रा. म. शास्त्री

दुसऱ्या लेखांकाच्या अखेरीस सांगितल्याप्रमाणें जिलास मॉस्को-हुकूमशहाला भेटण्यासाठीं जानेवारीच्या आठ तारखेस निघाला. साल होतें १९४८. युगोस्लाव्ह सैन्यातर्फें एक दोन प्रतिनिधि जिलास-बरोबर निघाले. चीफ ऑफ जनरल स्टाफ पोपोविक आणि शस्त्रास्त्र-निर्माण मंडळाचा प्रमुख टोडोरोविक् हे दोघे जिलासबरोबर होते.

मॉस्कोमध्यें पोहोंचल्यानंतर कांहीं तासांतच ही मंडळी युगोस्लाव्ह वकिलातींत गप्पा मारीत असतांना फोन घणघणला. फोनवरून बोल-णाऱ्या रशियन अधिकाऱ्यानें निरोप दिला कीं, स्टॅलिन लगोलग जिलासला भेटू इच्छित होता. जमलें तर त्याच दिवशीं सायंकाळीं ही भेट व्हावी अशी त्याची इच्छा व्यक्त झाली होती. जिलासला भेटीची ही घाई पाहून आश्चर्य वाटलें. तो सांगतो–

'इतक्या तांतडीनें मॉस्कोंत गांठीभेटी होत नसतात. परदेशांतील कम्युनिस्ट नेत्यांना इथें आणून बहुधा स्टॅलिनच्या भेटीची वाट पाहत तिष्ठत ठेवण्याचाच रिवाज होता. अशी म्हणच रूढ झाली होती कीं मॉस्कोला पोहोंचणें कठिण नाहीं, परंतु तिथलें काम उरकून पुनः परतणें कर्मकठिण ! मी जरी दमलेला असलों तरी स्टॅलिनच्या भेटीचें मीं अंतःकरणपूर्वक स्वागतच केलें असतें, परंतु इतक्या घाईगर्दीनें भेट ठरविण्यांत येत आहे, त्या अर्थी यांत कांहींतरी पाणी मुरतें आहे या संशयानें मी ग्रस्त झालों.

'नेहमींप्रमाणें रात्रीं नऊ वाजतां मला क्रेमलिनमध्यें स्टॅलिनच्या कचेरींत नेण्यांत आलें. तिथें पूर्वींच मालोटोव्ह व झाडनोव्ह हे जम-लेले होते. झाडनोव्हचा मला ऐकून परिचय होता. परदेशांतील कम्युनिस्ट पक्षांशीं संबंध राखणाऱ्या खात्याचा तो प्रमुख होता व पॉलिट ब्युरोचाहि सभासद होता.





– पुनर्जन्म –

'नमस्कार चमत्कार झाले न झाले तोंच स्टॅलिननें मुद्यावरच बोलणें सुरू केलें. तो म्हणाला– "एकूण काय अल्बानियांतील मध्यवर्ती समितींत तुमच्यामुळें हाणामारी सुरू झाली ! जें व्हायला नको तेंच नेमकें होत आहे–तेंच होत आहे– "

'मीं स्पष्टीकरण केलें कीं नाकू स्पिरू हा अल्बानिया व युगोस्लाव्हिया यांच्या एकीकरणाविरुद्ध होता. अल्बानियाच्या मध्यवर्ती समितींत यामुळें तो एकटा पडला – परंतु माझें बोलणें संपण्यापूर्वीच स्टॅलिन म्हणाला–

**"आम्हांला अल्बानियांत खास असा मुळींच स्वार्थ नाहीं. युगोस्लाव्हियानें अल्बानिया गिळंकृत केला तरी आमचा या गोष्टीला विरोध नाहीं ! या ठिकाणीं किंचित् थांबून स्टॅलिननें हाताच्या पंजाचीं बोटें एकत्र करून तोंडाकडे नेलीं व गिळंकृतीचा अभिनय करून दाखवला. "**

जिलासला स्टॅलिनचा हा अभिनय पाहून धक्काच बसला. त्याच्या तोंडांतून शब्द फुटेना. एका कम्युनिस्ट राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राला गिळंकृत करण्याची भाषा स्टॅलिनच्या तोंडांत पाहून जिलास हादरून गला. धक्का ओसरल्यावर तो कसेंबसें म्हणाला–

"यांत कुणी कुणाला गिळंकृत करण्याचा प्रश्न नाहीं. आमचा हेतु एकीकरणाचा आहे– "

मध्येंच तोंड घालून मोलोटोव्ह उद्‌गारला–

" एकीकरण काय आणि गिळंकृति काय, अर्थ तोच ! "

स्टॅलिनला आतां जोर चढला. तो मोठ्यानें म्हणाला–

"मी म्हणतों तुम्ही खुशाल अल्बनिया खाऊन टाका. आमचें या बाबतींत तुमच्याशीं एकमत आहे. परंतु हें काम जितक्या लवकर उरकेल तेवढें चांगलें– "

## खलिता तुम्हीच लिहा

अल्बानिया-युगोस्लाव्हिया यांच्या एकीकरणासंबंधीं जिलासचे विचार शुद्ध भूमिकेचे असतांनाहि युगोस्लाव्हियांतच त्याला थोडाफार विरोध होता. परंतु त्या भूमिकेचें विकृत स्वरूप मांडून आतां स्टॅलिन मोलोटोव्ह त्याचा वरवर पाठपुरावा करीत होते. यामुळें जिलासच्या मनांत असा विचार आला कीं, रशियानें लहान राष्ट्रांचें जें कम्युनिस्टीकरण केलें त्याचा अर्थ गिळंकृति असाच रशियाच्या मनांत होता कीं काय ? या विचारांना पुरेशी धार चढली नसली तरी कांहीं तरी चुकत आहे हा मुंगा जिलासाला पोखरूं लागला.

फक्त दहा मिनिटांत ही चर्चा आटोपती घेत स्टॅलिन अखेर जिलासला म्हणाला–

" तुमच्या आणि आमच्यांत आतां कांहींच मतभेद नाहीं. तुम्हीं आतां स्वतः जातीनें, परंतु रशियन सरकारच्या वतीनें मा. टिटोसाठीं झालेल्या चर्चेचा वृत्तांत लिहून काढा व उद्यांपर्यंत मला दाखवा. "

ज्या वेळीं स्टॅलिननें ही कामगिरी जिलासला सांगितली त्या वेळीं जिलासला असें वाटलें कीं स्टॅलिनचा आपल्यावर केवढा हा विश्वास! परंतु दुसऱ्या दिवशीं प्रत्यक्ष खलितालेखनासाठीं बसल्यावर जिलासच्या मनांत विचार चमकून गेला कीं कदाचित् या लिखाणाचा उपयोग आपल्याच सरकारविरुद्ध उद्यां रशिया करण्याची शक्यता आहे. म्हणून जिलासनें हा वृत्तान्त मोजक्याच शब्दांत आणि काळजीपूर्वक लिहिला. आपण काय लिहिलें तें आठवलें तसें जिलासनें सांगितलें आहे. जिलास सांगतो–

' ... मीं असें कांहींतरी लिहिल्याचें स्मरतें ... जिलास काल मॉस्कोंत दाखल झाला, व लगेंच त्यानें रशियन पुढाऱ्यांशीं विचारविनिमय केला. सोविएट सरकार व युगोस्लाव्हिया सरकार यांचें अल्बानियाबाबत एकमत झालें...'

हा खलिता पुढें धूळ खात ठेवण्तात आला. तो युगोस्लाव्ह सरकारला कधी मिळाला नाही किंवा पुढल्या भाडणांत त्याचा उल्लेखहि झाला नाही.

## नांवांत बरेंच आहे !

वरील अर्ध्या तासाची बैठक संपल्यावर लगेंच जिलासला स्टॅलिन-बरोबर जेवणासाठी नेण्यात आले. ज्या व्हिलांत स्टॅलिनचे जेवणखाण होत असे त्यातील बाहेरच्या दिवाणखान्यातच जगाचा मला मोठा गोल होता. जिलास, स्टॅलिन व झाडनोव्ह असे क्षण दोन क्षणच त्या गोला-पुढें थांबले. लेनिनग्राडभोवती स्टॅलिननें निळ्या पेन्सिलीने अर्धवर्तुळ केलें होते तिथें नजर रोखीत स्टॅलिन म्हणाला–" हें कोइन्सबर्ग नाव बदलून त्याचें कालिनिनग्राड होईल तरीहि अजून अनेक गांवाना जर्मन नावे आहेतच–"

झाडनोव्हकडे वळून मग त्याने सागितलें–" **हीं नांवें बदलून टाका. आतांपर्यंत हें कुणीं केलें नाहीं हें खरोखर चमत्कारिक आहे. अजून हीं जर्मन नावें चालू आहेत म्हणजे काय ?** "

लगेंच झाडनोव्हनें खिशातून एक छोटी वही काढली व स्टॅलिनची आज्ञा त्याने थोडक्यात त्यात टिपून ठेवली. यापुढची हकिगत जिला-सच्या शब्दांतच सादर करणे इष्ट. जिलास वर्णन करतो–

' एवढें झाल्यावर मोलोटोव्ह आम्हाला आत नेण्यास आला. मी व मोलोटोव्ह जेवणाच्या खोलीत गेलो. जेवणाच्या खोलीत स्टॅलिन मॅलेन्कॉव्ह, बेरिया, झाडनोव्ह व व्होजनेसेस्की एवढी माणसें जम-लेली होती. यापैकी झाडनोव्ह व व्होजनेसेस्की याच्याविषयी थोडी माहिती सागतों.

' झाडनोव्ह हा पॉलिटब्युरोपैकी फार हुशार मानला जाई. तो उच्चशिक्षित होता व त्याचा अनुभवहि मोठा होता. व्होजनेसेस्की हा प्लॅनिंग कमिशनचा अध्यक्ष होता. त्याचें वय चाळीसच्या आंत बाहेर असावें. तो बोले कमी. व ओंठाआड नेहमी किंचित् हसू दडलेलें दिसे त्याचें सोविएट अर्थकारणावरचें पुस्तक मीं वाचलेलें होतें व त्यावरून तो फार विचारी व मेहनती माणूस होता असें मला ठाऊक होतेंच नंतरच्या काळात त्याच्या पुस्तकावर रशियातच टीका सुरू झाली. आणि पाठोपाठ व्होजनेसेस्कीची गुप्तपणें वासलात लावण्यात आली याची कारणे आजतागायत गुलदस्तातच आहेत.

## तन आणि मन

'खाण्याला सुरवात होताच–मला वाटतें स्टॅलिननेच सुचविलें की, आता शून्य अशाखाली किती अश तपमान आहे याचा अदाज प्रत्ये-काने सांगावा जितक्या अशानें अदाज चुकेल तितक्या व्होडकाच्या वाटल्या शिक्षा म्हणून अदाज सागणाऱ्याला प्याव्या लागतील. मी कर्मधर्मसयोगाने हॉटेलातून निघतानाच सहज तपमानाकडे दृष्टि टाकलेली असल्यामुळें माझा अदाज फक्त एका अशाने चुकला. सर्वांत जास्त चुकलेला अदाज बेरियाचा होता. त्याला तीन चार व्होडकाच्या बाटल्या प्याव्या लागल्या. पिताना मात्र त्याने जाहीर केले की जास्त व्होडका मिळावी म्हणून मुद्दामच त्यानें चुकीचा अंदाज वाढवून सागितला होता.

' क्रेमलिनमधल्या वातावरणाची ही जी पातळी मी पाहात होतों त्यामुळें मला ओके बोके वाटत होतें. स्टॅलिन आता खूपच म्हातारा दिसू लागला होता. कांहींशी म्हातारचळाची लक्षणें मला दिसत होती.

' स्टॅलिनच्या म्हातारचळांत मला एकप्रकारची कुरूपता आणि शोकातिका जाणवत होती. वरवर पाहता यात दडलेली शोकातिका दिसली नसती. परतु मला मनातल्या मनात ती अस्वस्थ करीत होती. कारण एकेकाळी या माणसाबद्दल माझ्या मनात अपार प्रेम आणि आदर होता. खातांना देखील तो आतां हपापल्यासारखा खात होता. त्याची हुशारी आता उताराला लागलेली स्पष्ट दिसत होती गेल्या दोन तीन वर्षांत तो इतका बदलला होता की या बदलावर चट्कन विश्वास बसेना. १९४५ साली तीन वर्षांपूर्वी मी भेटलो तेव्हा स्टॅलिन तरतरीत, हजरजबाबी आणि विनोदांत डुबणारा होता, आतां मात्र तो काहीतरी चाळे करून हसत होता उथळ विनोद करीत होता

' मात्र एका बाबतीत पूर्वीचाच स्टॅलिन आहे तसा शाबूत होता. त्याची कठोर वृत्ति आणि सशयीपणा आहे तसा होता. मोलोटोव्ह सबधीहि त्याचे मन आता सशयी बनलेले असावे असें त्याच्या बोलण्यावरून वाटे. प्रत्येकजण त्याच्यापुढें हाजी हांजी करीत होता. परतु आपले खरें अतरग त्याच्यापुढें उघडें पडणार नाही अशी काळजी घेत वागत होता. बोलताना स्टॅलिन एका प्रश्नावरून दुसऱ्या प्रश्नावर उड्या मारीत जात होता. अर्थातच माझ्या निवेदनात तोच दोष येणार आहे.

## नाना विषयांची माळ

स्टॅलिन अणुअस्त्राविषयी बोलताना उद्गारला —

" हें फार भयानक अस्त्र आहे. फार भयानक ! " स्टॅलिनचा चेहरा हें बोलत असताना कौतुकानें फुललेला होता. त्यावरून असेंच वाटत होतें, की एकतर हे अस्त्र रशियाने हस्तगत केलेले आहे किंवा ते केल्याखेरीज रशिया स्वस्थ बसणार नाही. त्याने याचा मुळीच सुगावा लागू दिला नाही की सोविएट शास्त्रज्ञ याच अस्त्राच्या सशोधनात त्या वेळी मग्न होते.

' याउलट जेव्हा एक महिन्यानंतर मी व कारडेल्ज मॉस्कोत डिमि-ट्रॉव्हला भेटलों तेव्हा डिमिट्रॉव्हनें आम्हाला अत्यत खाजगी व गुप्त अशा विशेषणानी रशियाला अणुबॉंब सांपडल्याचे सागितले व रशियाने तयार केलेलें अस्त्र अमेरिकेच्या हिरोशिमावर फेंकलेल्या अस्त्रापेक्षा अधिक विध्वसक आहे अशीहि माहिती पुरवली, परंतु आज तारखाची दखल घेतली तर मी हें खात्रीपूर्वक म्हणू शकतो, की ज्या वेळी रशियाला अणुशस्त्र सापडल्याचे डिमिट्रॉव्ह सागत होता त्या वेळी प्रत्यक्षात तें अस्त्र तयार झालेले नव्हते. मात्र रशियन शास्त्रज्ञ त्या वाटेवर होते एवढें निश्चित.

' नतर जर्मन प्रश्नावर बोलताना स्टॅलिनने पुन:पुन: सागितले —

" **जर्मनी सदैव खंडितच राहणार. पश्चिम जर्मनी पाश्चिमा-त्यांच्या अकित राहील व पूर्व जर्मनीला आम्ही रशियाचा भूभागच करून टाकूं.** "

' मला स्वत.ला अनेक दिवसांपासून दोन प्रश्न सतावीत असत आणि त्याची उत्तरे स्टॅलिनकडूनच मिळवावी अशी मला इच्छा होती. त्यातला एक तात्त्विक होता. मार्क्सवादाच्या कुठल्याहि पुस्तकात किंवा इतरत्र कुठेंहि मला –लोक (people) व राष्ट्र (nation) यांतला फरक स्पष्ट केलेला आढळलेला नव्हता. स्टॅलिन हा कम्युनिस्ट वर्तुळात तात्त्विक प्रश्नावर जाणकार समजला जात असे. म्हणून मी माझा हा प्रश्न त्याला विचारला. विचारीत असताना मी हा खुलासा केला की

पहिलें महायुद्ध सुरू होण्यापूर्वी स्टॅलिनने जें राष्ट्रवादावर पुस्तक लिहिलेले माझ्या वाचनांत आले होतें त्यांतहि या प्रश्नाची चर्चा केलेली नाही.

' माझा प्रश्न ऐकतांच मोलोटोव्हने सांगितले, " लोक आणि राष्ट्र हीं वेगवेगळी असू शकत नाहीत. दोन्ही एकच आहेत. " परंतु स्टॅलिन याच्याशी सहमत नव्हता. तो म्हणाला –" छे: नॉनसेन्स ! ही दोन्ही एकच कशी असतील ?" एवढें सांगून स्टॅलिन स्वत: त्या शब्दाची फोड करून सागू लागला —

" राष्ट्र ? राष्ट्र म्हणजे काय हें तुम्हांला ठाऊक आहेच. भांडवलशाहीचाच, कांही वैशिष्ट्यें लागलेला, तो एक आविष्कार असतो (the product of capitalism with certain characteristics). आणि लोक म्हणजे–त्या राष्ट्रातला कामकरी वर्ग. ज्यांची भाषा, संस्कृति आणि चालीरीती एकच असतात ( workers of the same language, culture and custom). "

## डोस्टोइव्हस्की प्रतिगामी

' यानंतर डोस्टोइव्हस्कीचा विषय निघाला. अगदी तरुण वयापासून मला डोस्टोइव्हस्की अनेक दृष्टीनी या युगातील फार थोर लेखक वाटत असल्यामुळें त्याच्यावर मार्क्सवाद्यानी चढवलेले हल्ले मला साफ साफ मंजूर नव्हते. स्टॅलिननें यासंबंधी फारच सोपें स्पष्टीकरण केलें. तो म्हणाला –

" डोस्टोइव्हस्की थोर होता. थोर लेखक आणि थोर प्रतिगामी (Reactionary). आम्ही त्याचें वाङमय प्रसिद्ध करू देत नाही कारण तरुणाच्या मनावर त्याचा विकृत परिणाम होतो. असा माणूस थोर असलाच पाहिजे ! "

' माझ्या हें लक्षात येत होते की स्टॅलिनचें व माझें कसल्याच बाबतीत पटणे आता शक्य नव्हते. आम्ही एकमेकांना समजूच शकत नव्हतो. परतु त्या सहा तासाच्या प्रदीर्घ जेवण-संभाषणांत मला, " जें बोलले गेलें त्यापेक्षा त्या वातावरणांत जें बोलले गेलें नाही " त्याविषयीच अनिष्ट कुतूहल वाटत होते. काहीतरी गळचेपी होत होती. कोंडमारा होत होता. जें बोलले पाहिजे ते झाकले जात होतें.

' जें संभाषण चालू होतें तें लादलेले होते. जे विषय पुढें येत होते ते कुणाच्यातरी इशाऱ्यावर भीत भीत वाट काढीत होते. जें बोलले जात नव्हते त्याचा निनाद माझ्या मनात सारखा उमटत होता. टिटो आणि युगोस्लाव्ह मध्यवर्ती समिति यांच्याविरुद्ध टीकेची अस्त्रें परजली जात होती. झाडनोव्ह जरा मोकळेपणानें वागून वातावरणातला ताण घालवण्याचा प्रयत्न करीत होता. थोडीशी जवळीक निर्माण करू पाहात होता. बोरिया आपले हिरवे डोळे माझ्यावर रोखून बसला होता. त्याच्या जबड्याच्या कडातून काहीतरी अशुभ ओसडत होते. या सगळ्या बगलबच्चावर स्टॅलिन वचक देत होता. थंडपणें– सावधपणे !

' मग स्टॅलिनला दोन वर्षांपूर्वी त्याने टिटोमार्फत मला दिलेल्या निमत्रणाची आठवण झाली. तो मला म्हणाला–

" मागें तुम्ही क्रिमियात येण्याचे कां टाळलें ? माझें निमत्रण का नाकारले ? "

' असा काहीतरी प्रश्न विचारला जाईल अशी माझी अटकळ होतीच. स्टॅलिननें ही आठवण जपून ठेवावी याबद्दल मात्र मला फारसें बरें वाटत नव्हतें. मी खुलासा करू लागलों–

" सोविएट वकिलातीतून मला रीतसर निमत्रण मिळेल म्हणून मी वाट पहात होतों. शक्यतों माझ्यामुळें तुम्हांला त्रास होऊ नये अशीच माझी इच्छा होती–"

" नॉन्सेन्स ! त्रास कसला ! तुम्हाला यायचेंच नव्हतें एवढें खरें ! " स्टॅलिननें आतां परीक्षाच आरंभली.

' मी अधिक काही बोललो नाही. मूग गिळून बसलों.

' स्टॅलिननें जेवण्याच्या अखेरीस-लेनिनच्या स्मृतीला टोस्ट सूचवला. तो म्हणाला–

" आपण लेनिनच्या स्मृतीला अभिवादन करू. लेनिन आमचा नेता, राष्ट्रगुरु–सगळें काही आहे ! "

' आम्ही सर्व गंभीरपणें उभें राहिलों आणि मद्यपानानतरच्या त्या अवस्थेत ते गांभीर्य लगेंचच आमच्या सर्वांच्या मनातून घरगळलें. पण स्टॅलिन मात्र गंभीर आणि विचारी चेहरा ठेवून बसला होता.

' थोड्या वेळाने टेबलापासून आम्ही सर्व उठलों. परंतु जाऊं लागण्यापूर्वी स्टॅलिनने स्वनियंत्रित फोनोवर एक वाद्याची रेकॉर्ड लावली. त्याची पावलें नृत्याच्या तालात हलू लागली. तालाचें त्याला थोडेंफार ज्ञान होतें हें लक्षात येत होते. मग एकाएकी तो स्तब्ध झाला, विषादानें उद्गारला–

" आता हे जमत नाहीं. माझें वय झालें. मी म्हातारा झालों–! "

' परतु त्याचे सहकारी–सहकारी कसले दरबारी हुजरे– त्याला धीर देऊ लागले. म्हणू लागले–

–" छे : छे : हें काय बोलणें ? तुमचे वय झालें हें सागून देखील कुणाला खरें वाटणार नाही. वयाच्या मानाने तुम्ही इतके तरुण आणि तरतरीत वाटता– ! "

' हळूहळू सर्वजण जाण्यास निघाले. उशीर इतका झाला होता की आता बोलण्यासारखें काही शिल्लक नव्हतें. जेवताना नाना चर्चा झाल्या. परंतु मुळात हे जेवण कशाकरितां योजण्यात आले. होते. याविषयी मात्र कुणी चकार शब्दहि काढला नाही–'

## अखेर माशी शिंकलीच

या जेवणानतर एक दोन दिवस गेले. मग जिलासला आपल्या मागण्या घेऊन येण्यासबंधी बुल्गानिनचे निमंत्रण आले. बुल्गानिनच्या आजूबाजूस वरिष्ठ सैन्याधिकारी होते. जिलासने ढोबळपणे आपल्या सरकारच्या तातडीच्या गरजा सांगितल्या. तपशील नंतर वकिलातींतून पाठवावा असें ठरलें. एकदाची गाडी रुळावर आली. काहीतरी काम सुरू झालें म्हणून जिलासला आनद झाला.

यानतर लगेच युगोस्लाव्ह वकील पोपोविक यांना निमत्रण मिळाले. आणि कुठेतरी माशी शिंकली ! पुन: सर्व जैसे थे झाले ! सोविएट अधिकाऱ्यानी सागितले की वाटाघाटीत कांही विकल्प आले आहेत. आणि पुढें काही करण्यापूर्वी थोडा काळ थांबणें आवश्यक आहे.

एक गोष्ट जिलासला स्पष्ट दिसत होती की तो मास्कोत असतांना — मॉस्को व बेलग्रेड यामध्यें कसले तरी महत्त्वाचे सदेश जात येत होते.

आता माशा मारीत बसण्यापेक्षां लेनिनग्राड शहर पाहावें असे जिलासला वाटले व त्यानें आपली इच्छा झाडनोव्हच्या कानी

घातली. झाडनोव्हनें लगेच लेनिनग्राड भेटीची तयारी केली. जिलासनें लेनिनग्राडसंबंधी लिहिले आहे —

' लेनिनग्राडला पोचेपर्यंत मला असें वाटत होते की जर्मनांविरुद्ध युगोस्लाव्हियांतील आमच्या देशभक्त सैन्यानें जेवढा पराक्रम केला त्याला कुठेंच तोड नसली पाहिजे. परंतु लेनिनग्राडला मी जें प्रत्यक्ष पाहिलें व ऐकले त्यावरून लेनिनग्राडला रशियनानी केलेला सामुदायिक पराक्रमी लढा हा शौर्याचा उच्चांक ठरावा. लाखों वस्तीचें हें शहर पिछाडीकडून तोडले गेले होते. जळण नाही, अन्न नाही, सतत तोफांच्या गोळ्यांचा वर्षाव आणि बॉम्बहल्ले ! १९४१–४२ च्या थंडीत ३००,००० रशियन प्रजा भुकेने व थंडीनें कुडकुडत या शहरात मृत्युमुखी पडली. माणसानी माणसाचें मास खाण्याचेच फक्त शिल्लक राहिले होतें. परतु शरणागतीचा विचार एकाच्याहि मनांत क्षणभर ठरत नव्हता. लेनिनग्राडची ही लढाई म्हणजे, आपल्या संस्कृतीवर आणि राजकीय अस्तित्वावर घाला पडला असतां रशियन लोक किती प्रखरपणे त्या शत्रूविरुद्ध उभे ठाकतात याची रोमहर्षक चित्तथरारक कहाणीच आहे. ही माणसें साधींसुधीच होती. शिकलेली कामकरी माणसे. परतु या शहरावरचें संकट त्यांनी खांद्यावर पेलले त्याच्याशी बोलतांना माझ्या हें लक्षांत आले की ही माणसें जीवनाकडे साध्यासुध्या माणुसकीनें पाहतात. ही दृष्टि त्याना प्रसगी वाघाचे शौर्य देते. ही दृष्टि मॉस्को-म्होरक्यांत मात्र अभावानेच वास करीत होती. '

## दुसऱ्या भेटीपूर्वी

वरील भेटीनंतर बरेच दिवस वाझोटेच गेले. जिलासबरोबर आलेले सहकारी परतण्याची भाषा बोलू लागले. जिलासहि त्याच दृष्टीनें विचार करूं लागला. इतक्यात बेलग्रेडहून कार्डलेज् व बकारिक् हे दोघे मॉस्कोला निघाल्याचा सदेश आला. या दोघासह जिलासने वाटाघाटीत निर्माण झालेले आकस्मिक अडथळे दूर करावे अशी अपेक्षा होती.

८–२–१९४८ ला कार्डलेज् व बकारिक् येऊन पोंहोंचले. वस्तुत: मॉस्कोनें टिटोलाच बोलावले होते. परतु टिटोची प्रकृति ठीक नाही अशी सबब तयार करून कार्डलेज् व बकारिक् यानाच त्याच्याऐवजी धाडण्यात आले. याचबरोबर बल्गेरियन मध्यवर्ती समितीचे प्रतिनिधीहि निमत्रिण्यात आले होते.

जिलास सागतो —

' कार्डलेज् व बकारिक् यांना मॉस्कोजवळच एक व्हिला देण्यांत आला होता. यामुळें मी जाऊन त्यांनाच मिळालों. त्या रात्री मी कार्डलेज्ला याची कल्पना दिली की सोविएट मदतीवर अवलबून राहण्यात अर्थ नाही. अखेर आम्हाला आमच्याच पायांवर उभें राहणे भाग आहे. सोविएट सरकार युगोस्लाव्हियाची गणना पूर्व युरोपमध्यें रशियाच्या वर्चस्वाखाली गेलेल्या इतर राष्ट्रामध्येंच करीत आहे, युगोस्लाव्हियावर स्वामित्वासाठी रशियाची सगळी धडपड आहे. '

दुसऱ्या दिवशी म्हणजे १० फेब्रुवारीला सायंकाळी जिलास कार्डलेज्, बकारिक् आदि युगोस्लाव्ह प्रतिनिधीना क्रेमलिनमध्यें स्टॅलिनच्या कचेरीत नेण्यात आलें. तिथें पधरा मिनिटातच डिमिट्रॉव्ह, कोलारोव्ह आदि बल्गेरियन प्रतिनिधि येऊन थडकले.

या सर्वांना स्टॅलिनसमोर नेण्यात आले. प्रथम मोलोटोव्हने बोलण्यास प्रारंभ केला. तो म्हणाला की — रशियन सरकार व युगोस्लाव्ह-बल्गेरिया याचीं सरकारें यांमध्यें असें कांही मतभेद निर्माण झाले आहेत कीं जे कम्युनिस्ट पार्टीला व एकंदर राजकारणाला घातुक ठरणारे आहेत.

## अशी ही मॉस्को-नीति

असे हे मतभेद तरी काय होते ? रशियाच्या पूर्व अनुमतीशिवाय युगोस्लाव्ह व बल्गेरिया यांनी एक दोस्तीचा करार केला. सोविएट सरकारची या गोष्टीला पूर्व समति नव्हती तर खास विरोध होता. जोंपर्यंत बल्गेरिया शाततांकरार करीत नाही तोपर्यंत युगोस्लाव्हियाने त्यांच्याशी दोस्तीचा करार करणे हें मॉस्को-नीतीत बसत नव्हते. डिमिट्रॉव्हने बुखारेस्टमध्यें पत्रकाराशी बोलताना असें सांगितले होते की पूर्व युरोपातील राष्ट्रांचें एक फेडरेशन होणे शक्य आहे व ग्रीसचाहि अशा फेडरेशनमध्यें समावेश करता येईल. रुमानिया आणि बल्गेरिया याचे आर्थिक नियोजन सयुक्तरीत्या आंखण्यासहि हरकत नाही. डिमिट्रॉव्हच्या या वक्तव्यावर स्टॅलिनने जो हल्ला चढवला त्याचें वर्णन जिलास करतो—स्टॅलिन म्हणाला—

" कॉमरेड डिमिट्रॉव्ह हा पत्रकाराशी बोलतांना काहीतरी बकत सुटतो. आपण काय बोलत आहों याचेहि भान तो ठेवीत नाही. तो किंवा टिटो जी मुक्ताफळें उधळतात ती सर्व आमच्या समतीनेच असा निष्कारण गैरसमज पसरतो. डिमिट्रॉव्हच्या म्हणण्याला आमचा विरोध जाहीर होताच त्याने आमच्या वक्तव्याला पुस्ती जोडली. परतु अशा मलमपट्टयाचा काहीच उपयोग नसतो "

मोलोटोव्हने विचारले की रुमानिया व बल्गेरिया याचेमधील जकात रद्द करावी व दोघाचे आर्थिक नियोजन संयुक्तपणे आखावे या गोष्टी ठरवण्यापूर्वी रशियाचा सल्ला घेतला होता काय ?

डिमिट्रॉव्हने हे विशद करण्याचा प्रयत्न केला की त्याने फक्त ढोबळपणे सूचना माडलेल्या होत्या. त्यावर स्टॅलिन व मोलोटोव्ह पुन: कोसळले. स्टॅलिन कडाडला—

" ही सारवासारव आहे ! दोघाच्या सरहद्दीवरील जकात रद्द करण्याचे तुम्ही ठरवलेत. आर्थिक नियोजन एकत्र करण्याची भाषा काढलीत ! "—

मोलोटोव्हने री ओढली.—

" याचा अर्थ दोन्ही देशाचे एकीकरण करून एक नवीन राज्य निर्माण करण्याचेच हे पवित्रे आहेत—"

डिमिट्रॉव्ह पुन:पुन: खुलासा करण्याचा प्रयत्न करू लागला. परतु स्टॅलिन् त्याला पुरतें बोलूच देईना. खरा स्टॅलिन,— हुकूमशहा, लाल स्टॅलिन आतां प्रगट झाला होता. त्याच्या तोंडावरचा विनोदी भाषणाचा बुरखा आतां दूर झाला होता. उदासीनता सपली होती. आणि सहनशीलता आता शिल्लक नव्हती. त्याने बल्गेरियावर अमाप तोंडसुख घेतले.

## लाईन बदलतां म्हणजे काय ?

डिमिट्रॉव्ह व कार्डलेज् यानी पुन: पुन: सांगितले की रुमानिया व बल्गेरिया यानी कसलाहि करारनामा केलेला नाही. शिक्कामोर्तब झालेला नाही. फक्त करार कुठल्या तत्त्वावर व्हावा या तत्त्वांचा उच्चार झालेला आहे.

" पण याबद्दल आमचा सल्ला घेतला होता काय ? " स्टॅलिन कडाडला, " तुमचे उद्योग आम्हाला वृत्तपत्रातून कळायचे. तुम्ही

घराच्या छपरांवरून बायकांसारख्या नको त्या गोष्टींचा कलकलाट करा आणि वृत्तपत्रांनीं त्याचा जाहीर गाजावाजा करावा–"

यावर डिमिट्रॉव्हनें सांगितलें कीं बल्गेरियाची आर्थिक आघाडी ढांसळलेली आहे. इतर राष्ट्रांच्या मदतीखेरीज बल्गेरियाची धडगत नाहीं. परंतु तो पुढें म्हणाला, " मात्र मी पत्रकारांशीं बोलण्यांत घसरलों हें मी मान्य करतों–"

स्टॅलिननें त्याला अडवीत विचारलें–

" तुम्हांला जगांत स्वतःची अक्कल मिरवण्याची हौस ना ! अशा तऱ्हेचें एकीकरण शक्य नाहीं. बल्गेरिया व रुमानियाचे असे काय मोठे ऐतिहासिक संबंध आहेत ? शून्य– "

यावर डिमिट्रॉव्ह माघार घेऊन म्हणाला–

" खरं आहे. आमची चूक झाली. परंतु चुका करीत करीतच आम्ही परराष्ट्रीय राजकारणांत हळू हळू कांहीं शिकू..."

टॅलिन कठोर आवाजांत तुच्छतेनें म्हणाला, " शिकूं ! आज पन्नास वर्षे तुम्ही राजकारणांत वाढलां आहांत. अजून चुका सुधारणेंच सुरूं आहे ? या चुका नाहींत. मॉस्कोपेक्षां निराळ्या दिशेनें वारे वाहात आहेत हें काय आम्हांला समजत नाहीं ! ( You are taking a line ditterent from ours ) "

जिलास लिहितो –

' मीं डोळ्यांच्या कोपऱ्यांतून डिमिट्रॉव्हकडे दृष्टिक्षेप टाकला. त्याच्या कानांच्या पाळ्या लाल झाल्या होत्या. लिपझिग न्यायालयांत गोअरिंग-गोबेल्सच्या पाशवी सरकारपुढेंहि न नमलेला हा पुरुष स्टॅलिनपुढें मात्र हताश आणि गर्भगळित झालेला होता.

' या बैठकीचा खरा उद्देश आतां माझ्या ध्यानांत येऊं लागला. जर एखादा करारमदार सोविएट सरकारच्या हिताचा नसेल तर तसा तो करणें दोन लोकशाही लोकराज्यांनाहि (People's democracies) शक्य नव्हतें. वरवर जरी सर्व टोंचणारीं बोलणीं बल्गेरिया-रुमानिया यांना उद्देशून होतीं तरी लेकी बोले सुने लागे या न्यायानें ती आम्हांलाहि लागू होतीं.

**' बल्गेरिया - रुमानिया किंवा युगोस्लाव्हिया - अल्बानिया अशीं फेडरेशन्स होण्यापेक्षां स्टॅलिनला युगोस्लाव्हिया, बल्गेरिया व अल्बानिया यांचेंच एकीकरण** हवें होतें. थोडक्यांत ज्या योगानें मॉस्कोचा पूर्व युरोपांतील **राज्यांवर वरचष्मा राहील अशीं सोयीस्कर राज्यें आंखण्याचा मास्को-म्होरक्यांचा इरादा होता. '**

यानंतर कार्डेलेजला बोलण्यास सांगण्यांत आलें, त्यानें सांगितलें कीं युगोस्लाव्हिया व बल्गेरिया यांच्यांत जो करार ब्लेड येथें करण्यांत आला त्याची प्रत सह्या होण्यापूर्वी सोविएट सरकारला पाठविण्यांत आली होती. परंतु त्याची कालमर्यादा वीस वर्षेच ठेवावी एवढ्या एका सूचनेखेरीज कसलीच टीका त्यावर करण्यांत आली नाहीं. कार्डेलेज् बोलत असतांना स्टॅलिन रागानें मोलोटोव्हकडे पाहात होता. मोलोटोव्हनें मान हलवून–कार्डेलेज् म्हणतो तें खरें आहे हें कबूल केलें. कार्डेलेज् पुढें म्हणाला, " जी एकच सूचना सोविएट सरकारनें केली ती आम्हीं स्वीकारली व कराराला वीस वर्षांचें बंधन घातलें. कांहीं मतभेद असे नाहींतच–! "

## लाईन आमची–सल्ला आमचाच हवा !

यावर स्टॅलिन चिडल्यासारखा म्हणाला–" नॉन्सेन्स ! मतभेद




**मोठा मासा – छोटे मासे**

आहेत. गंभीर मतभेद आहेत. अल्बानियाबाबत तुमचें काय म्हणणें आहे ? तुमचें सैन्य अल्बानियांत पाठविण्यापूर्वी तुम्हीं आमचा विचार घेतलेला नाहीं. "

कार्डेलेज्नें सांगितलें कीं सैन्य पाठविण्यापूर्वी अल्बानियाच्या सरकारची संमति घेतलेली होती. यावर स्टॅलिन ओरडून म्हणाला,

" यामुळें गंभीर आंतरराष्ट्रीय कटकटी निर्माण होऊं शकल्या असत्या. अल्बानिया हें एक स्वतंत्र राज्य आहे ! तुम्ही आमचा विचार घेत नाहीं कारण तुम्हांला निराळें धोरण आंखावयाचें आहे–"

कार्डेलेज् गप्प झाला.

मोलोटोव्हनें रुमानियाचा विषय काढला. तो म्हणाला– " बल्गेरिया-रुमानियामधील जकाती रद्द होणें म्हणजे दोन्ही देशांच्या एकीकरणाची नांदी होय ! "

यावर कार्डेलेज् म्हणाला–

" प्रत्यक्षांत अनुभव वेगळा आहे. उदाहरणार्थ बेनेलक्स. (Benelux–बेल्जियम, हॉलंड आणि लक्झेंबर्ग यांचें एकीकरण) यांत बेल्जियम, हॉलंड व लक्झेंबर्ग यांचें स्वतंत्र अस्तित्व शिल्लक आहेच. "

यावर स्टॅलिन म्हणाला–

" यांत हॉलंड समाविष्ट नाहीं–"

" नाहीं कसा ? हॉलंड हा बेनेलक्सचा सभासद आहे. " कार्डेलेज्नें पुनः सांगितलें.

" नाहीं. हॉलंड समाविष्ट नाहीं–" स्टॅलिन मोलोटोव्ह व झोरिनकडे पाहात पुनः त्वेषानें म्हणाला.

वस्तुतः कार्डेलेज्चें म्हणणें खरें होतें. Be-ne-lux या शब्दांतील ne म्हणजे नेदरलंड. नेदरलंड म्हणजेच हॉलंड ! परंतु मोलोटोव्ह व झोरिन कांहीं बोलेनात. हें अज्ञान असलें तरी लहरी हुकुमशहाचें

होते ! त्याविरुद्ध कोण बोलणार ? शेवटी सोयीखातर कार्डलेज् गप्प बसला. आणि हॉलंड देश बेनेलक्सबाहेर आहे असें गृहीत धरण्यांत आले !

हा विषय सपण्यापूर्वी अखेर स्टॅलिनशहानें सांगितलें–

" प्रथम बल्गेरिया व युगोस्लाव्हिया यानी एकीकरण करावें व नंतर अल्बानियाला त्यात जोडून घेण्यात यावें. "

झाले. हा विषय सपला.

स्टॅलिनने ग्रीसचा विषय सुरू केला.

" ग्रीसमधला या वेळचा उठाव थांबला पाहिजे ! " मग कार्डलेज्‌ला त्याने विचारलें –

" तुम्हाला काय वाटते ? ग्रीसमध्यें बंडखोराना यश येईल ? "

कार्डलेज् उत्तरला –

" जर बाहेरच्या देशानी हस्तक्षेप केला नाही आणि जर बंडखोरानी राजकीय वा लष्करी चुका केल्या नाहीत तर... "

स्टॅलिनने कार्डलेज्‌च्या बोलण्याकडे दुर्लक्ष करीत म्हटलें –

" जर आणि तर ! नाही, या वेळी त्याना यशाची सुतराम् शक्यता नाही. आपल्याजवळ आरमार नाही. शिवाय अमेरिका भूमध्य समुद्रांतील आपली नाडी कशी तुटूं देईल ? ग्रीसमधील उठाव बंद केला पाहिजे. जितक्या लवकर हे होईल तितके हवें आहे. "

## चिनी पिंड जरा निराळा !

कुणीतरी तेवढ्यात चिनी कम्युनिस्टानी अशाच उठावात मिळवलेल्या यशाचा उल्लेख केला. यावरहि स्टॅलिन आपले म्हणणें न सोडता म्हणाला –

**" चिन्यांची गोष्ट निराळी आणि ग्रीसमधील परिस्थिति निराळी. ग्रीसमध्यें अमेरिकेचा प्रत्यक्ष संबंध पोचतो. तसें अतिपूर्वेकडील देशांबाबत नाहीं. शक्य आहे कीं, आपणहि एखादे वेळेस चूक ठरूं. चीनचेंच पहा ना ! जपानबरोबरचें युद्ध संपतांच आपण चिनी कॉमरेडना येथें चँग-कै-शेकबरोबर समझोता करण्यास सांगितलें. वरवर त्यांनीं ही गोष्ट मान्य केली. परंतु प्रत्यक्षांत देशांत परतल्यावर त्यांनीं करायचें तेंच केलें. त्यांनीं चँग कै शेकला बाजूला सारून हिंमतीवर उठाव केला. पुढें जें घडलें त्यावरून चिनी कॉमरेडनीं केलें तेंच बरोबर केलें असें ठरलें. परंतु ग्रीसबाबत असें कांहीं घडेल अशी शक्यता नाहीं. ग्रीसमधला उठाव बंद केला पाहिजे. "**

स्टॅलिनच्या या मतावर भाष्य करताना जिलास लिहितो–

**' स्टॅलिननें ग्रीसमधल्या उठावाला कां विरोध करावा हें मला आजतागायत कळलेलें नाहीं. कदाचित् ग्रीसमधील क्रांति यशस्वी झाली तर बाल्कन देशांत आणखी एक कम्युनिस्ट क्रांतीचें केन्द्र निर्माण होईल अशी भीति स्टॅलिनला असावी. कारण कुठल्याहि क्रांतीचें केंद्र रशियाबाहेर राहणें हें या हुकूमशाहीला मान्य नव्हतें.**

**' चिनी कम्युनिस्टांचें जें कौतुक स्टॅलिननें केलें तो त्याच्या परराष्ट्र नीतींतला एक पवित्रा असावा. नवीनच उदयाला येणाऱ्या चिनी कम्युनिस्ट राजवटीपासून स्वतःच्या रशियन साम्राज्याला शह बसण्याची भीति आहे, ही गोष्ट स्टॅलिनच्या लक्षांत आली असली पाहिजे. कारण चिनी कॉमरेडसमध्यें फाटाफूट पाडणें स्टॅलिनला अजून साधलेलें नव्हतें. कम्युनिस्ट चवळवळीचें केंद्र पेकिंगला निर्माण होणार अशी त्याची अटकळ होतीच. कारण जेव्हां साम्यवादी क्रांति एखाद्या देशांत यशस्वी होते तेव्हां तेथेंच चळवळीचें नवें केंद्र निर्माण होतें. आणि आसपासच्या देशांना तें प्रेरणा देऊं लागतें. ही गोष्ट स्टॅलिनला अनुभवानें माहीत होती. "**

(चिनी कम्युनिस्टासंबंधीं जी भीति स्टॅलिनच्या पोटात होती ती आज सार्थ ठरली आहे. )

ही बैठक जवळजवळ दोन तास चालू राहिल्यानतर सपली. परंतु या वेळी बैठकीनतर जिलासला वा कार्डलेज्‌ला स्टॅलिनबरोबर खाण्याचें निमंत्रण मिळाले नाही.

परततांना मोटारीत जिलासनें कार्डलेज्‌जवळ झाल्या प्रकाराबद्दल तीव्र नापसंती व्यक्त केली. जिलासला हें सर्व असह्य होत होतें. उलट कार्डलेज्‌चें मन हताश झाले तरी अजून बंड करण्यास राजी नव्हतें. दुसऱ्या दिवशी स्टॅलिनशहाच्या इच्छेनुसार जिलास कार्डलेज् यानी डिमिट्रॉव्हबरोबर खाना घेतला व फेड्रेशनची बोलणी सुरूं केली. युगोस्लाव्ह आणि बल्गेरियाचें फेडरेशन ! केवल सोविएट सरकारच्या इच्छेखातर !!

## शेवटीं मामला बिघडलाच

परतु अखेर काहीच निष्पन्न नाले आही. कारण स्टॅलिन व मोलोटोव्ह यानी महिनाभरात युगोस्लाव्हियाच्या नेतृत्वावर बोलण्यातून हल्ले सुरू झाले. या नेतृत्वात काहीजण फेडरशनला विरोध करीत आहेत. – ते प्रतिगामी आहेत असा सूर होता. म्हणजे युगोस्लाव्हियाच्या नेतृत्वात दुफळी माजवून, युगोस्लाव्हियावर आपली पकड घट्ट करावी म्हणून स्टॅलिन-मोलोटोव्हने टाकलेला हा फेडरेशनचा एक फासच होता. यात मान अडकवण्याची युगोस्लाव्हियाची इच्छा नव्हती. **युगोस्लाव्ह नेतृत्वानें एकमुखानें फेडरेशनविरुद्ध खंबीर भूमिका घेतली आणि जून १९४८ पर्यंत सोविएट सरकार व युगोस्लाव्हियन सरकार यांच्यातील मतभेद विकोपाला जाऊन चव्हाट्यावर आले.**

जिलास,, कार्डलेज् आदि युगस्लाव्ह भाईंना सोविएट सरकारनें निरोप दिला. त्याना कसल्याहि सन्मानाशिवाय सामान्य उतारूप्रमाणे विमानातून घरी पाठविण्यात आलें.

परतण्यासाठी विमानात पाय ठेवताना जिलासने आपल्या मनाची स्थिति सागितली आहे तो म्हणतो—

' चार वर्षांपूर्वी केवढ्या उत्साहानें आणि उत्सुकतेनें मॉस्कोला आलों होतो. एखाद्या भक्तानें गुरुकडे धांवावें अशी आर्तता माझ्या ठिकाणी स्टॅलिनबद्दल होती. सपले – एक स्वप्न सपलें— ! वास्तवतेच्या ओझ्याखाली त्या स्वप्नाचा चुराडा झाला. याच स्वप्नाच्या राखेंतून नवीन स्वप्न जन्माला येणार नाही ना— ? '

## स्टॅलिनशहाचीं कृष्णकृत्यें

जिलासची हीच स्टॅलिनशीं अखेरची भेट. यानतर स्टॅलिनच्या मृत्यूनंतर घडलेल्या घटना वाचकाना ज्ञात आहेतच. स्टॅलिनच्या कृष्णकृत्यांचा पाढा क्रुश्चेव्हनें वाचला आणि त्याच्या क्रूर कृत्यांच्या बातमीनें वृत्तपत्राचे रकाने भरभरून वाहूं लागले. जिलासनें स्टॅलिनबरोबर झालेल्या संभाषणाचे पुस्तक परदेशात प्रसिद्ध केलें म्हणून आज तो मा. टिटोच्या तुरुगात खितपत आहे मा. टिटोचा तो एके काळचा सहकारी परतु आता मा. टिटोचे व क्रुश्चेव्हचे संबध सुधारलेले आहेत जिलास हा मा. टिटोचा सहकारी असला, त्यानें फक्त सत्यच सागितले असले तरी आतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीला त्यामुळें

मोठे तडे गेले आहेत व याची शिक्षा आज तो भोगीत आहे. पुस्तकाच्या उपोद्घातात सांगितल्याप्रमाणें जिलासने पुस्तकाच्या अखेरीस स्टॅलिनसंबधी आपले विचार मांडले आहेत. ते महत्वाचे आहेत. जिलास लिहितो—

'स्टॅलिनची रक्तलांछित दुष्कृत्यें अनेक लोकानी वर्णन करून ठेवलेली आहेत. त्यात ट्रॉट्स्कीचाहि समावेश आहे. याच्या सत्यासत्यतेचा निर्वाळा देतां येणे मला कठिण आहे. कारण मला देखील प्रत्यक्ष सत्य माहीत नाही. मॉस्कोमध्यें नुकतेच असें सांगण्यांत आलें की लेनिनग्राड कम्युनिस्ट पार्टीचा चिटणीस किरॉव याचा स्टॅलिननेच खून केला असावा कारण त्याच्यामुळें पार्टीत अंतर्गत हेवेदावे वाढले असा त्याचा दावा होता. मॅक्झिम गॉर्कीच्या मृत्यूत स्टॅलिनचाच हात असावा. ट्रॉट्स्कीच्या म्हणण्याप्रमाणें लेनिनलाहि त्याचे हाल वाचावे या नावाखाली स्टॅलिननेंच ठार मारले. स्वतःच्या बायकोचाहि त्यानेंच विषप्रयोग करून खून केला असावा किंवा त्याच्या छळाला कंटाळून तिनें आत्महत्या केली असावी. स्टॅलिनच्या हस्तकानी मात्र अशी रोमहर्षक बातमी पसरवली की स्टॅलिनच्या अन्नात कुणीतरी विष कालवलेले होते, व नेहमीप्रमाणे स्टॅलिननें जेवण घेण्यापूर्वी त्याच्या बायकोनें त्या अन्नाची परीक्षा घेऊन पाहिली. स्टॅलिन वाचला पण बायको मात्र यमसदनाला गेली.

'स्टॅलिनच्या बाबतीत कुठलाच गुन्हा अशक्य कोटीतला नव्हता. कुठल्याहि फूटपट्टीनें मोजमाप केलें तरी इतिहासातील सर्वांत मोठा अत्याचारी माणूस म्हणून स्टॅलिनचें नाव कायमचे झळकत राहील यात शका नाही.

### सैतानाचे सहप्रवासी

'मला कुतूहल वाटते ते एकाच गोष्टीचें. एवढया काळ्या अंतःकरणाच्या, कपटी आणि निर्दय माणसाने एक दोन वर्षे नव्हे तर अखड तीस वर्षे रशियासारख्या मोठ्या आणि बलाढ्य देशाचें नेतृत्व कसे हाती राखले ? स्टॅलिनचे जे आजचे टीकाकार आणि वारसदार आहेत त्यानी याचें स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे, आणि जों पर्यंत हें स्पष्टीकरण होत नाही **तोंपर्यंत असेच मानणें आवश्यक आहे, कीं मुख्यत्वेकरून ज्या नीच मार्गानें स्टॅलिननें राज्य केलें त्याच मार्गानें सध्यांचे त्याचे वारसहि जात आहेत. त्या सैतानाचेच विचार, मूलतत्वें कल्पना, आडाखे आणि कार्यपद्धति सध्यांचे राज्यकर्ते अवलंबीत आहेत. कारण केवळ स्टॅलिन सैतानी हुकूमशहा होता असें म्हणून भागणार नाहीं. तो ज्या राजकीय पक्षाचा नेता होता त्या पक्षांतल्या मुख्य प्रवाहाला अशाच नेतृत्वाची भूक असली पाहिजे. ठरलेल्या गोष्टी निष्ठुरपणे अमलांत आणणारे, आणि व्यवहारांत माथेफिरूप्रमाणें वागणारे हें नेतृत्व होतें. पक्षानें निष्ठेनें या नेतृत्वाचा पाठपुरावा केला आणि स्टॅलिननें विजयामागून विजय पक्षाच्या पदरांत टाकले. मग सत्तेची नशाच त्याच्या डोळ्यांवर चढली आणि त्या नशेंत त्यानें पक्षाविरुद्धच पापकर्मे करण्यास सुरवात केली. आज रशियांतील कम्युनिस्ट पक्ष फक्त स्टॅलिनच्या या दुसऱ्या अवस्थेतील कृत्यांविरुद्धच आवाज उठवीत आहे. परंतु जीं कृष्णकृत्यें व पापें त्यानें तथाकथित समाजहितशत्रूंविरुद्ध केलीं त्याचें काय ? कामकरी वर्गांतील आणि सुशिक्षित समाजांतील असंख्य टीकाकारांचा त्यानें बळी घेतला. या मूलभूत अत्याचारी वृत्तीबद्दल आणि मार्गाबद्दल जोंपर्यंत कम्युनिस्ट पक्षाला सुखःदुख वाटत नाहीं तोंपर्यंत स्टॅलिनशाहीच्या छायेखालून पक्ष मुक्त झाला आहे असें म्हणतां येणार नाहीं. म्हणूनच मोलोटोव्ह आदि पक्षविरोधी कृत्यें करणाऱ्यांचा आज कांटा काढण्यांत आलेला असला तरी त्यांत अत्यानंद व्हावा अशी परिस्थिति नाहीं. हा फार उथळपणा ठरेल. कारण पक्षांतर्गत अमुक गटापेक्षां दुसरा गट अधिक बरा किंवा वाईट ठरणें याला महत्त्व नसून विचारस्वातंत्र्य शाबूत रहाणार कीं नाहीं हा खरा प्रश्न आहे. हें स्वातंत्र्य नाकारून एकमुखी-एकविचारी राज्यच सध्यांच्या मॉस्को-म्होरक्यांना अभिप्रेत असेल तर स्टॅलिनची कृष्णछाया रशियावर वावरत राहाणार आहे. जरी आज स्टॅलिन या नांवाची भरपूर बदनामी झाली असली तरी आजहि सोविएट समाजाच्या सामाजिक अंतरंगांत आणि विचारसरणींत स्टॅलिनवादाचेंच भूत जिवंत आहे.**

'लेनिनचा जयघोष भाषणातून आणि घोषणातूनकितीहि केला तरी त्यामुळें वस्तुस्थिति बदलू शकत नाही स्टॅलिनचे एखादें नवीन पापकर्म शोधून काढून सागणें सोपें आहे. परंतु याच माणसाने आजच्या सोविएट समाजाच्या विचारसरणीचा पाया घालून आजचे सोविएट साम्राज्य निर्माण केलेलें आहे ही बाब लपविणे कर्मकठिण आहे. **स्टॅलिननें निर्माण केलेल्या समाजवादाचा आणि साम्राज्याचा अभिमान बाळगावयाचा आणि पुन: त्याच्या दुष्कृत्यांबद्दल तिरस्कार व्यक्त करायचा हा ढोंगीपणा आहे. आजहि हा समाज स्टॅलिनवादाच्याच चौकटींत रुतलेला आहे. त्याच्याच पापकर्तृत्वाच्या आडोशाला भुका आहे. मूलतः बदल कुठेंच दृग्गोचर नाहीं.**

'माणुसकी या गुणाचे मूल्यमापन करताना ज्या दृष्टिकोनातून ती तपासली जाते त्या दृष्टिकोनावर सारें अवलबून राहातें. स्टॅलिनच्या बाबतीत तीच गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे.

'जर मानवी स्वातंत्र्य आणि मानवता या दृष्टिकोनांतून विचार केला तर स्टॅलिनइतका माथेफिरू आणि क्रूर सुलतान इतिहासात यापूर्वी झालेला नाही असे म्हणावे लागेल. **तो असा एक हुकूमशहा होता कीं उरलेल्या १।१० मानववंशाला सुखासमाधानानें जगतां यावे याकरतां ९।१० मानव वंश खलास करायला त्याला दिक्कत वाटली नसती. त्याच्या प्रत्येक दुष्कृत्याला विवक्षित दिशा निश्चित होती.**

'म्हणूनच कम्युनिस्ट चळवळीच्या इतिहासात स्टॅलिनचे कर्तृत्व काय असा प्रश्न कुणी विचारला तर त्याचे उत्तर असेच द्यावें लागेल की लेनिननतर कम्युनिस्ट चळवळीत स्टॅलिनचेच स्थान मान्य केले पाहिजे. त्याने कम्युनिस्ट विचारात कसलीहि प्रगति केली नसेल परंतु कम्युनिस्ट विचारसरणीचे त्याने नेतृत्व केले आणि समाजात आणि देशात ते प्रत्यक्ष राबवूनहि दाखवले त्याने आदर्श समाज निर्माण करण्यात यश मिळवले नाही—कारण मानवी स्वभावाचा विचार करता असा समाज निर्मिणे ही सोपी गोष्टहि नाही—**परंतु त्यानें रशियाला मोठें कारखानदारी राष्ट्र करून टाकून त्याचें साम्राज्यांत रूपांतर केलें. ही गोष्ट मान्य केली पाहिजे. जगावर राज्य करण्याची आकांक्षा आपल्या देशाला शक्य कोटींतील वाटावी एवढी परिस्थिति त्यानें निर्माण केली.**

'प्रत्यक्ष यशाचा आणि राजकीय मुत्सद्देगिरीचाच फक्त निकष लावला तर स्टॅलिनच्या आसपास त्याच्या कालखंडातील कुणीहि व्यक्ति पोचू शकणार नाही.'

'तसं म्हटलं तर स्टॅलिन हा एक राक्षसी हुकूमशहाच होता. यश एवढाच निकष तो मानीत असे आणि अर्थातच यश एवढाच निकष ठेवला की अनुषंगाने सर्व प्रकारची साधन-अशुचिता त्याने गृहीतकर्तव्य म्हणून अंगिकारलेली होती.

' मी अर्थातच असे मानीत नाही की यश हा एकच निकष राजकारणांत मानण्यात यावा साधनाची शुचिता राजकारणात अवश्य पाळली गेली पाहिजे सामान्य नीतितत्त्वे राजकारणांत पायदळी तुडवली गेलींच पाहिजेत असा काही दंड नाही. **मी त्याच राजकीय पुढाऱ्यांना आणि मुत्सद्यांना थोर समजतों कीं जे मूलभूत नीतिमूल्यांची योग्य ती कदर ठेवूनहि आपल्या ध्येयाकडे निश्चित वाटचाल करूं शकतात.** '

' हे सर्व सांगितल्यानंतर स्टॅलिनवर अकारण अन्याय करण्याचीहि माझी इच्छा नाही ज्या प्रकारचा समाज निर्माण करण्यासाठी स्टॅलिन धडपडत होता आणि ज्या प्रकारचा समाज निर्माण करण्यांत त्यानें थोडेफार यश मिळविले ते इतर कुठल्याहि सौम्य मार्गांनी लाभले नसते. ज्या समाजातील घटकांच्या विचारयंत्रणेची सर्व दारे बंद करण्यात आलेली आहेत अशा बंदिस्त समाजाचा स्टॅलिन हा जनक होता आणि अखेर त्याचाच तो बळीहि ठरला. "

' आज स्टॅलिनला अत्यंत नाटकीपणाने पदच्युत करण्यात आलेलें आहे त्याच्या पापकृत्याचे आणि चुकाचे जाहीर पाढ वाचण्यात येत आहेत. याचा अर्थ इतकाच म्हणता येईल. सत्यासाठीं झगडणारे बळी गेले तरी त्याच्या मरणानंतर का होईना सत्य बाहेर आल्याखेरीज राहात नाही **मानवी सदसद्विवेकबुद्धि ही सहजासहजीं दडपली तजा नाहीं वा नाशहि पावत नाहीं. म्हणूनच आजहि स्टॅलिनवादाविरुद्ध ज्यांना लढायचें असेल त्यांनीं अमाप लढ्याची सिद्धता ठेवली पाहिजे.**'

□ □ □

## नवीन विचारसरणी, नवीन कार्यपद्धति

शांततापूर्ण भूतकाळांतील सिद्धांत वादळी वर्तमानकाळांत अपुरे आहेत. समोर अडचणीचे डोंगर उभे आहेत. प्रसंगोचित धैर्याने त्याच्यावर मात केली पाहिजे. प्रसंग सर्वस्वी नवा आहे. त्यासाठी आपली विचारसरणी नवी असली पाहिजे व कार्यपद्धतहि नवीच असली पाहिजे. प्रथम आपण जुन्या बंधनांतून मुक्त झाले पाहिजे. मगच आपल्याला आपल्या देशाचे रक्षण करता येईल.

( " शांततेच्या नव्या परिसीमा " वरून ) —आब्राहाम लिंकन

# पंडित ऊर्फ वासुदेव महादेव भिडे



*पोलिस, पोस्टमन आणि तलाठी यांचा पगार साधारणतः सारखाच असतो, पण तलाठी लोकांची बेपर्वाई, पोलिसांची मुजोरी पोस्टमन लोकांजवळ नाहीं. याला काय कारण असावें ?*

**आमचे प्रतिनिधि**

" त्या बाईला अनेक वेळां मीं सांगितलं होतं ?" भिडे म्हणाले. बाई तुमचं कुत्रं जें मोकळं आहे त्याला बांधून टाका. पण तुम्हीं त्याला बांधलं नाहीं. आतां तें मला चावलं. माझी विजार फाटली. त्याला आतां मी काय करूं ?–" माझ्या त्या तडतडून बोलण्यावर बाई गहिंवरून म्हणाली, " पोस्टमन, मी तुमच्या नुकसानीचे पैसे देतें. "

" पण मला आतां चौदा इंजेक्शनं घ्यावीं लागतील त्याचं काय ? मला किती त्रास होईल आतां ! तुमची कुत्र्याची हौस आतां भागली. तुम्हीं कुत्रं पाळलंत तरी कशाला ?" त्यावर ती बाई म्हणाली, " पोस्टमन, दिल्या अन्नाला फक्त कुत्रंच जागतं. माणसापेक्षां कुत्रं जास्त प्रामाणिक असतं. माणूस आपल्या अन्नदात्याला विसरतो. पण कुत्रं विसरत नाहीं. म्हणून मीं कुत्रं पाळलं आहे. "

बाईच्या ह्या उत्तरावर मला कांहींच बोलतां येईना. भिडे सांगतच होते, " बहुतेक पोस्टमन लोकांना आयुष्यांतून एकदां तरी कुत्रं चावतंच --"

–बऱ्याच पोस्टमनांची आणि माझी ओळख आहे. श्री. भिडे यांची तक्रार खरी आहे. त्यानंतर त्यांनीं आणखी कांहीं गंमती सांगितल्या--

" एकदां एका म्हाताऱ्या स्त्रीला मनीऑर्डर द्यायला गेलों. अंधारांत दिसेना म्हणून त्या बाईच्या सांगण्यावरून गच्चीवर गेलों. चश्मा विसरला होता म्हणून बाईंनीं मुलाला खालीं धाडलं. तेवढ्यांत वारावादळ सुरूं झालं. बाईच्या हातांतला मनीऑर्डरचा फॉर्म उडून गेला. पळत खालीं शोधायला आलों तर पाऊस सुरूं झाला. फॉर्म सांपडला नाहीं. बाई भ्याल्या. खूपच गोंधळ झाला. डुप्लिकेट फॉर्म तयार करून पैसे देण्यास दीड महिन्यांचा अवधि गेला. मला आणि बाईला खूप त्रास झाला. "

एकदां १०५ बुधवार या पत्त्यावर ' सकीना बी ' या नांवानं मनीऑर्डर आली. पत्त्यावर-खालीं बारीक अक्षरांत चंचारे असं लिहिलं होतं. चौकशी केली तर त्या घरांत राहणारी सकीना बी बाहेर आली नि म्हणाली, माझा भाऊ चार महिन्यांपासून परागंदा झाला आहे. त्यानं पैसे पाठवले असतील. पण अगोदर पत्र वगैरे कांहीं नव्हतें म्हणून मनीऑर्डर डिपोझट ठेवली. कांहीं दिवसांनीं मूळ मनीऑर्डर करणारा माणूस आला. आणि त्यानं मनीऑर्डरची चौकशी केली. ती मनीऑर्डर चिंचवडची होती. डिस्ट्रिक्ट पूना असं असल्यानं व चिंचवड हा शब्द लहान लिहिल्यानं ती पुण्याला आली होती. खरी सकीना बी चिंचवडला होतीच."

या असल्या गंमतीबरोबर त्यांनीं कांहीं खास मासले पण सांगितले. पोस्टमन लोकांनीं जिन्या

तून पाय वाजवीत जाऊं नये, अशा पाट्या खास आमच्याकरितां आहेत असे त्यानी सागितले. एका मोठ्या वाड्यांत " माडकरूं-शिवाय इतरांनी आत येऊ नये " अशी पाटी होती. मालकाला मी विचारले, 'माझें काय?'— तिसऱ्या दिवशी पोस्टमन याला अपवाद आहे. अशी सूचना त्या पाटीखाली दिसली.

–सगळ्याच पोस्टमन लोकांना बरे–वाईट अनुभव येत असले तरी बरेच पोस्टमन आम्हाला चांगलेच अनुभव येतात असें म्हणतात. पोस्टमन ही व्यक्ति स्त्री, पुरुष, गरीब श्रीमत, आबालवृद्धाना सारखीच प्रिय आहे. किंबहुना मी खात्रीने असें देखील म्हणू शकेन की, पोस्टमनबद्दल समाजात जी आपुलकी आहे तितकी आपुलकी समाजाला कुणा-बद्दलहि वाटत नसेल. दिवसातून दोनदां किंवा तीनदां आपल्या दारावरून जाणारा पोस्टमन हा आपल्या घरांतीलच एक आहे असें सगळ्याना वाटतें. पोस्टमन घरातल्या कोण-त्याहि माणसाशी कुठेंहि केव्हाहि बोलला तरी ते आपल्या नजरेत सुद्धा भरत नाही; इतकी त्याच्याबद्दल आपल्याला आपुलकी वाटत असते. याउलट चुकून एखादे वेळी पोलीस आपल्या दारात आला तर आप-ल्याला धसका बसतो. शेजारीपाजारी हाता-तली कामें टाकून त्या खोलीकडे संशयित नजरेने पाहतात. " कशाला आला हो ?" अशा अर्थानें सगळे एकमेकाकडे पाहतात. आणि पोलीसदादा जाताच त्या खोलीभोवती लोकांचा गराडा पडतो या एकाच उदाहरणा-वरून पोस्टमन आणि पोलीस यामधला फरक आपल्याला जाणवतो. कुठेंहि तांबडा रंग दिसला की, नकळत आपल्याला ही पोस्टाची पेटी असावी अशी संवेदना होते. त्याप्रमाणे पोस्टमन बोलला, पाणी प्याला तर घरांतलें माणूस पाणी प्याल्यासारखेंच वाटतें. अर्थात् सर्व लोकात ही समजूत रूढ होण्यासाठी अनेक पोस्टमन लोकाना किती-तरी वर्षे प्रामाणिकपणे काम करावें लागलें असेल याचा विचार केलेला बरा. कोणतीहि कल्पना रूढ होण्याला अनेक वर्षे त्या गोष्टीचें सातत्य आसावे लागतें यात शका नाहीं.

—हें असले चागले काम श्री. वासुदेव वामन मिडे हे पुण्याच्या सिटी पोस्ट ऑफिसमध्यें गेलीं वीस वर्षे करीत आहेत. नोकरीच्या शोधात फिरता फिरता १९३९ साली योगा-योगानें पोस्टखात्यांत पॅकरची त्यांना नोकरी मिळाली. १९४२ साली खात्याची परीक्षा पास झाल्यानंतर त्याच साली पोस्टमनची पिशवी त्याच्या गळ्यांत पडली ती अजून काही निघाली नाही. खात्यामार्फत कारकून होण्याची परीक्षा पास झाल्यावर त्याच्या गळ्यातली पिशवी कदाचित निघेलहि.

परीस्थितीमुळें श्री. मिडे याना इंग्रजी सहा-वीत असतानाच शिक्षण सोडावे लागले. आप-ल्यावर जी वेळ आली ती वेळ आपल्या मुलावर येऊं नये त्याची त्याना सदोदित काळजी लागलेली असते. त्यांची थोरली कन्या पुष्पा ही इंग्रजी नववीत आहे. एक मुलगा कॉर्पोरेशनच्या प्राथमिक शाळेंत आणि दुसरा सरस्वति मंदिर शाळेंत शिकत आहे. आज तरी मुलाना जास्तीत जास्त शिक-वण्याची त्याची उमेद आहे. प्रत्यक्ष काय घडेल तें नियतीलाच माहीत. १२५ रुपया-च्या आसपास त्याना पगार मिळत असला तरी जी. पी. फंड आणि त्याचे कर्जहप्ते वजा जाता त्याच्या हातांत १०० ते १०५ च्या दरम्यान पैसे पडतात. महागाईच्या कठीण दिवसांत पांच माणसांच्या या कुटुंबाला अन्य खर्चासाठीच तेवढी रक्कम लागते. आकस्मिक येणारे पाहुणे, आजारपण, मधूनच उपटणाऱ्या मुंजी, लग्नें या खर्चाचा यात समावेश नाही. कपडे, मुलाची फी हा खर्च यात धरलेला नाही. त्यासाठी कर्ज काढणें, तें फेडीत बसणे हे काम त्याना वर्षानुवर्षे करावें लागत आहे; लागणार आहे.

पोस्टमनची पोतडी म्हणजे जादूची पिशवी. त्याच्या पिशवीत काय असेल आणि काय नसेल याचा अचूक अदाज कुणालाच बांधतां येणार नाही. सपादकानी परत केलेल्या गोष्टी जितक्या निर्विकार मनानें तो नवशिक्या लेखकाला परत करतो तितक्याच मख्खपणानें प्रसिद्ध लेखकाच्या घरी छापून आलेल्या मज-कुराचे अक टाकतो. मृत्यूच्या बातमीचे दु:खद पत्र एखाद्याच्या घरात टाकताना पत्र न वाचल्यामुळें त्याला दुःख होण्याचें कारण नसते. अगदी तसेच, नवबाळ जन्माला आलेल्या बातमीचे पत्र एखाद्याच्या घरात टाकताना त्याला आनंद होण्याचें कारण नसते. घरां-तल्या माणसाना चोरून प्रेयसीच्या हाती तिचे प्रेमपत्र देण्याला तो सहसा कधी विसरत नाहीं. पाहुणे येणार असल्याची दु:खद बातमी हाच पोस्टमन कुणाच्याहि घरी आणून टाकतो तर आजच मनीऑर्डरने पैसे पाठवले आहेत, असाहि सुखद मजकूर तो घरीं टाकून जातो. आजपासून कामावर हजर व्हा अशा मज-कुराचें पत्र कुणाच्या घरी आणून देणारा पोस्टमन हा त्या माणसाला देवासारखा वाटत असेल यात नवल ते कसलें! त्याच बरोबर काही दु:खी बातम्या पण सागायला तो कमी करीत नाही. पोस्टमनची पोतडी म्हणजे परस्पर विरोधी मासाचें भाडार आहे. एका लहान मुलाला पोस्टमन ही काय चीज वाटत आहे, त्याचें वर्णन एका लेखकाने बाळ होऊन केलें आहे—

पोस्टमन दादा,
रोज दोनदां जातां दारावरून
चालून चालून तुमचे पाय
जात नाहीत कां दमून ?
तात्याची आमच्या बदली झाली लांब
त्याच्या गांवीं जाऊन कसं येतां राव ?
काकू अन् तात्या येणार असल्या कधी
पत्र त्यांचे नेमकें कसें आणतां घरी ?
सुट्टीच्या अगोदर जातां मामाच्या गांवा
त्याचा तुम्ही आणतां गोड गोड सांगावा
दिवाळीच्या सुट्टीत पोरांना पाठवा
नेमका कसा आणतां तें तरी आठवा !
दादाचें येतें छापून काहीं, तें पण आणतां
विसरत कसे नाहीं ?
नात्याची आमच्या ठाऊक सगळी घरें
निरोप त्यांचा आणतां तुम्ही कसा बरें ?
इतक्या सगळ्या गांवा
जातां तुम्ही कधीं ?
सकाळीं नेमकें कसें येता घरीं
जादूची पिशवी एक दिवस द्या
गळ्यांत घालून पिशवी,
फिरून येईन गांवा
लाडू पेढे मिळतात कुठें लांब गांवीं
जाऊन तेथें आणिन भरून मोठी पिशवी
खाणार नाही एकटा देईन तुमच्या बाळा
एक दिवस द्यावी पिशवी तुमची मला.

बहुतेक कारकून आपल्या कारकुनी पेशाची अवहेलना करतात. पोलीस आपला मुलगा पोलीस होणार नाही ना याची काळजी

वाहतो. जवळजवळ सगळेच लोक आपण पत्करलेल्या पेशाला नांवें ठेवतात. पण श्री. भिडे यांनीं आपल्या नोकरीबद्दल कमीपणाचा एक साधा शब्ददेखील काढला नाहीं.

" इतर पोस्टमन लोकांना फंड सोसायटी-शिवाय इतरहि कर्ज असतं, तसं तुम्हांला आहे का ?" असें विचारतांच ते म्हणाले, " माझ्या काटकसरी वागणुकीमुळं मला कर्ज झालेलं नाहीं."

" काटकसरी वागणूक म्हणजे ?" मी.

" मला कसलाहि नाद नाहीं. फार फार तर मी सिगारेट ओढतों. त्यावरसुद्धां मला बराच विचार करावा लागतो."

" मग फावल्या वेळांत तुम्ही काय करतां ?"

" बऱ्याच वेळा मी वाचन करतों–"

वाचन म्हटल्यावर मीं कान टवकारले. पोस्टमन आणि वाचन ? आणि एवढ्यावरच माझें आश्चर्य थांबलें नाहीं. भिडे हळूंच म्हणाले, " मी कधीं कधीं कविता पण करतों–"

मी सर्दच झालों.

त्यांच्या घरीं गेलों तेव्हां दोन खणांच्या खोलींत त्यांनीं आपला संसार मांडलेला मला दिसला. एका जुनाट खाटेवर बसून ते आपले काव्याचे कागद जुळवीत होते. त्यांनीं बरेच पोवाडे रचलेले आहेत. बहुतेक ते प्रासंगिक आहेत. पोस्टमन मंडळींनीं संप केला तेव्हांचा पोवाडा, भारत स्वतंत्र झाला तेव्हांचा पोवाडा, अधिकारी बदलून गेले तेव्हांचें काव्य अशा प्रकारचें त्यांचें काव्य आहे.

दोन खणांच्या खोलींतला त्यांचा संसार अगदीं साधा वाटला. अगदीं जरुरीपुरतीं भांडी आणि पांघरुणाचे कपडे त्यांच्या घरांत दिसले. मुलांच्या अंगावरील कपडे पण साधारण प्रतीचे वाटले.

पोलीस, पोस्टमन आणि तलाठी यांचा पगार साधारणतः सारखाच असतो. मीं पोलीस आणि तलाठी लोकहि पाहिले आहेत. तलाठी लोकांची बेपर्वाई, पोलिसांची मुजोरी पोस्टमन लोकांजवळ नाहीं. माझं असं ठाम मत आहे कीं, त्या दोघांपेक्षां पोस्टमनची परिस्थिति जास्त हलाखीची आहे. पण संस्कार हे केवळ पैशावर अवलंबून नसतात हेंच खरें. त्यांच्या कामांतल्या कांहीं खास गोष्टी विचारल्यावर श्री. भिडे जरा बुचकळ्यांत पडले. काय सांगावें आणि काय सांगूं नये याचा त्यांना विचार पडलेला असावा. त्यांनीं सांगितलेल्या कांहीं गंमती–

त्यांच्या हातून एकदां एका वृद्ध स्त्रीस ९१ रुपये देण्याऐवजीं १०१ रुपये दिले गेले. ही गोष्ट ध्यानांत आल्याबरोबर ते परत कांहीं वेळानें त्या बाईच्या घरीं गेले. बाईनें घेतलेले पैसे एका पातेल्यांत ठेवले होते. ते तसेच भिडयांच्या पुढें आणून ठेवले आणि म्हटलें, " जास्ती दिले असतील तेवढे घेऊन जा ! –"

**विद्यार्थ्यांच्या वसतीगृहांत मनीऑर्डर देतांना नोटेला नोट लागून दहा रुपये जास्त दिले गेले ते मात्र परत मिळाले नाहींत. हें सांगतांना त्यांना मोठें दुःख झालें.**

शिक्षित समाजांत मनिऑर्डर्स देण्यापेक्षां अशिक्षित समाजांत मनी ऑर्डर्स चुकत्या करतांना आम्हांला आमच्या कामाबद्दल जास्त विश्वास वाटतो असे ते म्हणाले. कोणत्याहि गेस्ट हाऊसमधील मनी ऑर्डर देतांना आम्हांला बऱ्याच प्रमाणांत भीति वाटते असें त्यांनीं बोलून दाखविलें.

पोस्टमन लोकांना पहिली ड्यूटी असेल तेव्हां सकाळीं ६ ते १२ व दुपारीं २ ते ४ पर्यंत कामावर जावें लागतें. त्या वेळीं त्यांना फक्त पत्रें वाटावीं लागतात. दुसरी ड्यूटी असते तेव्हां सकाळीं ८ ते दुपारीं ४ वाजेपर्यंत काम करावें लागतें. कामाचा ताण पडतोच. दुरून कामावर येणाऱ्या माणसाला बराच वेळ रखडपट्टी घडते.

पोस्टांतल्या आठवणी मला अनेक सांगण्यांत आल्या. पण त्यांतल्या एका घटनेनें माझें काळीज दुखावलें गेलें. पोस्टांत काम करणारे एक वयस्कर नि जबाबदार कारकून श्री. देगांवकर मला सांगत होते. " आतां मी सांगतों ती आठवण मोठी हृद्य आहे. मी ठाण्याला कामाला होतों. एक खानदानी कुटुंब होतं. खानदानी कुटुंबांतील स्त्रिया सहसा बाहेर पडत नाहींत हें तुम्हांला माहीत आहेच. अशाच एका कुटुंबांतला कर्ता माणूस मेला. कांहीं दिवसांनंतर त्यांची विधवा पत्नी पोस्टांतल्या चौकांत केंविलवाण्या येरझारा घालतांना दिसली. त्या बाईला बराच वेळ त्या स्थितींत पाहिल्यानंतर तिचं कांहीं तरी काम अडलं आहे, अशी माझी खात्री झाली. म्हणून तिच्याबरोबर आलेल्या मुलाला 'तुझ्या आईचं काय काम आहे? ' म्हणून विचारलं. तेव्हां बाईनी सांगितलं, ' मीं पैसे पोस्टांत ठेवले आहेत. पण आतां सही जमत नाहीं म्हणून पैसे मिळत नाहींत--"

'सही चुकते तरी कुठं ?' देगांवकरांनीं क्लार्कला विचारलं. तेव्हां त्यांना कळलें कीं पूर्वी सही सौ. . . अशी होती. आतां विधवा झाल्यामुळे त्या बाई मागें सौ. शब्द लिहीत नव्हत्या. लिहिणें शक्य नव्हत्या. त्यामुळें त्यांना पैसे मिळत नव्हते !

---देगांवकरांनीं ओळख घालून प्रकरण संपविलें.

□ □ □




एकीला काळा रंग आवडतो तर दुसरीला पांढरा.

# श्रीमंत आणि सेवाभावी वृत्तपत्र "ला प्रेनुसा"

लेखक : दत्तात्रय गोविंद

आपल्याकडे वृत्तपत्राचे कार्यक्षेत्र फार मर्यादित आहे. सरकारवर टीका करणे, विशिष्ट पक्षीय विचारसरणीचा पाठपुरावा करणें किंवा फार झालें तर एखादा अन्याय वेशीवर टांगणे यापलीकडे आमच्या वृत्तपत्रांचा सामाजिक ध्येयवाद जाऊ शकत नाही. पारतंत्र्य-काळात ही अवस्था अपरिहार्य असेल. परतु स्वातंत्र्यकाळात आपण सर्वच क्षेत्रात काही नवीन विधायक माडणीचा प्रयत्न केला पाहिजे. त्या दृष्टीने वृत्तपत्रसृष्टीनें कोणते आदर्श डोळ्यासमोर ठेवावेत? एक उदाहरण म्हणून 'ला प्रेनुसा' या वृत्तपत्राची ओळख करून घेण्यासारखी आहे.

दक्षिण अमेरिकेतील अर्जेंटिना देशाची राजधानी ब्युनॉस आयर्स येथें या पत्राचा १८६८ मध्यें जन्म झाला. सत्य, स्वाभिमान आणि जनसेवा या ध्येयत्रयीवर क्लीमेंट पेज याने पत्राची उभारणी केली. सोयीनुसार अगर कुठल्याहि सबबीवर या धोरणात आजपर्यंत काडीचाहि फरक पडलेला नाही. म्हणूनच हें केवळ वृत्तपत्रच नसून मानवी समाजाची कृतार्थपणें सेवा करणारी ही एक अजब शक्ति आहे अशी जनतेची खात्री आहे. अशा प्रकारचे वृत्तपत्र जगात शोधूनहि सापडेल असे वाटत नाही.

या ध्येयानुसार ला प्रेनुसाचे स्वतत्र आरोग्यखातें आहे. कोणी आजारी असेल तर ला प्रेनुसाचा डॉक्टर तुमच्या घरी तुम्हाला विनामूल्य औषधोपचार करील. तसेच कोर्टकचेरीच्या कामातील सल्ल्यासाठीं ला प्रेनुसाच्या वकीलाचा तुम्ही लाभ घेऊ शकता. शेतकी सल्ला, कुणाची संगीतशिक्षणाची इच्छा, कुणाचे काही तर कुणाचें काहीं प्रेनुसाच्या मडळीतर्फे तत्परतेने पुरविले जाते. ला प्रेनुसाकडे अभिप्रायासाठी हजारोनी पुस्तके-मासिके येत असतात. त्यावर अभिप्राय देऊन तीं व्यवस्थित ठेवली जातात. अनत विद्यार्थी या ग्रंथशाळेचा फायदा घेऊं शकतात. ला प्रेनुसाचा स्वतत्र लेक्चर हॉल असून अनेक सार्वजनिक कार्यांत विचारविनिमय करण्यासाठी त्याचा मोफत उपयोग केला जातो. ला प्रेनुमा हें सर्व करीत असताना वैज्ञानिक युगाच्या गरजाना विसरलेले नाही. वैज्ञानिक शिक्षणाच्या चोखदळ विद्यार्थ्यांसाठी एक मोठी प्रयोगशाळासुद्धा आपल्या जाणकार शास्त्रज्ञाकडन त्या त्या शंकाचे निरसन करते.

**परदेशांतूनहि कीर्ति**

परदेशांतून येणारा अनोळखी प्रवासी जर ला प्रेनुसाच्या कचेरीत गेला तर त्याला अतिशय जिव्हाळयाने योग्य ते मार्गदर्शन होणार. त्याची येणारी पत्रें त्याला कचेरीमार्फत व्यवस्थित पोचणार. त्यामुळें स्वदेशाप्रमाणें ला-प्रेनुसाची कीर्ति परदेशातहि पोहोचली आहे. बेकार लोकांना कामधदा मिळवून देण्यासाठीसुद्धां स्वतंत्र खाते. आहे की नाही उरक ?

आणि हें सर्व करीत असतांना वृत्तपत्र-संपादनाकडे दुर्लक्ष होतें का ? तर तेहि नाही. ला प्रेनुसाचा उदोउदो करणाऱ्या लोकांबरोबर त्याचा पाय मागें ओढणारे समाजकटहि कमी नव्हते. प्रत्यक्ष सरकारचासुद्धा म्हणावा असा पाठिंबा नव्हता. पण या सर्वांना तोंड देतांना सपादकमडळानें आपल्या ध्येयनिष्ठेला धक्का लागू दिला नाही. ध्येयाबद्दलच्या आत्मीयतेमुळेंच दुसऱ्या महायुद्धाची झळ लागूनसुद्धा ला प्रेनुसाने आपला संपूर्ण प्रपच १९५५ नंतर पुन्हा डौलाने उभा केलेला आहे.

ला प्रेनुसाचा कोणताहि वरिष्ठ अधिकारी कोणत्याहि सार्वजनिक व्यासपीठावर व्याख्यान देत नाही. सरकारी जाहिराती, निवडणुका, राजकारणातील लाथाळया ला प्रेनुसात कटाक्षाने टाळल्या जातात. आपल्या विशेष प्रवृत्तीनुसार जगातील विख्यात साहित्याला ला-प्रेनुसातून व्यवस्थित व भरपूर प्रसिद्धि मिळते जगद्विख्यात विज्ञानवेत्ते प्रो. आईन्स्टीन याची पहिली मुलाखत ला प्रेनुसाने प्रसिद्ध करून त्याची ओळख जगाला प्रथमच करून दिली.

स्वत.च्या सर्व सहकाऱ्याच्या सोयीगैरसोयीकडे ला प्रेनुसाचे चालक जिव्हाळयाने लक्ष पुरवितात. त्याच्या नोकरवर्गाला शेवटच्या आयुष्यात पेन्शन मिळण्याची सोय आहे. एवढेंच नव्हे तर एखादा वर्गणीदार आकस्मिक मृत्यु पावला तर त्याच्या कुटुबास ला प्रेनुमा काही विशिष्ट मदतहि करीत असते.

या पत्राचा जगातील वाचकवर्ग मोठया प्रमाणावर आहे. दर दिवशी ५०।६० पानांच्या या वृत्तपत्रात फक्त १६ पानांतून वृत्त व लेख छापले जातात. राहिलेल्या पानातून सगळया जगातून अनेक विभागाच्या जाहिराती प्रसिद्ध होत असतात. जगातील सर्वांत श्रीमत अशा या वृत्तपत्राची सर्व सोयीनी सुसज्ज व भव्य अशी कचेरी नसेल तरच नवल !

या कचेरीतूनच ला प्रेनुसाच्या अनेक लोकोपयोगी व्यापाची सूत्रें शिस्तीने, ममतेने, तळमळीने चालू असतात. असें हे ला प्रेनुसा नुसतेच वृत्तपत्र नसून एक कष्टाळू सेवामूर्ति आहे असे म्हणावेंसे वाटते.

(आधारित)

# ‘ हिमालयाची हांक ’

## पुण्य नगरींत भरलेलें अभिनव रांगोळी प्रदर्शन

लेखक व छायाचित्रकार :


अनंत म. भिडे

जी. डी. आर्ट., ए एम्

आपल्या महाराष्ट्रांतील पुणें शहर (पुण्यनगरी) शिक्षणाचे माहेरघर म्हणून ओळखलें जाते. अनेकविध शिक्षण घेण्याची सोय पुण्यात झाली आहे. इतरहि अनेक तऱ्हेचे कलापूर्ण असे कार्यक्रम येथें सदैव होतच असतात. विविध दृष्टीनी पाहता पुणे शहर हे लोकाचे लक्ष वेधणारें असें होत चालले आहे. शैक्षणिक बाबतीत हें जसे माहेरघर होऊन बसले आहे तसेच ते अनेकविध कलाप्रदर्शनाचें माहेरघर बनू लागले आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही. भरतकाम, विणकाम, हस्तकौशल्याच्या वस्तू इत्यादि कलाप्रदर्शनें येथें नेहमीच लहानमोठ्या प्रमाणावर भरविली जात असतात. गेली ५–६ वर्षे चित्रकाराच्या दोनतीन छोटयाछोटया संघटनातर्फे आकर्षक अशी चित्रकलाप्रदर्शनें येथें भरविली जात आहेत. कलाशिक्षण देणाऱ्या दोन विद्यालयाची वार्षिक प्रदर्शनेंहि येथें भरत असतात. छायाचित्राच्या प्रदर्शनातहि ही नगरी मागें राहिलेली नाही. नुकतेच एक भव्य असे आरोग्यप्रदर्शनहि येथें भरविले गेले होते. अशा तऱ्हेची विविध प्रदर्शनें भरण्याचेच प्रमुख केंद्र ' पुणे ' म्हणून ओळखलें जात आहे. त्यात ' रागोळी ' चित्राच्या प्रदर्शनानेहि आपली जागा उच्च स्थानी ठेवली आहे.

दोन वर्षांपूर्वी ' महाराष्ट्र कलाविकास मडळ ' या रागोळी चित्रकाराच्या सघटनेतर्फे ' भारताच्या पंचवार्षिक योजने ' विषयी सुव्यवस्थित कल्पना व माहिती देणारे एक आकर्षक व अभिनव असे रागोळीप्रदर्शन भरविले गेले होते. पुणेकर रसिकानी या प्रदर्शनाची मुक्तकठाने प्रशसा केली होती. व त्याच प्रदर्शनाची माडणी पुन्हा एकवार महाराष्ट्र सरकारच्या सागण्यावरून मुबई येथे या होतकरू यशस्वी कलाकारानी केली होती. इतके भव्य व वेधक असें प्रदर्शन होते ते. त्याच कलाकारानी सद्य:परिस्थितीवर (सरक्षण विषयक) ' हिमालयाची हाक ' या शीर्षकाखाली सघटितपणे रागोळी चित्रकृतीचे एक अभिनव असे प्रदर्शन लक्ष्मी रोडवरील ' गोखले स्मारक मदिरात ' दिनाक १ जानेवारी ते १० जानेवारीपर्यंत भरविले होतें. महाराष्ट्राचे मुख्यमत्री ना. दादासाहेब कन्नमवार यानी दि. ३१ डिसेंबर रोजी या प्रदर्शनाचे उद्घाटन करून सर्व कलाकाराचे अभिनदन केले. प्रभावी चित्रकृति प्रदर्शित करून हे कलाकार जनताजागृतीचे कार्य करीत असल्याबद्दल त्यानी समाधान व्यक्त केले. पुणेकर रसिकाकडूनहि या अभिनव रागोळीप्रदर्शनाबाबत सपूर्ण समाधानाचे बोल ऐकविले जात होते.

सीमेवर लढणाऱ्या आपल्या जवानांबरोबरच या देशातील प्रत्येक नागरिकहि तितकाच महत्त्वाचा आहे. प्रत्येकाला आपल्याला काय करता येईल ? तसेच सध्याच्या आणीबाणीच्या व देशाचें रक्षण करण्याच्या महत्त्वपूर्ण कालात काय करा व काय करूं नका असे सागणारी विविध चित्रें चितारण्यांत आली होती. केवळ ही चित्रें क्रमशः पाहून सामान्य मनुष्यहि चकित होऊन जाई. त्याला त्याच्या सध्याच्या राष्ट्राच्या परिस्थितीत करावयाच्या स्वत च्या कर्तव्याची जाणीव होत होती. राष्ट्रप्रेम जागृत होऊन आणि हा प्रेक्षक समाधानाने व नवचैतन्यानें प्रभावित होऊन बाहेर पडत होता.




कलाकार – अनंत भिडे

## दूरदूरच्या कलावंतांची हजेरी

पाशवी चिनी आक्रमणानें हिमालयानें हांक दिली आणि ती हांक सामान्य जनतेपर्यंत नेऊन पोहोंचविण्याचें कर्तव्य पार पाडण्यासाठीं, पोष्ट, शाळा, कचेऱ्या इत्यादि विविध ठिकाणीं काम करून उदर-निर्वाह करणारे हे सर्व रांगोळी-कलाकार एकत्र आले. लहान मोठ्या पंचवीस चित्रकारांनीं संघटित असें ३४ रांगोळी-चित्रांचें प्रदर्शन थाटलें होतें. पुणेंकरांपुढें कर्तव्याची जाणीव चित्रद्वारें प्रगट केली. या प्रदर्शनांत भाग घेण्यासाठीं बडोदा, सातारा, वाई, सांगली, मुंबई अशा ठिकाणांहून कलाकार त्वरेनें धांवले. पुण्यांतील कलाकार तर होतेच होते. यांपैकीं कांहींनीं ३, कांहींनीं २ चित्रें सादर केलीं. सामान्यतः चित्रांचे आकार तीन फूट रुंद व चार फूट लांब असे होते. ३४ पकीं १० चित्रें एकाच रंगाच्या छटा वापरून सजलीं होतीं तर इतर सर्व अनेक रंगांच्या मधुर रंगसंगतीनें नटलीं होतीं. केवळ सजलीं होतीं, नटलीं होतीं असें नव्हे तर तीं प्रेक्षकांशीं बोलण्याचा प्रयत्न करीत होतीं. मनाची पकड घेत होतीं. आपले नेते, कष्टी हिमालय, सेनेचीं तीन अंगें, सैन्यभरती, रक्तदान, सुवर्णदान, शस्त्रांची देशांत निर्मिति, शेती उत्पादन वाढ, एकाग्र झालेले कामगार, श्रमदान, पशु-संवर्धन, वैद्यकीय मदत, संप, टाळेबंदी, खर्चकपात, अफवा, प्रत्यक्ष लढणारा जवान, लोककलाकार व धारातीर्थी पतन पावलेल्यांचें पुण्य स्मारक असे अनेक चित्रविषय "हिमालयाची हांक" या शीर्षका-खालीं निवडले गेले होते. कांहीं चित्रें फारच परिणामकारक व रच-नेच्या दृष्टीनेंहि महत्त्वाचीं ठरलीं होतीं.

कोल्हापूरचे श्री. शांताराम कमते यांनीं ८ फूट लांबरुंद अशी एक रांगोळी काढली होती. हिमालयाच्या पार्श्वभूमीवर एक मुनि दाख-विला होता. त्याच्या हातांत परकीय आक्रमकानें शृंखला बांधली आहे. व तो आक्रमक त्याला खेचूं पाहत आहे. तोंवरच आपला जवान हातोड्यानें शृंखला तोडीत आहे. 'हिमालया तूं बंदिस्त असेतों आम्ही स्वस्थ बसणार नाहीं' असेंच तो जवान दाखवीत आहे. चित्र-कल्पना व रंगसंगति मनोवेधक अशीच होती. प्रथमदर्शनीं चित्र पकड घेई पण बारकाईनें पाहातां सांखळी तोडणाऱ्या जवानाच्या हातांतील हातोडा किरकोळ व लांकडी असा वाटत होता. मनुष्या-कृतीचें प्रमाण थोडें पाहाणें अगत्याचें होतें. तथापि चित्रतंत्र चांगलें साधलें होतें. चौथ्या रांगेंतील, चंद्रकांत टेंबवलकर यांचें 'संप व टाळेबंदी', तसेंच अनंत भिडे व प्रमोद उपासनी यांनीं चितारलेलें 'यांत कपात करा - निधि वाढवा' हें कल्पनाचित्र, याच ओळीच्या शेवटीं काटकोन त्रिकोणी आकारांत 'धडाडीचा जवान' माधव नाईक यानें दाखविला होता. हीं चित्रें विशेष उठावाचीं वाटत होतीं. टेंबवलकरांनीं 'आपल्या चित्राला कुलुपाचा बाह्यआकार देऊन त्या किल्लीच्या ठिकाणांतून कामगार संपाचे फलक हातांत घेऊन गिरणी-बाहेर निघाले आहेत असें दाखविलें होतें. पार्श्वभूमीवर कारखान्याची इमारत व तांबडा रंग योजला होता. दोन कोपऱ्यांत संप व टाळेबंदी शब्दावर तांबड्या फुल्या दाखवून अर्थपूर्ण चित्र पुरें केलें होतें. अनंत भिडे यांनीं काढलेलें चित्र रंगांची खैरात करीत रचनाकर्पकता दाखवीत होतें. चित्राच्या तीन भागांपैकीं डाव्या वरच्या भागांत थाटाची जेवणाची पंगत, उजव्या कोपऱ्यांत रोषणाई ( विद्युत् ) केलेल्या इमारतीचा भाग व तळच्या पट्ट्यांत थाटानें सुशोभित मोट-रींतून चाललेली लग्नाची वरात दाखविली होती. यांत कपात करा व हाच बचत केलेला पैसा राष्ट्रीय आणीबाणीच्या प्रसंगीं राष्ट्रसंर-




कलाकार – चंद्रकांत टेंबवलकर


क्षणनिधीसाठीं द्या असा बोध या चित्रांतून होत होता. माधव नाईक या बडोद्याहून आलेल्या एका कलाकारानें चितारलेला भारतीय सैनिक लक्ष वेधून घेत होता. शत्रूला अचूक टिपण्यासाठीं बंदूक रोखून पवित्र्यांत उभ्या असलेल्या या सैनिकाच्या चेहऱ्यावरील भाव खरोखरच तेजस्वी व राष्ट्रभक्तीनें ओथंबणाऱ्या अशा चेहऱ्याचें दर्शन घडवीत होतें. काटकोन त्रिकोणाकृति आकारांत चित्र होतें. त्रिकोणाचें टोंकहि बंदुकीच्या रोखानें होतें. त्यामुळें चेहऱ्याची दिशा अधिक उठावदार होती. याच नाईक यांनीं, नभोवाणीवरून, राष्ट्राला आवाहन करणारे आपलें लाडके पंतप्रधान मूर्तिमंत स्वरूपांत प्रेक्ष-कांपुढें उभे केले होते. सेपिया या एकाच रंगांत विविध छटा निर्माण करून पंडितजींचें चेहऱ्याचें साम्य हुबेहूब साधलें होतें. पंडितजींचे ते शब्द ऐकूं येताहेत असा जणू भास होत होता. व्यक्तिचित्रणांत श्री. माधव नाईक हे अधिकाधिक पारंगत होत आहेत असें म्हणावेंसें वाटतें.

## कल्पकता—विविधता

टेंबवलकरांनीं आपल्या आणखी एका चित्रांत अलंकार घातलेली स्त्री मापल्या हातांनीं सुवर्णाचे अलंकार काढीत आहे असें दाखविलें होतें. शेजारींच एक रणगाडा चित्रित केला होता. शस्त्रास्त्रांच्या खरेदीसाठीं सुवर्णालंकार द्या हा आशय होता अनंत भिडे यांनीं आपलें दुसरें चित्र म्हणज युद्धप्रसंगच मांडला होता. शत्रूचें विमान व त्यांतून टपकणारा छत्रीधारी सैनिक व या विमानाला वेधण्यासाठीं आपल्या भूमिवर सज्ज असलेली तोफ व छत्रीधाऱ्याला अचूक टिपण्यासाठीं खंदकातून वर येत असलेला तडफदार शीख जवान असें तें चित्रण होतें. चित्रांत सैनिकाचा कणखरपणा स्पष्ट होता. खालीं कारखान्यांची सूचक आकृति होती. सैनिकांबरोबरच शस्त्रास्त्रें हवींत आणि त्यांचें उत्पादन आपणच केलें पाहिजे असा त्याचा अर्थ होता.


श्री. पाकणीकर यांनीं एका कमिशन्ड ऑफिसरची व्यक्तिरेखा फारच बहारदार रंगविली होती. इमर्जन्सी कमिशन्स मिळवा हा त्यांचा विषय. पण सैन्याचे तीन भाग दर्शविणारें असें कुठेंच सूचित होत नव्हतें. त्यामुळें हें केवळ व्यक्तिचित्रच आहे असें म्हणावें लागत होतें.

अशोक सानीनकरांनीं, संरक्षणमंत्री यशवंतरावांचें एका रंगांतील व्यक्तिचित्र काढून त्यांची ओळख दिली होती. या चित्रालाहि पार्श्वभूमीची कमतरता वाटत होती.



कलाकार – माधव नाईक

सुधाकर शारंगपाणी यांचेंहि रांगोळी–चित्र सुरेख होतें. हिमालयाच्या बाजूनें पलीकडून उन्मत्त विषारी भयंकर असा सर्प येत आहे आणि भारतीय जवानानें त्याला रोखलें आहे. आणीबाणीच्या काळांत नाना तऱ्हेच्या अफवा पसरतात व त्यांवर घाबरलेली सामान्य जनता विश्वास ठेवते. अशा अफवा पसरवूं नका व ऐकूंहि नका असें एक विनोदी पद्धतीवर आधारलेलें चित्र नरेंद्र मोकाशी व जयंत भिडे या कलाकारांनीं रेखाटलेलें होतें. श्रमदानांत गुंतलेले शेतकरी व ग्रामीण जनता शरद ब्रह्मे यांनीं दर्शविली होती. पशुसंवर्धनाची गरज दाखविण्यासाठीं यशवंत देव यांनीं एका तुस्त अशा रेखीव बैलाचा चेहरा फारच प्रभावी असा उतरविला होता. या शिवाय व. तु. सहाणे यांनीं नौदलांतील सैनिक, निफाडकर यांनीं विमानतळ व ए. सी. सी.,



कलाकार – माधव नाईक

एन्. सी. सी. भरतीची गरज हीं दोन चित्रें, बर्डे यांनीं 'सैन्यांत दाखल व्हा' हें पोस्टर, अरविंद श्रोत्री, सातारा यांनीं 'पोलाद उत्पादन व पोलाद भट्टीचा भाग', मोकाशी यांनीं नित्योपयोगी वस्तूंचा तुटवडा होऊं देऊं नका', भालचन्द्र काटदरे यांनीं 'भूमिसैनिक नांवाखालीं एक 'शेतकरी कुटुंब' अशीं चित्रें रेखाटलीं होतीं.

सौ. मीना शिवरकर, श्री. अनंत गुणे, श्री. आपटे, पेंडारकर, वेंगुर्लेकर, जगदीश गवंडी, उमेश गुप्ते या कलाकारांनींहि आपापल्या परी हें प्रदर्शन उभारण्यांत चित्रें काढलीं होतीं.

असें हें संघटितपणें भरविलें गेलेलें 'हिमालयाची हांक' हें रांगोळी-प्रदर्शन अत्यंत आकर्षक तर झालें होतेंच त्याबरोबरच चित्रद्वारें लोकजागृतीचें व लोकशिक्षणाचें महत्त्वपूर्ण कार्य करण्यासाठीं अत्यंत उपयुक्त ठरत होतें. प्रदर्शन पाहून झाल्यानंतर प्रत्येक प्रेक्षक कलाकारांचें अभिनंदन करीत होता. या अशा रांगोळी प्रदर्शनाच्या मार्गानें लोकजागृति करण्याचा उपक्रम व तो पार पाडण्यासाठीं सर्व ते कष्ट करण्याचें ध्येय पुढें ठेवणारे असें पुणें येथील एक दुकानदार व कलाप्रेमी श्री. पी. व्ही. कुलकर्णी हे आहेत. तसेच एक शिक्षक प्र. द. कवठेकर हेहि या सर्व खटाटोपाचा भाग स्वेच्छेनें स्वीकारून रात्रंदिवस कष्ट घेत असतात. प्रदर्शनाची मांडणी, कलाकारांना एकत्र आणणें व प्रत्यक्ष अशीं प्रदर्शनें चालविणें हा सर्व उद्योग या दोन व्यक्ति अत्यंत आनंदानें व कर्तव्यतत्परतेनें पार पाडीत असतात. अशा प्रकारें चित्रें रेखाटून आपलें राष्ट्रीय कार्य करणाऱ्या कलाकारांना ठिकठिकाणीं जाऊन हा अभिनव उपक्रम करणें शक्य होण्यासाठीं सरकारनेंहि जनतेप्रमाणेंच त्यांना प्रोत्साहन द्यावें व 'रांगोळी' सारखें अगदीं साधें वाटणारें एक माध्यम इतकें प्रभावी आहे हें सांगण्याची संधि द्यावी अशी एक नम्र सूचना करावीसें वाटतें. अशा या रांगोळी–माध्यमांतून चित्रकृति निर्माण करून लोकशिक्षणाचें कार्य करणाऱ्या सर्व कलाकारांचें अभिनंदन करावें तितकें थोडेंच !

□ □ □

# १९६२ साल गाजविणारे मराठी चित्रपट

## पूर्वार्ध

लेखक

वसन्त भालेकर

१९६३ साल उजाडले आहे नवी संकटें नि नव्या जबाबदाऱ्या घेऊन. सीमारेषेवर कटकट सुरू झाली आहे. ज्या नगाधिराज हिमालयानें गेली शतकानुशतके भारत वर्षाचे सरक्षण केले तो पर्वतराजच सकटात सापडला आहे. विश्वासघातकी नि कसावकरणी चिन्यानी भारतभूवर आक्रमण केले आहे. त्यामुळेच अखिल भारतीय जनता हवालदिल झाली आहे. बेचैन बनली आहे. त्यामुळेंच येथील सारे वातावरणच ढवळून निघाले आहे. साऱ्यांची मन स्थितीच बिघडली आहे. याचा इष्ट तो परिणाम येथील सर्वच व्यवसायावर झाला आहे. मग त्यातून भारतीय चित्रसृष्टि तरी कशी वाचणार ? या धद्यावर-देखील या युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम झाला आहे.

मराठी चित्रसृष्टीस तर याची विशेष झळ लागली आहे; आधीच आमची मराठी चित्रसृष्टि गरीब. सर्वच बाजनी तिचा कोडमारा झालेला. चित्रपटाला धड स्टुडिओ नाहीत की ऐसपैस पैसा खर्च करूं म्हटले तर आर्थिक बाजूची चणचण. मर्यादित बाजारपेठ नि हिंदी चित्रपटाशी करावी लागणारी स्पर्धा या कैचीत सापडून अगोदरच घायाळ झालेली. त्यात आता कच्च्या फिल्मचा तुटवडा भासू लासल्यानें तिची शोचनीय परिस्थिति झाली आहे. अनेक चित्राच्या मूहूर्ताचे नारळ फुटले पण पुढें काहीच प्रगति नाही. स्वस्त भाड्याचे स्टुडिओ बडाघड बद होत आहेत. मुबईचे महाग स्टुडिओ निर्मात्याच्या खिशात परवडत नाहीत नि कोल्हापूरचे दोन स्टुडिओ चित्रणाला पुरे पडत नाहीत. त्यामुळें चालू सालात मराठी चित्रपटावर चागलीच सक्रांत बसणार असे वाटते. चित्रनिर्मिति फारशी नेत्रदीपक होईल, असे सध्यांच्या परिस्थितीचा कानोसा घेता वाटत नाही. नियतीनेच नियंत्रण बसविलें आहे मराठी चित्रपटाच्या निर्मितीवर !

### पौराणिक चित्रांचा काळ संपलेला नाहीं

गेला दिवस बरा होता असें आपण नेहमीच म्हणतों. पण यंदाच्या एकदर परिस्थितीचें चोखदळपणे अवलोकन केले तर मराठी चित्र-पटसृष्टीला १९६२ साल खरोखरीच भाग्याचे वैभवाचे गेले असेच म्हणावे लागेल. गत साली एकूण २० मराठी चित्रानी रजतपट पाहिला त्यातील एक बोलपट होता. मराठी भाषेंत निर्माण झालेला हा पहिलाच बोल चित्रपट होय.

१९६१ सालीं एकूण तेरा मराठी चित्रपटाचें येथें प्रकाशन झाले होते तर १९६० साली सतरा मराठी चित्रपट रुपेरी पडद्यावर रुजू झाले होते म्हणजे गेल्या दोन वर्षांच्या मानानें १९६२ साल अधिक भर-भराटीचे गेलें असें म्हणायला कोणतीच हरकत नसावी.

या १९ चित्रपटापैकी शत्रुजित् फिल्मचा ' विठू माझा लेकुरवाळा ' हा एकच चित्रपट पौराणिक होता. इतर १८ चित्रांपैकी 'चिमण्याची शाळा' ' सूनबाई ', जावई 'माझा मला' व 'सुख आले माझ्या दारी' या चार चित्रपटाना ग्रामीण पार्श्वभूमि लाभली होती. त्यापैकी ' जावई माझा मला ' हा चित्रपट कोकणच्या रम्य पार्श्वभूमीवरील होता.

१९६१ साली एकहि पौराणिक चित्रपट प्रकाशित झाला नव्हता. पौराणिक अगर ऐतिहासिक पार्श्वभूमीवरील चित्रपटाला भरमसाट खर्च येत असल्याने मराठी निर्म्यात्याला हा खर्च पेलत नाही. १९६० साली कीचकवध हा एकमेव पौराणिक चित्रपट प्रकाशित झाला होता. पण तो काही ताजा चित्रपट नव्हे. त्या सालात तो कसातरी पुरा होऊन त्याने पडदा पाहिला इतकेच. गेली अनेक वर्षें तो डब्यात पडू-नच होता. त्यामुळें तो जुनाच झाला होता की पाच पांडवाचे पुरातन कथानक लाभलेल्या या चित्राची निर्मितिमूल्येंहि इतकी जुनाट की तो चित्रपट पडद्यावर सलग दोन अडीच तास पाहावा हे फार मोठें संकटच होते.

गत सालीं शत्रुजित् पॉल या महाराष्ट्रेतर निर्मात्यानें धाडस केले नि ' विठू माझा लेकुरवाळा ' हा चित्रपट निर्माण केला. त्याचें कथानक जुनेच नि जुन्या पठडीतील श्री. स. अ. शुक्ल यानीच त्याची कथा, पटकथा व सवाद लिहिलेले त्यांत काही विशेष चमक होती अशातला भाग नाही. पण आमची पुराणप्रियता जोपर्यंत कमी होत नाही नि

*१९६२ सालांत एकूण २० मराठी चित्रपट प्रकाशित झाले. त्याचें समालोचन या ठिकाणीं आम्ही देत आहोंत. चालू अंकांत चित्रकथांविषयीं माहिती देण्यांत आली असून येत्या अंकांत दिग्दर्शक, कलावंत व तंत्रज्ञ यांच्या कामगिरीचा आढावा घेण्यांत येईल. आमच्या वाचकांना हें समालोचन माहितीपूर्ण वाटेल अशी अपेक्षा आहे.*

**– संपादक**

साधु जनाचें आम्हाला जोंपर्यंत अधिक आकर्षण वाटते तोपर्यंत अशा चित्राना भाविक प्रेक्षकाचा कधी तुटवडा पडणार नाही. या चित्राला म्हणूनच गिऱ्हाईक चागले मिळालें. गत सालात सगळचात अधिक धंदा याच चित्रपटाने केला. जनाबाईला दृष्टीसमोर ठेवून या चित्राची आखणी केली होती हे खरे. पण त्याचबरोबर नामदेव, ज्ञानेश्वर, गोराकुंभार, सेना न्हावी, चोखा मेळा, सावतामाळी व पुडलिक आदि झाडून साऱ्या सत मंडळीचे नि त्याचबरोबर विठ्ठल रखुमाईचेहि कळलाव्या नारदासह दर्शन झाल्यानें भाविक जनता धन्य पावली !

## अधिक चित्रें देणारें वर्ष

१९६२ सालची सुरुवात स्नेहल चित्रच्या 'माझी आई 'ने झाली व चित्रगगाच्या 'नंदादीप 'ने शेवट झाला. आई व नंदादीप यामागें चांगल्यांच्या पावित्र्याच्या भावना लपलेल्या असल्यानें हा योगायोग मोठा गमतीदार वाटला. पण चागल्या नि पावित्र्याबरोबरच उदात्ततेचे दर्शन या सालात प्रकाशित झालेल्या चित्रपटातून अभावानेच घडले हीच अत्यंत खेदाची गोष्ट. बरेचसे चित्रपट नाचगाण्यात बुडून गेलेले दिसले तर अनेकावर हिंदी चित्राची छाया पडलेली दिसली. काहीनी तर जुन्या कथानकानाच नव्याने कढ काढला. सकस कथानकाने विनटलेली दमदार कलाकृति अभावानेच पाहायला मिळाली. त्यामुळें चित्रपट खूप प्रकाशित होऊन आत्यंतिक आनद देणाऱ्या कलाकृति हाताच्या बोटावर मोजण्याइतक्यादेखील भरल्या नाहीत याचेच फार दुःख होते.

अठळ सामाजिक चित्रपटांपैकी माझी आई हा कामगारजीवनावरील चित्रपट होता. मराठीत तरी अशा पार्श्वभूमीचा हा पहिलाच चित्रपट. मालक व मजूर याचा झगडा तसा पुरातन. शेतकऱ्याची जमीन ही जशी आई तद्वत कामगाराची माता गिरण. हें या चित्रपटाचे मध्यवर्ती सूत्र. पण कामगारजीवनातील ज्वलत सघर्ष आणि त्याची यशस्वी उकल करण्यात मात्र या चित्रपटाचे निर्माते, दिग्दर्शक असफल ठरले. कारण हा विषयच मुळात अवघड नि मराठी निर्मात्याच्या खिशाला परवडणारा नाही. त्यामुळेंच १९६२ सालची सुरुवात करणारा हा पहिलाच चित्रपट मराठी मनाची पकड घेण्यास असमर्थ ठरला. जैमिनीच्या 'पैगाम 'ची दाट छाया या चित्रपटावर पडली होती. पण पैगाम हा कामगारजीवनावरील चित्रपट असूनहि इतका दरिद्री वाटत नव्हता.

गत सालांतील अगदी वेगळ्या प्रकृतीचा चित्रपट होता 'रंगल्या रात्री अशा ' हा. एका तबलापटूच्या जीवनावरील या कथेंत खरोखरीच काहीतरी निराळे पहावयास मिळालें. वेगळें ऐकायला मिळाले. कानाची नि डोळ्याची तृप्ति केली या चित्राने. तसें या चित्राचे कथानक दुबळेच. पुढचे पाऊल नि मी तुळस तुझ्या अगणी या गाजलेल्या मराठी चित्रपटाची पदोपदी आठवण करून देणारे. यातील बराचसा भाग हिंदी भाषेनेच व्यापलेला असल्याने हा चित्रपट हिंदी की मराठी असा सभ्रम पडत होता पण उत्तर प्रदेशच्या एका कोठीवरच्या बाईचे यथार्थ दर्शन घडवायचे म्हणजे असें होणें क्रमप्राप्त होते.

गतसालच्या एकदर चित्रपटांत राघव चित्रच्या वरदक्षिणा या चित्रपटाचाहि आवर्जून उल्लेख करावयास हवा तो अशासाठी की समाजातील आजच्या हुड्याच्या ज्वलंत प्रश्नाला या चित्राने हात घातला होता. बावरत बिचकत का होईना पण एक चागली समस्या सोडवण्याचा प्रयत्न या चित्रांत झालेला पहायला मिळतो. पण त्याची माडणी मात्र तितकीशी आकर्षक वाटली नाही. चित्रपटाची वडखोर नायिकाच येथें बरीचशी दुबळी झाली असून तिच्यावर मनापासून प्रेम करणारा व तिच्या कुटुबियात सहानुभूति मिळवून बसलेला एक सुशील, सालस नि देखणा तरुण यशवतच्या रूपाने पहिल्यापासूनच वावरत असल्याने चित्रकथेत उत्कठा राहिलीच नव्हती. उलट ज्याच्याशी लग्न ठरत आहे तें हुड्यावरून मोडलें की यशवतालाच ती वरणार हे अगोदरच माहीत असल्याने यातील एकदर गंमतच सपुष्टात आली होती परतु तसें काही असते तरी हुड्याला विरोध दर्शविणारी कथा अगदी खेळकरपणें इथें मांडण्याचा प्रयत्न झाला हीच कौतुकाची बाब

## ग्रामीण चित्रांची शोकांतिका

सुख आलें माझ्या दारी, जावई माझा भला, चिमण्याची शाळा आणि सूनबाई ही चार चित्रें ग्रामीण पार्श्वभूमि लाभलेली. पण सकस ग्रामीण चित्रे म्हणून काहीं त्याचा उल्लेख करतां येणार नाही. आजकाल तमाशात कोंबण्यासाठीच ग्रामीण कथेची कास धरली जाते. त्यामुळें ढगदार लावण्यांची चागली पेरणी करता येते. छेलछवेलीच्या अगविक्षेपाला नि नयनकटाक्षाना भरपूर वाव देऊन पिठातल्या प्रेक्षकाना खूष करतां येतें. तोच विषयलपट पाटील. तेच गुड नि तोच तमाशा. यापेक्षा खेड्यांतून काहीं वेगळे घडते याची दाद फिर्यादच नाही आमच्या कथालेखकाना नि निर्मात्यानाहि.

या चार चित्रात पाटील दिसला नाहीं. पण एकदर माडणी काहीशी याच थाटाची. त्यातहि जावई माझा भला हें एक निष्पाप चित्र वाटते. त्याचें कथासूत्र चागले होते. सुखासमाधानाने नादत असलेल्या गावात एखादाहि समाजकटक कसे विष पेरू शकतो हें त्यात पहायला मिळते. पण चित्रकथेची हाताळणीच एवढी भोगळ नि ठिसूळ की चित्रपट आनंदापेक्षां जाभयाच अधिक आणायला लावीत होता. पण

कोकणच्या नितान्तरम्य ठिकाणच्या एका पापभीरु लोकाच्या निर्मल खेडयांतून प्रेक्षकाना फिरवून आणलें.

" ठेविले अनते तैसेचि रहावें चित्ती असो द्यावें समाधान " या तुकाराम उक्तीची आठवण करून देणाऱ्या ' सुख आलें माझ्या दारी ' या चित्रपटात फारसें मोठें कथानकच नव्हते. टिचभर कथेला नाचगाण्याची भरपूर फोडणी देऊन त्याची लाबण लावली होती. त्यामुळें पावशेर दुधात पाऊणशेर पाणी मिसळल्यामुळें होणारा पाणचटपणा या चित्राबाबत झाला होता खरा. लाळी शहरी सुखाला भाळून आपल्या नवऱ्याला नि पोराला टाकून आपल्या नाचगाण्याचा नि उसळत्या जवानीचा सौदा माडायला शहरात येते नि तेथें तिला वेगळाच अनुभव येतो. पश्चात्तापानें पोळून फिरून ती आपल्या घरचा रस्ता धरते. हें कथेचे बीज होते. उद्‌बोधक पण जास्तीत जास्त नृत्ये नि गाणी हेच चित्राचे मुख्य ध्येय असल्याने मूळ सूत्र नूपुरांच्या झकारात केव्हाच बुडून गेलें नि बाकी राहिला हिंदी चित्रपटासारखा खमग मसाला.

निर्मल चित्रच्या सूनबाईंत एका स्वातंत्र्यप्रेमी तरुणीची तेजस्वी कहाणी सागण्याचा प्रयत्न झाला. श्री. दत्त रघुनाथ कवठेकर यांच्या मूळ कथेंतील क्षमा मात्र येथें दिसली नाही. खुल्या जगाच्या भ्रामक कल्पना डोक्यात घोळविणारी क्षमा, एकत्र कुटुंबपद्धति नि शेतीवाडीला विरोध दर्शविते· घर सोडूनहि जाते नि फिरून नवऱ्याच्या आश्रयाला येते. सुख आलें... मधील लाळी नि सूनबाईमधील क्षमा म्हणूनच एका जातीच्या वाटतात.

यशोधन चित्रच्या ' चिमण्याची शाळा ' ने मात्र खरेंखुरे ग्रामीण दर्शन घडविले. पण ते पूर्वार्धांतच. उत्तरार्धांत हा चित्रपट नाचगाण्यातच (ती देखील अगदीच टुकार) बुडून गेला. त्यामुळें ज्या निर्मल नि निरागस वातावरणात चित्रपट सुरू होतो त्याचा मागमूसहि पुढें रहात नाही. जन्मत.च काव्याचे वेड असलेला, मुलाफुलात रमणाऱ्या, बालांना कधी गाणी म्हणून तर कधी गोष्टी सांगून रमविणाऱ्या नि निसर्गाच्या सान्निध्यात तासन तास घालविणाऱ्या लोहाराच्या एका भोळ्याभावड्या पोराची कथा खरोखरीच हृद्य अगदी वेगळ्या धाटणीची. तिचा पूर्वार्धातील आविष्कारहि कल्पकतेने झालेला. पण मग धंद्याची आठवण झाल्याने केलेल्या श्रमावर पाणी पडलें. यामुळें झालेले काम धड धंदाहि नाहीं की धड एक सकस कलाकृतीहि नाही असा प्रकार या चित्राबाबत झाला. खेड्यातील दिनचर्येचे बारीकसारीक प्रसग येथें चागले चितारले होते. पण त्याचबरोबर शेतात काम करणाऱ्या बायाना एका तालासुरात समरगीत गायला लावून हिंदी चित्रपटांवरहि ताण करण्यांत आली होती ! या चित्रातील आणखी एक विक्रम म्हणजे २१ मिनिटाचे एक अत्यंत भिकार गाणें. शशाक मजरीची (म्हणजेच ससा नि राणीचा) ही संगीतिका म्हणजे डोकेदुखीचाच प्रकार आतां म्हणजे या चित्रपटात फिरून काटछाट करून नि या सगीतिकेच्या जागीं युद्धजन्य परिस्थितीवरील एखादें समरगीत घालून 'गाऊं त्याना आरती ' या नावानें हा चित्रपट फिरून पडद्यावर येणार आहे.

## हिंदीच्या तोंडावळ्याचीं चित्रें

सागरचित्रचा " क्षण आला भाग्याचा ", गौरव फिल्मस्-कृत " भिंतीला कान असतात ", सुरेल चित्रनिर्मित " बायकोचा भाऊ ", चित्रगुंजनची " सोनियाची पावले ", चित्र साधनाचा " प्रेम आधळं असतं " आणि चित्रगंगाचा " नंदादीप " ही सहा चित्रें जुन्या थाटाची नि हिंदी चित्रपटाची आठवण करून देणारी ठरली. या सर्व चित्रात " क्षण आला भाग्याचा " हा चित्रपट केव्हाहि सरस होता. हृदयस्पर्शी कथानक व त्याची नीटनेटकी माडणी यामुळें तो महापाप्याच्या हृदयाचा ठाव घेण्यात नि डोळ्यात आसवें जमा करण्यात यशस्वी ठरला. एका सच्छील पापभीरु नि परोपकारी वृत्तीच्या पोस्ट मास्तराची आणि त्याच्या कुटुबाची एक अत्यत साधी नि सोज्वळ कथा ती पाहतांना गंमत वाटली, मन रमलें व हास्याच्या लाटाबरोबर दुःखाचे हुदकेहि द्यावे लागले. पण एके काळी खूप गाजलेल्या पाचोलीच्या ' खजाची ' या हिंदी व अलीकडेच रौप्य महोत्सवी ठरलेल्या बिपीन गज्जर यांच्या ' मेहेंदी रंग लाग्यो ' या लोकप्रिय गुजराथी चित्रपटाची या चित्रावर छाया पडलेली आढळली.

चित्रगगाच्या नदादीपमध्यें एका गरीब पण अपघातानें पंगू झालेल्या अत्यत सालस व गुणी तरुणीची कहाणी चांगली रेखाटली होती. पण कथानकाची एकदर हाताळणी अगदीच भोगळ व योगायोगांना शकुनअपशकुनाना आणि समज गैरसमजाला येथें खूपच प्राधान्य देण्यात आल्यामुळें तिसऱ्या दर्जाच्या नि मद्रासी फॉर्म्युल्याच्या हिंदी चित्रपटाचेच स्वरूप या चित्राला आले होते. त्यात कोणतीहि एक व्यक्तिरेखा परिपूर्ण वाटत नसल्यानें चित्रपट अनेक जागी तुटक वाटत होता. परिणामी हा नदादीप फारसा तेजस्वी नि ओजस्वी ठरला नाही. मात्र यातील काही प्रसंग हृदयस्पर्शी होते. चित्राची एकदर बैठकच नाटकी. (नाट्यक्षेत्रात उभी हयात घालविलेले कृष्णराव चोणकरच या चित्रपटाचे निर्माते, दिग्दर्शक असल्यानें असे होणेंहि स्वाभाविकच होतें ! )

" बायकोचा भाऊ " हा कांहीसा खटयाळ, लबाड, अवखळ नि तितकाच जोमदार वाटला. त्यानेंहि लोकाना खूप हसविलें. आंतून पोखरलेल्या पण वरकरणी बडेजाव करणाऱ्या एका दांभिक कुटुबाची टिंगल उडवून त्याना सरळमार्गाला लावणारा अनंत उत्पाद मन रिझवून गेला. पण जातांना पेडगावच्या दाढीवाल्या शहाण्यांची आठवण करून गेला. (पेडगांवचे शहाणे रगविलेल्या राजा पराजपे यानीच हा बिनदाढीमिशीचा अनंत उत्पाद उभा केला होता हाहि योगायोगच ! ) त्या चित्रपटाचीच ही प्रतिकृति वाटली, कांहीशी सुधारलेली.

पैसा हीच प्रतिष्ठा मानणाऱ्या एका सरसाहेबाची कथा ' प्रेम आधळं असत ' मध्यें पाहायला मिळाली. या चित्रपटांतील एकदर वातावरण हिंदी चित्रपटाच्या वळणाचेच. चित्रपटातील एकदर प्रेमप्रसग पाहिल्यानतर आधळ्या प्रेमाची कुठेंच प्रचीति येत नाही. उलट प्रेम डोळस असतें असेच म्हणण्याची पाळी येते. सरसाहेबाची मानलेली कन्या एका गरीब पण सालस नि हुशार तरुणावर प्रेम करून प्रतिष्ठा पैशात लपलेली नाही हे आपल्या मानलेल्या पित्याला पटवून देते. पण त्यासाठी बिचारीला खूप आटापिटा करावा लागतो. प्रेमाच्या वैफल्यानें तिच्या मेंदूत टयमर पण निर्माण होतो. (हाय मोहब्बत जिंदाबाद ! ) नायकाला समाजसेवेचें व्रतहि धारण करावे लागते नि सरसाहेबाच्या लफंग्या पुतण्याला एका नाचणारणीच्या नादीहि लागावें लागते. पण हा सगळा घोळ घालूनहि चित्रकथा काही समर्थपणें रसिकापुढें उभी राहूं शकली नाही. सारा तकलुवीचा कारभार.

या चित्राच एकच उल्लेखनीय वैशिष्टय म्हणजे त्याची निर्मिती.

## १९६२ सालांत प्रकाशित झालेले मराठी चित्रपट

१. स्नेहल चित्र माझी ' आई ' २. सुदिन चित्र ' पुत्र व्हावा ऐसा ' ३. श्रद्धा चित्र ' भिंतीला कान असतात ' ४. सुरेल चित्र ' बायकोचा भाऊ ' ५. मनीषा चित्र ' जावई माझा भला ' ६. मानिनी चित्र ' सुख आलें माझ्या दारी ' ७. राघव चित्र ' वरदक्षिणा ' ८. चित्रवदना ' बाप माझा ब्रह्मचारी ' ९. चित्र गुंजन ' सोनियाची पावले ' १०. सुहास चित्र ' सप्तपदी ' ११. अनत चित्र ' प्रीति विवाह ' १२. शत्रुजित फिल्म्स् ' विठू माझा लेकुरवाळा ' १३. अनत चित्र ' भाग्यलक्ष्मी ' १४. सागर चित्र ' क्षण आला भाग्याचा ' १५. महाराष्ट्र फिल्म्स् इंडस्टियल को-ऑपरेटिव्ह सोसायटी– ' रंगल्या रात्री अशा ' १६. यशोधन चित्र ' चिमण्याची शाळा ' १७. निर्मल चित्र ' सुनबाई ' १८. चित्र साधना ' प्रेम आंधळं असतं ' १९. चित्र गंगा ' नंदादीप ' २०. विनय चित्र ' निरुपमा आणि परीराणी '.

मूल्यें सकस होतीं. कोठेंहि दारिद्र्याचे दर्शन झालें नाही. मराठी चित्रपट असूनहि निर्मात्यानी सढळ हातानें अनेक जागी पैसा खर्च केला होता.

' भिंतीला कान असतात ' या नावावरून कांही तरी वेगळें गंमतीदार पाहायला मिळेल असे वाटलें होते. पण हिंदी चित्रपटात जी नेहमी बघायला मिळते तशीच रडारड. समज गैरसमज नि एकदोन दिलखेचक नृत्यें पहायला मिळाली. थोडक्यात म्हणजे मराठी नाव धारण केलेला हा हिंदी चित्रपटच वाटला. त्याचा निर्माता व कथालेखक बहेराम नामक एक महाराष्ट्रीयेतरच आहे हेंहि याबाबत लक्षांत ठेवलेले बरें.

चित्रगुंजनच्या ' सोनियाची पावलं ' नें तर वेगळाच विक्रम केला आहे. शादी व मगल फेरा या हिंदी व गुजराथी चित्रपटांवरून हा मराठी चित्रपट जन्मास आला होता. पुराणातील ' सती अनुसया ' छापाची ही कथा. अगदी अलिकडच्या छोटे नवाब या मुस्लिम पार्श्व भूमीवरील चित्रपटाचाहि थोडाफार परिणाम या चित्रपटावर झाला होता. एका साध्वी स्त्रीचे हाल पहाण्यातहि गंमत वाटणारा नि तिच्या बरोबर आंसवें ढाळण्यांतहि आत्यंतिक समाधान मानणारा बाल-बुद्धि प्रेक्षक जोपर्यंत आपल्याकडे आहे तोंपर्यंत अशा कथानकाचे चित्रपट चालणारच. हा चित्रपट एका गुजराथी निर्मात्याच्या मांड-वलावर उभा राहिलेला असल्यानें असे हिंदी नि गुजराथीकरण झालेले कथानक मराठी प्रेक्षकांना पहायला मिळालें तर नवल नाही ! मराठीत मातब्बर कथालेखकांचाच तुटवडा पडत चालला आहे असेच अनुमान काढावें काय ?

### कांहीं वेगळे चित्रपट

सुदिन चित्रच्या ' पुत्र व्हावा ऐसा ' नें मातेचा त्याग व पुत्राची जिद्द यांचे वेगळें दर्शन घडविले तर सुहास चित्रच्या ' सप्तपदी ' ने सांगि-तले— वडिलोपार्जित इस्टेटीवर जगण्यापेक्षां स्वकर्तृत्वावर उभें रहाणे सर्वश्रेष्ठ होय. अनत चित्रच्या ' प्रीतिविवाह ' चा संदेश होता प्रेमविवाह सफल होत नाहीत. हें तर ' भाग्यलक्ष्मी ' चें म्हणणें होतें. जीवनात तडजोडीला अधिक महत्त्व द्यावें. प्रेमभंग झाला म्हणून काहीं जीवन बरबाद होत नाहीं. तसें कुणी करूंहि नये.

या चारहि चित्रपटांची मांडणी तितकीशी ठसठसीत नव्हती पण तरीहि त्यांनी प्रेक्षकांना रिझविलें. भाग्यलक्ष्मी व प्रीतिविवाह या दोन्हीहि ' अनंत ' चित्रात फिल्मिस्तानचे पहिले प्रेम डोकावले. त्यातील अनेक दृश्यें तर लोकप्रिय हिंदी चित्रपटांतून सही सही उचललेली होतीं !

या १९ चित्रपटात सर्वांत भयंकर वाटला तो चित्रवदनाचा ' बाप माझा ब्रह्मचारी ' हा चित्रपट ! चमत्कारिक नावामुळें नि बिन च्या सर्व कलावंताच्या वापरामुळें या चित्रपटाविषयी लोकांच्या खूपच अपेक्षा निर्माण झालेल्या होत्या. चित्रासाठी भरमसाट खर्चहि झाला होता. नि ' नाझ ' सारखें मुंबईतील प्रथम दर्जाचें शीतल चित्रपट गृहहि या चित्राच्या प्रकाशनाला लाभले होतें. परंतु या चित्रपटाचा जसा गाजावाजा खूप झाला तसाच तो आपटलाहि खूप जोरानें.

जन्म रहस्य कळल्यानें वेडा झालेला एक तरुण प्राध्यापक आणि त्याला आपल्या रागदारी संगीताच्या जोरावर बरें करूं पहाणारा एक गवई याची ही कथा तसे म्हटले तर मनाची पकड घेण्यास अयशस्वी ठरूं नये. पण चित्रपटानें एकंदर कथानकास एवढें हास्या स्पद केलें की त्यानें कुठेंहि मूळ धरलेंच नाही.

विनय चित्राची निरुपमा आणि परिराणी हा चित्रपट बालासाठीच निर्माण झालेला. त्याचें कथानक चांगले होतें. आणि त्याचा आविष्कारहि सुरेख होता. त्यामुळें बालमन त्यात चटकन् रमे. पण हा बोलपट लघुपट असल्याने नि त्याला चित्रपट गृहाचें भरमसाट भाडें परवड-णार नसल्याने एका जागी सलग असा कुठें तो प्रकाशित होऊं शकला नाहीं.

एकंदर १९६२ सालांतील चित्रनिर्मिति ही अशी आहे.

□ □ □



# दीर्घायुष्य व कायाकल्प

लेखांक तिसरा

पु. ना. ओक

रोज पुरेशा प्रमाणांत व योग्य प्रकारें दूध पिणें मानवी जीवनास जरूर असतें. दूध न पितां दहीं वा लोणी खाल्लें तरी चालतें. परंतु या तीन्हींपैकीं एक वा अधिक पदार्थ रोजच्या आहारांत अंतर्भूत असणें जरूर आहे.

गवळी वांसराला दुष्टपणें दूर सारून व इतर अमानुष प्रकारांनीं गायींना पिळवटून दूध काढतात व विकतात अशा उद्वेगी विचारांच्या भरांत 'मी जन्मभर दूध पिणार नाहीं' अशी महात्मा गांधींनीं प्रतिज्ञा केलेली होती. परंतु दुग्धाविना मानवी जीवन अशक्य आहे; असें डॉक्टरांनीं वारंवार सांगितल्यानें महात्मा गांधींनाहि आपल्या प्रतिज्ञेला मुरड घालून शेळीचें दूध सेवन करणें अवश्य झालें.

वर सांगितलेले दूधदुभत्यांचे प्रकार आहारांत नसले तर शरीर व चेहरा मद्द दिसणें, दृष्टि अधू होणें, कान बधीर होणें बद्धकोष्ठता, अशक्तता, त्वचारोग इ. वाटेल ते विकार संभवतात. किंबहुना शरीरयंत्राचीं सर्व अंगोपांगें नीट व सुरळीत चालण्यास, व चपळता, वृद्धि, कार्यक्षमता, जोम आणि आयुष्य वाढण्यास दूधदुभत्याची अत्यंत जरूर आहे.

प्रत्येक प्रौढ व्यक्तीनें दिवसांतून दोनतीन वेळां मिळून निदान एक शेर (८० तोळे) शुद्ध दूध घेणें जरूर आहे. आज जे कोणी ऐपत असून दूध घेत नसतील त्यांनीं अवश्य सकाळीं, संध्याकाळीं, रात्रीं निजतांना व दोन्ही वेळां जेवणाबरोबर असें झेपेल त्याप्रमाणें विभागून दूध प्यावें.

ज्यांना दूध पचत नसेल त्यांनीं तेवढेंच (म्हणजे निदान ८० तोळे दहीं खावें. दहींसुद्धां वर सांगितल्याप्रमाणें झेपेल तसें विभागून घ्यावें. दहीं चटकन् पचतें व सत्त्वांश त्यांत दुधाइतकाच असतो.

गायीपेक्षां म्हशीचें दूध चांगलें असा अपप्रचार सध्यां चालू आहे. परंतु आजवरच्या मानवी इतिहासाचें अवलोकन केल्यास पुरातन कालापासूनच शास्त्रापासून तो अद्यावत् शास्त्रीय युगापर्यंत म्हशीच्या दूधास मानवी आहारास योग्य असें कोठेंच मानलेलें दिसत नाहीं. इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, जपान, अमेरिका आदि देशांत म्हशीचें दूध असा वाक्प्रचारच नाहीं. दूध गायीचेंच असेंच ते मानतात. सीलबंद डब्यांतून येणारें दूध गायीचेंच असतें. एकाहि डब्यावर म्हशीचें दूध असें लिहिलेलें नसतें किंवा म्हशीचें चित्र नसतें. त्यांच्याकडे म्हशी होत नाहींत हें म्हणणें चुकीचें आहे. समान हवामान असणाऱ्या, समान कटिबंधांतल्या देशांत समान प्राणी व वनस्पती असतात हा निसर्गाचा नियम आहे. पाश्चात्य देशांत शेतीसाठीं रेडे राबवतात हें आपणांस सिनेमांत पाहावयास मिळतें व पुस्तकांत–मासिकांत लिहिलेलेंहि आढळतें. अर्थात् तिकडेहि म्हशी होतात. परंतु ते लोक मानवी आहारास म्हशीचें दूध योग्य समजत नाहींत हेंच सिद्ध होतें.

## अधिकारी व्यक्तींचें मत

कांहीं वर्षांपूर्वीं दिल्ली राज्याच्या शेती व डेअरी अधिकाऱ्यांशीं माझें या विषयांवर बोलणें झालें. ते अधिकारी गोव्याच्या बाजूचे परंतु भारतीय ख्रिश्चन होते. तेहि म्हणाले, " The buffalo is not a dairy animal at all. " भारतांतच आधुनिक कालांत गायीबरोबर म्हशीचें दूधहि कसें प्राशनयोग्य मानलें जातें यावद्दल त्यांनीं आश्चर्य व्यक्त केलें.

आपल्या भारतीय परंपरेंतहि म्हशीचा कोठेंच नामनिर्देशहि नाहीं. गवळी, गोप, गोपाळ, गोपी, गोमुख, गोधन, गोदान, गोपूजन, गोसेवा,

# दुग्धपान :

- गायीच्या दुधाचें महत्त्व
- साखरेचा सदोष वापर

गोबर, गुरखे, गोसावी, गोरक्षक, गोब्राह्मणप्रतिपालक, गोपालकृष्ण इत्यादि सर्व शहरातून गायीच्याच दुग्धामृताची गोडी गाइलेली आहे.

उलट महिषी जातीचा जर कोठें संबंध आलेला असेल तर तो यमाचे वाहन (रेडा) म्हणून आलेला आहे. यावरूनच म्हशीच्या दुग्धाचे काय परिणाम होत असावेत याचा ज्याचा त्यानें विचार करावा. हजारों वर्षांच्या आपल्या परंपरेत व शास्त्रीय शोधात अग्रेसर असणाऱ्या पाश्चात्य देशातहि म्हशीला दुभतें जनावर म्हणून कोठेंच स्थान नाही हें ओळखून म्हशीचें दूध पिणे सोडून दिलें पाहिजे व दूध म्हणजे गाईचेच ही प्रथा पुन्हा रूढ झाली पाहिजे.

तसें पाहिले तर प्रत्येक मादी दूध देते. म्हशीचें दूध प्यावें तर गाढवी, कुत्री, उटीण, डुकरीण, शेळी, वाघीण, हत्तीण याचें दूध का पिऊं नये ? या प्राण्याचे दूध पिणें आपणास जितकें त्याज्य वाटतें तितकेंच म्हशीचें दूधहि त्याज्य होय हें हजारों वर्षांच्या संकलित मानवी अनुभवानें व अद्यावत शास्त्रीय दृष्टीनें वागणाऱ्या पाश्चात्यांच्या व्यवहारावरून स्पष्ट होते.

दूध धारोष्ण पिणें उत्तम. मूल मातेचे दूध धारोष्णच पितें. ते उकळून पीत नाही.

कांही कारणाने धारोष्ण दूध उपलब्ध नसल्यास तें एकदाच मंद आचेवर साय येईपर्यंत तापवून प्यावे. दिवसातून ठरलेल्या दोन तीन दुग्धपानांच्या वेळी धारोष्ण दूध मिळाल्यास उत्तमच. तें नच जमले तर ताजें दूध मदाग्नीवर तापवून प्यावे. तेहि शक्य नसेल व सकाळी एकदाच भरपूर घेऊन ठेवलेले दूध दिवसभर पुरवायचे असेल तर तें एकदांच मदाग्नीवर तापवलेलें असावें. दिवसभर लागेल तेव्हां तसेंच (थडच) प्यावें. पिण्याचे वेळी (किंवा चहा-कॉफी घेण्याचा अट्टाहासच असेल तर) चहांत (कॉफीत) घालते वेळी पुन्हां पुन्हां तापवू नये. थंडीत रात्रीसुद्धां लहान अर्भकाना वरचे दूध देतांना (एकदाच तापवलेले) थड दूधच द्यावें. उकळल्याने व वारंवार तापवल्याने शरीरास पुष्ट करणारे दुधांतील सूक्ष्म जीवजंतु मरतात. ते मेल्यावर दूध हें शरीरांत जडान्नच ठरतें.

### पाश्चराईज्ड दूध

दूध पाश्चराइझ् करण्यानें लवकर नासत नाही. परतु पाश्चरायझेशन केल्यानेंच ते काहीसें सत्त्वहीन बनते या गोष्टीकडेहि विशेष लक्ष दिले पाहिजे. शरीरास पुष्ट बनविणारे दुधांतील जीवजंतु नवीन जन्मलेल्या अर्भकाप्रमाणें अगदी कोमल व नाजूक असतात. त्यास कसल्याहि प्रकारची धिंगामस्ती सहन होत नाही. उकळणे, वारवार तापविणें, घुसळणें, बर्फ ओतणें, साखर घालणे, लाबच्या प्रवासात दुधास सारखे हिसके बसणें, एकदम तापवून लगेच थंड करणें, भाड्याभांड्यांतून ओतणें, पाणी मिसळणें, धूळ, धूरपूर्ण अशा अस्वच्छ वातावरणात दूध ठेवणें, दुधांत अस्वच्छ वस्तु किंवा हात बुडविणें आदि प्रकारानी दूध अगदी निःसत्त्व बनते. हे सगळे प्रकार ज्या दुधाच्या बाबतीत होतात त्या दुधाची दैना तर विचारूच नका. असें दूध सेवन करणें न करणे सारखेंच. दूध पाश्चराइझ करताना भरकन एका वाफवलेल्या व एका बर्फावलेल्या नळकांड्यातून ते वाहवतात. यांत वाहवण्याची क्रिया वाईट. शिवाय अतितप्त व अतिशीत नळकांड्यांतून ओढून काढलेल्या दुधांतील जीवजतु तिरिमिरी येऊन काही बेशुद्ध तर कांही गतप्राण होतात. उन्हाळ्यात गारीगार वातावरणातून बाहेरच्या कडक उन्हात पदार्पण करणारा मनुष्य एकदम मरण्याचा संभव असतो. कडक उन्हातून शीत वातावरणात जाणाऱ्या माणसाची तीच गत होते. तीच अवस्था दुधांतील नाजूक जीवजंतूंचीहि होते. म्हणून पाश्चराईज्ड दूध धारोष्ण दुधापेक्षां सत्वाच्या दृष्टीनें पुष्कळच हीन असतें.

पंजाबी लोकांत लस्सी घेण्याची प्रथा आहे. वरपागी दिसण्यात ही प्रथा फार चागली वाटते व लस्सी आणि पंजाबी हे शब्द उच्चारतांच सशक्त धिप्पाड व तजेलदार माणसाची मूर्ति डोळ्यांसमोर उभी रहाते. परंतु हल्लीची लस्सीची रूढ पद्धत ही शरीराचा ऱ्हास करवणारी आहे. पंजाब्यांचे पूर्वज आजकालच्या सारखी लस्सी घेत नसत. एक लहान मडकें भरून ताजें दही चमच्यानें वा बोटानें ढवळून, एकजीव करून पूर्वीचे पंजाबी लोक रोज सकाळी न्याहारीस घेत असत. अशी लस्सी घेतली तर ती खरोखरच फार उत्तम असते. (महाराष्ट्रातहि सकाळी दहीभाकरी खाण्याची पद्धत असे.) त्या पंजाब्याचे वंशज म्हणून आजचे पजाबी अगापिंडाने इतरापेक्षा जास्त उभे आडवे दिसत असतील. परतु आतां ते ज्या प्रकारची लस्सी घेतात तीमुळें ते त्यांच्या पूर्वजांइतके धिप्पाड, तजेलदार व दीर्घायुषी केव्हाहि असणार नाहीत. हल्लीची लस्सी म्हणजे दही जोरजोरांत रवीने घुसळून फेसाळणें, त्यात भरपूर साखर मिसळणें व उन्हाळ्यांत त्यात अनेक बर्फाच्या खड्याचा खडबडाट करणें अशी असते. साखर घालणें हे मोबिलऑईलमध्यें मूठभर धूळ मिसळण्याइतकें घातक ठरतें हें वर सागितलेच आहे. शिवाय (दूध किंवा) दह्यात साखर व बर्फ मिसळून त्यात रवीने जोरांत घुसळून खडबडत, धिंगामस्ती व शैत्य निर्माण केल्याने शरीरास पोषक असें दह्यांतील कोमल जंतु निर्बुद्ध, निःशक्त, पगू व मृत होतात. म्हणून 'लस्सी' हे नाव जरी गोडस व

वाळसेंदार वाटत असलें तरी आजकालची प्रचलित लस्सी कुचकामीच होय हें स्पष्ट होतें. दुधाच्या लस्सीसहि तोच न्याय लागू होतो दूध, दही व लोणी या अत्यत नाजूक परतु अत्यंत शक्तिदायी, आयुष्यवर्धक वस्तु होत. त्याच्याशो धिगामस्ती न करतां, त्यात साखर, बर्फ, पाणी इ. पदार्थ न मिसळतां, अग्नीचा फाजील संपर्क होऊं न देतां, स्वच्छ व ताज्या घेतल्या तरच त्यांचा फायदा होतो.

**साखरेंतील दोष**

दुधात, दह्यात (वा अन्य प्रकारें आहारांत) साखर घातल्याने शरीरयंत्रास लागणाऱ्या ओशटपणांत (मोबिल ऑईलमध्यें) धूळ मिसळल्यासारखें होतें. आणखी तीन कारणांस्तव साखर दुधात दह्यांत (आहारात) वर्ज्य ठरते. पहिले कारण म्हणजे साखर ही उसाच्या रसाची एक प्रकारची राख होय. शरीरात जिरून शरीराचें पोषण होईल असा सत्त्वांश त्यात जवळजवळ उरलेलाच नसतो. साखरेचा मूळ पदार्थ उसाचा रस. तो उकळून, उकळून व घोटून गूळ किंवा राब होते. बऱ्याच दिवसानतर पुन्हा हा उकळून, घोटून काहीसा निष्प्रभ, शिळा व कारखान्याच्या पिपातून (सूक्ष्म शास्त्रोक्त दृष्टचा) अस्वच्छपणे ठेवलेला पदार्थ यत्रात घालून अनेक जोराचे गिरके देऊन तावून सुलाखून साखर म्हणून निघतो तेव्हां शेतातील उसाच्या रसाचे कोणते सत्त्वाश त्यात उरूं शकतील ? साखर पोटांत गेल्यावर आतडी जेव्हां त्याच्यातील शारीरपोषक रसशोषण करूं पाहातात तेव्हां महत्प्रयत्नाती त्याना साखरेंतून काही सत्त्व मिळत नाही. त्यामुळें साखर ही शरीर यत्रांत अडवणूकच करवते. म्हणूनच पक्वान्नें, मिष्टान्नें, साखर असलेले कोणतेहि पदार्थ हीं जडान्नें होऊन अपाचक ठरतात त्याची घाण शरीरांतच साठून राहिल्याने शरीराचा ऱ्हासच करवतात. एवढ्याचसाठी साखर फार खाणारी मुले लहानपणीच किंवा मोठेपणी लवकरच रोगी व दुर्बल बनतात.

साखर आहारांत घेतल्यानें मनुष्य जरुरीपेक्षा जास्त खाऊन शरीरांत अडचण निर्माण करतो. भूक असो नसो गोड पाहिलें की खाण्याची बुद्धि होते व ते सार्धें अन्न खाववलें असतें त्यापेक्षां साहजीकच जास्त खाल्लें जातें सणावारी गोडधोडाचे जेवण जास्त जेवल्याचा प्रत्येकाच्या नित्याच्या अनुभवांतला आहे. हा साखरेचा दुसरा दोष आहे. साखरेतील (व गुळांतीलहि) आणखी एक दोष म्हणजे त्यांत असलेली धूळ व घाण वरून कितीहि गोंडस, पाढरी शुभ्र व दाणेदार दिसली तरी साखर पाक करण्यासाठी पाण्यांत टाकून थोडी तापवताच पाण्यावर घाणीचे तवंग येतात व ते आपण शक्य तेवढे झाऱ्यानें काढून टाकतों हा नित्याचा अनुभव आहे. परंतु तेवढीहि घाण न काढता आपण ती रोज चहा, कॉफी, दूध, दही, पुरण, श्रीखंड खवा, लाडू, वड्या, शिरा इत्यादीत टाकून मिटक्या मारीत भक्षण करतो. यामुळें किती घाण पोटांत जात असेल याची कल्पनाच केलेली बरी. वास्तविक कोणताहि खाण्याचा पदार्थ निवडून, पाखडून, धुऊन, घासलेल्या धुतलेल्या स्वच्छ पात्रांत सोवळ्याने शिजविण्याची किंवा आहारास घेण्याची पूर्वीची प्रथा असे. हल्लीच्या यात्रिक युगात तुसे असलेल्या, न धुतलेल्या गोणपाटाच्या पोत्यातून भरलेली चिकट, अनेक गोदी व मालगाड्यातून अंधारात धूळ व पाऊस खात पडून राहिलेली, वाण्याकडे उघड्यावर माश्याच्या तावडीत सापडलेली साखर (गुळाचीही हुबेहूब अशीच कुळकथा आहे) विकत किंवा उसनी घेऊन, शुद्ध करण्याची काहीच जरुरी नाही अशा खात्रीने सरळ सोवळ्याच्या स्वयंपाकात, एकादशीच्या फराळात, लग्ना-मुंजीच्या श्राद्धाच्या वा सणावाराच्या पक्वान्नात किंवा लहान मुलांच्या व आपल्या चहा, कॉफी, दुधात आपण विनादिक्कत घालतो हेहि भारतांतील रोगराईचें, निस्तेज चेहऱ्यांचें, रोगी शरीराचे, व अल्पायुष्याचें एक मोठें कारण आहे. □ □ □


**समाज प्रबोधन संस्था**

**१२४२, सदाशिव पेठ, पुणें २.**

| | |
|---|---|
| **आर्थिक विकासाचा प्रश्न** : दे. अ. दाभोलकर | १.५० |
| **लोकशाहीचा कारभार** : सदाशिव आठवले | २.०० |
| **विश्वरचना** : ना. वा. कोगेकर | १.२४ |
| **आपला महाराष्ट्र** : पन्नालाल सुराणा | २.५० |
| **अपंगत्वावर विजय** : उषा मोहनी | २.६० |
| **भारतीय शेती** : स. ह. देशपाडे | २.०६ |
| **राजकीय पक्षांसाठीं आचारसंहिता** : (सं. निबंध) | २.०० |
| **अंतरिक्ष प्रवास** : ना. वा. कोगेकर | २.०० |

**पांढरे डाग**

अनुभवी प्रसिद्ध गुणकारी औषध. अनेक बक्षिसें व हजारों अभिप्राय मिळाले आहेत व नित्य मिळतात. औषधाची किंमत ६ रुपये पो. ख. १ रु. माहिती मागवा. मोफत पाठवू

नकली वैद्यापासून सावध राहावें.

**वैद्य बी. आर्. बोरकर. आयुर्वेद भवन (माणू.)**

मु. पो. मगरूळपीर. जि. अकोला (महाराष्ट्र.)

रंगा मराठे

भालजींचा बहिर्जी चित्रपट

# मोहित्यांची मंजुळा

## अजोड कांहीं नाहीं, सारी तडजोडच !



मंजुळा — जयश्री गडकर

### प्रास्ताविक

शिवकालीन इतिहासाचा कलश हा स्फूर्तिदायक, तेजस्वी, अंगावर रोमांच उभे करणाऱ्या घटनांनीं भरलेला आहे. या काळांतील इ. स. १६५४ ते ५६ च्या काळांतील ऐतिहासिक पार्श्वभूमि घेऊन "मोहित्यांची मंजुळा" ही काल्पनिक प्रेमकथा भालजींनीं पडद्यावर आणली आहे. सध्यांच्या आपल्या देशाच्या राजकीय परिस्थितीचा विचार केला तर या कालांत स्फूर्तिदायी ठरावी अशी एखादी शिवकालीन प्रेमकथा भालजींनीं निवडावी हें त्यांच्या विशिष्ट परंपरेला धरूनच आहे. चित्रपट हें जनतेंत चैतन्य निर्माण करणारें एक अत्यंत प्रभावी माध्यम आहे. जिवाचें रान करून आणि झीज सोसूनहि गेल्या पंचवीस वर्षात भालजींनीं अनेक स्फूर्तिदायक चित्रपट जनतेला सादर केले आहेत. याबद्दल शहाणासुर्ता मराठी प्रेक्षक यांचा सदैव ऋणीच राहील. भालजींच्या नव्या चित्रपटाची मराठी सिनेरसिक नेहमींच मोठ्या आशेनें वाट पाहत असतो. परंतु शहाणेसुर्ते हे अल्पसंख्य असतात. त्यामुळें चित्रपटाचें आर्थिक यश अन्य मालमसाल्यावर अवलंबून राहतें. मोहित्यांच्या मंजुळेच्या निर्मितीच्या वेळीं भालजींनीं आपली नजर निव्वळ करमणुकीवर मुक्रर केली असें जरी म्हणतां आलें नाहीं तरी बरीच तडजोड त्यांनीं स्वीकारली आहे असें नाइलाजानें म्हणावें लागतें.

### कथानकाची मूळ पार्श्वभूमि

जावळीच्या चंद्रराव मोऱ्यांनीं शिवाजीराजांशीं वैर धरलें होतें. स्वराज्यांत सामील व्हायला ते तयार नव्हते. महाराजांनीं सामोपचारानें समजावूनसुद्धां मोरे वठणीवर येत नव्हता. (इ. स. १६५४). याच सुमारास महाराजांच्या राज्यांतील मुसे खोऱ्यांतील रंगोजिमल वाकडे नांवाच्या एका कुलकर्ण्यानें एका विधवेशीं पाप केलें. अशा गुन्ह्याला महाराज शासन किती कडक करतात हे रंगोजिमलला माहीत असल्यामुळें तो चंद्रराव मोऱ्यांच्या आश्रयाला गेला. आपल्या राज्यांतील गुन्हेगाराला मोऱ्यांनीं पाठीशीं घातलेलें महाराजांना आवडलें नाहीं. पुढें पुढें तर चंद्रराव व त्याचा कारभारी व नातेवाईक हणमंतराव मोरे फारच गुर्मीनें वागूं लागले. महाराजांनीं पाठविलेल्या कडक थैलीची दखलसुद्धां चंद्ररावानें घेतली नाहीं. चंद्ररावाच्या या बेगुमान वागण्यानें महाराजांच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. त्यांनीं जावळीवर हल्ला केला व जावळी काबीज केली. चंद्रराव पळून गेला. परंतु महाराजांनीं त्याला कोंडींत पकडून कैद करून त्याच्या दोन मुलांसह त्यास ठार केलें.

### काल्पनिक कथा

वरील ऐतिहासिक घटनांच्या पार्श्वभूमीवर भालजींनीं बहिर्जी नाईक व मोहित्यांची मंजुळा यांची प्रेमकथा गुंफली आहे. या काल्पनिक कथेचा खुलासा अर्थातच चित्रपटांत केलेला आहे. जावळीपासून जवळच असलेल्या खड्यांत आईबाप नसलेली मंजुळा (जयश्री गडकर) आपल्या आत्याजवळ (इंदिरा चिटणीस) राहत असते. खंडोबाच्या जत्रेला ती मैत्रिणींसह गेली असतां तिच्यावर केदार मोरे (राजा पटवर्धन) या चंद्ररावाच्या नातलगाची वाईट नजर जाते. जत्रेंत मंजुळा दांडपट्टा खेळून त्याला चीत करते. केदारनें तिच्याशीं सलगी करण्याचा प्रयत्न केल्यावर ती त्याचा उघड अपमान करते. याच जत्रेंत "सोंगाड्या" म्हणून बहिर्जी नाईक (सूर्यकांत) आपलें कसब दाखवतो. त्याच्यावर खूष होऊन केदार त्याला आपल्या पदरीं नोकर म्हणून ठेवून घेतो. केदार खूष होऊन मंजुळेला लग्नाची मागणी घालतो आणि मंजुळा ती साफ धुडकावून लावते. मोंगलांच्या आश्रित

सरदाराशीं लग्न करण्यापेक्षां शिवरायाच्या एखाद्या शिलेदाराबरोबर लग्न करीन असें झणझणीत उत्तर केदारला मिळतें. सूडबुद्धीनें केदार मंजुळेला पळवण्याचा घाट घालतो. परंतु त्याचा सुगावा सोंगाड्या बहिर्जीला लागतो. तो केदाराच्या हस्तकांना ठार मारून मजुळेची मुक्तता करतो. केदारला मंजुळेवर सूड उगवायचा असतो. तो आपल्या पदरी ठेवलेल्या सोंगाड्याला शिवाजीचा शिलेदार म्हणून बतावणी करायला सांगतो. या बतावणीला बळी पडून मजुळेचा सोंगाड्याशीं विवाह होतो. अर्थात् बहिर्जीला आपले खरें स्वरूप प्रकट करणें त्याच्यावरील जबाबदारीमुळें शक्य नसतें.

महाराजानी बहिर्जीला गुप्त हेर म्हणून जावळीला पाठविलेले असतें. रंगो वाकडे बदफैली कुळकर्ण्याला दिलेली देहान्त शिक्षा अंमलात आणून जावळीची वित्तबातमी महाराजाना पोहचवायची कामगिरी त्याच्यावर असते. आणि याच धामधुमीत मंजुळेशी बहिर्जीला विवाह करावा लागतो. केदारचा नोकर म्हणून बहिर्जीचा कुठेंहि प्रवेश होऊं शकतो. सधी साधून तो रगोबापूला यमसदनाला पाठवतो. चदरराव मोरे (जयशंकर दानवे) व त्याचा कारभारी (बाबूराव पेंढारकर) या घटनेमुळें संतापून जातात. हें कृत्य शिवाजीचेच असले पाहिजे याची त्याना खात्री पटते. परंतु खुनी इसमाचा पत्ता त्याना पुष्कळ प्रयत्न करूनहि लागत नाही.

इकडे केदार मंजुळेला भेटून तिला सागतो की तुझा नवरा शिवाजीचा शिलेदार नसून माझाच नोकर आहे. मजुळा संतापते व बहिर्जीला वाटेल तसें बोलते. परंतु हें सारें सहन करूनहि बहिर्जी आपण कोण आहोंत याचा पत्ता तिला लागूं देत नाहीं.

चंद्रराव मोरे अजूनहि वठणीवर येत नाही. हें पाहून महाराजाचा (चंद्रकांत) खलिता घेऊन रघुनाथराव (शंकर कुलकर्णी) व मावजी (मा. विठ्ठल) अखेरचा यत्न करतात. या खलित्यास चंद्ररावाने वाटाण्याच्या अक्षता देतांच जावळीवर हल्ला होऊन घनघोर युद्ध पेटते. बहिर्जी नाईक हा केदारकडून मोरे घराण्याची अंगठी मिळवतो व केदारचा कांटा काढून त्याचा पोशाख घालून मोरे यांच्या शिबंदीत फंदफितुरी माजवतो. मंजुळा तलवार उपसून महाराजाच्या बाजूने लढाईत सामील झालेली असते. जावळीच्या चंद्ररावाचा पाडाव होतो. महाराजांना अतिशय आनद होतो. मंजुळेला पत्ता लागतो की आपला नवरा हा केदारचा नोकर नसून शिवाजीचा उजवा हात बहिर्जी नाईक हा आहे. तिचा आनद गगनात मावेनासा होतो. महाराज मंजुळेचा पराक्रम पाहून अतिशय आनदित होतात. ते जातीनें मजुळेला भेटायला येतात. तिचें आणि बहिर्जीचे कौतुक करून त्याना ते शाबासकी देतात आणि चित्रपट सपतो.

**पटकथा : संवाद :**

पटकथा भालजीचीच असल्यामुळें ती आकर्षक असून खटकेबाज व धारदार सवादामुळें तिला उत्तम रंगतहि येते. असें असूनहि प्रेक्षक धड ऐतिहासिक प्रसंगाशी समरस होऊं शकत नाहीत की मजुळेच्या प्रेमकथेशी एकरूप हीत नाहीत. याचे कारण उघडपणें जाणवतें ते असें की भालजीनी या चित्रपटाचें स्वरूप एक प्रेमकथा ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. भालजीच्या चित्रपटात तो हेतु प्रेक्षकाना अभिप्रेत नाही. अर्थातच बहिर्जी महत्त्वाच्या कामगिरीवर घराबाहेर पडल्यानंतर तो पुढें काय करतो याविषयी प्रेक्षकांना उत्सुकता असताना त्याना मंजुळेचे एक दर्दभरें विरहगीत ऐकावे लागतें. मोऱ्याचें राजकारण रगत असताना साखरपुड्याचे घोळवलेले गाणे प्रेक्षकाना ऐकत बसावे लागते. मजुळा आणि बहिर्जीचे गैरसमजुतीमुळें निर्माण झालेलें दु:ख ते दोघे पुन: पुन: चघळू लागले की प्रेक्षकाना जांभई येते. करमणूक होते ती भालजीच्या प्रभावी सवादामुळें. मात्र या काल्पनिक कथेच्या मोहाला बळी पडून भालजीनी काही ऐतिहासिक सत्यें डावलली आहेत. जावळीच्या कामगिरीवर बहिर्जीची नेमणूक केली गेली होती याला ऐतिहासिक पुरावा नाही. रगोजीमल वाकडे चंद्ररावाच्या आश्रयाला गेल्यानतर लवकरच मरण पावतो. त्याचा खून झालेला नाही. वरील दोन गोष्टी सोडल्या तर पटकथा इतिहासाशी इमान ठेवून आहे.

**अभिनय : छायालेखन : संगीत**

या चित्रपटात सारेच कलावत नांवाजलेले असल्यामुळें अभिनयाची कमतरता कुठेंच भासत नाही. सर्वांत अभिनयात उच्चांक गाठला आहे तो जयश्री गडकर यानी. शूर तडफदार आणि स्वाभिमानी स्त्रीची उत्कट व्यक्तिरेखा मंजुळेच्या रूपानें त्यांनी उभी केली आहे. दाडपट्टा खेळताना, खटकेबाज संवाद उच्चारतांना किंवा तलवार चालवताना एका तडफदार स्त्रीचे वास्तववादी चित्र त्यानी प्रेक्षकांसमोर उभें केलें आहे. सूर्यकात दानवे, शंकर कुलकर्णी, बाबुराव पेंढारकर, चित्तरंजन, वसंत शिंदे या सर्वांची कामें उत्कृष्ट झाली आहेत.

हे सर्व बोलून चालून कसलेले नट आहेत. परंतु राजा पटवर्धनाना खास शाबासकी द्यायला हवी. त्यांनी आपली खलनायकाची (केदार) भूमिका चागली वठवली आहे. मात्र त्यांच्या हुजऱ्याचें काम चित्तरजनने केल्यामुळें त्याला वाव देण्याच्या प्रयत्नात तो फार आगाऊपणा करतो असे वाटतें. त्यामुळें केदारच्या व्यक्तिमत्त्वालाहि गालबोट लागतें. अर्थात् हा प्रकार भालजीनी करायला नको होता. सूर्यकांतचें बहिर्जीचें काम त्यांच्या आतापर्यंतच्या भूमिकेंत उजवे ठरेल इतकें चागलें झालेलें आहे.

चागल्या अभिनयाला लाड याच्या उत्कृष्ट छायालेखनाची साथ मिळाली आहे. चित्रपटांतील बरेचसे देखावे (outdoor) नैसर्गिक पार्श्वभूमीवर घेतल्यामुळें त्यांत जिवतपणा आला आहे. जत्रेंतील प्रसंग, लढाईचे देखावे कौशल्यपूर्ण आहेत. सगीताला चित्रपटात फारच कमी प्राधान्य दिलें आहे. द्वंद्वसंगीत कटाक्षाने टाळलेलें दिसतें. मास्टर आनंद धान यानीं सगीत दिलेला हा बहुधा पहिलाच मराठी चित्रपट असावा. सगीत चित्रपटाला साजेसे भारदस्त व आल्हादकारी आहे.

चित्रपटाची पार्श्वभूमि शिवकालीन असल्यामुळें प्रेक्षकाना त्याबद्दल फार आदर व आकर्षण वाटतें. कांही घटना पड्यावर पाहात असतांना प्रेक्षकाच्या अंगावर रोमांच उभे राहतात ते केवळ या आत्यतिक उमाळ्यापायी. मंजुळेची जयश्री गडकरांनी उभी केलेली व्यक्तिरेखा, उत्कृष्ट छायाचित्रण, खटकेबाज संवाद, करमणुकीचे प्रसग यांमुळें ही शिवकालीन प्रेमकथा प्रत्येक भारदस्त मराठी कुटुबाला आवडेल यात शंका नाहीं.

□ □ □

[ पृष्ठ चार वरून चालू ]

India (Consequential Provision) Act 1949 नुसार समस्त ब्रिटिश कायदे पूर्वीसारखेच भारतांत लागू होतील– मग भारत Republic असो किंवा नसो. The British Nationality Act म्हणतो, कॉमनवेल्थच्या नागरिकाना ब्रिटिश प्रजेचा मान मिळेल. या कायद्याचा अर्थ असा, की कुणीहि भारतीय नागरिक (मग तो प्रधानमंत्री असो की राष्ट्रपति असो) इंग्लडमधें अन् इंग्लडच्या कॉलन्यामधें भारतीय नागरिक तर आहेच पण ब्रिटिश प्रजा म्हणूनहि ओळखला जाईल. कॅनडा, ऑस्ट्रेलिया वगैरे डोमिनियन्सचे नागरिक असे ओळखले जातात. पण कुणाहि अमेरिकन माणसाला किंवा रशियन माणसाला ब्रिटिश प्रजा म्हटल जाणार नाही. नतर त्याच कायद्यात आणखी अस म्हटल आहे, की कॉमनवेल्थमधले देश हे इंग्लंडकरता परदेश (foreign states) नव्हेत; म्हणजे U. S. A., U. S. S. R. हे इग्लंडकरतां परदेश आहेत, पण भारत, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, पाकिस्तान वगैरे परदेश नाहीत. भारतांत पण एक कायदा आहे— The Constitution (Declaration as to foreign states) Order, 1950. या कायद्यांत अस म्हटलं आहे, की कॉमनवेल्थमधले देश हे भारताकरता परदेश नाहीत. म्हणजे अमेरिका भारताकरतां परदेश असला, तरी कायद्याच्या दृष्टीन इग्लंड परदेश नाही. आणखी, ब्रिटिश कायद्याचा एक maxim असा, की विशेष रीतीनं पास झालेल्या कायद्याशिवाय किंवा सशस्त्र बडाशिवाय राणीचं राज्य संपत नाही. अमेरिका, आयर्लंड नि बर्मा याच्या घटनात अशी सुस्पष्ट घोषणा आहे, की ब्रिटिश साम्राज्याशी असलेली आमचीं सगळी बंधन आतां तुटली. अन् ह्या देशानी स्वत:ला निव्वळ Sovereign म्हटलेले नाही, तर 'Independent Sovereign' म्हणून घोषित केलं आहे. आंतरराष्ट्रीय व्यवहारांत एका राष्ट्राचा दुसऱ्या राष्ट्राशी असलेला स्वतत्र सबंध 'Independent' या शब्दान दाखवला जातो. युद्ध पुकारण्याची क्षमता नि शातता स्थापन करण्याची क्षमता हेच Independent State च लक्षण आहे. ही क्षमता भारताला आहे की नाही, याबद्दल घटनेच्या तज्ज्ञांना शंका आहे. भारताची घटना ही जगातली सर्वांत मोठी घटना आहे. पण अमेरिका, आयर्लंड किंवा ब्रह्मदेश यांनी जशी घोषणा केली आहे की ब्रिटिश साम्राज्याशी असलेले आमचे सगळे संबंध आजपासून तुटले, अस काही आमच्या घटनेत कुठंतरी आहे का ? किंवा Independent शब्द तरी वापरला गेला आहे का ? भारताचं स्वातंत्र्य काही सशस्त्र बडामुळं आलेल नाही, ही गोष्ट सागण्याची बहुतेक काही जरुरी नाही. तर मग आमच्यात अन् कॅनडा किंवा आस्ट्रेलियात फरक तरी काय ? फरक बहुतेक एकदरीनं एवढाच, की, आमच्या राष्ट्राच्या शाशनव्यवस्थेच्या डोक्यावर निवडलेला एक माणूस राष्ट्रपति असतो, अन् तिकडे असतो राणीन नेमलेला (पण डोमिनियन मत्रिमंडळाच्या सल्ल्यानं) एक गव्हर्नर जनरल. डोमिनियन्स राणीचं आनुगत्य स्वीकारतात, पण आम्ही मात्र तिला Symbolic Head म्हणून मान्यता दिली आहे. हें तारतम्य फक्त भाषेंतलंच आहे, की खराच काही फरक यात कुठ आहे, तें मला माहीत नाही. कारण कॅनडा-ऑस्ट्रेलियादेखील स्वेच्छेनंच कॉमनवेल्थचे समासद आहेत—वाटल्यास आमच्यासारखच त्यानाहि कॉमनवेल्थमधून बाहेर पडतां येत. पण जोपर्यंत ते अन् आम्ही कॉमनवेल्थचे समासद म्हणून आहोत, तोंपर्यंत आमची स्टेटस एकमेकाहून वेगळी नाही हें अमान्य करणं म्हणजे सत्याची दखल न घेण्यासारखं आहे. सुतराम्, अन्नदाशकराचें म्हणणे अपुऱ्या विचारातून जन्म पावलेलं आहे अस म्हणून उडवून लावतां येण्याजोगं नाही.

निर्मल सेन

**[ देश : १६ फेब्रुवारी १९६३ मधून ]**

अन्नदाशकरबाबूंनी भारताला ज्या दृष्टिकोनातून दाखवलं आहे ('देश' चा १९ जानेवारीचा अंक), तो दृष्टिकोन विसंगत नि निव्वळ काल्पनिक आहे, ही गोष्ट खाली दिलेल्या उताऱ्यावरून सिद्ध होईल—

"On 17th May 1949, the Commonwealth Prime Ministers' Conference held at London on April 27th, 1949, where our Prime Minister, Pandit Nehru declared that notwithstanding her becoming a Sovereign Independent Republic, India will continue 'her full membership of the commonwealth of Nations and the acceptance of the King as the symbol of the free association of independent nations and as such the head of the commonweath. Further in broadcast to the nation in in the same month, Pandit Jawaharlal Nehru stated this: 'It must be remembered that the commonwealth is not a superstate in any sense of the term. We have aggreed to consider the King as the symbolic head of this free association. But the Government has no fuuction attached to that status in the commonwealth. So far as the constitution of India is concerned, the King has no place and we shall owe no allegiance to him.'" (Mahajan & Sethi-Modern Governments, पान ५९५)

शिवाय —

" It is to benoted that this declaration is extralegal and there is no mention of it in the constitution of India. It is a voluntary declaration and indicates a free association and no obligation. " (D. Basu-Introduction to Indian Constitution,पान ५०)
यावरून सहज लक्षात येईल, की भारतवर्ष (The Republic of Indian Union)–अंतर्गत किंवा आतरराष्ट्रीय–कोणत्याच व्यवहारात कुणाचाच बाधील नाही.

असीमकुमार विश्वास

## मॅकमहोन रेषा

**[ देश : १९ जानेवारी १९६३ मधून ]**

पांच जानेवारीच्या 'देश' च्या अंकांत, मॅकमोहननें सीमा आंखली, त्या प्रस्तावासबंधीं श्री. अन्नदाशंकर राय यानी असं लिहिल आहे, की 'वरच्या लोकाचा हुकूम घेतल्याशिवाय आपल्याला (चिनी प्रतिनिधीला) सही करता यायची नाही, म्हणून कागदपत्र चीनच्या केंद्रीय सरकारकडे पाठविण्यांत आले. चीन सरकारनं मंजुरी दिली नाहीं.'
दुसऱ्या एके ठिकाणी त्यानीं असं म्हटलं आहे, की 'भारतानं सही दिलेली आहे, तिबेटने दिलेली आहे, चीनन सही दिलेली नाही.' पण त्याच अंकांत 'ड्रॅगनच्या दातांतलं विष' या लेखमालेतल्या लेखात श्री. गौरकिशोर घोष याचं म्हणण मात्र असं आहे, 'की मौजेची गोष्ट अशी, की सिमला कन्व्हेन्शन' मधें मॅकमहोन लाइनबद्दल कोणत्याच पक्षान कांही आक्षेप घेतला नव्हता. चिनी सरकारच्या प्रतिनिधीनी — मि. इव्हान चेन यानी — इतर सगळया बाबतीत टोलवाटोलवी केली, तरी मॅकमहोन लाईन मान्य करून नकाशावर सही करण्यात त्यानी चांगलीच तत्परता दाखविली होती.. ...'
आतां प्रश्न असा, की यांत बरोबर कोण ? अन्नदाशंकर की घोषमहाशय ?

नगेन नियोगी

### गौरीकिशोर घोषांचें उत्तर

श्री. नगेन नियोगी याच्या पत्राबद्दल धन्यवाद. मॅकमहोन लाइनबद्दलचे श्रद्धेय अन्नदाशकर राय याचं नि माझं म्हणणं परस्परविरोधी आहे. यामुळं नियोगीमहाशयाच्या मनांत गोंधळ उडाला आहे. अन् एकटे नियोगीमहाशयच तेवढे काय म्हणून, इतरहि कितीतरी लोक गोंधळात पडले आहेत. अन् ते बरोबरच आहे.
मॅकमहोन लाइन अमीमासित आहे, म्हणून श्रद्धेय रायमहाशयानी जो सवाल टाकलेला आहे, त्याच्या बाजूनं ते काय साक्षीपुरावे दाखल करतील मला माहीत नाही. ज्या माहितीवर मी माझं म्हणणं आधारलेलं आहे, ती माहिती मी इथं सगळयाच्या माहितीकरतां पेश करतों.
(१) माझ्या हातीं मॅकमहोन लाइनबद्दलच्या ऐतिहासिक नकाशाची जी फोटोस्टॅट कॉपी आहे, तिच्या बाजूला ब्रिटिश प्रतिनिधि सर हेन्री मॅकमहोन, चिनी प्रतिनिधि मि. इव्हान चेन अन् तिबेटी प्रतिनिधि मि. लोचेन शात्रा याच्या सह्या आहेत. १९१४च्या २७ एप्रिलला ह्या नकाशावर सह्या झालेल्या आहेत. भारत सरकारच्या अनुमोदनानं प्रचार झालेला हा नकाशा खोटा आहे असं जोपर्यंत सिद्ध होत नाही, तोपर्यंत माझं म्हणणहि पण खोट ठरवितां येणार नाही. (नकाशा 'ड्रॅगनच्या दाातल विष'च्या या अंकातल्या लेखाकात पुनर्मुद्रित केला आहे.)
(२) सिमला बैठकीबद्दलची जी काही कागदपत्रं प्रकाशित झाली आहेत, त्यावरून असं दिसतं (त्यात असं म्हणण्यात आले आहे), की ब्रिटिश, तिबेट अन् चीन सरकरानी सिमला बैठकीत आपापले 'प्लेनिपोटेन्शिअरीज्' पाठवले होते.
PLENIPOTENTIARY या इग्रजी शब्दाचा अर्थ शब्दकोशांत असा दिला आहे — " an ambassador given full power by his government to act as he thinks."
शब्दकोशातल्या या अर्थावरूनच अस दिसतं, की बैठकीतल्याहि ठरावावर आपल्या बुद्धचनुसार सही करायची सपूर्ण क्षमता चिनी प्रतिनिधीला होती. म्हणजे श्रद्धेय रायमहाशयाच 'वरच्या लोकाचा हुकूम घेतल्याशिवाय आपल्याला (चिनी प्रतिनिधीला) सही करता यायची नाही.' हें म्हणण टिकत नाहीं.
अर्थात् शब्दकोश हें काहीं प्रमाण नव्हे. म्हणून तेव्हाच्या चिनी सरकारच्या परराष्ट्रीय खात्यान ब्रिटिश प्रतिनिधीला ७ ऑगस्ट १९१३ रोजी जी नोट पाठवली होती, ती मी इथें देतो —
"A Presidential Order was recieved on 2nd August appointing Ivan Chen as Special Plenipotentiary of Chinese Government for the conduct of negotiations relating to Tibet. It therefore devolves upon our Goverment to order Ivan Chen to proceed to India as speedily as possible there to open negotiations for treaty jointly with the Tibetan Plenipotentiary and the Plenipotentiary appointed by the British Government and to sign articles which may be agreed upon for the purpose of removing all difficulties which have existed hitherto in regard to Tibet. "
(३) शेवटीं माझ्या म्हणण्याच्या समर्थनादाखल ब्रिटिश-भारत, तिबेट अन् चिनी सरकारांनी आपापल्या प्रतिनिधीना जी ओळखपत्रं दिली होती, त्यांतून काही उतारे देतों –
(अ) ब्रिटिश-भारत सरकारच्या प्रतिनिधीच्या ओळखपत्रात असं म्हटलेलं होतं, की
" To sign for Us and in Our name everything so agreed upon and concluded and to do and transact all such matters as may appertain thereto ... "
(आ) चिनी प्रतिनिधीचं ओळखपत्र –
"Ch'en I-fen (Iven Chen) is hereby appointed Special Plenipotentiary for Tibetan negotiations. "
(इ) तिबेटी प्रतिनिधीच्या ओळखपत्रात दलाई लामानं असं म्हटलं होत, की

"I hereby authorise Srid Dzin sha-tra Paljor Doji to decide all matters beneficial to Tibet and I authorise him to seal all such documents."

*त्यानतरहि श्री. राय याच्या 'भारताने सही दिलेली आहे, तिबेटनं सही दिलेली आहे, चीनन सही दिलेली नाही' या इति-इति-नेति-* वाचक म्हणण्याला आम्ही मान डोलवावी काय ?

गौरकिशोर घोष

□ □ □

## एक शंका

'माणूस'च्या गेल्या अकात प्रसिद्ध झालेल्या श्री. अन्नदाशकर राय याच्या 'योगभ्रष्ट' या लेखात एके ठिकाणी असे म्हटले आहे, की 'एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे, की १९१४ साली तिबेटने करारावर सही दिली, तेव्हा पूर्व सरहद्दीवरचा काहीं भाग त्याच्या पदरात पडला होता, म्हणून दक्षिण सरहद्दीवर काही भाग त्याने सोडला होता. म्हणजे, चीनकडून काही त्याला परत मिळाले होते किंवा परत मिळेल अशी आशा त्याला वाटली होती, म्हणून ब्रिटिश सरकारला काही सोडून द्यायला किंवा आधीपासूनच इग्रजानी बळकावून ठेवलेलें काही सोडायला तो राजी झाला होता.'

हे जर खरे असेल तर, आणि भारतानें तिबेट हा चीनचाच प्रांत आहे हे मान्य केलेलें असल्यानें, सिमला-बैठकीतून भारताकडे आलेला हा प्रदेश आपण चीनला सरळ देऊन टाकावा, हें योग्य होणार नाही काय ? तसेच हा भाग कोणता हें ठरविणारे सिमला-बैठकीपूर्वीचे व नतरचे भारताचे नकाशे 'माणूस' प्रकाशित करील काय ?

एरवीं इतक्या सम्यक्पणें व साधार समस्येची मांडणी करणारा लेख मराठीत अन्यत्र वाचनात आला नव्हता. हा लेख प्रकाशित केल्याबद्दल धन्यवाद.

सुधीर कोलटकर, भांडूप

## उत्तर

आपण म्हणतां तसा प्रदेश चीनला देणे योग्य होणार नाही. कारणें :

(१) १९५० सालीं चीननें तिबेटवर हल्ला केला तेव्हां भारतानें चीनचा निषेधच केलेला आहे. भारतानें चीनचे तिबटवरील अधिराज्य (Suzerainty) मान्य केलें, सार्वभौमत्व (Sovereignty) नव्हे. याबाबत भारतीय लोकसभेत दि. ७ डिसेंबर १९५० ला केलेल्या भाषणात पं. नेहरू यांनी सागितले. –

'Since Tibet is *not the same as China*, it should ultimately be the wishes of the people of Tibet that should pervail, and not any legal or constitutional arguments.

(२) तिबेटचें लोकमत काय हा महत्त्वाचा प्रश्न. १९५० साली युनोपुढें माडलेल्या फिर्यादीत तिबेटनें त्याच्या स्वातंत्र्याचे पुरावे म्हणून मगोलियाशी व इतर देशाशी झालेले करार, चीन-जपानी युद्धात पाळलेली तटस्थता, बाडुग परिषदेंत मिळालेली मान्यता, परराष्ट्रानी मान्य केलेले तिबेटी सरकारचे पासपोर्ट वगैरे गोष्टीचा उल्लेख केला आहे. '१९११–१२ सालापासून तिबेट वस्तुतः आणि कायदेशीर रीत्या चीनपासून विभक्त असे सपूर्ण सार्वभौम राष्ट्र म्हणून उभें राहिलें' हा कायदेपंडिताच्या आंतरराष्ट्रीय न्यायमंडळाचा निवाडाहि याबाबत मार्गदर्शक ठरावा. तेव्हा तिबेटचे पूर्वपद प्रथम त्याला लाभणें अवश्य आहे. तोंपर्यंत तिबेटचा तथाकथित प्रदेश चीनला भारतानें देण्याचा प्रश्नच उद्‌भवूं शकत नाही.

तिबेट स्वायत्त होऊन आपल्या प्रदेशाची भारताकडे मागणी करण्यास येईल तेव्हा प्रश्न सहजीवनाच्या तत्त्वानुरूप व त्या वेळच्या आंतरराष्ट्रीय नियमानुरूप सोडविण्याचा भारतानें प्रयत्न करावा हें ठीकच आहे. सिमला बैठकीपूर्वीचे व नतरचे नकाशे प्रसिद्ध करण्यासाठी 'माणूस' खटपट करील. पण केव्हां ! मराठी वाचकानी या प्रश्नाची एका विशिष्ट पातळीवरून चर्चा आरभली व चर्चेच्या पूर्तीसाठी नकाशे देणें अवश्यच होऊन बसलें तर सरकारदरबारी नकाशांसाठी 'माणूस' पत्रव्यवहार सुरू करील. पण आधी 'चर्चा' अवश्य. नुसते 'अभिप्राय' नकोत.

संपादक

□ □ □

# राजा शिवछत्रपति

भाग एक ते दहा

ब. मो. पुरंदरे



एक : जन्म आणि पूर्वस्थिति

दोन : स्वराज्याची प्रतिष्ठापना

तीन : अफजलखान-मोहीम

चार : सिद्दी जौहर-मोहीम

पांच : शाइस्तेखान आणि सुरत

सहा : मिर्झा राजे जयसिंह-मोहीम

सात : आग्रा : कैद आणि सुटका

आठ : सुराज्याची प्रतिष्ठापना

नऊ : राज्याभिषेक

दहा : दक्षिण दिग्विजय

मूल्य :: सोळा रुपये

राजहंस प्रकाशन : ४१९ नारायण पेठ, पुणें २.

 Regd. No. : B 9304




# शिवचरित्र प्रसार योजना

आजच्या आणिबाणीच्या प्रसंगीं

छत्रपति शिवरायांच्या चरित्राचा आणि चारित्र्याचा आदर्श साऱ्या भारतीयांपर्यंत नेऊन पोहोचविणें प्रत्येक मराठी माणसाचें कर्तव्य आहे.

'राजहंस प्रकाशन संस्थे'नें श्री. ब. मो. पुरंदरेकृत 'राजा शिवछत्रपति' या दशखंडात्मक शिवचरित्रग्रंथाचा प्रसार करण्याची एक अभिनव व आटोपशीर योजना तयार केली आहे.

आमच्या असंख्य हितचिंतकांना
या योजनेंत
सहभागी होतां येण्यासारखें आहे.

*कृपया पत्रानें वा समक्ष चौकशी करावी*

**राजहंस प्रकाशन संस्था**

४१९ नारायण पेठ, पुणें २.


संपादक : मुद्रक : प्रकाशक : **श्री. ग. माजगांवकर** ▫ प्रकाशनस्थळ : **राजहंस प्रकाशन**, ४१९ नारायण पेठ, पुणें २.

मुद्रणस्थळ : **संगम प्रेस** प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणें २.